

म. पटवर्धन

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ४५३

REFBK-0006379

दा. क्र. ~~६२३९~~ ६३७९

# हितपत्रें

१९७०

REFBK-0006379

ना. म. पटवर्धन

ग्रं. क्र. ~~६२३९~~ ६३७९

मूल्य ३ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी
१९१ शनवार पेठ, पुणें २

संचालक
भ. व्यं. देशमुख,
बी.ए., एल्‌एल्. बी.

१ पुढील आवृत्तीचे व उतारे वगैरे घेण्याचे सर्व हक्क लेखकांकडे आहेत.
२ मुखपृष्ठावरील चित्र श्री. डी. डी. दलाल यांचें आहे.

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
आर्यभूषण मुद्रणालय,
९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

क्रमांक ४०
१० जुलै

# समर्पण

हीं ‘ हितपत्रें ’
तीं लिहिण्यास कारणीभूत झालेल्या
सर्व लहान-थोर व्यक्तींना "
सादर व सप्रेम

## ना. म. पटवर्धन यांचीं

### इतर पुस्तकें

१ *आमची दिवाळी*
(आवृत्ति २ री) ०-६-०

२ *जगांतील मौजा*
(आवृत्ति ३ री) ०-६-०

३ *जगांतील मुलें*
(आवृत्ति १ ली, पुनर्मुद्रण)
०-१०-०

४ *साम्राज्यांतील आपले संबंधी* (आवृत्ति १ ली, पुनर्मुद्रण) ०-१०-०

५ *जगांतील प्रमुख पिकें व तीं पिकविणारे लोक*
(आवृत्ति २ री) ०-६-०

६ *वाङ्मयमाला-पुष्प १ लें*
[प्रो. वा. म. जोशी यांचें सहकार्यानें] (आवृत्ति ५ वी)
१-४-०

७ *वाङ्मयमाला-पुष्प २ रें*
[प्रो. वा. म. जोशी यांचे सहकार्यानें] (आवृत्ति ५ वी, पुनर्मुद्रण १-६-०

८ *आमच्या इंदूचें शिक्षण*
(आवृत्ति २ री) १-०-०

९ *तिचें अखेरचें पत्र, व अघोर अहंकार* १-०-०

# प्रस्तावना

हिंगणें बुद्रुक येथील अध्यापिकाशाळेचे माजी प्रिन्सिपाल ना. म. पटवर्धन, एम. ए., एल. टी. यांनीं लिहिलेल्या "हितपत्रें" या पुस्तकाची हस्तलिखित प्रत त्यांनीं मला दोन दिवस बसून वाचून दाखविली. त्यांच्या या पुस्तकास मीं प्रस्तावना लिहावी म्हणून त्यांनीं मला आग्रहाची विनंती केली. अशा प्रसिद्ध विद्वान् अध्यापकाच्या पुस्तकास, माझ्या सारख्या विनपदवीधर शिपायानें प्रस्तावना लिहिणें म्हणजे भरजरी शालजोडीला खाकी कपड्याचें ठिगळ देण्यासारखें होईल, यासाठीं आपण कोणा विद्वानाकडून प्रस्तावना लिहिण्याचें काम करून घ्यावें, म्हणून मीं त्यांना सांगितलें. मला आपल्यासारख्या शिपायाच्या हाताचीच प्रस्तावना पाहिजे असा त्यांनीं आग्रह धरल्यानें, व त्यांची माझी बऱ्याच दिवसांची ओळख असल्यानें, त्यांना नाराज करण्याचें माझ्या जिवावर आल्यानें, प्रस्तावनेदाखल मी दोन शब्द लिहिण्याचें धाडस करीत आहें, त्याबद्दल वाचक मला माफी करतील.

प्रो. पटवर्धन यांनीं लहान मुलांकरितां पांच व आईबापांना मार्गदर्शक होईल असें एक, याप्रमाणें सहा पुस्तकें पूर्वीच प्रसिद्ध केलीं आहेत व तीं सर्वांस प्रिय झालीं आहेत. " आमच्या इंदूचें शिक्षण " हें यांचें पुस्तक मीं वाचलें आहे. त्यांतील विचारसरणी मला फार आवडली. ज्यांना मुलें असतील त्या आईबापांनीं हें पुस्तक जरूर वाचावें, व मानसशास्त्राच्या आधारें व अनुभवावरून, त्यांनीं केलेल्या सूचनांचा जरूर अंमल करावा.

' हितपत्रें ' या प्रस्तुतच्या पत्ररूप पुस्तकांत पटवर्धनांनीं आपल्या आप्तेष्टांस व विद्यार्थ्यांस केलेला बोध व सांगितलेला अनुभव हेहि अतिशय सुंदर आहेत. पत्र-

रूपानें ज्ञान देणें किंवा बोध करणें ही मराठी भाषेंतील जुनीच प्रथा आहे. लोकहितवादींचीं पत्रें, हरीभाऊ आपट्यांचीं पत्रें वगैरे पूर्वींच प्रसिद्ध झालेलीं आहेत. परंतु प्रो. पटवर्धन यांच्या या 'हितपत्रां'मधील मानसशास्त्राची खुमारी कुछ औरच आहे असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. या पत्रांतील विचारसौंदर्य व भाषासौंदर्य हीं सांगून समजावयाचीं नाहींत–प्रत्यक्ष पुस्तक वाचूनच त्यांचा आनंद उपभोगिला पाहिजे. रोजच्या व्यवहारांत चालत असलेल्या गोष्टींचें इतक्या बारकाईनें निरीक्षण करून व त्याला मानसशास्त्रांतील तत्त्वांची जोड देऊन, त्यांत चांगलें कोणतें व वाईट कोणतें, घ्यावें कोणतें व टाकावें कोणतें, हें स्पष्टपणें समजाऊन सांगणें ही एक कठीण कला आहे, व ती सर्वांसच साधते असें नाहीं. प्रो. पटवर्धन यांनीं ही कला पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें व अध्यापनानें अवगत केली आहे असें त्यांचीं हीं ' हितपत्रें ' वाचलीं म्हणजे दिसून येतें.

असें उत्कृष्ट पुस्तक प्रसिद्ध करून मराठी वाङ्मयांत भर टाकल्याबद्दल मी प्रो. पटवर्धन यांचें अभिनंदन करतों. समाजांतील तरुणांनीं, प्रौढांनीं व वृद्धांनींहि हें पुस्तक वाचून आपला जीवनक्रम सुधारून जास्त सुखकर करावा अशी मी त्यांना शिफारस करतों.

' वास्तव, ' ' विनोदि, ' ' पुरोगामी ' इत्यादि सोज्वल नांवाखालीं हल्लीं प्रसिद्ध होत असलेल्या वाङ्मयाचा वाचकांना आतां इतका वीट येऊं लागला आहे कीं, सदरहु पुस्तकासारख्या हितप्रद व बोधप्रद वाङ्मयाचें ते मनापासून स्वागत करतील असा विश्वास आहे.

सख्याबाग,
यशवंत निवास, बडोदें.
१–३–४३

**नानासाहेब शिंदे**
जनरल
रिटायर्ड-बडोदा-आर्मी

# आभार

या माझ्या ' हितपत्रां ' तील वहुतेक विचार प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ विल्यम मॅक्डुगल व डेल कार्नेजी यांनीं आपल्या सुंदर ग्रंथांत ग्रथित केलेल्या विचारां-पैकींच आहेत असें जाहीरपणें कबूल करण्यांत मला आनंदच होत आहे. मला मिळालेला प्रसाद माझ्या मित्रमंडळींना देऊन त्यांचींहि मनें प्रसन्न व उन्नत करतां आल्यास मला धन्यताच वाटेल.

जनरल नानासाहेब शिंदे यांनीं माझ्या विनंतीला मान देऊन प्रस्तावना लिहिली यावद्दल मी त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. तलवार व लेखणी सारख्याच लीलेनें खेळवणारी, वाल–तरुण–वृद्ध या सर्वांना सारखीच प्रिय व आदरणीय वाटणारी, व तरुणांना विचारीपणाचा अन् संयमाचा–तर उलट वृद्धांना भावनेचा अन् धडाडीचा धडा स्वतः घालून देणारी धीरोदात्त व्यक्ति या पुस्तकाला प्रस्तावक म्हणून लाभली हें मी मोठ्या भाग्याचें समजतों.

या माझ्या लिखाणाला नांव काय द्यावें यासंबंधीं मला मोठा प्रश्न पडला होता. ' माझीं पत्रें ' असें म्हणून मी मोकळा होणार होतों; व तसें केलें असतें तर नांव आकर्षक झालें असतें यांत शंका नाहीं. पण ' पत्र ' म्हणतांच ज्या कांहीं अपेक्षा (–साधी, धावती, घरगुति भाषा, हितगुजात्मक मजकूर, लेखकाच्या व्यक्ति-मत्वाचा आविष्कार, सुटसुटीतपणा, खेळकर वृत्ति, व मुख्यतः म्हणजे कोणत्याहि वोधाचा किंवा उपदेशाचा अभाव वगैरे– ) तंत्रानें चालणाऱ्या आधुनिक वाच-काच्या मनांत उत्पन्न होतात त्या सदरहु लिखाणांत पूर्ण होत नसल्यामुळें तें नांव ठेवणें योग्य वाटेना. ' पत्रें ' याशिवाय दुसरें नांव सुचत तर नाहीं, आणि

'पत्र' हें नांव निर्दोषपणें लागू तर पडत नाहीं अशा विचारापत्तींत असतांना श्री. तात्यासाहेब केळकरांनीं 'हितपत्रें' हें नांव सुचविलें व सर्व दृष्ट्या तें बरें वाटून तेंच कायम केलें. तात्यासाहेबांनीं हें जें मार्गदर्शन केलें त्याबद्दल मी त्यांचेहि आभार मानतों.

सौ. गंगुबाई, प्रि. बा. म. जोशी, व प्रि. ना. ग. नारळकर यांनींहि बराचश्या बहुमोल सूचना करून आपलें आप्तकार्य उत्तम प्रकारें बजावलें याबद्दल आणि प्रकाशक देशमुख यांनीं प्रकाशनाचे बाबतींत बरीच आस्था, हौस व धडाडी दाखविली याबद्दल मी त्या सर्वांचेहि आभार मानतों.

दांड्याबाजार–बडोदें
१–५–४३

ना. म. पटवर्धन

१०
१०३९
नो. २८७१६
१४-१२-६८

# तीर्थरूप अण्णा यांस— १

*वडिलांचे सेवेसीं कृ० शिर सा. नमस्कार, वि. वि.*

आपले आशीर्वाद घेऊन निघालों तो दुसरे दिवशीं येथें येऊन सुखरूप पोंचलों. गाडी पॅसेंजर असल्यामुळें तींत बराच वेळ काढावा लागला, पण बसावयास जागा मात्र मुबलक मिळाली. संसारांतल्याप्रमाणें प्रवासांतहि कांहीं सोयी तर कांहीं गैरसोयी या असावयाच्याच; पण त्यांतल्यात्यांतच सोयी करून घ्यावयाच्याच अश्या इराद्यानें वागल्यास माणसाला थोडेंबहुत समाधान मिळूं शकतेंच.

मुंबईस अधिक वेळ न घालवितां काम झाल्यावरोबर तडक इकडे यावयास निघालों हेंहि बरेंच झालें; कारण दुसरेच दिवशीं आगगाडीचे मार्गांत कांहीं बिघाड होऊन गाड्या येण्याजाण्याच्या बंद झाल्या आहेत. अश्या कांहीं गोष्टी पाहिल्या म्हणजे आयुष्यांत नशीब म्हणून कांहीं आहे याचा प्रत्यय येतो. साध्या खुशालीच्या पत्रांत ‘ नशीब ’, ‘ संसारांत सोयी करून घेण्याच्या इराद्यानें वागणें ’ वगैरेसारख्या तात्त्विक प्रश्नांचा उल्लेख करण्याचें सुचावें हें जरा चमत्कारिकच दिसतें, नाहीं? पण आज बरेच दिवस आपल्या स्थितीसंबंधीं जे विचार मनांत घोळत आहेत त्यांना या निमित्तानें वाचा फुटत आहे येवढेंच.

गेले कांहीं दिवस—विशेषतः गेलें वर्षभर आपण आपल्या मनाला जो निष्कारण

त्रास करून घेत आहां, व त्यामुळें एकंदर कुटुंबामध्यें जी बेदिली व असमाधान उत्पन्न झालीं आहेत त्याचें राहून राहून फार वाईट वाटतें. यासंबंधीं आपणांशीं समक्षच एकदा बोलावें, व कांहीं उपयोग झाला तर पाहावा म्हणून मीं आपली खाजगी गांठ घेण्याचा कितीतरी प्रयत्न केला. पण प्रत्येक खेपेस कांहीं ना कांहीं सबबींवर आपण ती गोष्ट घडूं दिली नाहींत. आतां काय डोकें चढलें आहे, आतां काय पोटांत गलबलतें आहे, आतां काय शौचाला जावयाचें आहे, असें प्रत्येक खेपेस कांहीं ना कांहीं होत जाऊन समक्ष बोलण्याचें तसेंच राहून गेलें, आणि म्हणून आज पत्रांतूनच लिहिण्याला उद्युक्त झालों आहें. लिहून बोलण्याचें योजलें हेंहि एकप्रकारें बरेंच झालें. कारण हल्लीं तुम्हांला मोठ्यानें बोलल्याशिवाय ऐकूं येत नाहीं; आणि त्यामुळें त्यांतील खाजगीपणा नाहींसा होतो. शिवाय माणूस मोठ्यानें बोलावयाला लागला म्हणजे तुम्हांला तो भांडतो आहे असें वाटतें; व मग संभाषणाचें शांत व विचारविनिमयाचें स्वरूप नाहींसें होऊन त्याला भांडणाचें व हमरीतुमरीचें रूप प्राप्त होतें. तेव्हां आतां जें कांहीं मी पत्रानें सांगणार आहें त्याचा–आपणांस सवड असेल तेव्हां, व शांतपणें ऐकून घेऊन विचार करण्याच्या मनःस्थितींत आपण असाल तेव्हां–विचार करावा अशी विनंति आहे.

हें करण्यांत माझ्या हातून लहान तोंडीं मोठा घांस घेण्यासारखें होत आहे याची मला पूर्ण जाणीव आहे. माझ्यापेक्षां आपण, नाहीं म्हटलें तरी दहा बारा पावसाळे जास्त पाहिले आहेत. वाढत्या वयाबरोबर येणाऱ्या व्यावहारिक शहाणपणांत भारतभागवतादि पुराणांच्या आपल्या व्यासंगाची भर पडली आहे. माझें तत्त्वज्ञानाचें वाचन केवळ एकदोन वर्षांचें, व तेंहि फक्त परीक्षा पास होण्यापुरतेंच होतें. उलट आपण आज चाळीस वर्षें आपलीं पुराणें वाचीत आहां व व्यासपीठावरून आपल्या श्रोत्यांना ऐकवून त्यांना चिरंतन समाधान प्राप्त करून दिलें आहे–देत आहां. आपण दहा वीस माणसांचा संसार केला आहे, तर सुदैवानें म्हणा–दुर्दैवानें म्हणा मला तो करण्याची आयुष्यांत संधीच मिळाली नाही. असें असूनहि मी जर आपल्याला दोन गोष्टी सांगण्याचें–नव्हे, आपणांपुढें मांडण्याचें धाडस केलें तर मला त्याची क्षमा करा. आजपर्यंत माझे इतर अपराधहि आपण मोठ्या मनानें पोटांत नाहीं का घातलेत ?

कर्त्यासवरत्या व बरोबरीच्या पत्नीचा वियोग या वयांत होणें ही खरोखरच फार मोठी आपत्ति यांत शंकाच नाहीं. मनुष्य तरुणपणीं येवढी यातायात व येवढा

आटापिटा कां करतो, तर पुढचें उर्वरित आयुष्य सुखासमाधानांत जावें म्हणून; आणि हें सुखसमाधान मुख्यतः ज्या पत्नीवर अवलंबून असतें तिनेंच असा ऐन अवसानीं दगा दिला तर माणसाला अतिशय दुःख होऊन तो कांहीं काळ तरी गांगरून गेल्यास नवल नाहीं. पण तो काळ गेल्यावर मनाची विसकटलेली घडी त्यांतल्या-त्यांत चापून चोपून बसवून त्यानें पुन्हा आनंदांत राहण्याचा प्रयत्न करावयास नको काय ? 'यथा काष्ठंच काष्ठंच' हें सुभाषित तुम्हीं हजारदां वाचलें असेल, व इतरांना उपदेशिलें असेल. नियतीच्या इच्छेप्रमाणें कोणतें तरी एक लाकूड केव्हां तरी फुटून दुसरीकडे वाहात जाणारच. समजा, झालें त्याच्या उलट झालें असतें तर ? स्वतः आजारी पडलां असतां तुम्हीच नव्हता का म्हणत कीं 'माझ्यामागें एकटी राहाण्या-पेक्षां तीच माझ्या अगोदर गेली असती तर सोनें झालें असतें' ? मग आतां वहिनी भरल्या घरांतून अहेवपणीं गेल्यावर तुम्हांला ते आपले पूर्वीचे शब्द कां नाहीं आठवूं ? ती बिचारी सुखांत गेली याचें सुख मानण्याऐवजीं आपण आतां एकटे राहिलों याचें वाईट वाटून कां घेतां ? आणि तसेंच पाहिलें तर तुम्ही खरोखरच एकटे आहां काय ? सुदैवानें तुम्हांला चांगला होतकरू व आज्ञाधारक मुलगा व पुतण्या दिला आहे. ममतेनें करायला पाठचे भाऊ व भावजया दिल्या आहेत. पण असलेल्याचें सुख न मानतां माणूस नसलेल्याचें दुःखच करीत बसलां तर त्याला कोण काय करणार ?

तुम्हीं म्हणतां कीं 'मुलगा व पुतण्या माझं ऐकत नाहींत, त्यांना माझेकडे पाह-ण्याला वेळ नाहीं, त्यांचें तें सुधारकी वागणं मला पसंत नाहीं.' पण मी विचारतों 'सुधारकी वागणें' 'सुधारकी वागणें' म्हणजे तरी काय ? ते नवीन तऱ्हेचे कपडे घालतात, केस ठेवतात, तुमच्या इतकी स्नानसंध्या व सोवळेंओवळें करीत नाहींत, हेंच ना ? पण अवा, या बाबतींत तुम्ही जरा काळवेळ लक्षांत घेऊन नको का पाहा-यला ! ते तरुण आहेत, नवीन चालीरीतींच्या माणसांत त्यांना वागावें लागतें, त्यांचे उद्योगधंदे निराळे झाले आहेत. नवीन पिढीच्या कपड्यासंबंधींच्या व वागणुकीसंबं-धींच्या तुम्हां वृद्धांच्या ज्या तक्रारी आहेत त्या बऱ्याचश्या अकारण आहेत असें म्हणावेसें वाटतें. तुम्ही स्वतःचें तारुण्य आठवा; तुमच्या त्यावेळच्या आवडीनिवडी आठवा; तुम्हांलाहि त्यावेळचीं जुनीं माणसें जें बोलत तें अनाठायीं व निष्कारण आहे असें कसें वाटत असे तें आठवा. तुमच्या त्या बदामी घेऱ्याबद्दल व लांब तुळतुळीत शेंडीबद्दल बाबा कमी का बोलत असत ? स्वतः गुडघ्यावर पागोटें बांधून

घालण्याऐवजीं तुम्ही रंगीबेरंगी लहान लहान वत्त्या पगडबंदाकडून बांधवून घेऊन घालीत असां तें त्यांना कितपतसें मान्य होतें ? त्यांच्याप्रमाणें बाराबंदी बंडया घालण्याचें सोडून तुम्ही तलम मलमलीचे मुंडेछाट सद्रे व सद्र्यांआंतून तांबूस रंगाचीं जाकिटें घालीत नसां का ? भरभक्कम तीनतळी जोडे वापरण्याऐवजीं उत्तर हिंदुस्थानी नाजूक चढाव वापरीत नव्हतां का ? हातांत भरीव बांबूचे सोडगें घेण्याऐवजी रुपेरी मुठीची बेताची छडी घेत नसां का ? मोठें थोरलें पांढरें दुबोटी आडवें गंध कपाळावर माखण्याऐवजीं लहानसेंच तांबडें चंद्रकोरी गंध लावीत नसां का ? तपकिरीला पितळी डबी न घेतां चांदीची डबी घेण्याचा शौक नव्हता का केलात ? उद्योगाच्या गर्दीमुळें घरच्या स्नानसंध्येकडे व पूजेअर्चेकडे जरा दुर्लक्ष करीत नसां का ? तुमचेंहि सोवळेंओवळें वडिलांच्या मानानें कमी कडक झालें नव्हतें का ? मी या सर्व आठवणी तुम्हांला कां करून देत आहें ? तुमचे दोष काढण्याकरितां नव्हे, तर गुण गाण्याकरितांच. वडिलांचा व तुमचा काळ बदलला हें ओळखून तुम्हीं आपल्या पोषाखा वगैरेंत जो बदल केलात त्यांत कांहीं वाईट नसून तो स्वाभाविकच आहे असें मानून वडिलांनीं तुम्हांला नांवें ठेवूं नयेत असें जसें तुम्हांला वाटत असे, तसेंच तुमच्या पुढच्या पिढीला वाटलें तर त्यांत त्यांची काय बरें चूक आहे ?

अवा, कालमानाप्रमाणें चालीरीती—नव्हे, धर्मसुद्धां बदलायला पाहिजे असें तुम्हीच नव्हतां का म्हणत, व स्वतःच्या वागणुकीचें समर्थन करीत ? बाबांचे व तुमचे खटके उडाले म्हणजे तुम्हीच नसां का त्यांना उदार मन करून नावडणाऱ्या गोष्टींकडे जरा कानाडोळा करण्यास सांगत ? मग, तेंच उदार मन तुम्हींहि करून नवीन पिढीच्या वागणुकीकडे जरा सहिष्णुतेनें पहाना ! मुलें खरोखर प्रकृतीनेंच वाईट निघालीं असतीं—तीं नादी—फंदी व व्यसनी निघालीं असतीं, खोटे व अनैतिक व्यवहार करीत असतीं, उधळेपणानें वागून कर्जबाजारी झालीं असतीं, देवाधर्मावर त्यांची श्रद्धा नसती, वडीलधाऱ्यांचा अपमान करणारीं झालीं असतीं तर त्यांच्यासंबंधीं येवढें अकांडतांडव करणें किंवा हीं बिघडलीं असें मानून खंत करणें वाजवी झालें असतें; पण तुमच्या पुण्याईनें अद्याप तरी तीं तशीं चांगलीं आहेत, हो. खरेंच सांगायचें म्हणजे मीहि जरा तुमच्या दृष्टीनें वाह्यातपणानेंच नाहीं का वागलों ? मोठ्या पगाराची सरकारी नोकरी सोडून कमी पगाराची खाजगी नोकरी धरली, शास्त्राला असम्मत असा विवाह केला, एक ना दोन. पण या सर्व गोष्टी तुम्ही

नाहीं का मोठ्या मनानें त्या वेळीं विसरलों ? मग तें मोठें मन आतांच कोठें गेलें ? उगीचच कां स्वतःला त्रास करून घेऊन इतरांच्या त्रासाला कारणीभूत होतां ?

तुम्ही म्हणाल, 'त्याकरितां नाहीं रे. मी पंगू झालों, दुसऱ्यांना भार झालों, याचं वाईट वाटतं.' वाईट वाटणें निराळें, व त्रागा करणें निराळें. पहिल्यामुळें स्वतःलाच त्रास होतो. दुसऱ्यानें इतरांना होतो. शिवाय असें कीं, म्हातारपणीं मनुष्य थोडाफार पंगू बनला व त्याचें दुसऱ्यांना करावें लागलें तर त्यांत इतकें वाईट वाटण्यासारखें तें काय ? वाढत्या वयावरोवर शरीर क्षीण होणें हा तर निसर्गाचा नियमच आहे. शरीर क्षीण होऊं नये व आपलें दुसऱ्याला करावें लागूं नये असें जर खरोखरच वाटत असेल तर क्षीणत्व येऊं नये, आरोग्य कायम राहावें म्हणून जरूर तें पथ्यपाणी, औषधोपचार वगैरे नकोत का करायला ? पण तुम्हां वृद्धांचें चुकतें तें इथेंच. पंगू झालों, पंगू झालों असें तोंडानें हळहळायचें मात्र, पण त्याला इलाज म्हणून करायचा नाहीं. वहिनींची व तुमची वाचावाची होते ती वरीचशी यामुळेंच नाहीं का होत ? तुम्ही पहांटेच्या चार वाजल्यापासून उठतां व लोकांना ( म्हणजे वास्तविक घरांतल्या माणसांनाच ) आपलें ओझें वाटूं नये म्हणून, झाड-झूड, धुणें-पाणी, वगैरे करायला धांवतां. शरीरानें होईल तोंपर्यन्त काम करावें, आळशीपणानें राहूं नये हें सर्व खरें; व येवढ्याच हेतूनें तुम्हीं काम केलें असतें तर त्यांत वावगें कांहींच नव्हतें. पण स्वतःची लाचारी दाखविण्याच्या व आपल्या उद्योगीपणानें इतरांना त्यांच्या आळशीपणाची जाणीव करून देण्याच्या इच्छेनें जेव्हां तुम्ही तावातावानें कामें करतां तेव्हां त्या कामाचें चीज न होतां बरें वाटण्याऐवजीं वाईटच वाटूं लागतें.

आणि आपण इतरांना भार झालों असें तरी तुमच्यासारख्या केल्यासवरलेल्या माणसाला कां वाटावें ? जन्मभर मीच इतरांचें करीन, इतरांना माझें कांहीं करावें लागलें तर तें मानहानीचें व नामुष्कीचें आहे, असें तुम्हीं काय म्हणून मानावें ? असें मानणें हाहि एक प्रकारचा दुरभिमानच आहे. आपण आपल्या शक्ती-प्रमाणें इतरांचें करावें व प्रसंगवशात् इतरांनाहि आपलें करूं द्यावें; योग्य वेळीं सेवा करावी नि योग्य वेळीं सेवा करून घ्यावी असाच सृष्टीचा नियम नाहीं का ? मी नेहमींच देत जाणार, घेणार मात्र केव्हांच नाहीं असें म्हणून कोणाचें तरी जगांत चालेल का ? जग दिल्या-घेतल्यानें चालतें—नुसत्या देण्यानें नाहीं—अन् घेण्यानें तर नाहींच—नाहीं. तुम्ही म्हणाल आपल्याकरितां दुसऱ्याला त्रास द्यावयाचा

नाहीं. तत्त्व फार चांगलें. पण खरें सांगूं? दुसऱ्यांना तुमचें करतांना जो त्रास होतो तो करावें लागतें म्हणून नव्हे, तर त्यांच्या केलेल्याचें तुम्ही चीज करीत नाहीं म्हणून होतो. तुमची भावजय व सून आपलेकडून तुमचें इतकें करतात त्याचें तुम्हीं कधीं समाधान मानलें आहेत काय? त्यांनीं शंभर गोष्टी कराव्या, पण एखादीच गोष्ट चुकून करायची राहिली किंवा या क्षणाची त्या क्षणाला केली तर लगेच तुम्ही घर डोक्यावर घ्यावयाला निघतां! प्यायला घेतलेली मुलगी बाजूला करून समईची कोजळी झाडायला सुनेला जरा उशीर झाला तर परवां तुम्हीं तिचे किती वाभाडे काढलेत, आठवतें? पोर रडत रडत म्हणाली सुद्धां—'शेळी जाते जिवानिशीं, खाणारा म्हणणार वातट!' तुमच्या त्या सरबत्तींत तुम्हांला तें ऐकूं आलें नाहीं म्हणून ठीक. नाहींतर 'मला कोल्हा म्हणतेस काय?' म्हणून दुसरा हल्ला सुरू झाला असता. सांगायचें काय कीं तुमचें करण्यांत त्यांना त्रास होतो असें नाहीं, तर तुमच्या त्या विशिष्ट वृत्तीमुळें त्यांना करण्यांत आनंद वाटत नाहीं.

तुम्ही म्हणतां 'मी मर मर मरतों, पण त्यांना सुख नाहीं, आणि म्हणून मला सुख नाहीं.' पण त्यांचेंहि नेमकें असेंच होतें. दोन माणसें दुसऱ्याला सुख व्हावें म्हणून स्वतः मर मर मरतात, पण सुख मात्र कोणालाच होऊं नये हा एक दैव-दुर्विलासच म्हणावयास पाहिजे! वस्तुस्थिति अशी आहे कीं तुम्ही असें नुसतें मनांत म्हणूनच राहात नाही तर तोंडानें मोठ्यानें बोलून दाखवितां—केलेल्याची सारखी जाणीव देत राहातां! आणि ही जाणीव प्रत्येक वेळीं देत गेलें म्हणजे 'तुमचें तें करणेंहि नको, व त्याची जाणीवहि नको' असें वाटून सुखाऐवजीं त्यांना दुःखच प्राप्त होतें. 'दे दान गुप्त, उपकार करीं, न बोले' या वचनांत दानाच्या अन् उपकाराच्या थोरवीबरोबरच तें करीत असतांनाच्या गुप्ततेची व न बोलण्याची थोरवीहि कवीनें स्पष्ट सांगितली आहे.

चांगल्या करण्याचा–केवळ बोलून दाखविल्यामुळें–जर असा विपरीत परिणाम होतो, तर कांहींएक न करतां नुसत्या बोलण्याचा किती भयंकर परिणाम होत असेल याची कल्पना करा. तुमच्या लहानग्या विनूला कोकणांतून घरीं परत आणण्यासंबंधीच्या गोष्टी निघाल्या असतांना तुम्ही एकदम काय बोलून गेलांत, लक्षांत आहे? 'तो तिकडेच आहे तो असूं दे खुशाल. थोरल्यालाच मी बाहेर राहायला जायला सांगत आहें. येथल्या पेशवाईंत त्याचें काय होईल त्याचा नेम नाहीं.' यावर

वहिनींहि जरा चवताळून म्हणाल्या, ' हो, त्याला नकाच आणूं ! ही आनंदीबाई एकादे वेळीं ' ध ' चा ' मा ' करायची ! ' शब्दांनीं शब्द वाढला, आणि घरांत रण माजलें ! तो ' पेशवाई ' शब्द आपण अगदीं सहज म्हणून वापरला असें तुम्ही मागाहून म्हणालांत. व तें तसें असेलहि. पण अगोदरच गढूळ झालेल्या ( वहिनींच्या ) मनाला तो विषारी वाटला असल्यास त्यांत अस्वाभाविक तें काय ? घरांतलीं माणसं दावेदार आहेत, तीं तुमच्या व तुमच्या मुलांबाळांच्या वाइटावर उठलीं आहेत ही जी तुमची फारा दिवसांची सुप्त भीति तीच त्या शब्दाचे रूपानें त्या वेळीं व्यक्त झाली असें नाहीं का तुम्हांला वाटत ? अबा, घरच्या माणसांसंबंधीं असा अविश्वास वाटणें हें वाईट व तो अशा प्रकारें बोलून दाखविणें तर फारच वाईट. पुढें तुम्ही विनूला आणलेंत. त्याचें चांगलें चाललें आहे, व आणखीहि चांगलें चालेल. पण बोलणें मात्र सहजीं निघून जाणार नाहीं. तुम्हीं एक साधी उपमा म्हणून दिलीत, पण त्या उपमेचा किती अनर्थ झाला, पाहिलात ? अविचारीपणानें व निरर्थक बोलण्याचें हें एक ढोबळ उदाहरण झालें. पुतण्याला ' साहेब ' म्हणायचें, सुनेला ' बाईसाहेब ' म्हणायचें अशीं कितीतरी बारीकसारीक घालून पाडणारीं बोलणीं तुम्हीं नेहमीं बोलतां ! ध्यानांत तरी किती ठेवायचीं, अन् कशाला ठेवायचीं ?

तुम्हांला खरोखर घरांतल्या माणसांबद्दल अविश्वास वाटूं लागला असावा म्हणून, व रोज उठून उगीचच भांड्याला भांडें लागायला नको अन् आवाज व्हायला नको म्हणून मींच तुम्हांला ' वेगळे राहातां का ? ' म्हणून विचारलें. तुम्हीं तें बापूंवर घातलेंत, अन् उस्मरून म्हणालांत, ' त्याला सांग कीं वेगळा तर हो, म्हणजे जिथं जाशील तिथं येऊन तुझ्या पायाशीं जीव देईन ! ' या बोलण्याला काय म्हणावें ? जन्मभर सगळ्यांनीं एकत्र राहावें ही तुमची इच्छा फार चांगली; आणि त्याप्रमाणें सर्वजण गुण्यागोविंदानें एकत्र नांदलांत तर तें सोन्याहून पिवळें होईल. पण सुखासमाधानानें तर एकत्र राहावयाचें नाहीं, आणि घराण्याची अब्रू जाते म्हणून निराळेंहि व्हावयाचें नाहीं हें त्रांगडें कसें काय उलगडायचें ! आपलें आपआपसांत पटत नाहीं असें दिसूं लागल्याबरोबर वेगळें होण्यांत कांहीं वावगें नाहीं. उभयतांनाहि तें सुखाचें होतें. तार ताणून ताणून तुटायची वाट कशाला पाहायची ? अन् समजा, निराळं होण्यांत पूर्वीं कांहीं वावगं असलं तरी आता तें कोणी तसं मानीतहि नाहीं. अब्रूची

खोटी कल्पना हवी कशाला? तेव्हां अजूनहि मी तुम्हांला हेंच सुचवितों की, सगळ्यांच्या सुखाकरितां तुम्ही आपले मुलांना घेऊन वेगळे व्हा कसे.

'हें सगळें खरें. पण आतां पुढं काय करूं?' असें जर विचाराल (असें कोण विचारील, म्हणा!) तर मलाहि कांही तुम्हांला नक्की सांगतां यावयाचें नाही. पण सर्वसामान्यरीत्या जें सुचतें तें मोकळ्या मनानें तुमच्यापुढे मांडतों. ग्राह्य वाटेल तेवढें घ्या; बाकीचें–मूर्खपणा आहे, झालं–असें म्हणून खुशाल टाकून द्या. मी सांगणार तें तुम्हांला नवीन आहे असें नाहीं, पण भांबावलेल्या मनःस्थितींत जुन्या अनुभवलेल्या गोष्टींचेंहि माणसाला पुष्कळ वेळां विस्मरण होतें.

(१) जीवनाच्या सर्व अवस्थांमध्यें वार्धक्य इतकें वाईट कां? तर त्यांत शरीराची वर्धनक्षमता कमी कमी होत जाऊन कणशः व क्षणशः होणारी झीज भरून निघत नाहीं व त्यामुळें निरनिराळे रोग उद्भवूं लागतात म्हणून. पण स्वाभाविकतः असें हें व्हायचेंच असें गृहीत धरूनच माणसानें वागावयास पाहिजे. शिवाय आरोग्याचे सर्वसामान्य नियम समजावून घेतले व त्यांना धरून जीवनाची आंखणी केली तर वृद्धावस्थेंतहि शरीर एकदम भंगून निकामी होईल अशी धास्ती वाटण्याचें कारण नाहीं. पूर्वीच्या धडाडीनें पुढें कामें करतां येणार नाहींत हें खरें. पण आयुष्याच्या नाटकांत मुख्य पात्र नेहमीं आपणच असावें असा तरी हेका कां असावा? तुमचा येवढा 'गंधर्व' घ्या. चाळीस वर्षं त्यानं रंगभूमि गाजविलीन्. पण तोहि आतां टाकाऊ झालाच कीं नाहीं? अजून तो थोडीं तरी कामें करतो आहे. थोड्याच दिवसांत पूर्णपणें निकामी होऊन बिचाऱ्याला नुसत्या प्रेक्षकाचें काम करावें लागेल! पण म्हणून काय त्याचें पूर्वीचें कर्तृत्व नाहींसें झालें कीं काय? स्वतःला चांगले नट होतां येईनासें झालें म्हणजे वृद्धांनींहि चांगले प्रेक्षक बनून नवोदित नटांना वन्समोअर करून उत्तेजन द्यावें व त्यांच्या आनंदांत सहभागी होऊन स्वतः आनंदित बनावें हेंच उचित. शिवाय शरीर कमजोर होत चाललें तरी मनाचा जोर जर कायम असेल तर त्याचा परिणाम शरिरावर झाल्यावांचून राहात नाहीं; मन निकोप राखल्यामुळें कितीतरी वृद्ध माणसें धट्टीकट्टीं राहिल्याचीं व दीर्घायु झाल्याचीं उदाहरणें आहेत. तुमच्या माहितीचे नानासाहेब आठवले घ्या. ऐंशीच्या उमरींतहि तरुणाच्या उमेदीनें त्यांनीं नुकतीच गंगोत्रीची यात्रा पायीं केली! किंवा आपले अण्णा कर्वे नव्वदीच्या घरांत आले असूनहि अद्याप जें काम करीत आहेत त्याचें एकच रहस्य आहे; आणि तें म्हणजे त्यांनीं आपलें मन एका विशिष्ट ध्येयाला वाहून टाकलें

आहे. इतकें, कीं आपल्या म्हातारपणाची व शारीरिक दुर्बलतेची त्यांना जाणीवहि होत नाही. म्हणून तुम्हीहि आतां मनाला असा एखादा छंद लावून घ्या कीं त्यांत मन मग्न झाल्यामुळें म्हातारपणाचाच काय पण प्रत्यक्ष मरणाचाहि विचार मनांत येणार नाही.

( २ ) तारुण्यांत अपूर्त राहिलेल्या कितीतरी इच्छा व आशाआकांक्षा माणसाला वृद्धपणीं पूर्त करतां येतील. तरुणपणीं तुम्हांलाच कितीतरी ग्रंथ वाचावेसे वाटत, किंती तरी गाणीं ऐकावींशीं वाटत; किती तरी वेळां तुम्ही म्हणत असां, कीं ' काय करूं रे ? वेळ नाहीं. रोज एकादष्णी करावीशी वाटते. पण कामाची भगभग संपत नाहीं ! ' या वयांत आतां तुम्हांला वेळ आहे ना ! मग मागच्या अपूर्त इच्छा आतां पुऱ्या करून कां घेत नाहीं ? देवानें तुमचें गाऱ्हाणें ऐकून पुन्हा एक संधि दिली आहे ! घ्या तिचा फायदा.

हें झालें स्वतःच्या अपूर्ण राहिलेल्या इच्छांसंबंधीं. यांशिवाय कुटुंबांतल्या माणसांसंबंधींहि कितीतरी लहानसान पण महत्त्वाच्या व तुम्हांला योग्य अशा गोष्टी करतां येतील. नुसते केरवारे करून किंवा रस्त्यांतील शेण जमा करून स्वतःला कष्ट करून कां घेतां ? घरांत विनू, मनी, जनू वगैरे मुलें आहेत. तीं उन्हापावसांत उनाडतात, किंवा ओटीवरील झोपाळ्यासंबंधीं भांडतात, किंवा सिनेमांतलीं घाणेरडीं गाणीं म्हणतात म्हणून तुम्ही त्यांच्या अंगावर खेकासतां. त्याच्या ऐवजीं त्यांना सकाळसंध्याकाळ गोडीनें जवळ घेऊन पुराणांतल्या गोष्टी सांगितल्यात, त्यांच्याकडून श्लोक, स्तोत्रें, भक्तिपर गाणीं वगैरे म्हणवून घेतलींत, परवाचा शिकवलात तर तुमचा सर्वांचाच वेळ सत्कारणीं नाहीं का लागणार ? पुराणापुढें एक केळें आलें तर तुम्ही त्याचे सात तुकडे करून सर्वांना वांटून देतां हें खरें. पण तेवढ्यानें त्यांची खेळण्यासवरण्याची इच्छा कशी पुरी होणार ? त्यांचें शिक्षण होईल, तुमचेंहि मनरंजन होईल; आपले बाबाहि घरांतल्या आम्हां लहान मुलांना व सुनांनाहि घेऊन फावल्या वेळीं सोंगट्या खेळत, व घरांतल्या घरांतच मोठ्यानें प्राकृत पुराणें वाचीत हें आठवतें ना ? तुम्हालाहि त्यावेळीं त्याचें कौतुक वाटत असे. सुनेला तुम्ही होऊन पुन्हा शाळेंत जाऊं दिलेंत हें चांगलें केलेंत. पण मग ती शाळेंत गेल्यावर तिची शकू जरा रडली—सवरली तर चिडून जाऊन सारखी तिच्या आईची शाळा काढीत कां बसतां ? उलट नातीला आपल्या कुशींत घेऊन निजलांत, तिला खेळवलीत तर तिला व तिच्या आईलाहि आनंद नाहीं का होणार ? तिच्या

कल्याणाकरितां तुम्ही झटतां, तिची सोय पाहतां या जाणीवेनें तुमची सूनहि तुमच्याशीं आतांसारखी वाकून राहणार नाहीं. मालकाला नकळत शेजारच्या परड्यांतल्या चाफ्याचीं व कण्हेरीचीं शिळीं कोमेजलेलीं फुलें आणतां व तीं पुरवून पुरवून देवाला वाहातां; त्याऐवजीं घरच्याच आंगणांत मुलांच्या मदतीनेंच एकादी बाग कां तयार करीत नाहीं ? मुलांना एक उपयुक्त उद्योग झाला, घरांत ताजी भाजी आली, पूजेकरितां ताजीं सुवासिक फुलें मिळालीं. तुमचाहि वेळ सत्कारणीं लागून स्वार्थ नि परमार्थ–दोन्ही साधले.

घरच्या आतांच्या परिस्थितींत अत्यन्त आवश्यक व महत्त्वाची आणखी एक गोष्ट तुम्हांला करतां येण्यासारखी आहे. दुर्दैवानें तुमची पुतणी घरीं आली आहे. तिला कांहीं शिकवून–सवरून मार्गाला लावा. नाहींतर तिनें विचारीनें जन्मभर काय करावयाचें ? हल्लीं बायका कीर्तनें करूं लागल्या आहेत. तिला तें जमण्यासारखें नाहीं. पण तिच्याकडून प्राकृत पुराणें वाचून घेऊन तिला जर तुम्हीं त्यांत तयार केलीत, आणि तिच्याकडून एखाद्या देवळांत पुराण वाचून घेतलेंत तर विचारीला रोजच्या पोटापुरते तांदूळ मिळायला पंचाईत पडूं नये. हें सगळें जमणें कठीणच दिसतें आहे; पण प्रयत्न करून पाहण्यासारखें असून तुम्हींच पुढाकार घेतलात तर एकाद वेळेस जमूनहि जाईल. तुम्ही म्हणाल ‘ उंटावरून शेळ्या हांकणें टीक आहे. ’ हें मलाहि कळतें आहे. मला सांगायचें येवढेंच कीं तुम्ही अमूक एक करा असें नसून, तुम्हाला जें कांहीं जमेल तें करा–पण करा. आजपर्यन्त कसं होतं अन् आतां मात्र कसं झालं असं म्हणून नुसता विषादहि वाटूं देऊं नका, किंवा पुढें कसें होणार म्हणून नुसती विवंचनाहि करीत बसूं नका.

( ३ ) लहानपण सुखाचें कां म्हणतात, तर लहान मुलांना काळज्या, चिंता, जबाबदाऱ्या, कर्तव्यें वगैरेंची जाणीव नसते, व त्यांना मोठ्या माणसांप्रमाणें ‘उद्या’चा विचार न पडतां चालू घटकाच मजेंत व आनंदांत घालविण्याकडे त्यांचें सर्व लक्ष गुंतलें असतें म्हणून. वृद्धांची स्थितिहि, वास्तविक पाहतां, मुलांसारखीच असते. तारुण्यांतल्या आशाआकांक्षा व प्रौढावस्थेंतील जबाबदाऱ्या त्या त्या काळांत पूर्ण झाल्या असल्यामुळें, व भविष्यकाळीं साधायाचें तें सर्व त्यांचें आगाऊच साधून झालें असल्यामुळें त्यांना या वयांत पूर्ण निश्चिंत व समाधानी असें राहातां येऊन चालू घडीचाच शक्य तो उपभोग घेतां येण्यासारखा आहे. शिवाय म्हातारपणाचा दुसरा असा एक फायदा असतो, कीं लोकांची त्याच्यासंबंधीं फारशी अपेक्षाच

नसल्यामुळें म्हाताऱ्याच्या हातून होणाऱ्या चुका, त्याचे स्वाभाविक दोष, व शारीरिक व्यंगें यांकडे समाज साहजीकपणेंच सहानुभूतीनें व सहृदयतेनें पाहातो. म्हाताऱ्याला सर्व गुन्हे माफ असा जणूं एक संकेतच पडून जातो. अर्थात् समाजाच्या या सहिष्णुतेचा व सहानुभूतीचा गैरफायदा घेऊन त्यानें मुद्दामच वाटेल तसें वागतां कामा नये. आपल्या उणीवांची व इतरांच्या सहानुभूतीची व औदार्याची जाणीव ठेवून त्यानें समाजाशीं कृतज्ञतेच्या भावनेनें वागलें पाहिजे. तारुण्यांतील व प्रौढावस्थेंतील कर्तव्यें व जबाबदाऱ्या माणसानें शक्य तों पार पाडल्या असतील, आपल्या दुष्कृत्यानें त्यानें समाजाचा रोष आपणावर ओढून घेतला नसेल तर त्याला म्हातारपणीं इतरांच्या सहानुभूतीचा फायदा मिळण्यास कांहींच अडचण पडूं नये.

( ४ ) आपल्या चालत्या काळीं दुसरे आपल्याला फार मान देत असत, जो तो आपलेकडे येत असे, लोकांत आपली फार चहा असे व आतां आपल्याला कोणी पुसत नाहीं, आपणाकडे कोणी ढुंकूनहि पाहात नाहीं वगैरेबद्दल म्हाताऱ्या माणसाला फार दुःख होतें. पण कर्तृत्व संपलें व त्यामुळें मिळणाऱ्या गोष्टी मिळेनाश्या झाल्या तर तें स्वाभाविकच नाहीं काय ? कारणावांचून कार्य कसें होत राहणार ? आणि अश्या रीतीनें आलेल्या अज्ञातवासांतहि कांहीं फायदे आहेतच कीं. पूर्वायुष्याची धांवपळ, धांदल, गर्दी, व्यग्रता वगैरे संपून माणसाला जरा स्वस्थता, शांतता, एकाग्रता मिळाली तर चांगलेंच झालें. कीर्ति, प्रसिद्धी वगैरेमुळें माणसाला, एक प्रकारची सत्ता व सामर्थ्य प्राप्त होऊन त्यांचा त्याला आपलें इप्सित साधण्याचे कामीं फार उपयोग होतो, व म्हणून तारुण्यांत व प्रौढावस्थेंत माणूस प्रसिद्धीच्या व कीर्तीच्या मागें लागत असला तर तें योग्यच होय. पण म्हातारपणीं त्याला साधावयाचें असें कांहीं उरलेंच नसल्यामुळें म्हाताऱ्याला सत्तेची, सामर्थ्याची व प्रसिद्धीची फारशी मातब्बरी वाटावयास नको. संसारांत तर राहावयाचें, पण संसारांतील रागलोभादि विकारांची बाधा होऊं द्यावयाची नाहीं हीच ना आपल्या गीतेची मुख्य शिकवण ? आपण जिवंत असतांनाहि लोक आपल्याला विसरणार, आपला उल्लेख फारसा कोणी करणार नाहीं, आणि असें होणें अगदीं स्वाभाविक आहे अशी मनाची तयारी केली म्हणजे मेल्यानंतरहि आपली स्मृति लोकांनीं कायम ठेवावी, आपलीं स्मारकें करावीं असा विचार चुकूनसुद्धां मनांत येणार नाहीं. उलट असें ज्यांना वाटतें त्यांच्याच मूर्खपणाबद्दल हंसूं येऊन एक प्रकारचें समाधान होतें.

( ५ ) म्हातारपणीं मनुष्य पंगू होतो हें खरें; पण त्याच वयांत त्याच्या गरजाहि कमी झाल्यामुळें त्याला इतरांवर अवलंबून राहण्याचें फारसें कारणच पडत नाहीं, हें काय थोडें झालें ! शिवाय लोक आपली जी कांही सेवा करतात ती कृतज्ञताबुद्धीनें स्वीकारून त्यामुळें सेवा करणाऱ्यास आपण जो कांहीं सात्त्विक आनंद देऊं शकतों तो तर अमोप आणि अमोल आहे. आपण सेवा केली व ती समाधानपूर्वक मान्य झाली या जाणीवेमुळें होणाऱ्या सुखाला जीवनांत दुसरी जोड नाहीं. तिच्यामुळें जीवन स्वादिष्ट व रुचकर बनून त्याला एक नवीनच खुमारी आल्यासारखें वाटतें.

( ६ ) कोणत्याशा निमित्तानें केव्हांतरी वर्तमानपत्रांत माझें नांव आलेलें पाहून तुम्हाला प्रथम फार समाधान झालें; पण जरा वेळानें तुम्हीं काय उद्‌गारलांत, आहे लक्षांत ? 'तुझं आपलं ठीक आहे. चार पोरं गोळा करायचीं, त्यांना पढवायचं; अन् जरा गोड बोललं म्हणजे मोठेपणाचं फुकटचं श्रेय मिळून वर्तमान-पत्रांत नांव झळकतंच आहे ! सगळ्यांच्याच भाग्यांत तें कुठलं असायचं ?' या तुमच्या उद्‌गारांत मला जो एक लहानसा टोमणा आहे तो मी जाणतों; आणि तो अगदींच चुकीचा आहे असें मला स्वतःलाहि वाटत नाहीं. खरें बोलायचें म्हणजे माझ्या गुणाच्या मानानें माझें कौतुक अतिशय होतें हें कांहीं खोटें नाहीं; आणि तेवढ्या दृष्टीनें मी एक दैववान् प्राणी आहें यांत कांहीं शंका नाहीं. पण 'सग-ळ्यांच्या भाग्यांत तें कुठलं असायचं ?' या तुमच्या शेवटच्या उद्‌गारांत स्वतःच्या व्यर्थ, अज्ञात व अप्रसिद्ध जिण्याची जी कडवट जाणीव व्यक्त झाली आहे तिचें मात्र वाईट वाटतें. अबा, तुमचें 'जिणें.' तुम्ही मानतां त्याप्रमाणें व्यर्थ किंवा अज्ञात असें गेलेलें नाहीं आहे हो. वर्तमानपत्रांत नांव 'झळकलें' नाहीं म्हणून वैषम्य वाटण्याचें कांहीच कारण नाहीं. तुम्हीं सुद्धां एके काळीं—व अजूनहि किती-तरी जीवांना आनंद दिला आहे ! भारतरामायणांतील त्या गोड गोष्टी आपल्या गोड वाणीनें व्यासपीठावरून सांगतांना कितीतरी भाविक जीवांना तुम्हीं रिझविलें आहे ! तुमच्या विनोदी, गोड, आणि चालवून घेण्याच्या स्वभावानें तुम्ही किती लोकप्रिय झालां होता हें काय मला माहीत नाहीं ? रस्त्यांतून जातां येतांना किती-तरी लोकांनी तुम्हांला 'शास्त्रीबुवा !' म्हणून हाक मारून नमस्कार करावा, व तुम्हींहि त्यांची कांहीं ना कांहीं थट्टामस्करी करून, स्वतः हसून व त्यांना हसवून पुढें जावें असें हंमेश घडत असे ! वाईट येवढेंच वाटतें, कीं तो तुमचा पूर्वीचा गोडवा स्वभाव, विनोदी अन् समाधानी वृत्ति याच काळांत कशीं लुप्त झालीं !

विनोदाची, समाधानाची, व चालवून घेण्याच्या उदार वृत्तीची आवश्यकता जीवनाच्या कोणत्या एका विशिष्ट अवस्थेंत विशेष रीतीनें जाणवत असेल तर ती या वृद्धावस्थेंतच होय. आपल्या मनासारखें कांहीं होत नाहीं म्हणून इतरांशीं सारखी धुसफुस न करितां, किंवा स्वतःवर रागवत व चडफडत न बसतां, किंवा दुःखी कष्टीहि न होतां, आपणच आतां वयोमानाप्रमाणें अधू होत चाललों आहों, आतां हें असेंच चालावयाचें अश्या आंतर्जाणीवेनें माणसानें—लटकें कां होईना—स्वतः हसत—व दुसऱ्यांना हसवीत राहावयास नको काय ? म्हणजे स्वतःला समाधान लाधून दुसऱ्यांनाहि देतां येईल.

( ७ ) तुमच्या वेदान्तांतहि जीविताला मायेची, क्रीडेची वगैरे उपमा देतात ती किती सार्थ आहे, नाहीं ? खेळामध्यें प्रत्येक खेळाडूला कांहीं एका क्षणानंतर परिस्थितीच्या जोरामुळें बाद व्हावेंच लागतें, व बाद झाल्यावर त्याला इतरांच्या खेळाकडे प्रेक्षकाच्या तटस्थ भूमिकेनें पाहावेंच लागतें; तो जर खरा खेळाडू असेल तर आपण मात्र ' मेलों ' याबद्दल वाईट वाटून घेणार नाही. उलट आपण मेलों तरी बाकीचे ' जिवंत ' आहेत, आणि ते चांगलें खेळून आपल्या बाजूला जय मिळवून देण्याचा प्राणपणानें प्रयत्न करीत आहेत याचाच आनंद तो मानीत असतो. तुम्हांला स्वतःला कुटुंबाच्या धारणापोषणाचीं कामें पूर्वीच्या धडाडीनें व तडफेनें आता करतां येत नाहींत याबद्दल खंत वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. तुमची जागा आतां तुमचा मुलगा व पुतण्या घ्यावयास पुढें आले आहेत, त्यांचें थोडेंसें कौतुक करून त्यांना जरा उत्तेजन द्याना. पहिल्या पहिल्यांदा तुमच्यासारखें व तुमच्या इतकें त्यांना जुळणार नाही, पण जीवनाच्या कलेंतहि मनुष्य चुकत चुकतच शहाणा व तरबेज होत असतो.

( ८ ) पाहणाराला वृद्धावस्थेंतहि कांहीं कमी सौंदर्य आढळून येणार नाहीं. आपल्या इतक्या दिवसांच्या अनुभवाचा व शहाणपणाचा फायदा जर वृद्धानें तरुणांना दिला, मिळणारें सुख भोगायला व येऊं पाहाणारें दुःख टाळायला जर त्यानें त्यांना शिकविलें, स्वतः त्यांच्या सुखदुःखांत जर तो सहभागी झाला तर वृद्ध माणूस—तो केवळ वृद्ध आहे म्हणून—तरुणांना कधीहि नकोसा होणार नाही. उलट तो हवाहवासा वाटून कितीतरी तरुण मंडळी अशा वृद्धाकडे आपोआप आकर्षिली जातील. आणि मग त्यांच्या आनंदमय सहवासांत म्हातारपणच्या जीवनांतील सर्व रूक्षता नाहींशी होऊन त्यालाहि नवचैतन्य प्राप्त होईल. त्यांना

शिकवायचें तें त्याला एकाद्या स्थितप्रज्ञ योग्याप्रमाणें शांत, दान्त व समधात मनानें शिकवितां येईल. आपले दोष व त्यांमुळें आयुष्यांत आपल्या हातून झालेल्या चुका तो हसत हसत न लाजतांसवरतां सांगूं शकतो. उलट आपल्या गुणांचें अन् बिनचूक केलेल्या गोष्टींचें वर्णनहि तो आनंदानें पण फारशी फुशारकी न मारतां करतो. आयुष्यांतील दुःखांचें विष व सुखांचा मादकपणा हीं ज्यानें पचविलीं आहेत, व इतरांना आनंद देण्यापुरताच जो आतां उरला आहे असा वृद्ध म्हणजे प्रतिशंकरच होय.

अन् अवा तुम्ही नुसते शंकरच नव्हे तर शंकरालाहि मान्य असलेले प्रत्यक्ष रामचंद्र आहां. आपल्या वृत्तीनें व आचरणानें तें नांव सार्थ करा येवढीच शेवटची विनंती आहे.

लहान तोंडीं मोठा घांस घेणें माझें मलाच अक्षम्य वाटतें; मग तो घेतल्याबद्दल तुमच्या धाकट्या भावाला क्षमा करा असें मी कोणत्या तोंडानें तुम्हांला म्हणूं ?

आपला

नाना.

ता. क.—सोबत आठवल्यांनीं लिहिलेलें ‘ वृद्धांनीं आरोग्य कसें राखावें ? ’ हें पुस्तक पाठवीत आहें. अवश्य वाचून पाहावें. लहानसेंच असल्यामुळें सहज वाचून होईल.

॥ श्री ॥

## 'वृद्धाश्रमा'चे सन्मान्य चिटणीस, रा. श्रीधरपंत जोशी, यांस—

*सा. न. वि. वि. तुमचें श्रावण वद्य अष्टमीचें कृपापत्र पोंचलें. मजकूर वाचून अतिशय आनंद झाला. तुमच्या व 'आश्रमा'च्या इतर सभासदांच्या इच्छेला मान देऊन मला व्याख्यानाला तिकडे यावयास इतक्यांतच सवड होईलसें दिसत नाहीं. दुसरे एकादे प्रसंगीं अवश्य येईन. मात्र तुम्हां सर्वांना सर्वस्वीं नाखूष करण्याचेंहि जिवावर येत असल्यामुळें आपल्याला जें कांहीं सांगावयाचें तें लिहूनच कळवावें असें वाटून सोबतचें पत्र लिहिलें आहे. तें योग्य वाटल्यास वाचून दाखवून वेळ साजरी करावी अशी विनंति आहे. तसें योग्य न वाटून त्याऐवजीं दुसरें कांहीं करण्याचें ठरविलें तरीहि माझी हरकत नाहीं. सार्वजनिक संस्थांतून काम करणें किती कठीण आहे याची जाणीव मला असल्यामुळें कोणत्याहि प्रकारें आपल्याला अडचणींत आणण्याची माझी इच्छा नाहीं. आपला 'आश्रम' वृद्धांना योग्य पण भरीव अशी कामगिरी करो व त्याचा उत्कर्ष होत जावो अशी इच्छा आहे. कळावें हे विनंति.*

'वृद्धाश्रमा' च्या सर्व सन्मान्य सभासदांस—

*सा. नमस्कार, विनंति विशेष.*

पुण्याच्या 'विश्रामधाम' मंडळाचे धर्तीवर तुम्हीं मंडळींनीं आपल्याहि गांवीं एक 'वृद्धाश्रम' स्थापन केल्याचें नुकतेंच कोठेंसें वाचलें होतें; आणि या तुमच्या कामगिरीबद्दल तुमचें अभिनंदन करावें असाहि विचार त्याचवेळीं मनांत येऊन गेला. पण तें अप्रासंगिक दिसलें असतें कीं काय अशी शंका येऊन तो विचार रहित केला होता. पण नुकताच एक प्रसंग घडला व त्याचा फायदा घेऊन मी तुमचें प्रथम अभिनंदन करतों. प्रसंग असा कीं:—तुमच्या 'आश्रमा'चे सन्मान्य चिटणीस—रा. श्रीधरपंत जोशी—यांनीं मला मुद्दाम पत्र लिहून माझा 'किर्लोस्कर' मासिकांतील वृद्धांच्या कर्तव्यांसंबंधींचा लेख माझ्या इतर लिखाणाप्रमाणेंच आपल्याला अतिशय आवडला असल्याचें कळवून 'आपण आमच्या 'आश्रमांत' अशयाच स्वरूपाचें एकादें व्याख्यान द्यावें' अशीहि विनंति केली आहे. स्वतः वृद्ध असूनहि रा. श्रीधरपंत हे मोठे जिज्ञासू व मोकळ्या मनाचे गृहस्थ दिसतात. अर्थात् त्यांना आवडलेला माझा लेख तुम्हां इतर सभासदांना कितपत आवडला, व त्यांनीं केलेल्या विनंतीला तुमचा कितपत दुजोरा आहे हें मला समजणें शक्य नाहीं. तथापि ज्याअर्थी 'चिटणीस' या नात्यानें त्यांनीं तें पत्र मला लिहिलें आहे त्याअर्थी तुमची सर्वांचीच इच्छा त्यांनीं व्यक्त केली आहे असें गृहीत धरूनच मी हें पत्र लिहीत आहें. प्रत्यक्ष व्याख्यान देण्याचा व त्या निमित्तानें तुम्हां सर्व समवयस्क मंडळींची ओळखदेख होण्याचा योग आला असता, तर मलाहि फार बरें वाटलें असतें. पण माझ्या खाजगी अडचणींमुळें सध्यां तरी तो योग येईलसें दिसत नाहीं. व्याख्यानाचें जरी जमलें नाहीं, तरी तुमची तद्‌विषयक आस्था पाहून मला जें वाटतें तें लिहून कळवावें असें मनांत येऊन हें पत्र लिहीत आहें. मीं जें कांहीं लिहिलें आहे त्यांत माझें स्वतःचें असें फारसें नसून प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ विल्यम मॅक्डुगल यांनीं आपल्या 'कॅरेक्टर अँड् दी कॉंडक्ट ऑफ् लाइफ' या सुंदर ग्रंथांत 'टु ऑल हूम् इट् मे कन्सर्न' हें जें प्रकरण लिहिलें आहे त्यावरूनच लिहिलें आहे. (माझ्या-सारख्या सामान्य माणसाला स्वतंत्रपणें इतकें विचारप्रवर्तक कसें लिहितां येईल?) माझी आपणां सर्वांस अशी प्रार्थना आहे कीं आपण सर्वांनीं तो सबंध ग्रंथ—निदान तें प्रकरण तरी अवश्य वाचावें.

सुरुवातीलाच, मला तुमचें जें कौतुक वाटतें तें व्यक्त केल्यावांचून राहवत नाहीं. तुम्ही सर्व मंडळी वयस्क, वृद्ध व पुराणमताभिमानी असतांनाहि 'किर्लोस्कर' मासिकासारखें नवमतवादी व केवळ तरुणांतरुणींकरितांच प्रसिद्ध होत असलेलें मासिक वाचतां, या एकाच गोष्टीवरून मला तुमच्या उदारमतवादित्वाची व प्रगमनशीलतेची वरीचशी साक्ष पटते. स्वतःला मानवणारीं मतें व आवडणारे विचार येवढ्यांचेंच वाचन करून एकपक्षी व एकतर्फी आचरण ठेवण्यापेक्षां भिन्न मतें व भिन्न विचार समजून घेऊन व त्यांत जें कांहीं सत्य असेल तें स्वीकारून आपलें आचरण सर्वसमावेशक व सर्वसंग्राहक करणें हें हल्लींच्या लोकसत्तेच्या काळीं अत्यंत जरूरीचें आहे, आणि हें ओळखूनच तुम्ही वागतां ही अतिशय समाधानाची गोष्ट आहे.

वर उल्लेखिलेल्या प्रकारणांत मॅक्डुगल साहेबांनीं पुष्कळ उपयुक्त विचार प्रदर्शित केले आहेत. पण त्यांपैकीं मला जे विशेष आवडले तेवढेच मी सांगणार आहें. आपण सर्व माझ्याच वयाचे व माझ्याच वृत्तीचे दिसत असल्यामुळें आपणांसहि ते आवडतील अशी आशा आहे.

'तुमचे हे विचार कितीहि चांगले असले तरी आम्हांला त्यांचा काय उपयोग? आयुष्याचा माथा ओलांडून आम्ही आतां उतरणीला लागलों आहोंत. आमच्या संवयी, आमच्या विचारसरणी, आमच्या वृत्ती, आमच्या आवडी–निवडी–सर्व कांहीं आतां कायमचें बनून गेलें आहे. आमच्या जीवनाची इमारत अगोदरच पुरी होऊन गेली असून तिच्यांत पडझडीलाहि सुरुवात झाली आहे. अशा या स्थितींत नवीन विचार स्वीकारणार तरी कसले, आणि आचरणार तरी केव्हां?' असें तुम्हांला वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. मला स्वतःलाहि पुष्कळ वेळां तसेंच वाटून मी अगदीं निराश होतों. पण तो क्षण गेला म्हणजे पुन्हां असें वाटूं लागतें कीं, नवीन गोष्टी वाचाव्यात तर खऱ्या. प्रत्यक्ष आचरणाचें नाहीं जमलें तर नाहीं. सुधारणा करतां आली नाहीं तरी सुधारणेला जागा आहे, व केवळ परिस्थितीमुळें आपल्याला ती आतां करतां येत नाहीं म्हणून आपण करीत नाहीं येवढ्या जाणीवेनें सुद्धां माणसाला एक प्रकारचें समाधान लाभतें. तुम्हीं जीवनाला इमारतीची उपमा दिली आहेत. ग्रंथकारानें त्याला चित्राची उपमा दिली असून तो म्हणतो–सबंध चित्र पुरें झालें असतांहि चित्रकार त्याचेकडे दुरून दृष्टि टाकतो, व त्यांत कमजास्तपणाचे जे कांहीं किरकोळ दोष राहिले असतील ते दुरुस्त करतो.

एकादी रेषा जरा लांबलेली असेल तर किंचित् आंखूड कर, आंखूड असलेली जरा वाढव; एकादा कानाकोपरा जास्तच बोंचक दिसत असला तर छाटून जरा गोल करून घे, अगदींच भोंगळ असला तर नीटस व सुस्पष्ट करून घे; एकाद्या ठिकाणचा रंग अगदींच फिकट असल्यास जरा भडक कर, किंवा विनाकारणच भडक दिसत असल्यास त्यावर जरा ओला ब्रश फिरव; असें त्याचें कांहींना कांहीं सारखें चाललें असतें. किंवा ताबूत पाण्यांत टाकीटाकीतोंपर्यन्त सुद्धां त्याचेवर बेगड चिकट-वण्याचें काम चालू नसतें का? आपणां सर्वांचेंहि थोडेंफार तसेंच असावें. तिकडे आपलेहि ताबूत थंडे होण्याचे मार्गाला लागले असले तरी इकडे आपण आपलें निरीक्षण चालू ठेवावें व जें कांहीं सुधारतां येईल तें शेवटपर्यन्त सुधारीत असावें. तेव्हां विचार आचरणांत आणतां येणार नाहींत अशी अवास्तव भीति मनांत न आणतां, नवीन नवीन विचार ऐकत असावेत, व सुधारतां येईल तितकें सुधारत असावें हेंच आपणां सर्वांना योग्य आहे.

आपण कितीतरी माणसें अशीं पाहतों कीं तीं एरवीं सत्प्रवृत्त, सुवृत्त व सुशील अशीं असतात. पण त्यांच्या संवयींत किंवा स्वभावांत असा एकादा बारीक दोष चुकून राहून गेला असतो कीं त्यामुळें त्यांच्या एकंदर वागणुकींत वैगुण्य उत्पन्न होऊन त्यांची संगति तितकीशी सुखदायक व जीवन तितकेंसें यशस्वी होत नाहींत. हा दोष वेळींच जर त्यांच्या लक्षांत आला असता, किंवा कोणीतरी मुद्दाम तो त्यांच्या लक्षांत आणून दिला असता तर सहज निघून गेला असता, आणि त्यांचा एकंदर चांगूलपणा त्यांना व इतरांना सारखाच आनंददायक झाला असता. मोठ-मोठे पराक्रम करून नवीन नवीन प्रांत काबीज करूनच राजाचें भागत नाहीं, तर मिळवलेलें राज्य कायम टिकवण्याबद्दलहि त्यानें दक्षता घ्यावी लागते. तसेंच कष्टानें कमावलेलें शील व चारित्र्य थोड्याश्या हलगर्जीपणानें गमावणार नाहीं याबद्दल माणसानें नेहमीं जागरूक रहावें लागतें. त्याला स्वतःवर एकप्रकारची नजर व पहारा ठेवावीं लागतात. अर्थातच त्याला निर्धास्तपणाच्या स्वातंत्र्याचें क्षणिक सुख मिळणार नाहीं हें खरें, पण गाफीलपणामुळें कायमच्या पारतंत्र्यांत जाण्यापेक्षां तें पुष्कळ बरें.

शारीरिक स्वरूपाच्या कांहीं क्षुल्लक संवयींमुळें एरवीं चांगला असलेला मनुष्यसुद्धां कसा अप्रिय व नकोसा होतो, पहा. आमच्याकडे येणारा एक वयस्क गृहस्थ वस्तुतः अतिशय विद्वान् व गुणी. पण त्याला 'अऽऽब्बा!' करून सारख्या ढेकरा देण्याची

अशी कांहीं खोड आहे कीं, त्याच्या त्या ढेकरांच्या धडाक्यांत त्याच्या विद्वत्तेचा सूरहि ऐकूं येत नाहीं. त्याचें नांवच आमचेकडे 'ढेकरेबुवा' असें पडलें आहे. जी स्थिति ढेकरांची तीच 'फों फों' करून नाक शिंकरण्याची, किंवा 'सूं सूं' करून आंत ओढण्याची, किंवा दात-कान कोरण्याची, किंवा उचक्यांची. वास्तविक पाहतां एकंदर गुणांच्या मानानें माणसांतील हे दोष किती क्षुल्लक असतात. आणि तेवढ्या-करितां त्यांना हास्यास्पद व्हावें लागूं नये; पण करणार काय! डोळस जगाची लहानश्या दोषांकडे सुद्धां डोळेझांक करण्याची तयारी नाहीं ना! असल्या संवयी विशेषतः आपल्यासारख्या (जेव्हां जेव्हां मी 'आपल्यासारख्या,' 'आपण' असें म्हणेन तेव्हां तेव्हां मीहि तुमच्यांत आहे असें धरून चालायचें.) वयस्क मंडळींतच आढळत असल्यामुळें व त्या जराश्या जागरूकतेनें काढून टाकतां येण्यासारख्या असल्यामुळेंच मीं त्यांचें येथें दिग्दर्शन केलें.

आतां प्रकृतिदोषांकडे वळूं. आपल्याकडे कोणीहि, केव्हांहि, कोणत्याहि कारणा-करितां येवो, आपण त्याच्यापुढें आपलें प्रकृति–पुराण सुरू करतों. अमांशच झाला आहे, कोठा साफ नाहीं, मुरडा झाला आहे, अजीर्ण होऊन करपट ढेंकरा येताहेत, वात सरत नाहीं किंवा जास्त सरतो आहे, सांधे धरले आहेत, दाढ (असलीच तर!) ठणकते आहे, झोंप लागत नाहीं–असल्या कसल्या तरी तक्रारी आपण त्याला सुनवीत असतों. आलेल्या माणसानें विषय बदलण्याकरितां दुसऱ्या कितीहि गोष्टी काढल्या तरी आपण त्याला मध्येंच थांबवून आपल्या मूळपदावर येतों! 'काल पाऊस खूप पडला' असें तो म्हणतांच 'अहो, खूप म्हणजे काय! हें पहा पडसें! फडकीं ओलींचिंब होताहेत!' असें म्हणून आपण त्याला आपल्या विषया-कडे खेंचून घेतों. तो एकादी आग लागल्याचें सांगूं लागला कीं आपण बंबाच्या घणघणाटानें आपली झोंप उडाल्याचें सांगतों! महात्मा गांधींना पकडल्याचें कोणीं सांगितलें कीं लगेच आपणहि 'हो, बरी आठवण केलीत. मीहि हल्लीं गांधींप्रमाणें शेळीचें दूध व खजूर खात असून तीं प्रकृतीला चांगलीं मानवलीं आहेत' वगैरे सांगूं लागतो. दुसरा मनुष्य आपणापुढें कोणताहि विषय काढो, आपण त्याला पलटी देऊन पुन्हां आपल्या स्वतःसंबंधीं बोलूं लागतों; आणि विशेष म्हणजे असें कीं हें सर्व आपण अगदीं खुलवून व रंगवून सांगतों. तशांतूनहि ऐकणाराला आपल्या सांगण्याचा संशय येतो आहे, किंवा तो त्याकडे दुर्लक्ष करतो आहे अशी शंका आली तर आपण खरोखरचेच कण्हायला किंवा विवळायला लागतों. असलें हें बीभत्स व भयानक

रसांतलें वर्णन ऐकून, किंवा तें प्रत्यक्ष पाहून ऐकणाऱ्या माणसांतहि वृत्तिपरत्वें हास्य किंवा रौद्ररसाची निष्पत्ति झाल्यावांचून राहात नाहीं. तो हसून आपली चेष्टा तरी करतो किंवा खरोखरच रागावतो तरी.

प्रकृतिदोषांप्रमाणें आपण आपले मानसिक दोषहि मुक्तकंठानें व मिटक्या मारमारून सांगतों. आपल्या आशीलाला पोलिसांनीं वेताच्या छडीनें कसें मारलें हें कोर्टांत न्यायाधिशाला समजावून देतांना आपण 'And they beated him सपासप्' असें म्हणून कसा हशा पिकविला, वर्गांत शास्त्रीय प्रयोग चालूं असतांना 'Water came out फस्फस्' असें सांगून आपण वेळ कशी मारून नेली, इत्यादि बावळटपणाचें वर्णन आपल्यांतले वकील व प्रोफेसर मोठें विनोदी आणि रसभरितपणें करतात. आपण हपिसचें काम कसें शिताफीनें चुकवीत असूं, साहेबाशीं कसे उर्मटपणानें वागत असूं, वेळेचें भान न राहिल्यामुळें आपल्या गाड्या कश्या चुकत, किंवा आपण भलत्याच गाडींत जाऊन कसे बसत असूं, बायकोनें 'आजच्या दिवस गीतेला जाऊं नका' म्हटल्याबरोबर आपण तिची कशी तासाडपट्टी केली, सुनेनें तस्त आणायला जरा उशीर केल्यावरोबर आपण कशी ठणकावून दिली, आपण रागावलों असतांना पोरं कशीं थर थर कांपतात, अन् चळ् चळ् + + लागतात, पुराणाची थाप देऊन आपण 'सुंदराबाई' च्या गाण्याला कसे गेलों, वगैरे कितीतरी लहानमोठ्या दोषांचा पाढा आपण स्वतःच वाचतों. हें सर्व ऐकून सामान्य माणसाला जरी हंसूं आलें तरी सदभिरुचीच्या माणसाला आपला तिटकारा आल्यावांचून रहात नाहीं. हे सर्व दोष आपल्याला कळत नाहींत असें नाहीं, पण आपण अश्या रीतीनें बोलून लोकांचें रंजनच करतों अश्या भ्रामक समजुतीनें ते आपणांतून काढून न टाकतां आपण ते तसेच राहूं देतों !

आपल्यांतलीं कांहीं माणसें इतकीं स्वयंमग्न, आत्मनिष्ठ व स्वतःच्याच संसारांत व व्यवहारांत इतकीं गुरफटलेलीं असतांत कीं त्यांना इतरांचे संसार, इतरांचीं सुखदुःखें, इतरांचे उद्योग, इतरांच्या आवडी-निवडी, इतरांचीं मतें वगैरेची बिलकूलच जाणीव किंवा पर्वा नसते. हीं माणसें जात्या दुष्ट किंवा निर्दय किंवा दुसऱ्याचा जाणून-बुजून अपमान करण्याइतकीं उद्धट असतात असें नाहीं. किंवा त्यांनीं लौकिक आचारविचार व रीतीरिवाज गुंडाळून ठेवले असतात असें नाहीं, किंवा तीं माणूसघाणीं किंवा कायमचीं मानवद्वेष्टीं बनलेलीं असतात असेंहि नाहीं;

पण त्यांना स्वतःबद्दलच इतकी अहंता व स्वतःच्या गोष्टींबद्दल इतकें ममत्त्व वाटतें कीं, त्यांचे भरांत तीं जगाला विसरून जातात. स्वतः करीत असलेल्या एकाद्या चांगल्या गोष्टीचेंच त्यांना इतकें वेड लागतें कीं आपण करतों तेवढेंच चांगलें व खरें, बाकीचें कुचकामाचें व फुकट असें त्यांना वाटूं लागतें. कोणाला नमस्कारांचें किंवा ज्योतिषाचें वेड; तर कोणाला लंघनाचें किंवा व्हिटॅमिन्सचें फ्याड्; कोणाला राष्ट्रोद्धाराचे कामीं विधवाविवाहासारखा दुसरा अचूक मार्ग दिसत नाहीं, तर कोणाला सहशिक्षणाशिवाय बाकीचे मार्ग फोल वाटतात. आणि मग असले लोक अत्र्यांसारख्यांचे तावडींत सांपडून हास्यास्पद होतात! गांधींच्या मोठेपणाची गोष्ट निघाली कीं हे आपल्या 'बळवंतरावांची' थोरवी सांगणार. नायडूंच्या टोलेबाजीचा विषय निघाला कीं हे आपल्या वेळच्या दात्यांनीं जिमखान्यावरचें घडयाळ फोडल्याचें सांगणार! सावरकरांच्या वक्तृत्वाचें किंवा धाडशी स्वभावाचें कोणी कौतुक करूं लागलें म्हणजे हे जिन्सीवाल्यांच्या किंवा शिवरामपंत परांजप्यांच्या वक्तृत्वाच्या आणि तात्या टोप्यांच्या किंवा वासुदेव बळवंतांच्या धाडसाच्या गोष्टी सांगत राहतात. हिराबाईच्या गायनाची कोणी प्रशंसा करूं लागले म्हणजे हे आपल्या काळच्या यल्ली किंवा चुन्ना यांच्या गायनाचें कौतुक करतात! कोणी मुलीच्या सौंदर्याबद्दल व मुलाच्या हुशारीबद्दल सांगूं लागले म्हणजे हेहि आपल्या चिंगी-रंगींचें सौंदर्य, व गुंडा-पुंडांची हुशारी वर्णन करतील. कोणी कांहीं काढो, यांचा आपला बीचमे मेरा चांदभाई असायचाच! बोलण्याचें सुख इतरांना कधींहि लाभूं न देतां तें सर्व हे स्वतः लाटतील आणि त्यांना सारखे ऐकत ठेवतील. त्यांनीं दुसऱ्याच्या सुखदुःखासंबंधीं चौकशी केलीच तर ती आपल्या सुखदुःखांची वाच्यता करायला मिळावी अश्या स्वार्थी दृष्टीनेंच करतील! अश्या रीतीनें वागणारांत फार मोठा दोष असतो असें म्हणतां आलें नाहीं तरी त्यांचे मध्यें स्वार्थपरता व 'मी म्हणजेच सर्व जग' अशी अहंता नखशिखान्त भरलेली असते येवढें तरी म्हटलेंच पाहिजे. पुराण ऐकतांना ऐकलेल्या 'अहं ब्रह्मास्मि' या तत्त्वाचा खरा अर्थ व त्याचा प्रत्यक्ष अनुभव यांनीं कधींच घेतलेला नसतो. वरं, यांचें स्वतःचें भारूड चालू असतांना ऐकणारानें चालचलाऊ लक्ष देऊन नुसतें हुं हुं केलें तरी त्यांना पुरे पडत नाहीं. ऐकणारानें तें सर्व एकतानतेनें व आस्थापूर्वक ऐकलें पाहिजे असा यांचा आग्रह असतो. अगदीं गहजब झाला कीं नाहीं? अश्या माणसांच्याबद्दल इतरांना काय म्हणून प्रेम वाटावें व त्यांनीं त्यांच्या इतर गुणांचें काय म्हणून

चीज करावें ? उलट त्यांची संगति त्यांना अत्यन्त कंटाळवाणी अन् त्रासदायक वाटली नाहीं तरच नवल.

असला दोष आपल्यांत आहे हें पुढें पुढें माणसाच्या लक्षांत सुद्धां येईनासें होतें. पण यदाकदाचित् कांहीं कारणांनीं तो दोष त्याच्या लक्षांत आलाच तर त्यानें असा निश्चय करावा कीं चार चौघे जमले असतांना, काय वाटेल तें झालें तरी, आपण आपल्यासंबंधीं कांहींहि बोलायचें नाहीं, व शक्य तों दुसऱ्याला बोलायला संधि देऊन तो सांगत असलेल्या गोष्टी आस्थापूर्वक ऐकून घ्यावयाच्या, किंवा आपण होऊन त्याला त्या विचारावयाच्या. अर्थात् तो सांगत असलेली प्रत्येक गोष्ट आपल्याला कळत आहे किंवा आवडत आहे असेंहि ढोंग करूं नये. नाहींतर गवयाला गायला हुरूप वाटावा म्हणून भलत्याच ठिकाणीं मान डोलावण्यासारखें किंवा मोठ्यांदा 'वाहवा' केल्यासारखें अप्रयोजकपणाचें व अरसिकतेचें व्हायचें ! एकदां देवधरांच्या बॅटिंग्चें कौतुक चाललें असतांना आपल्यालाहि त्यांची माहिती आहे हें दाखविण्याचे भरांत 'अरे, वा ! माणूस मोठा ऑल् राऊंड् दिसतो आँ ! क्रिकेटहि खेळतो, सेवासदनंहि चालवितो, अन् गातोहि !' असें बोलून एकानें आपल्या मूर्खपणाचें प्रदर्शन केल्याचें मला माहीत आहे.

कांहीं कांहीं माणसांना आपले विचार व आपलीं मतें तेवढींच खरीं व बरोबर असें वाटतें, व इतरांनींहि तीं ग्राह्य मानावींत असा त्यांचा कटाक्ष असतो. दुसऱ्यांना कांहीं समजत नाहीं, समजतें तें फक्त आपल्यालाच अशी त्यांची प्रामाणिक समजूत असते. इतिहासाची आवड असलेले असे माझे एक मित्र आहेत. त्यांचेंहि असेंच. 'हिटलरनें दोन वर्षांपूर्वीच इंग्लंडवर स्वारी करावयास पाहिजे होती, दुसरी अघाडी निर्माण न करण्यांत चर्चिल फार चुकत आहे, गांधींनीं मुसुलमानांशीं मिळतें घेतलें तें सपशेल चुकलं, सावरकर हिंदुत्वाबद्दल इतका आग्रह धरतात हा त्यांचा मूर्खपणा आहे' असें कांहींतरी त्यांचें सारखें चालूं असतें. प्रत्येकाचें कांहीं ना कांहीं चुकत असल्याचें त्यांना वाटतें. 'बरं, त्यांचें चुकलें, तुमचें तरी म्हणणें सांगा' असें कोणीं उद्देखून विचारलें म्हणजे मात्र ते गप्प बसतात. दुसरे एक मित्र आहेत. त्यांना डॉक्टरनें केलेली कोणतीच गोष्ट बरोबर वाटत नाहीं. डॉक्टरांनीं इन्जेक्शन दिलें असल्यास तें द्यायला नको होतें; बरें, दिलें नसल्यास तें द्यायला हवें होतें असें त्यांना नेहमीं वाटतें. 'आपल्या तान्ह्या मुलांना केव्हां व कसें पाजावें, व भाजणींत काय काय घालावें' हें सुद्धां हल्लींच्या बायकांना समजत नाहीं अशी

तक्रार माझे तिसरे एक मित्र करीत असतात! 'सर्व मूर्खांचा बाजार' असें या सर्वांना वाटत असतें!

दुसऱ्याचें एकादें मत बरोबर असलें तरी त्याचें श्रेय त्याला न देतां 'आज किती दिवस मी हेंच म्हणतों आहे' असें सांगून तें श्रेय ते स्वतःला घेतील! डॉ. भांडारकरांनीं सांगितलेलेंच स्वतः सांगून Dr. Bhandarkar also agrees with me' असें म्हणून स्वतःला मोठेपणा घेणारे कितीतरी संस्कृत प्रोफेसर, व 'तरी मी सांगत होतों!' येवढेंच म्हणून दुसऱ्यांना मूर्खांत काढणारे कितीतरी हरीचे लाल समाजांत आढळतात! लहानपणीं करड्या शिस्तीच्या वडिलांच्यापुढें सारखें तोंड दाबून घ्यावें लागल्यामुळेंच माणसाला मोठेपणीं अशी झब्बूबाजी किंवा दादागिरी गाजवावीशी वाटते, असें कांहीं मानसशास्त्रज्ञ म्हणतात. कारण कांहींहि असो—समाजांत वागतांना हा गुण (?) माणसांत असतां कामा नये हें खरें. त्यामुळें तो इतरांना तर अप्रिय होतोच, पण त्याशिवाय स्वतःच्या सुधारणेलाहि तो कायमचा अंतरतो. आपणच काय ते शहाणे असें मानणारा घमेंडनंदन दुसऱ्यांपासून शिकणार काय व स्वतःची उन्नति करणार कशी? 'बाल्येन तिष्ठासेत्' असें त्यानें कितीही वेळां ऐकलें असलें तरी मुलांतील जिज्ञासु वृत्ति व नवीन नवीन गोष्टी घेण्याची तयारी तो कधींच दाखवीत नाहीं. शौनकांसारखें शिष्यभावानें व प्रांजलपणें तो कधींहि विचारणार नाहीं. उलट 'सूतां' सारखे आपणहि सर्वज्ञ असून, खिस्त व महंमद यांप्रमाणेंच आपलाहि अवतार लोकांना संदेश देऊन शिकवण्यासाठींच झाला आहे असें त्याला वाटत असतें!

कांहीं माणसें नुसतें सांगून व शिकवून थांबत नाहींत, तर दुसऱ्यांना कांहीं साधतच नाहीं असें समजून प्रत्येक गोष्ट स्वतःच करतात. प्रत्येक गोष्ट आपण करतों तशीच करावयास पाहिजे, दुसऱ्या तऱ्हेनें होणें शक्यच नाहीं, झाली तरी आपल्या इतकी चांगली होणार नाहीं अश्या अभिमानानें त्यांना पछाडलेलें असतें. दुसऱ्यांचें कशाला?–माझेंच घ्या ना.–साधा पुडा बांधायचा असो, पाकिटावर सील करायचें असो, विजारींत नाडी घालायची असो, पेन्सिल तासायची असो, अंथरूण घालायचें असो, धोतराच्या निऱ्या करायच्या असोत, केर काढायचा असो, स्टोवला पंप करायचा असो,–गोष्ट कितीहि साधी व क्षुल्लक असो, ती मी घरांत दुसऱ्या कोणाला करूं देणार नाहीं. स्वतः केल्यावांचून माझं समाधानच होत नाहीं. खरं सांगायचं म्हणजे मी फार प्रेमळ आहें व पोराबाळांना त्रास पडूं नये अशी माझी खरोखरची

इच्छा असते. परंतु 'नेहमीं यांच्या तंत्रानें चालण्यापेक्षां आपण स्वतः कांहींतरी करावें–मग तें थोडसें वाईट झालें तरी हरकत नाहीं' असें माझ्या मुलांना वाटत असतें. आणि म्हणून माझा टिक्कोजीपणा त्यांना आवडत नाहीं. पण ही महत्त्वाची गोष्ट मी विसरून जातों, आणि त्यांना खूष ठेवण्याच्या सदिच्छेमुळेंच मी त्यांना नाखूष करतों!

लहानसान घरगुती बावतींत जसें माझें होतें तसेंच मोठ्या सार्वजनिक बावतींत कांहींचें होतें. म्युनिसिपॅलिटींतील किंवा कौंसिलांतील सर्व नामदार सभासद नुसत्या नांवाचे नामदार आहेत, निरनिराळे राजकीय पुढारी बेवकूब आहेत, व त्यांनीं केलेली घाण व चुथडा हीं निस्तरायला योग्य असें कोणी असेल तर तें आपण असें त्यांना मनांतून वाटत असतें. सदरहु नादान सभासदांना (निवडणुकींत) पाडून ते स्वतः निवडून जात नाहींत ही गोष्ट निराळी. कदाचित् त्यांच्या निवडून येण्यानें आणखी चुथडा व घाण मात्र व्हावयाचीं! वर जीं चार-पांच प्रकारचीं उदाहरणें सांगितलीं त्यांवरून माणसांत–विशेषतः आपल्यासारख्या वयस्क माणसांत–अहंता हा दुर्गुण किती रोमरोमीं भिनला असतो, व त्यामुळें आपण दुसऱ्यांना अप्रिय होऊन स्वतःचें नुकसान कसें करतों हें लक्षांत आलें असेलच. त्या एकाच दुर्गुणाचीं अहंमन्यता, आत्मश्लाघा, स्वार्थपरायणता वगैरे निरनिराळीं नांवें असून त्याचीं रूपेंहि निरनिराळीं दिसतात. हे सर्व एकाच बीजाचे निरनिराळे धुमारे किंवा एकाच गळवाचीं निरनिराळीं तोंडें असून तीं बरीं करायचीं म्हणजे मूळ गळूं कापून काढून त्याच्या खालच्या नासक्या रक्ताचा निचरा केला पाहिजे. हा दोष उघड्या–नागड्या स्वरूपांत दिसून आला म्हणजे त्याची राजरोस चौकशी करून त्यावर इलाज तरी करतां येतो; पण एकादे वेळीं तो इतक्या गुप्त रीतीनें वावरतो कीं दुसऱ्याला व स्वतः त्या माणसालाहि त्याचा पत्ता नसतो. मोठमोठ्या माणसांतील नम्रता, शालीनता हीं याचींच नाजूक रूपें होत. आपल्या खऱ्या कर्तृत्वाचें योग्य श्रेय कोणीं देऊं लागलें म्हणजे 'कसचं–कसचं,' 'देवाची कृपा,' 'ईश्वरी प्रसाद,' 'हा पामर काय करणार,' 'आपण निमित्तमात्र असून कर्ता–करविता नारायण आहे' असें कांहींतरी म्हणून हीं माणसें मुद्दामच अंग झाडून मोकळीं होऊं पाहतात! आपलें नांव दिसूं नये म्हणून हे अनामिकपणें किंवा टोपण नांवानें लिहितील! वास्तविक यांतहि ढोंग व संतांच्या खऱ्या मोठेपणाची खोटी ऐट असते. स्वतःच्या कर्तृत्वाचा वृथाभिमान धरूं नये हें चांगलें. पण असले

लोक जेव्हां मुद्दामच आडनांवानें त्रावरून आडरानांत शिरतात व खोटी नम्रता दाखवितात तेव्हां तो दोषच होतो. सीझर का दुसऱ्या कोणा मोठ्या माणसासंबंधीं सांगतात–'आपण कसचे स्तुतीला भाळणार!' असें लोकांनीं त्याला म्हटलें म्हणजेच तो जास्त खुलत व खुशालत असे! तेव्हां या हरिदासी ढोंगीपणाबद्दलहि माणसानें जागृत राहिलें पाहिजे.

अगदीं अहंतेच्या रूपाचेच नव्हत, पण त्याच जातींतले दुसरेहि दोष सांगतां येतील. कांहीं माणसें अशीं दोषग्राही आणि छिद्रदृष्टि असतात कीं दुसऱ्याच्या बारीक सारीक चुकांवरहि ते कावळ्यासारखी झडप घालतील! आणि त्यासंबंधींची स्वतःची एकादी उपपत्ति लावून दुसऱ्याला दोष देतील; किंवा त्यांचें खापर तुमच्याहि माथ्यावर फोडतील! मध्यरात्रीं घरांत चोरी झाल्याचें तुम्ही त्यांना सांगायला जा, कीं 'गस्त वाल्याचेंच तें काम' असें छातीठोकपणानें ते सांगतील; व 'तुम्ही असे कसे निजलांत!' असें आश्चर्यानें विचारतील! खुद्द स्वयंपाकघरांतच वीज पडून एकादीचा कपाळमोक्ष झाला असला तरी 'वया मरायला तेथें गेलीच कशाला?' असें म्हणून विचारीला आणखी मारतील! पुष्कळ वेळां स्वतःचे दोष सुद्धां ते तुमच्यावर लादतील, व आपण निर्दोषी असल्याचा वाहणा करतील! लहानपणीं त्यांनीं स्वतः न केलेल्या चुकाहि त्यांच्याच अंगीं चिकटवल्या गेल्याची व निष्कारण भोगाव्या लागलेल्या दंडाची ही प्रतिक्रिया असावी; किंवा आंतून टोंचणाऱ्या स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीलाच गप्प वसविण्याचा हा त्यांचा वृथा प्रयत्न असावा. वसंतसेनेला स्वतःच मारून 'न मया' म्हणणाऱ्या शकारासारखेंच हें आहे! कुटाळक्या करणें, कंड्या पिकविणें, चहाडयाचुगल्या सांगणें किंवा ज्याला आपण 'लांडे कारभार' म्हणतों ते करणें हे सर्व दोष याच सदरांत पडणारे आहेत. अशा दोषांनीं युक्त असलेलीं नतद्रष्ट माणसें मोठमोठ्या व्यक्तींतील किंवा विभूतींतील बारीकसारीक दोषांवरहि चोंच मारून त्यांच्या सबंध चारित्र्यावर बोळा फिरवायला मागेंपुढें पहात नाहींत. मग तें महात्माजींचें मर्दनपूर्वक स्नान असो किंवा वीर सावरकरांचा अत्तराचा फाया असो! विशेषतः बायकांमध्यें हा दोष प्रामुख्यानें दिसून येतो. एकाद्या स्त्रीच्या आयुष्यांतला उत्तरार्ध कितीहि स्पृहणीय असला तरी पूर्वार्धांत तिनें केलेल्या एकाद्या आगळिकीची किंवा चुकीची वाच्यता अनाहूतपणें करून तिच्याबद्दल इतरांना वाटत असलेल्या आदरांत त्या विरजण घालतील! आणि ऐकणारणींपैकीं प्रत्येकीला 'हें अगदीं खाजगी आहे' म्हणून वर बजावतील.

वहुभाषपणा, गोष्टीवेल्हाळपणा हेहि दोष अशाच प्रकारचे आहेत. असे लोक मनानें फार प्रेमळ व भाबडे असतात. एकाद्यासंबंधीं नसत्या कंड्या उठवून त्यांच्या नांवाला कालिमा आणण्याचा दुष्ट हेतु त्यांच्यांत नसल्यामुळें त्यांचेपासून नुकसानहि तसें फारसें होत नाहीं. पण तोंडाच्या वायफळ वटवटीनें लोकांचे कान किटवून त्यांना काय म्हणून त्रास द्यावयाचा ? आणि स्वतःच्या वलवल बोलण्याची जाणीव होऊन ' मी जरा जास्त वोलतों का, हो ? ' असें अजाणपणें विचारायलाहि हे कमी करीत नाहींत. अशा निष्पाप, भावड्या, गप्पाखोर माणसाचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे गडकऱ्यांचा ' धुंडिराज ! ' घनःश्यामासारखा तामसी अन् अधीरा माणूसहि त्याची गोड वडवड आनंदानें ऐकून घेतो ! पण एकंदरींत त्याचें बोलणें वायफळ, फाजील अन् जरा जास्तच होतें !

दुसऱ्यांची वित्तंवातमी काढण्याचें व तिचा वेळींअवेळीं हळूंच उपयोग करण्याचें व्यसनहि कांहींना असतें. आपल्या मानभावीपणानें ते दुसऱ्याच्या अंतरंगाचा अगदीं ठाव घेतील व त्यांतलें एकादें विंग डोळे मिचकावीत, जीभ वेळावीत, इकडे-तिकडे पाहात, थवकत व अवांकत हळूंच बाहेर फोडतील; किंवा त्या माणसावरच त्याचा प्रयोग करून त्याला ऐनवेळीं फशीं पाडतील.

फाजील व्यवस्थितपणा हाहि अहंतेचाच एक प्रकार असून आत्मप्रदर्शनाचा मार्ग आहे. महत्त्वाच्या बाबतींत माणसानें अत्यंत व्यवस्थित असलें पाहिजे यांत शंकाच नाहीं. पण त्यालाहि ताळतंत्र न राहिल्यामुळें पुष्कळ वेळां नुकसानच होतें. साध्या—क्षुल्लक गोष्टीसुद्धां यथासांग व मंत्रचळेपणानें करण्याचे भरांत महत्त्वाच्या घटनाहि ते बिघडवतील ! अशा प्रकारचे लोक बूट स्वच्छ करण्यांत किंवा बिस्तरा ठाक-ठिकीनें बांधण्यांत इतका वेळ घालवतील कीं त्यामुळें स्टेशनवर उशीरां पोंचतील अन् गाडी चुकवतील ! तळमजल्याच्या फरशीचें कामच ते इतक्या कसोशीनें व कांटेखोरपणानें चालवितील, कीं मृग लागून पाऊस डोक्यावर आला तरी तिसऱ्या मजल्यावर कौलें चढविण्याचें भान यांना राहणार नाहीं ! लहानपणीं करायच्या गोष्टीच म्हातारपणीं ते इतक्या साक्षेपानें करीत बसतात कीं या वयांतील गोष्टी त्यांच्या तश्याच राहून जातात ! कांहीं कांहीं बायका फाजील स्वच्छतेच्या व भलत्या व्यवस्थितपणाच्या भुतानें इतक्या पछाडलेच्या दिसतात कीं त्या वेडांत बाकीच्या सुखानांहि त्या लाथाडतात. मोठ्या प्रेमानें आईला मुका देण्याकरितां म्हणून मुलानें जवळ यावें, पण आईसाहेबांची दृष्टि त्याच्या विस्कळित केंसाकडे जाऊन ते अगोदर

साफसूफ करून येण्याबद्दल त्या त्याला फर्मावितील! नवरा खुशींत व लाडांत आला असतांना सुद्धां या बायका आपल्या कांटेकोरपणानें व तालेवारपणानें त्याला हिरमुष्टः करीत असतील कीं काय कोणास ठाऊक!

एकाद्यानें केलेली चांगली गोष्ट वास्तविक फार चांगली आहे असें वाटत असूनहि तसें न म्हणतां तिच्यांतील कांहींतरी न्यून काढायचें किंवा एखादा दुष्ट हेतु सूचित करावयाचा व अश्या रीतीनें स्वतःचें समाधान करून घ्यावयाचें असाहि एक दुर्गुण कांहीं जणांत दिसून येतो. कोणीं मोठा दानधर्म केला, कोणीं शेजाऱ्यापाजाऱ्यांना मदत केली तर त्याचें हें करणें स्वतःच्या नांवाकरतां किंवा अन्य कांहीं फायद्याकरितां आहे, असें हे सिद्ध करतील व आपल्या म्हणण्याला 'आत्मनस्तु कामाय सर्वं' किंवा 'प्रीति जी दुज्यावर मोठी, ती सर्वहि आपुल्यासाठीं, अर्जुना' अशासारख्या एकाद्या भारदस्त वचनाचा आधार दाखवितील! सत्य, सौंदर्य, सौजन्य यांपैकीं कशावरहि यांचा विश्वास नसल्यामुळें, आणि सर्व गोष्टी मनुष्य स्वार्थाकरितां करतो असें यांचें तत्त्वज्ञान असल्यामुळें अशीं माणसें कायमचो संशयवादी बनतात व स्वःतच्या सुधारणेला व समाधानाला मुकतात.

व्यवस्थितपणाच्या किंवा स्वच्छतेच्या सोसाप्रमाणेंच चांगल्या तत्त्वांच्या अतिरेकामुळेंहि माणसें कशीं अप्रिय होतात हेंहि पाहण्यासारखें आहे. खुद्द महात्मा गांधींचा सत्य व अहिंसा यांबद्दलचा आग्रह घ्या. हीं तत्त्वें खरोखरच अत्यंत उच्च व उदात्त आहेत. पण त्यांचा अतिरेक केल्यामुळेंच गांधीजींना कितीतरी चांगल्या माणसांच्या विरुद्ध जावें लागत आहे! शिक्षणाचें तत्त्व फार चांगलें. पण तें प्रत्येक मुलामुलीला व अगदीं उच्च दर्जापर्यंतचें मिळालें पाहिजे असा आग्रह धरणें चांगलें होणार नाहीं. मुलांना स्वातंत्र्य पाहिजे हें खरें; पण म्हणून त्यांनीं कांहीं केलें तरी करूं द्या असें म्हणणें धाष्ट्र्याचें होईल. जीवनांत करमणुकीला अतिशय महत्त्व आहे हें खरें पण मजुरांच्या पोटापाण्याची सोय न करतां त्यांचेकरितां सिनेमागृहें व क्रीडांगणें तयार करून काय उपयोग! व्यापारांत व उद्योगधंद्यांत शिस्त व व्यवस्था पाहिजेत हें खरें; पण व्यापार वाढवून कमाई वाढविण्यापूर्वीच टाईपरायटर, टेलीफोन, फायली, कारकून, पट्टेवाले वगैरेसारख्या भपक्यावरच खर्च करून कसें परवडेल? कोणतेंहि सत्तत्त्व योग्य वेळीं व योग्य प्रमाणांत लागू न केल्यामुळें तें कसें निरर्थक व निरुपयोगी होतें येवढेंच मला तुमच्या लक्षांत आणून द्यावयाचें आहे.

आतांपर्यन्त अहंतेचे प्रकार व त्यांचेमुळें उत्पन्न होणारे दोष यांचें दिग्दर्शन केलें. या अहंगंडानें दूषित झालेलीं माणसें स्वतःच्या प्रत्येक गोष्टीचें जारीनें समर्थन करून दुसऱ्यांना खालीं पाहायला लावण्याच्या आपल्या तामसी वृत्तीमुळें समाजांत मानानें व सुखानें कशीं वावरूं शकत नाहींत हेंहि आपण पाहिलें. अहंगंडाच्या उलट जो हीनगंड त्यानें पछाडलेलींहि कांहीं माणसें असतात. ‘ आपल्याला कांहीं समजत नाहीं, कांहीं येत नाहीं ’ अशा स्वरूपाच्या दुबळ्या भावनेनें त्यांना कायमचें ग्रासलेलें असतें. ते कोणतेंहि काम करायला लागोत, प्रथम अनेकांना अनेक वेळां विचारतील व त्यांनीं ठीक म्हटल्यास तें करतील. स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास न ठेवतां किंवा अंतस्थ विचारशक्तीला न विचारतां, हीं माणसें नेहमीं जनताजनार्दनाला कौल लावतात व तें काम करणें किंवा न करणें हें त्या कौलाच्या डावें-उजवें पडण्यावर अवलंबून ठेवतात. पांचामुखीं परमेश्वर या न्यायानें लोकमताला मान देणें हें चांगलें; पण त्याचा फाजील बाऊ करून स्वतःला योग्य वाटत असलेली गोष्ट सुद्धां न करणें हा दोषच होय. लोकमताची फिकीर अजिबात न करणें हें जितकें वाईट तितकेंच त्याच्याबद्दल फाजील हळवेपणा दाखविणें हेंहि वाईट.

दुसरीं कांहीं माणसें अशीं असतात कीं तीं लोकमतावर सर्वस्वीं अवलंबून न राहतां आपल्याला वाटेल तें आधीं करून टाकतील पण नंतर ‘ लोक काय म्हणतील,’ ‘ लोकांत कसें दिसेल ’ अशा अष्टाक्षरी मंत्राचा जप उगीचच जपत बसतील. करायचें तें करून झाल्यावर लोकमत अजमावून पाहण्याच्या किंवा त्याचा कानोसा घेण्याच्या इच्छेंतहि एक प्रकारचा भित्रेपणाच असतो. माझेंच उदाहरण घेतों. ‘ ती० अवांस ’ हें जें पत्र मी ‘किर्लोस्करां’त दिलें तें, मी लिहीत असलेल्या पत्रांपैकीं एक आहे. पण अशीं पत्रें प्रसिद्ध केलीं असतां लोकांना कितपत आवडतील याचा अंदाज यावा याच भावनेनें तें एकटेंच मीं अगाऊ प्रसिद्ध केलें असावें. लोकांनीं कांहीं सूचना केल्याच तर मी त्या स्वीकारीनच किंवा त्यांच्या नापसंतीची फारशी पर्वा करीन असें माझें मलाहि वाटत नाहीं.

‘ चांगलें कसें होईल ’ याचे पेक्षां ‘ चांगलें कसें दिसेल ’ याचीच विवंचना सामान्य माणसांना अधिक लागलेली असते. ‘ असणें ’ आणि ‘ दिसणें ’ यालाच वेदान्तांत ब्रह्म आणि माया ( ‘ अनुक्रमें ’ शब्द घालायचा विसरलों. ) म्हणतात. व मायेला भुलून ब्रह्माला गमवूं नका असेंच वेदान्ताला सांगावयाचें असतें असें मला वाटतें. आपल्याला जें चांगलें व बरोबर वाटतें तें इतरांना तसेंच वाटतें अश्या

जाणीवेनेंहि कांहीं लोकांना मोठें समाधान वाटतें. आणि लोकांचें मत घेत–घेतच ते कोणतीहि गोष्ट पार पाडतात. वास्तविक पाहतां यांत चुकलें असें कांहीं नसलें तरी त्यामुळें माणसाला मानसिक दुबळेपणा येतो व तो कोणतीहि गोष्ट स्वतःच्या जबाबदारीवर व धडाडीनें पार पाडण्यास असमर्थ बनतो. ' खानेकू हम् ' असा धडधडीत स्वार्थीपणा जरी तो दाखविणार नाहीं तरी ' लडनेकू हम् ' असें म्हणून मर्दपणानें पुढें येण्याची धमकहि तो दाखविणार नाहीं. नेहमीं मागें मागें राहून तिऱ्हाइताकरवीं साप मारण्याचा तो प्रयत्न करील. या वृत्तीचा एक फायदा मात्र असा होतो कीं कोणत्याहि कृतीचें—ती चांगल्या प्रकारें पार पडल्यास—पूर्ण श्रेय जरी त्याच्या पदरांत पडत नसलें तरी ती गोष्ट वाईट झाल्यास तिचें अपेशहि त्याचे माथीं कोणी मारीत नाहीं. व्यावहारिक दृष्ट्या हें फायद्याचें असलें तरी नैतिक दृष्ट्या हीनतेचें आहे असेंच म्हटलें पाहिजे.

आतां अगदीं निराळ्या जातीच्या एकदोन दोषांचा उल्लेख करून पुरे करतों. आपल्यापैकीं कांहींजण मोठे ढोंगी आणि वरकरणी असतात. ते इतरांना धडधडीत फसविण्याइतके दुष्ट, किंवा स्वार्थ साधण्यासाठीं दुसऱ्याची जाणूनबुजून खुशामत करण्याइतके कावेबाजहि नसतात. पण ' आपल्याला काय करायचें आहे ? जाईना का मरेना. ' अश्या भावनेनें वागतील व ' रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति ' असें सामोपचाराचें धोरण ठेवून दोषांनाहि खूप ठेवण्याचा प्रयत्न करतील. पण खूष ठेवतांनाहि जो कांहीं संयम व विवेक राखायला पाहिजे तो ते राखीत नसल्यामुळें त्यांच्या शाबासकीला व वाखाणणीला विचारी लोक कांहींच किंमत देत नाहींत. माझे एक मित्र आहेत. त्यांना कोणीहि लहान-थोर, सुष्ट-दुष्ट मनुष्य भेटो—त्याला ते अदबीनें नमस्कार करतील, व त्याच्या प्रत्येक कृतीची मोठ्या अघळपघळपणानें वाखाणणी करतील. पण या वाखाणणींत सत्यांश किती हें आतां प्रत्येकाला माहीत झाल्यामुळें त्यांच्या चांगूलपणाचें बरें वाटण्याऐवजीं त्यांच्या दिखाऊपणाचें वाईटच वाटतें. चांगलं, मध्यम, वाईट असा विवेक करून जे बोलतात त्यांच्याच बोलण्याची किंमत वाटते—नेहमींच नुसतें चांगलें म्हणणारांच्या नव्हे.

अघळपघळ स्तुति किंवा अवाच्यासवा निंदा करायला नको म्हणून कांहीं माणसें नुसतेंच ' हं हं ' म्हणून वेळ मारून नेतात. चांगल्याला चांगलें, वाइटाला वाईट असें स्पष्टपणें म्हणण्याचें धैर्य व सरळपणा तीं कधींच दाखविणार नाहींत. मी स्वतः या वर्गांत मोडत असून या माझ्या दुर्गुणाबद्दल आमचे भास्करभाऊ माझ्यावर नेहमीं

रागावतात व चिडतात. आणि तें बरोबरहि आहे. मुग्धतेमुळें मी स्वतः चांगला ठरत असलों तरी माझ्या मानानें ते निष्कारण वाईट ठरतात.

कोणतेंहि मत द्यावयाचें तें अतिरंजित व अतिरिक्त स्वरूपाचें देण्यांतहि अशाच प्रकारचा दोष असून तो विशेषतः तरुण माणसांत दिसून येतो. कोणत्याहि चांगल्या किंवा वाईट गोष्टीसंबंधीं त्यांना बोलायचें असो, ते ' भयंकर, ' ' मस्त ' अशासारख्या अत्युक्तिपर व तमतावाचक शब्दांचा उपयोग करतात. ' राधाकृष्ण काय भयंकर बोलले, ' ' महाजनी काय मस्त शिकवितात, ' ' बडे नायडू काय बेफाम खेळले, ' ' छोट्या नायडूंच्या बोलिंगवर इलाहि काय भलता जिरला, '—अश्या प्रकारची मस्ती ते शब्दांशीं करीत असतात. आपण वापरतों तीं विशेषणें अर्थानुरूप पाहिजेत, येवढेंच नव्हे, तर आपल्या मनांतील भावनांचा कमी–जास्तपणा व्यक्त करण्याजोगा रेखीवपणा त्यांत पाहिजे याची दादच त्यांना नसते. तुमचें मत बरोबर असलें तरी तें बरोबर रीतीनें मांडलें तरच त्याचा योग्य परिणाम होतो. नाहींतर तुमच्या मताला कोणी विचारीत नाहीं, व तुम्ही कायमचे खोटे व लुच्चे बनतां. ' जिरणें ' सारखे शब्द स्त्रियांचे तोंडीं तर फारच चमत्कारिक दिसतात.

कांहीं माणसांना कोणत्याच गोष्टींबद्दल कसलेंच गांभीर्य वाटत नाहीं. ' यांत कांहीं अर्थ नाहीं, ' ' त्यांत कांहीं राम नाहीं ' असें म्हणून तीं महत्त्वाच्या गोष्टी कश्यातरी करायच्या म्हणून करतात व दुसरे कोणी त्या श्रद्धेनें व आस्थापूर्वक करीत असलें तर त्यास नांवें ठेवतात. कोणीं कांहीं करावयास काढलें व त्यासंबंधीं त्यांचा सल्ला घेऊं लागलें तर असलीं माणसें ' वाईट नाहीं, ठीक आहे, ' ' करून पाहायला हरकत नाहीं ' अश्या प्रकारचें कांहींतरी बोलून स्वतःचा शहाणपणा व अलिप्तपणा दाखवितात. जग ही सगळी माया आहे, तें मृगजळासारखें फसवें आहे, अशा प्रकारची जाणीव केल्यासवरलेल्या व अनुभव घेतलेल्या सिद्ध, किंवा मुक्त माणसांतच उत्पन्न होऊं शकते. व त्यांनींच ' संसार असार आहे, ' ' व्यवहार विफल आहे ' असें म्हटल्यास बरें दिसतें. पण साधकावस्थेंत व मुमुक्षुदशेंतच माणसानें असलें अकालि वैराग्य दाखविणें, व वैराग्याच्या नांवाखालीं कांहींहि न करणें हें एक प्रकारचें ढोंगच आहे. अतिशयोक्तीचा दोष जसा विशेषतः तरुणांत दिसतो तसा हा सोंगीढोंगीपणाचा दोष मुख्यतः आपल्यासारख्या म्हाताऱ्यांत दिसतो. तेव्हां या दोन्ही दोषांना टाळून आपलें नित्य कर्म विहित मार्गानें करीत राहणें हेंच आपलें खरें कर्तव्य आहे.

मित्रांनो, मीं वाचलेला हा दोषांचा पाढा ऐकून व कंटाळून तुम्ही मला म्हणाल ‘ हें सर्व ठीक आहे, पण हे दोष नाहींसे कसे करावे यासंबंधीं कांहीं विधायक सूचना करा कीं. ’ पण खरें सांगूं ? मीहि तुमच्यासारखा एक साधक व मुमुक्षु असून हे दोष टाळण्याचा निश्चित मार्ग मला स्वतःलाच अद्याप सांपडला नाही. डोळस दृष्टीनें व सुधारण्याच्या बुद्धीनें वावरूनच आपल्याला तो सांपडेल अशी माझी श्रद्धा आहे. व या श्रद्धेनेंच आपण सर्वांनींहि वागावें अशी आपणांस विनंति आहे. निरनिराळ्या मोहांनीं लडवडलेल्या जगांतच सारखे रममाण न होतां रोज थोडा वेळ तरी अंतर्मुख व्हा, व समाधीच्या रूपानें आत्मनिरीक्षण करून असलेले दोष शक्य तितके, व शक्य तितक्या प्रमाणांत काढून टाकण्याचा शक्य तितका प्रयत्न करा. प्रयत्नांती परमेश्वर प्राप्त होतोच. नाहींच झाला तरी आपण आपलें कर्तव्य केलें हा आनंद तरी आपणांपासून कोणी हिरावून नेणार नाहीं.

आतांपर्यंन्त मीं आपणांपुढें आपल्यांतील दोषांचाच तेवढा पाढा वाचला. आपणांमध्यें गुणहि पुष्कळच आहेत. पण त्यांची जाणीव आपणांपैकीं प्रत्येकाला असल्यामुळें ते पुन्हां सांगण्यांत औचित्य तें काय ? आपणांपैकीं बरेचजण स्वतःच्या दोषांकडे पाहूं शकत नाहींत व म्हणून ते स्वतःच्या सुधारणेलाहि प्रवृत्त होत नाहींत. अशांचेसाठीं हें कटू काम करावें लागलें. राग नसावा. हे विनंति.

‘ सर्वेऽत्र सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चित् दुःखभाक् भवेत् ’ अशी परमेश्वराची प्रार्थना करून व आपल्याला हवी असलेली उन्नति होवो अशी इच्छा करून आपणां सर्वांची रजा घेतों.

## चि० अप्पास--                                                    ३

*अ. आशीर्वाद, वि.*

'ब्राह्मणांची नुसती बडबड ऐकून घ्यावी ! कृतीच्या नांवानें शून्य !' असें म्हणून त्यांच्या वाग्वीर्याची नेहमीं निंदा करण्यांत येते; पण मी ब्राह्मण असूनहि मला मात्र ही निंदा बिलकूलच लागूं पडत नाहीं. कारण एखाद्याला कांहीं सांगा-शिकवायचें झाल्यास मला तें त्याला तोंडानें प्रत्यक्ष बोलून दाखवून करतां येत नाहीं, तर हातानें लिहून करतां येतें. असें करण्यांत एक फायदा असा असतो कीं आपल्याला आपलें म्हणणें संथपणें, पूर्णतया व निर्व्यत्यय सांगतां येतें. शिवाय बोलण्याच्या भरांत तोंडांतून गेलेल्या अधिकउण्या शब्दांमुळें ऐकणाराला राग येण्याचा किंवा वाईट वाटण्याचा संभव असतो, आणि त्याला राग आला किंवा त्याला वाईट वाटलें म्हणजे तो आपलें बोलणें ऐकून घेण्याच्या मनःस्थितींत रहात नाहीं; व मग अर्थातच आपल्या बोलण्याचा कांहीं उपयोग होत नाहीं.

लौकिक दृष्ट्या आपलं एकमेकाशीं मामा-भाच्याचें नातें असलें तरी वस्तुतः नात्याच्या संबंधापेक्षां मैत्रीचाच संबंध आपल्यामध्यें जास्त आहे असें तूंहि कबूल करशील. तसें नसतें तर तूं माझ्याशींहि इतर नातेवाइकांप्रमाणें जरूरीपुरतें व औपचारिक रीत्या बोलून काम भागविलें असतेंस. पण तूं माझ्याशीं इतक्या मोकळे-पणानें वागतोस, इतक्या निःसंकोचपणानें थट्टामस्करी करतोस कीं आपण नाते-वाईक नसून खरेखुरे अन् जिवश्चकंठश्च मित्र आहोंत असें आपणां दोघांना व

इतरांनाहि वाटतें. स्वतःसंबंधींच्या अश्या कितीतरी गोष्टी तूं मजजवळ बोलला आहेस कीं एरवीं तूं त्या कोणाजवळहि बोलला नसतास.

अप्पा, तुझ्यांत खरोखरच बरेचसे गुण आहेत. शरीरसंपदा व रूपसंपदा तुझ्यावर प्रसन्न आहेत; तूं उत्तम प्रकारचा खेळाडू आहेस; वृत्तीनेंहि तूं खिळाडू, उमदा व उदार आहेस. सुहास्याच्या व विनोदबुद्धीच्या देणग्यांमुळें तूं सर्वांना हवाहवासा वाटतोस. मनानें निष्कपटी, वाणीनें गोड, व वृत्तीनें प्रेमळ अन् हळवा आहेस. तुझी बुद्धीहि बऱ्या प्रकारची असून तूं आपला अभ्यास आजपर्यंन्त बऱ्याच चांगल्या प्रकारें पार पाडला आहेस. परंतु गुणांप्रमाणें कांहीं अवगुणहि तुझ्यांत आहेत. अजूनपर्यंन्त त्यांचा फारसा जोर झाला नसल्यामुळें तुझें आजपर्यंन्तचें जीवन सुरळीत व यशोयुक्त चाललें आहे खरें; पण पुढचें आयुष्यहि तितकेंच सुरळीत जाईल अश्या गोड धुंदींत राहिलास तर अद्यापपर्यंन्त कमजोर असलेले हे अवगुणच केव्हां जोर करतील याचा नेम नाहीं, आणि म्हणून कांहीं महत्त्वाच्या दोषांची तुला वेळींच जाणीव करून देणें मला अगत्याचें वाटतें.

तुझ्यांतील जे जे दुर्गुण ज्या ज्या वेळीं मला दिसून आले ते ते त्या त्या वेळींच दाखवून देऊन मीं तुला जागें करावयास पाहिजे होतें; आणि तुझा माझेवर जो नितान्त विश्वास आहे त्या विश्वासामुळें तूं माझें शांतपणें ऐकलें असतेंस अशीहि माझी खात्री आहे. पण मीं प्रथमच तुला सांगितलें ना कीं मला वेळींच कोणतीहि गोष्ट कोणालाहि स्पष्टपणें सांगायचा धीर होत नाहीं? तो रागावेल कीं काय, त्याला वाईट वाटेल कीं काय अशी भीति वाटून मी आपल्या विहित कर्तव्यापासून पुष्कळ वेळां पराङ्मुख होतों हें खरें.

कोठूनतरी सुरुवात करायची म्हणून तुझ्या परवांच्या परीक्षेचीच बाबत घेऊं. आतांपर्यन्तच्या दोन्ही परीक्षा चांगल्याप्रकारें पास होणारा तूं इंटरमध्यें नापास झालास! परवांच एका प्रिन्सिपलसाहेबांनीं असें म्हटल्याचें वाचलें कीं "मुलं दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गांत पास होतात तरी कशीं!" त्यांना वाटतं कीं सर्वच मुलं पहिल्या वर्गांत पास झालीं पाहिजेत! तरी बरं कीं सर्वच पोरं पहिलीं आलीं पाहिजेत असं त्यांना वाटत नाहीं! भाकरी खायला मिळत नाहीं तर लोक लाडू कां नाहीं खात असें राजानें विचारण्यासारखाच हा प्रकार आहे. नापासांचीं दुःखें व अडचणी काय आहेत हें जावें त्यांच्या वंशा तेव्हांच कळे. मी स्वतः त्यांच्या वंशांत एकदां सोडून दोनदां जन्मलों असल्यामुळें त्यांच्याबद्दल मला नेहमीं एक प्रकारची

कारणानें तुझी व तुझ्या प्रोफेसराची जी थोडी कुरबुर किंवा वाचावाची झाली त्याचा आकस धरून त्यांनीं तुला आपल्या पेपरांत नापास केलें असावें. आणि तूं कधीं खोटें बोलणार नाहींस असा माझा विश्वास असल्यामुळें हें तुझें म्हणणें मी खरें मानतों. पण, बाबारे! हें तर जास्तच वाईट! बोलाचालींत प्रोफेसर जें कांहीं म्हणाला असेल तें अत्यंत मूर्खपणाचें व अपमानकारक असेल. उलट तुझें म्हणणें अगदीं खरें असेल. पण तोडीस तोड म्हणून तूं त्याला उद्दामपणाचें उत्तर द्यावयास नको होतें. खरं मुद्दां सौम्य शब्दांत व नम्रपणानें सांगतां येतें. तें सांगतांना अगदीं फाडफाड व टाकूनच बोललें पाहिजे असें नाहीं सासू–सून, नवरा–बायको, मालक–नोकर, राजा–प्रजा यांच्यांत तेढ व भांडणं उत्पन्न झालीं असतांना नुकसान कोणाचें होणार हें देवच बोलून चुकलाय! जी गोष्ट वरील संबंधांत तीच प्रोफेसर व विद्यार्थी, आणि परीक्षक व परीक्ष्य यांचे बाबतींत व्हावयाची. शिक्षक, प्रोफेसर, परीक्षक कितीहि मूर्ख–अगदीं दगड–असले तरी त्या खुर्चीचाच असा कांहीं गुण आहे कीं लोकांत तेच शहाणे आणि सामर्थ्यवान ठरायचे. व आपण जोंपर्यन्त विद्यार्थी आहोंत तोंपर्यन्त त्यांच्याशीं वागतांना आपल्याला खालच्या मानेनेंच वागलें पाहिजे. एकदां स्वावलंबी अन् स्वतंत्र झाल्यावर ' ते आमचे गुरूच नव्हत ' अशी घोषणा करून त्यांस खुशाल खुर्चीवरून खालीं ओढावें. तेव्हां थोडक्यांत सांगायचें म्हणजे, इतर कांहीं नडलें नसलें तर तुझा ' बाणेदारपणा ' तरी तुला नडलाच आणि तुझें एक सबंध वर्ष फुकट गेलें.

आयुष्यांतलं एक वर्ष फुकट गेलं म्हणून येवढं काय बिघडलं असं कदाचित तूं म्हणशील. ' वर्ष ' असें जेव्हां मी म्हणतों तेव्हां मी त्याच्याकडे नुसत्या कालगणनेच्या दृष्टीनें पहात नाहीं. तीनशें पासस्ट दिवस फुकट गेले याचें मला तितकेसें वाईट वाटत नाहीं. कांहीं एक दुष्परिणाम मागें शिल्लक न ठेवतां तें वर्ष निमूटपणें गेलें असतें तर माझी हरकत नव्हती. पण जातां जातां त्यानें अपयशाची जी जाणीव तुझे मनांत करून दिली ती तुला तुझ्या पुढच्या आयुष्यांत नडत राहिल्यावांचून राहणार नाहीं. अपेशाची भावना मनांत एकदां उत्पन्न झाली म्हणजे ती कांहीं केल्या जात नाहीं. अपयशाचीं कारणें शोधून काढून व तीं नाहींशीं करून पुन्हां सिद्धी मिळविणारे लोक फार थोडे. बाकीचे सर्व एका अपयशानें कायमचे अपेशी बनण्याची भीतीच जास्त. यशाचेंहि असेंच होतें. एकदां पहिलें यश आलें म्हणजे, दुसरें–अन् मग तिसरें असें होत जाऊन मनुष्य कायमचा यशस्वी बनतो.

Nothing succeeds like success याचा अर्थ हाच. या मानसिक सत्याचा अनुभव तुला स्वतःला आजपर्यंत पुष्कळशा सामन्यांतून आल्यामुळें मी जास्त सांगत नाहीं. Nothing succeeds like success हें जसें खरें आहे तसेंच Nothing fails like a failure हेंहि खरें आहे. आणि म्हणून तें पहिलें फेल्युअर न येऊं देण्याबद्दल माणसानें जिवापाड जपलें पाहिजे. वर्ष फुकट जाण्याचा हा मानसिक दुष्परिणाम लक्षांत घेतला नाहीं, आणि वर्ष म्हणजे तीनशें पासष्ट दिवसांचें वर्ष असें जरी मानलें तरी नोकरीच्या व धंद्याच्या दृष्टीनें तें वाया जाऊं देण्याला कांहींच का महत्त्व नाहीं? जेव्हां नोकऱ्या थोड्या अन् उमेदवार पुष्कळ असतात, तेव्हां जो जितका आधीं जाईल तितका ती त्याला मिळण्याचा संभव अधिक. M. S. M. ची मेल रात्रीं १० ला सुटायची असली तरी आठ वाजल्यापासूनच स्टेशनवर जाणें हें जरी हास्यास्पद वाटलें तरी निदान साडेनवाला जाणें तरी जरूरीचें आहे. काळ जसजसा वाढत जाईल तसतशा जागा कमी होत जाऊन त्या मिळवूं पहाणारांची संख्या मात्र वाढत जाणार. व्यावहारिक जगांत गुणानें श्रेष्ठ असण्यापेक्षां काळानें ज्येष्ठ असण्यांतच फायदा असतो. नोकरी करायची नसून एकादा स्वतंत्र धंदा करायचा म्हटलें तरी शक्य तितक्या लवकर सुरू करून त्यांतहि ज्येष्ठत्व मिळविणें जरूरचें आहे. पुष्कळशा डॉक्टरा-वकिलांची आज जी चलती चाललेली दिसते ती कशामुळें? जादा फी, इतर जादा खर्च यांमुळें होणाऱ्या आर्थिक नुकसानीचा हिशेब मी करूं लागलों तर तूं हसशील, आणि म्हणून मी तो सोडून देतों. सारांश एक वर्ष फुकट गेल्यानें होणारें नुकसान तुम्हां लोकांना वाटतें तितकें थोडें नसतें. त्याचे दुष्परिणाम तेवढ्या वेळेपुरतेच होणारे नसून ते बरेच दूरपर्यंत जाऊन पोंचतात हेंच मला तुला समजून द्यावयाचें आहे.

यशाची फाजील खात्री व अभ्यासाचा अव्यवस्थितपणा यांशिवाय तुझ्या यशाचे आड येणारा तिसरा अवगुण म्हणजे मनाची व्यग्रता किंवा चित्ताची अनवधानता. आणि पहिल्या दोन दोषांपेक्षां हाच दोष माझे मतें तुझ्या अपयशाला विशेष कारणीभूत झाला आहे. चित्ताची व्यग्रता उत्पन्न होते ती मुख्यतः खेळणें, गप्पा मारणें वगैरे कारणांनीं, आणि हीं सर्व कारणें तुझे बाबतींत बरींच लागूं पडतात हें तूं सुद्धां कबूल करशील. तुला खेळण्याचा भारी शोक आहे. सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं—केव्हांहि तूं आपला खेळायला तयार—कधीं स्वतःच्या आनंदाकरितां तर कधीं दुसऱ्यांचे भिडेखातर. खेळण्याचा शोक असणें हें कितीहि चांगलें असलें तरी त्यालाहि कांहीं

मर्यादा घातल्या पाहिजेत. विशेषतः अंगीकृत कार्य जेव्हां अतिशय लक्षपूर्वक करावयाचें असतें त्यावेळीं खेळांवर बंधन घातलेंच पाहिजे. खरें सांगायचें म्हणजे विद्यार्थ्यांनीं टेनिस्–बॅडमिंटन् सारखे खेळ सकाळच्या वेळीं खेळणें मला केव्हांच पसंत नसतें. जें काय खेळायचें तें खेळून झाल्याबरोबर पुन्हां निर्वेधरीतीनें अभ्यास करतां आला असता तर माझी हरकत नव्हती. पण तसें होत नाहीं. खेळल्यानंतर त्यासंबंधींच्या गप्पा, खेळाडूंच्या गुणावगुणांची चर्चा व त्यावरून उत्पन्न होणारा हास्य–विनोद, जेत्यानें द्यावयाचें चहापाणी किंवा इतर खाणें–पिणें इत्यादि आनुषंगिक व फालतू गोष्टींतच सबंध सकाळ निघून जाते. वास्तविक पहातां अभ्यासेच्छु विद्यार्थ्याला सकाळच्या वेळेसारखा शांत, थंड व प्रसन्न असा वेळ सबंध दिवसांत दुसरा कोणताच मिळत नाहीं. आणि म्हणून तो वेळ त्यानें शक्यतितका अभ्यासाचे कामींच लावला पाहिजे. थोड्याश्या खेळण्यानें तरतरी व हुशारी येते हें खरें; पण तें खेळणें 'थोडेंसें' राहात नाहीं हें वाईट आहे. या दृष्टीनें ठराविक जोर काढणें किंवा नियमित नमस्कार घालणें मला जास्त फायद्याचें वाटतें. त्यांना वेळ कमी पुरतो हें एक, व त्यांत इतरांचा संबंध येत नसल्यामुळें अर्थातच इतर गप्पागोष्टींना त्यांत अवसर मिळत नाहीं व मनाची चलविचल होत नाहीं हें दुसरें.

रोजच्या खेळण्याशिवाय निरनिराळ्या सामन्यांत भाग घेणें तुझें चालूंच होतें. स्वतःच्या अंगचें प्राविण्य दाखवायला व प्रसिद्धि मिळवायला या मोठ्या सामन्यांत खेळणें अत्यंत जरूरीचें असतें यांत शंका नाहीं. आणि ज्यांच्यांत तेवढाच गुण आहे त्यांनीं असल्या संधींचा फायदा अवश्य घ्यायला पाहिजे यांतहि शंका नाहीं. पण उत्तम स्कॉलर म्हणून यश संपादन करणें हें ध्येय तूं आपल्यापुढें ठेवलें असल्यामुळें उत्तम खेळाडू म्हणून पुढें येण्याचें ध्येय तुला मागें सारावयास पाहिजे होतें. दोहोंत सारखेंच प्राविण्य दाखवून दोहोंतही नांव मिळविणाऱ्या कितीश्या व्यक्ती आढळून येतात? कार्याकार्यामधला हा विवेक तूं स्वतः केला नाहींस आणि दुसऱ्यांचेंहि ऐकलें नाहींस. तुझी आई आणि आजी सोलापूर, नगर वगैरे ठिकाणीं भरलेल्या सामन्यांत तूं भाग घेऊं नयेस अश्या मताच्या होत्या हें तुला आठवतें ना? 'पडशील-झडशील, लागेल-खरचटेल' असें जरी त्या वरून वरून म्हणत होत्या तरी 'तुझा वेळ जाऊन तुझ्या अभ्यासांत कमतरता पडेल' असेंच त्यांना मनांतून म्हणावयाचें होतें. 'जाऊं नकोस' असें त्यांना प्रत्यक्ष सांगतां आलें असतें; पण अपत्यप्रेम आडवें आलं म्हणून, किंवा तुझ्यासारख्या समंजस मुलाला नुसतं सुचवलं

म्हणजे पुरं होईल असें त्यांना वाटून त्यांनीं तुला बंदी केली नाहीं. नगरच्या सामन्यांत उत्तम खेळल्याबद्दल वर्तमानपत्रांत तुझें नांव झळकलेलं पाहून त्यांना अतिशय आनंद झाला. परंतु परीक्षेंत पास होणाऱ्यांच्या यादींत तुझें नांव तसेंच झळकलें नाहीं हें पाहून मात्र त्यांना इतकें वाईट वाटलें कीं त्यांत तो पहिला आनंद पार नाहींसा झाला, येवढेंच नव्हे तर तो मिळाला नसता तरीहि बरें झालें असतें असें वाटण्यापर्यन्त मजल गेली. सांगायचें येवढेंच कीं भलत्या वेळीं आणि भलत्या प्रमाणांत खेळणें विद्यार्थ्यांच्या यशाच्या आड आल्यावांचून राहात नाहीं, आणि म्हणून त्यानें या बाबतींत संयम राखला पाहिजे.

विद्यार्थ्यांच्या मनाची एकाग्रता बिघडवण्याला निष्कारण गप्पा व वायफळ चकाट्याहि तितक्याच कारण होतात. जेव्हां पहावें तेव्हां सहाध्यायी विद्यार्थ्यांचे मेळावे–'टोळकीं' म्हणत नाहीं–जमले आहेत, आणि गप्पागोष्टींचे फड पडले आहेत! गप्पा मारण्याचें आणि चकाट्या पिटण्याचें–इतर विद्यार्थ्यांतलें हें व्यसन तुलाहि जडूं लागत आहे असें तुला नाहीं का वाटत? नेहमींच दारें लावून व कानांत बोळे घालून खोलींत वाचीत बसणें, किंवा बाहेर हिंडायला जातांना अगदीं एकट्यानें जाणें व भोंवतालचें कांहीं दिसायला नको म्हणून आकाशाकडे डोळे लावून अथवा खालीं पाहून चालणें बरें नाहीं. तुसडेपणाचें व माणूसघाणेपणाचेंच तें एक लक्षण आहे असें मी म्हणेन. हा माणूसघाणेपणा जितका वाईट तितकाच तो माणूसलोभीपणाहि वाईट. असल्या 'सोशल' पणानें तुमच्या व्यक्तित्वाचा विकास न होतां त्याच्या अतिरेकामुळें तें व्यक्तित्व गुदमरून नाहींसें होतें. बरं, या गप्पा तरी कसल्या विषयांच्या? तर लढाईतील 'शिस्तीच्या माघारीच्या,' सिनेमासम्राज्ञीच्या किंवा कॉलेजकुञ्जेच्या, आवडत्या खेळाडूंच्या किंवा नावडत्या प्रोफेसरांच्या! आणि हेहि विषय संपले म्हणजे 'सख्याहरी'च्या पत्रांमधील किंवा नवयुग–झंकार मधील अत्रे–फडके वादांतील वाङ्मयासारख्या राखीव व ठेवणीच्या विषयांच्या! त्यांत कधीं सामाजिक व आर्थिक गोष्टींचा विचार असेल, का राजकीय बाबींची चार्चा असेल, का निरनिराळ्या पक्षोपपक्षांच्या विचारसरणींची चिकित्सा असेल—कांहीं नाहीं. तुम्हां तरुणांना कोणत्याहि गोष्टींसंबंधीं आस्था व गांभीर्य वाटेनासें झाल्यामुळें, व कोणत्याही विषयाचा अभ्यास करण्याची आवड नसल्यामुळें प्रत्येक विषयाची तुम्ही नुसती चावाचावी करतां, अन् स्वस्थ बसतां. त्यांतच आपण सर्वज्ञ व सर्वगुणसंपन्न आहोंत अशा अभि-

मानाची भर पडल्यामुळें प्रत्येक विषयाची व व्यक्तीची टिंगल करण्याखेरीज दुसरें कांहीं कामच उरलें नसतें. आणि म्हणूनच तुमच्या सर्व गप्पा नुसत्या वरवरच्या, टिंगलीच्या स्वरूपाच्या, हशाच्या आणि टाळ्यांच्या होतात. माझें एक असो, पण माझ्या वेळचे कॉलेजविद्यार्थी ज्या गप्पा मारीत त्या आगरकर व टिळक या व्यक्तींतील गुणांसंबंधींच्या व विचारांसंबंधींच्या असत. आपला शेजारचा अनंता सुद्धां जरा गप्पिदासच आहे; आणि या गपिष्टपणामुळें त्यालाहि कांहीं कमी अद्दल घडली आहे असें नाहीं. पण त्याच्या गप्पांत एक प्रकारचा विचारीपणा, बहुश्रुतता, ध्येयनिष्ठा, पक्षाभिमान, नवीन नवीन गोष्टी समजावून घेण्याची आवड वगैरे गुण दिसत असल्यामुळें त्याच्याशीं गप्पा मारणें अगदींच फुकट गेलें असें वाटत नाहीं. 'श्रीमान्' आपला काळ विनोदानें घालवतात हें खरें; पण त्यांचा तो विनोद नुसता निरर्थक नसून काव्यशास्त्रांवर आधरलेला असतो, आणि म्हणूनच त्यांच्या त्या 'स्वैरकथा' सुद्धां ऐकणाराला शास्त्रांप्रमाणें उपयुक्त व हितावह होतात.

मनाला व्यग्रता येण्याचीं हीं दोन नित्याचीं कारणें झालीं. यांशिवाय आणखीहि एक नैमित्तिक कारण नुकतेंच उत्पन्न झालें असून त्याचेमुळें तुझें लक्ष अभ्यासाकडें लागत नसलें तर मी तुला फारसा दोष देणार नाहीं. देशाची राजकीय परिस्थितीच इतकी आणीबाणीची व चमत्कारिक झाली आहे कीं या वेळीं आपलें खरें कर्तव्य कोणतें याचा मोठमोठ्यांनाहि व्यामोह पडलेला आहे. त्यांतच तुझें तरुण रक्त! केव्हां कशी उसळी घेईल याचा कांहीं नेमच नाहीं. नापास होण्याचे वैतागांत तुला नोकरी करण्याची इच्छा होऊन हपीसें व शाळा यांत कारकुनीच्या व शिक्षकाच्या जागेकरितां अर्ज करायलाहि तूं तयार झालास. मध्यंतरीं नाशीकच्या पोलिस ट्रेनिंग स्कूलमध्यें व खडकीच्या ॲम्युनिशन फॅक्टरीमध्यें प्रवेश मिळविण्याच्या खटपटींतहि तूं होतास. त्यानंतर किंग्स् कमिशन् मिळविण्याचे मागें लागलास. कोणत्या ना कोणत्या कारणांनीं तुझ्या घरच्या मंडळींनीं या तुझ्या बेतांत खो घातला. आतां आतां तर सत्याग्रहाच्या चळवळींत भाग घेऊन कांहींतरी देशकार्य करावें अशी उत्कट इच्छा होऊन तुला दुसरें कांहीं सुचेनासें झालें आहे. देशकार्यांत जातीनें भाग घेऊन स्वातंत्र्य मिळविण्याचे कामीं मदत करण्याला प्रत्येकानें या वेळीं पुढें आलें पाहिजे यांत बिलकूल शंका नाहीं. पण आतांची 'सत्याग्रहाची' म्हणून जी चळवळ चालू आहे तिचा स्वातंत्र्य मिळविण्यास कितपत उपयोग होईल याचा देशांतील सर्व विचारी माणसांना मोठा संदेह पडला असून खुद्द महात्माजींनाहि चळवळीचें हें

स्वरूप मान्य होईलसें वाटत नाहीं. चळवळ इष्ट मार्गानें नेण्याचें कौशल्य अंगीं असणारा व लोकांना विश्वास वाटवणाराच नेताच आतां–गांधीजींच्या मागें–कोणी उरला नाहीं. या चळवळीचे मागें कांहीं ठराविक धोरण व विशिष्ट योजना हीं नाहींत. ज्याला जें सुचेल व आवडेल तें तो कसें तरी करीत आहे. तिचा मार्ग संपूर्णतया अनत्याचारी असावा, का थोडाबहुत अत्याचारी असला तरी चालेल यासंबंधीं पुढाऱ्यांपुढाऱ्यांमध्येंहि एकवाक्यता नाहीं. चळवळीचें साध्य काय हेंहि निश्चित नाहीं. जपानसारख्या बाहेरच्या शत्रूपासून देशाचें रक्षण करायचें व त्या कामीं इंग्रजांची मदत मिळवायची, का इंग्रजानांच हिंदुस्थान सोडून जाण्यास भाग पाडावयाचें, का अगोदर हिंदुमुसलमानांत ऐक्य निर्माण करून त्यांच्या मदतीनें पुढचा मार्ग आक्रमण करायचा, का कांहींना वाटतें तसें हिंदुस्थानांत बंडाळी उत्पन्न करून जपानला सामोरें जायचें? का आणखी कांहीं करायचें? कोणालाच कशाचा नीटसा पत्ता नाहीं. 'श्रुतीश्च भिन्नाः स्मृतयश्च भिन्नाः, नैको ऋषिर्यस्य वचः प्रमाणम्, धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां, देवो न जानाति कुतो मनुष्यः' या सुभाषितांत वर्णिलेल्याप्रमाणें सर्वांची मति मूढ व कुंठित झाली आहे. इतरांना नांवें ठेवण्याच्या दृष्टीनें हें मी सांगत आहें असें नसून, परिस्थितीच इतकी गुंतागुंतीची व विकट झाली आहे कीं काय करावें अन् काय करूं नये याचा मोठमोठ्या विचारवंतांना सुद्धां संभ्रम पडला असला तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं हें मला सांगायचें आहे. अश्या प्रकारच्या निर्नायक, ध्येयशून्य, व साधनहीन परिस्थितीत एकंदर चळवळीला नुसत्या ओरडाओरडीचें, गोंधळाचें, हुल्लडीचें, आपआपसांतल्या मारामारीचें, मोडतोडीचें, जाळपोळीचें स्वरूप प्राप्त झाल्यास बिलकूल नवल नाहीं. कोणतेंहि एकादें निश्चित ध्येय असतें, निश्चित मार्ग असता, ठराविक कार्यक्रम असता तर तुम्हीं तरुणांनीं कॉलेजें सोडणें, अभ्यास थांबविणें, रोजचे इतर व्यवहार व उद्योग बंद पाडणें व देशकार्यांत उडी घेणें हें योग्य झालें असतें. त्यामुळें होणारी वैयक्तिक हानी सोसून व स्वार्थ सोडून परार्थाकरितां पुढें आलां म्हणून तुम्हां तरुणांचें लोकांनीं कौतुक केलें असतें. पण या चळवळीनें नुसत्या हानीपेक्षां दुसरें कांहीं साधेल असें वाटत नाहीं.

माझ्यासारखा माणूस तुझ्यासारख्या तरुणांना सत्यस्थिति समजावून सांगूं लागला म्हणजे ते त्याचें ऐकून न घेतां उलट त्यालाच स्वार्थी, भेदरट, अपशकुनी, विघ्नसंतोषी, सरकारचे बगलबच्चे अशीं नाहीं नाहीं तीं नांवें ठेवतात. अश्या शिव्यांची संवयच झाल्यामुळें आतां त्यासंबंधीं कांहींच वाटेनासें झालें आहे. शिवाय तरुणांनीं

म्हाताऱ्यांना भित्रे भागुबाई म्हणणें आणि म्हाताऱ्यांनीं तरुणांना आततायी अन् अविवेकी म्हणणें हा नित्यक्रम असून खुद्द परमेश्वराप्रमाणेंच अनादि आणि अनंत आहे. तरण्याम्हाताऱ्यांमधील हें भांडण व हा वाद आमचा ब्रह्मदेव किंवा तुमचा दुसरा कोणी शहाणा आला तरी तीं कधींच तुटणार नाहींत.

वर सांगितलेली सर्व परिस्थिति तुला कळत नाहीं असें बिलकूल नाहीं. वर्तमानपत्रें, व्याख्यानें, रेडिओवरील भाषणें रोज सकाळ–संध्याकाळ कानीं कपाळीं ओरडत असतांना कोणता सुज्ञ मनुष्य यासंबंधीं अज्ञानी राहील? पण सगळं कळत असूनहि गोंधळ झालेला पाहिला म्हणजे आपणहि आपल्या माणसाला दोन शब्द सांगून पहावेत असें भावड्या माणसांना वाटतें. माणसाचे विचारांत पुष्कळ वेळां गोंधळ कसा होतो हें स्वतःवरूनच पहाना. सर्वसामान्य माणसांनीं उठवलेल्या वावटळींत अन् हुल्लडींत भाग घेऊन तुला आतां कायदेभंग करावासा वाटतो; व कायद्याचे रक्षक जे पोलीस वगैरे त्यांना विरोध करायला तूं तयार होतोस. उलट कांहीं काळापूर्वींच पोलीस ट्रेनिंग स्कूलमध्यें जाऊन व परीक्षा पास होऊन स्वतः एकादा पोलीस अंमलदार व्हावें असें तुलाच वाटत होतें. आणि तसें झालें असतें म्हणजे पोलिसांच्या ज्या कृत्यांना आज तुला विरोध करावासा वाटतो तींच कृत्यें तूं स्वतः करणार होतास! एका क्षणीं ॲम्युनिशन् फॅक्टरीमध्यें जाऊन दारुगोळा तयार करावेंसें वाटतें, तर दुसऱ्या क्षणीं, त्याच फॅक्टरींना आग लावूं पाहणाऱ्यांना जाऊन मिळावेंसें वाटतें! तुझ्या ध्येयांत व विचारांत कशी धरसोड व विसंगति होत आहे हें दाखविण्याकरितांच हीं उदाहरणें घेतलीं आहेत. तुला खिजविण्याकरितां म्हणून नव्हेत.

तुझ्या आतांच्या मनःस्थितीचें मीं जें निदान केलें आहे तें असें आहे कीं, तुला तुझ्या आतांच्या कार्यांत कांहीं आनंद वाटेनासा झाला असून–किंवा आणखी खरें बोलायचें म्हणजे तोच तोच अभ्यास फिरून करण्याचा तुला तिटकारा आला असल्यामुळें तुला दुसरें कांहीं तरी करावेंसें वाटत आहे. आणि या ‘दुसऱ्या कांहीं तरी’ ची तुला नीटशी कल्पना येत नसल्यामुळें एकदां हें तर दुसऱ्यांदा तें करूं पाहतो आहेस. मग तें पहिल्याच्या अगदीं उलट व विरुद्ध का असेना!

विद्यार्थ्यांनीं प्रचलित राजकारणांत प्रत्यक्ष भाग घ्यावा का नाहीं या प्रश्नाला सुरुवात टिळकांच्या वेळेपासून झाली. आणि आज पन्नास वर्षें त्याचा काथ्याकूट होऊन त्यांनीं तसा भाग घेऊं नये, विद्यार्थीदशेंत त्यांनीं त्याची फक्त तयारी करावी

असें मत प्रस्थापित झालें आहे. ही जादा तयारी तर तुम्ही विद्यार्थी करीत नाहींच, पण साध्या परीक्षेची नेहमींची तयारीहि तुम्ही करीत नाहीं. आणि पुन्हां एकदां मागचाच प्रश्न विचारतों कीं सत्याग्रहाच्या नांवाखालीं हीं जीं हुल्लड व हैदोसधुल्ला विद्यार्थ्यांनीं चालविलेलीं आहेत तीं खुद्द गांधींना—ज्यांना तुम्ही आपले आदर्श नेते मानतां त्या महात्मा गांधींना—तरी कितपत पसंत पडणार आहेत ? आपल्या तपाला हें असलें विषारी फळ येत असल्याचें पाहून निराशेनें ते स्वतःचाच बळी द्यावयास तयार होतील अशी मला फार भीति वाटते. म्हणून घरांतल्या माणसांसाठीं नसलें, दुसऱ्या कोणांसाठीं नसलें तरी निदान महात्माजींच्यासाठीं तरी असल्या भानगडींत न पडतां त्यांनीं प्रणीत केलेल्या विधायक कार्यक्रमांत भाग घे. खादी व इतर देशी वस्तु निष्ठापूर्वक वापर, त्यांचा इतरांमध्यें प्रचार कर, खेडेगांवांत जाऊन ग्रामसंघटनेचें कार्य करतां आल्यास पहा, राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास कर, पक्षोपपक्षांच्या मूलभूत विचारसरणींची छाननी कर, राष्ट्रीयस्वयंसेवक संघासारख्या मंडळींनीं चालविलेल्या शारीरिक, बौद्धिक, नैतिक सुधारणेच्या कार्यांत प्रामुख्यानें भाग घे, स्वतःला शिस्तीची संवय लाव, व ती लावण्याचीं जीं कांहीं यमनियमादि साधनें आहेत तीं पाळ. अश्या प्रकारें कितीतरी सांगतां येईल. पण या सांगण्यांत कांहीं जुनें, पौराणिक अन् धार्मिक आहे असें तुम्हां तरुणांना वाटतें, आणि येवढ्याच सबबीवर तुम्ही त्याचा निषेध व हेटाळणी करतां ! तेव्हां मला येवढेंच सांगायचें आहे कीं मनाचा कोंडमारा करून नुसता धुमसत राहूं नकोस; या आतांच्या अनिर्बंध व निर्नायक चळवळींत पडूं नकोस; उद्यांच्या परीक्षेचा अभ्यास कर; अभ्यासांत बदल म्हणून प्रचलित गोष्टींचेंहि ज्ञान करून घे; आणि ही परीक्षा झाली म्हणजे मग जीवितांतल्या मोठ्या परीक्षेसाठीं सिद्ध हो. सध्यांची चळवळ थांबली म्हणजे पुढें चळवळ करायला कांहीं उरणार नाहीं असें थोडेंच आहे ? व्यक्तीप्रमाणें राष्ट्राच्या आकांक्षा व ध्येयें सारखीं वाढत जातात, व तीं साध्य करण्याकरितां नवीन व वाढत्या चळवळीहि कराव्या लागतात. आणि त्या यशस्वी होण्याला जास्त जास्त लायक माणसांची जरूरी राष्ट्राला नेहमींच राहणार. किंबहुना आतांचीच चळवळ पुष्कळ काळ चालूं राहून तिच्यांतही तुला भाग घेतां येईल. प्रत्यक्ष लढणाऱ्या सैन्याइतकेंच राखीव सैन्यालाहि महत्त्व असतें. तेव्हां तुझा हा तयारीचा काळ आहे असें समजून त्या तयारीला लाग. They also serve who stand and wait.

हा शेवटचा परिच्छेद व विशेषतः शेवटचें हें इंग्रजी वाक्य वाचून माझें मलाच थोडेंसें हंसू आलें; व कोणीतरी ' हिअर, हिअर ' च्यां टाळ्या वाजवून ' इन्किलाब झिंदाबाद ' असें ओरडल्याचाहि भास झाला. त्यांत जरासा नाटकीपणा आला आहे हें खरें. पण हा नाटकीपणा सांयगांवच्या ' झिंदाबाद ' रेडिओंतून केलेल्या भाषणांतील नाटकीपणासारखा भाडोत्री व पैशापुरता नसून त्यांत स्वयंस्फूर्तीचा अन् विनमोल भागच जास्त आहे हें लक्षांत ठेव. लिहिलेल्याचा योग्य विचार कर; आणि विचार करूनहि तुला तें पसंत पडलें नाहीं तर स्वतःची सदसद्विवेकबुद्धि सांगेल त्याप्रमाणें वाग. यापेक्षां जास्त मी काय सांगणार ? तुझें सदैव कल्याण असो. कळावें, हे आशीर्वाद.

ती० आई व ती० ताई यांना हें पत्र वाचून दाखवून त्यांचाहि सल्ला घे. कळावें.

तुझा

नाना मामा.

## चि० अप्पास— ( फिरून एकदां ) ४

*अनेक उत्तम आशीर्वाद, वि.*

माझ्या मागील पत्राचा तुझे मनावर बराच परिणाम झालेला दिसतो. शिवाय झालेल्या गोष्टींचें तुला वाईट वाटत असलें तरी आपल्या करण्यांत फारसें चुकलें आहे–किंवा चुकत आहे असें तुझी मनोदेवता तुला सांगत नसून तुझा स्वतःवर पूर्ण विश्वास आहे असेंहि दिसतें. त्याशिवाय तूं मला इतक्या तावडतोबीनें पत्र लिहून आपली बाजू कळविण्याचे भानगडींत पडला नसतास. तुझा आत्मविश्वास, व तो तसा असल्याबद्दल मला कळविण्यांत तूं घेतलेली दक्षता हीं पाहून आनंद झाला. माझें पहिलें पत्र, त्यावर तुझें पत्र, व त्यावर माझें हें दुसरें पत्र–अश्या पत्रोपत्रीनें मूळ प्रश्न सुटणार आहेत असें जरी नसलें तरी त्यामुळें आपल्या मनामध्यें परस्परांविषयीं जी तेढ पडूं पहात होती ती तरी आतां खास पडणार नाहीं; आणि या दृष्टीनें पहातां आपला हा पत्रव्यवहार अगदींच फुकट गेला असें मला वाटत नाहीं. असो.

एकदमच सांगून टाकतों कीं आपल्या पत्रामुळें यांचा अपमान झाला कीं काय, यांना राग आला कीं काय अशी जी तुला धास्ती वाटत आहे, ती वाटूं देऊं नकोस. उलट तुझें लेखन-चातुर्य पाहून तुझ्यांतल्या आणखीहि एका गुणाची मला नवीनच ओळख झाल्यामुळें मला तुझ्याबद्दल वाटत असलेल्या आदरांत भरच पडली आहे. अप्पा, तूं जर असाच लिहीत राहिलास तर लवकरच एक चांगला लेखक होशील

असें मला वाटूं लागलें आहे. मीं लिहिलेलें पत्र लिहावयास मला दोन-तीन दिवस विचार करावा लागला; विचारांची जुळणी करतांना व योग्य शब्दांची योजना करतांना मला कितीतरी खोडाखोडी करावी लागली. उलट तूं माझें पत्र वाचल्या-पासून अवघ्या दोन तासांचे आंत त्याचें सविस्तर उत्तर-व तेंहि एकदम, एकटाकी, कांहींएक खाडाखोड न करतां-लिहिलेंस व पाठविलेंस ही खरोखर मोठीच करामत केलीस! आणि याबद्दल मी प्रथम तुझें अभिनंदन करतों. सायन्सकडे न जातां आर्टस्कडे गेलास हें बरें झालें ना? वाङ्मयाचा अभ्यास करून लेखन व्यवसायहि करतां येईल.

आतां तुझ्या पत्रांतील-किंवा उत्तरांतील-तीन-चार मुद्देच घेऊन त्यांसंबंधींचें माझें म्हणणें कळवितों. पण तत्पूर्वी एका लहानश्या गोष्टीचा खुलासा करतों. तूं विचारतोस—"शरीरसंपदा, रूपसंपदा, खिलाडू वृत्ति, सुहास्य, विनोद-बुद्धि वगैरे गुणांचा उल्लेख प्रथम करून माझा मोठा गौरव केलात, तेव्हांच पोटांत धस् झालं कीं बहुतेक आतां आमची चांगली शष्ठि होणार! एरवीं कोण कोणाचे गुण गाईल! जर पुढें येवढा दोषांचा पाढा वाचवयाचा होता तर अगोदर येवढे गुण गाण्याचें सोंग तरी कशाला केलेंत?" ज्या गुणांचा मीं निर्देश केला ते तुझी स्तुति करण्याकरितां तुझ्या अंगीं खोटेच चिकटविले आहेत असें नसून ते तुझ्यांत तसे आहेत असें मला प्रामाणिकपणें वाटतें. अन् दुसरें असें कीं मला तुझे फक्त दोषच दिसतात असें नसून तुझ्यांतील गुणांचीहि मला जाणीव आहे, मी नुसता दोषैकदृक् नाहीं हें तुला पटावें म्हणून मीं तसें केलें. आपल्या मुलांबाळांचे गुण न पाहण्याचा व ते दिसले तरी ते तसे बोलून न दाखविण्याचा कद्रूपणा पुष्कळश्या आईबापांच्या स्वभावांत दिसतो हें खरें. पण माझा तरी स्वभाव तसा नाहीं, हें आजपर्यन्तच्या माझ्या वागणुकीवरून तुला कळायला हरकत नव्हती.

नेमलेल्या सर्व विषयांचा व त्यांतील सर्व भागांचा तूं अभ्यास केला नाहींस असें मीं म्हटलें होतें. त्याला उत्तर म्हणून तूं म्हणतोस कीं, बहुतेक विद्यार्थी माझ्या-पेक्षांहि जास्त टाळाटाळी व गाळागाळी करतात. पण अशा गाळागाळी करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं कितीजण पास—व तेंहि चांगल्या प्रकारें पास—होतात हें तूं मला कळविलें नाहींस. त्यांतील बहुतेक नापासच होत असतील—कांहीं पास झालेच तर कट्टाकट्टीनें पास होत असतील. तुझें ध्येय नुसतें 'बाउंडरी'वर पास होण्याचें नव्हतें, आणि म्हणून जें वाचावयाचें तें तूं सांगोपांग आणि संपूर्णतया वाचावयास पाहिजे

होतें असें मला अजूनहि वाटतें. जेमतेम अभ्यास करून पहिल्या वर्गांत येणारे 'लकी चॅप्स्' फारसे आढळत नाहींत; एकादा हरीचा लाल आढळलाच तर त्याची किंमत विचारी लोक जाणून असतातच. तूं म्हणतोस कीं 'माझें व प्रोफेसरांचें भांडण झालें नसतें, व त्यांना एकादा जादा निबंध लिहून दाखविला असता, किंवा दोन-चार डिफिकल्टीज मुद्दामच विचारल्या असत्या, किंवा आणखी कांहीं करून त्यांच्या जरा पुढें पुढें केलें असतें तर यंदा माझा खास फायदा झाला असता.' म्हणजे तुझें जें नुकसान झालें तें तूं पुढें पुढें न करण्यानें झालें असें तुला म्हणावयाचें आहे, व त्याचबरोबर जे विद्यार्थी पहिल्या वर्गांत वगैरे येतात ते स्वतःच्या अभ्यासावर नव्हे–तर नुसतें पुढें पुढें करून येतात असें तुला ध्वनित करावयाचें आहे. विद्यार्थ्यांच्या पुढें पुढें करण्यावर प्रोफेसर भाळतात, ते त्यांची खरी योग्यता लक्षांत घेत नाहींत असें म्हणणें जरा अविवेकीपणाचें व थोडेंसें धाष्टर्याचें आहे असें मला वाटतें. ओळख करणें आणि ओळख होणें यांत अगोदर फरक केला पाहिजे. निष्कारण व अभ्यासेतर अन्य मार्गानें मुद्दाम ओळख करून घेणें हें पुढें पुढें करणें असून तें तुझ्यासारख्या मानी माणसाला न आवडणें स्वाभाविक आहे; आणि लांगूलचालन वगैरे करून कुत्र्याच्या लाचार वृत्तीनें माणसानें कधींहि वागूं नये असें मीहि म्हणेन. पण खरोखरच्या शंका वगैरे विचारण्याकरितां प्रोफेसरांकडे जावें–यावें लागल्यामुळें आपोआप होणाऱ्या ओळखीला पुढें पुढें करणें असें मी कधींहि म्हणणार नाहीं. आणि विद्यार्थीवृत्तीनें व शिष्यभावानें आपलेकडे येणाऱ्या विद्यार्थ्याबद्दल प्रोफेसराचें मत अनुकूल बनून त्याला त्याचे हातून जर थोडेसे जादा मार्क पडले तर त्याबद्दल मी प्रोफेसरालाहि तितकासा दोष देणार नाहीं. मनावर अगोदर होऊन बसलेल्या ग्रहाचा–तो अनुकूल किंवा प्रतिकूल असेल त्या मानानें–पुढें चांगला किंवा वाईट परिणाम होणें हें मानसशास्त्राला सर्वस्वीं धरून असून पूर्णपणें निःपक्षपातबुद्धीनें व मनांत कसल्याहि प्रकारचा पूर्वग्रह करून न घेतां वागतां येणें जवळ जवळ अशक्य आहे. म्हणून शिष्याच्या नात्यानें प्रोफेसराकडे जाण्या–येण्यांत व त्या योगानें त्याचें मत अनुकूल करून घेण्यांत कसल्याहि प्रकारचा कमीपणा नसून तूंहि यापुढें तसेंच वागावेंस, व त्यानें होणारा व्यावहारिक फायदा गमवूं नयेस असें मला वाटतें.

वशिला लावण्याची तुला मोठी चीड आहे असें तूं म्हणतोस. म्हणणें फार चांगलें आहे. पण वशिल्याची चीड कोणाला व केव्हां येते–सांगूं? ज्यांचा तो नसतो त्यांना, किंवा असूनहि जेव्हां तो पुरेसा 'पोचत' नाहीं–तेव्हां. कोल्ह्यानें द्राक्षें

आंवट आहेत असें म्हणण्यासारखा किंवा परीक्षकाचें काम विनंत्या वगैरे करूनहि न मिळाल्यामुळें, 'जाऊं दे कीं, नकोच ती म्हारकी' असें म्हणण्यासारखाच तो एक प्रकार आहे. या बावतींत नाहीं, पण इतर बावतींत---जेथें जेथें वशिला लागण्यासारखा होता तेथें तेथें---तूं त्याचा आजपर्यन्त विलकूल उपयोग करून घेतला नाहींस असें शपथपूर्वक सांगूं शकशील काय? पुन्हां म्हणतों, स्वतः वशिला लावूं नये हें उत्तम. पण दुसऱ्या कोणीं तो लावला तर तो एक व्यवहार आहे असें समजून त्याचेकडे दुर्लक्ष करणेंच चांगलें. जगांत जातिवंत घोडे फार थोडे, वशिल्याचीं तट्टेंच जास्त! असो.

आतां तुझ्या खेळण्याच्या नादासंबंधीं. "प्रत्येकाला कसलें तरी व्यसन असतेंच, त्याप्रमाणें मला खेळाचें व्यसन आहे. दारुड्याची दारू तो मेल्याशिवाय सुटत नाहीं, त्याप्रमाणें माझें खेळाचें आहे" असें तूं म्हणतोस. हें वाचून मला अत्यन्त वाईट वाटलें. खेळाचें 'व्यसन' लागून तुझी स्थिती खरोखरच जर दारुड्याइतकी अगतिक झाली असेल तर मला तुझी कीव येते; व त्यासंबंधीं मी तुला आणखी दोष न देतां तुझें सांत्वनच करतों. पण, अप्पा! तुला खेळाचा नाद असला तरी त्याची मजल अद्याप व्यसनापर्यन्त गेलेली नाहीं असं मी सांगतों; आणि मनांत आणशील तर त्यांतहि तुला संयमानें वागतां येईल. यासंबंधीं इतक्यांतच इतका निराश होऊन वैतागून जाऊं नकोस. पण खेळाचें 'व्यसन' आहे असें एकदां तोंडानें कबूल केल्यावर खेळ आपल्या अभ्यासाच्या आड आला नाहीं हें सिद्ध करून दाखविण्याच्या भरीस पडलास कशाला? व आपल्या म्हणण्याचा पुरावा म्हणून आपलें रोजचें वेळापत्रक इतकें तपशीलवार दिलेंस कशाला? कोणताहि नाद आपल्या अंगीकृत कार्यांत व्यत्यय आणूं लागला म्हणजेच त्याला व्यसन असें म्हणावयाचें असतें. आणि वेळापत्रक देऊन तरी काय सिद्ध झालें? कॉलेजचा वेळ सोडल्यास तुझा घरचा अभ्यास रोज पांच तासांपेक्षां जास्त पडला नाहीं, येवढेंच. येवढा अभ्यास नुसत्या पास होण्याला पुरा पडत असला तरी परीक्षेंत वरच्या श्रेणींत येण्याला तो अगदीं पुरून उरण्यासारखा आहे असें मला स्वतःला तरी वाटत नाहीं. मग तूं मला अगदीं मद्द म्हण, किंवा स्वतःला अत्यन्त बुद्धिमान् समज! बरं, तें असो. खेळणें हें व्यसन आहे असें तुला खरोखरच वाटत असेल तर त्यापासून मुक्त होण्याचा वेळींच प्रयत्न कर येवढेंच मी तुला सध्यां सांगेन.

नोकरी धरावी असें आपल्याला कां वाटत होतें यासंबंधीं तूं जें स्पष्टीकरण

केलें आहेस त्याचा आतां विचार करूं. " सर्वांना वाटतें, मला नोकरीची फार हौस आहे, माझें मन धड एका गोष्टीवर स्थिर नाहीं. सर्व साफ खोटें आहे......नापास झालों ही गोष्ट मला लागली नाहीं आहे. पण नापास झाल्यामुळें आईचें जे दोनशें रुपये कारणाशिवाय खर्च झाले त्याचें वाटतें. " वगैरे लिहून आपण नोकरी करतां अर्ज कां केले याचें समर्थन तूं केलें आहेस. आपल्या हातून कळत–नकळत झालेल्या चुकांबद्दल इतरांना भुर्दंड सोसावा लागूं नये ही जी तुझी इच्छा ती स्पृहणीय आहे यांत शंका नाहीं. आणि इतरांशीं वागतांना असें बाणेदार धोरण ठेवणें अत्यन्त आवश्यक आहे. पण इतरांना त्रास द्यावयाचा नाहीं, त्यांना कसलीहि तोशीस लावावयाची नाहीं, त्यांचे ऋणांत राहावयाचें नाहीं हें तत्त्व––आम्हां मामांचें एक असो––पण प्रत्यक्ष आईचे बाबतींत लागू करूं पाहून अभ्यास करण्याचें आजचें कर्तव्य उद्यांवर टाकण्यांत कितपत शहाण-पणा आहे ? तुला असं का वाटतं, कीं तूं नापास झाल्यामुळें तुझ्या आईला––इतरांचें सोडून देऊं––जें वाईट वाटलें तें केवळ दोनशें रुपायांचा जादा खर्च करावा लाग-णार म्हणून वाटलें ? समज, हे दोनशें रुपये द्यावे लागले नसते तर तिला तुझ्या नापास होण्याचें कांहीं वाटलें नसतें––( किंवा वाटतां कामा नये. ) असें जर तुला वाटत असलें, तर बाबारे ! मातृहृदयाची खरी पारख तुला अद्याप झाली नाहीं असेंच म्हणावें लागतें. मुलाला एकादें अपयश आलें म्हणजे आईला जें वाईट वाटतें तें ' इतके रुपये, इतके आणे, इतक्या पया ' यांचें नुकसान झालें अश्या व्यावहा-रिक विचारानें नव्हे तर तें आईच्या अपत्यप्रेमामुळेंच वाटत असतें; आणि तिच्या वऱ्यावाईट वाटण्याची किंमत अश्या रीतीनें आर्थिक स्वरूपांत करूं पाहणें हें मुलाला शोभण्यासारखें नाहीं.

मराठी चौथीच्या पुस्तकांत ' दिनूचें बिल् ' या मथळ्याची एक गोष्ट दिली आहे तिची मला या प्रसंगीं आठवण होते. दिनूचा बाप डॉक्टर असून त्यानें रोग्याच्या नांवानें केलेलें बारा रुपयांचें बिल् दिनूच्या पाहण्यांत आलें. बाल-स्वभावानुरूप त्यानेंहि आदल्या दिवशीं आपण केलेल्या आईच्या कामांबद्दलचें दीड रुपयाचें एक बिल तयार करून आईला दिलें. अर्थातच आईला याचें वाईट वाटलें; पण तसें कांहीं न दाखवितां तिनेंहि आपण मुलाबद्दल खाल्लेल्या खस्तांचें एक बिल तयार करून व बाकीं येणें शून्य दाखवून बिनमोल व निष्काम प्रेमाची स्पष्ट जाणीव मुलाला करून दिली. गोष्ट किती मार्मिक व सारांश किती उदात्त

आहे, नव्हे ? ( ' आई थोर तुझे उपकार ' अशासारखी जुनी पुराणी कविता, किंवा ' न मातुःपरदैवतम् ' असें सुभाषित, अथवा ' मातृदेवो भव ' असा एकादा आदेश लहान मुलांचे पुस्तकांत न घालतां आधुनिक स्वरूपाची अशी मार्मिक गोष्ट देण्यांत प्रकाशकांनीं मोठा मार्मिकपणा दाखविला आहे असें नाहीं तुला वाटत ? ) मुलांबाळां-करितां मातापितरांनीं केलेल्या कर्तव्याची मोजमापणी रुपयेआणेपैंत करतां आली असती, आणि तेवढे पैसे देऊन टाकून मुलांना त्यांच्या ऋणांतून मुक्त होतां येत असतें, तर व्यवहार एका अर्थानें सोपा व सोईस्कर झाला असता, खरा; पण मग जीवनांतलें सर्व सौंदर्य, मांगल्य, कोमलता, प्रेमलता हींहि नाहींशीं झालीं असतीं; आणि घर म्हणजे निवळ खाणावळ, आईबाप म्हणजे धनको, मुलें म्हणजे ऋणको, व संसार म्हणजे व्यापार असें झालें असतें. आईबापांनीं केलेले उपकार व दिलेलें ऋण हीं त्यांचीं त्यांनाच व त्याच रूपानें परत फेडून टाकून फिटांफीट करावयाची नसते, तर आपण आपल्या मुलाबाळांचे बाबतींत तसेंच वागून पितरांच्या उपकारांचें लोण पुढें पोंचवावयाचें असतें. वेली व फुलें भूमातेपासून घेतलेलें खत-पाणी तिचें तिलाच व त्याच रूपांत परत करीत नाहींत, तर स्वतः दुसऱ्या वेलीफुलांना जन्म देऊन व त्यांचें धारण पोषण वगैरे करून स्वतःचा वंशविस्तार करतात, व त्याचेचबरोबर भूमातेलाहि तोषवितात व भूषवितात. आईचे दोनशें रुपये तूं नोकरी धरून व ताबडतोबीनें परत करून ऋणमुक्त होण्याऐवजीं तिचें दातृत्व, व उपकारित्व तूं पुढें मोठा झाल्यावर आपल्या मुलांबाळांच्या बाबतींत दाखविलीस म्हणजे ' आपण दिलें–केलेलें सर्व सव्याज भरून पावलों ' असें तुझ्या आईला वाटेल. तेव्हां सांगावयाचें इतकेंच कीं ' जन्मदेचें ' ऋण जीव देऊन सुद्धां फेडतां यावयाचें नाहीं अशी जाणीव मनाशीं ठेवून तिला आवडतील अश्या दुसऱ्या गोष्टी करून तिला प्रसन्न ठेवणें व तिची माया वृद्धिंगत करणें येवढेंच कर्तव्य मुलाचें ठरतें.

तूं विचारशील " इतर उपकारांचें असो, पण आईबापांसारख्यांकडून प्रत्यक्ष घेतलेले पैसे, किंवा आपणाकरितां त्यांना खर्च करावे लागलेले पैसे मुलानें परत करण्याची आकांक्षा धरली तर त्यांत काय बिघडलें ? " बिघडलें असें कांहीं नाहीं. पण आपल्याच माणसांचे उपकार त्याच रूपानें त्यांनाच परत करण्याची वृत्ति जुन्या जमान्यांत वाढलेल्या माझ्या सारख्या माणसाला कशीशीच वाटते. एकाद्या पाहु-ण्यानें पाहुणचार भोगून परत निघतांना यजमानाच्या मुलाच्या हातावर खाऊकरितां पैसे ठेवणें, किंवा लग्नकार्यासारख्या लौकिक प्रसंगीं कोणीं दहा रुपये आहेराकरितां

म्हणून दिले तर यजमानानें उलट प्रतिआहेर म्हणून दहा रुपये परत देणें, असल्या गोष्टींतसुद्धां मला एक प्रकारचा कृत्रिमपणा व रूक्षपणा वाटतो; बेरीज–वजावाकी बरोबर करून व देणें–घेणें शून्य दाखवून व्यापारांतलीं खातीं जशीं बंद करतात, तशीं संसारांतलीं नातींसुद्धां का बंद करावयाचीं आहेत ? कुटुंबांतल्या कुटुंबांत वागतांना माणसांमध्यें निस्पृहता, आर्थिक निरपेक्षता, स्वयंसिद्धता वगैरेंची इच्छा असावी का नसावी, असल्यास कोणत्या बाबतींत, व किती प्रमाणांत असावी वगैरे प्रश्न अत्यन्त नाजूक, आंतड्याला स्पर्श करणारे व भावनांना भिडणारे असल्यामुळें त्यांसंबंधीं तूं स्वतःच खोल विचार कर; म्हणजे मला नक्की काय म्हणायाचें आहे याचा उलगडा तुला होईल.

गप्पांच्या बाबतींत मीं तुझी अन् शेजारच्या अंतूची तुलना केली ती तुला जराशी लागलेली दिसते. तुलना करतांना मी एकादें काल्पनिक किंवा फार मोठ्या माणसाचें उदाहरण घेतलें असतें, किंवा अजिबात तुलनाच न करतां नुसतें तात्त्विक, अमूर्त व गुणात्मक विवेचन केलें असतें तर बरें झालें असतें असें मलाहि आतां वाटतें. दोघां सारख्याच व्यक्तींची तुलना केली असतांना, त्या व्यक्तींना एकमेकांबद्दल विनाकारणच हेवा व मत्सर वाटूं लागतात हें कांहीं खोटें नाहीं. पण माझें म्हणणें तुला स्पष्टपणें कळावें येवढ्यासाठींच तुझ्या माहितींतल्या मुलाचें उदाहरण घेतलें–येवढेंच. तथापि माझ्या या अप्रयोजकपणाची मला क्षमा कर. या एका बाबातींत तो तुझ्यापेक्षां जरा बरा असला तरी सर्वच बाबतींत तूं त्याच्यापेक्षां कमी दर्जाचा आहेस असें मला बिलकूल वाटत नाहीं.

माझ्या वेळच्या कॉलेज–विद्यार्थ्यांच्या गप्पांचे विषय सामान्यतः कशा प्रकारचे असत हें दाखवितांना मी टिळक–आगरकरांचें उदाहरण घेतलें. त्यासंबंधींहि तुझ्या समजुतींत थोडीशी गफलत झालेली दिसते. माझें म्हणणें अर्धवट मान्य करून तूं मला विचारतोस–" आज उभ्या महाराष्ट्रांत–सावरकर सोडले तर–नांव घेण्यासारखा पुढारी आहे काय ? आणि त्यांचें देखील व्याख्यान एकादे वेळीं ऐकावयास मिळायचें; आणि तेवढ्यापुरती चर्चा झाली कीं खलास ! " महाराष्ट्रांत टिळक–आगरकरांसारखे पुढारी आतां राहिले नाहींत ही तुझी तक्रार कांहींशी बरोबर आहे. पण दुसऱ्या कांहीं लोकांप्रमाणें ' महाराष्ट्र अगदीं निर्नायकच बनला आहे ' असें तूं अद्याप म्हणत नाहींस ही आनंदाची गोष्ट आहे; आणि सावरकर तुला नांव घेण्यासारखे पुढारी वाटतात ही त्याहून आनंदाची गोष्ट आहे. आतां तुझी तक्रार येवढीच कीं

त्यांचें व्याख्यान वगैरे एकादे वेळींच ऐकावयास मिळत असल्यामुळें तेवढ्यापुरती चर्चा झाली म्हणजे संपतें. एरवीं कशाची चर्चा व कशाचा विचार करावयाचा! चर्चा किंवा विचार करायचा, तो तात्पुरत्या व तात्कालीन व्याख्यानांचाच नसतो करायचा. मी विचारतों, सावरकरांचें तरी सर्व लिखाण—त्यांच्या कादंबऱ्या, त्यांचे लेख, त्यांच्या कविता, त्यांचीं नाटकें, त्यांचीं चरित्रें, त्यांचीं भाषणें वगैरे—तूं वाचलें आहेस काय? तुझ्या विचाराला जन्मभर पुरून उरेल इतकें खाद्य त्यांच्या वाङ्मयांत तुला सांपडेल. आणि दुसरें असें कीं, टिळक—आगरकर जरी आतां जिवंत नसले तरी त्यांचे विचार अमर असून ते तुला त्यांच्या ग्रंथांतून आजहि पहावयास मिळतील. महाराष्ट्रांत इतर गोष्टींच्याप्रमाणें खऱ्या पुढाऱ्यांचेंहि दुर्भिक्ष्य असलें तरी इतर प्रांतांत तर त्यांची सुवत्ता आहे ना? महात्मा गांधी, पंडित नेहरू, डॉ. अंबेडकर, जिना, रॉय वगैरे सारखे पुढारी आपल्या सुदैवानें आपल्या देशाला लाभले आहेत. रानडे, वैद्य, राजवाडे, परांजपे, केळकर वगैरे महाराष्ट्रीय लेखकांचें लिखाण जुनें व नुसतें ज्ञानप्रदच आहे असें वादाकरितां मानलें तरी वरील पुढाऱ्यांचें वाङ्मय तर अद्यावत व विचारप्रवर्तक आहे ना? तें वाच. कोणाचें लिखाण वाचावयाचें व कोणाच्या विचारांची चर्चा करावयाची हा प्रश्न नसून, 'तुम्ही विद्यार्थी वाचता का? व विचार करता का?' असा प्रश्न आहे; आणि तुमच्यापैकीं बहुतेकांना या प्रश्नांचें तितकेंसें समाधानकारक उत्तर देतां येईल असें मला वाटत नाहीं.

तूं विचारलेल्या महत्त्वाच्या प्रश्नांपैकीं बहुतेकांचीं उत्तरें देऊन झालीं आहेत. आतां एक—दोन किरकोळ गोष्टींचा ओझरता उल्लेख करून हें पत्र पुरें करतों. कॉलेजांत विद्यार्थी आहेस तोंपर्यन्त राजकारणाच्या कोणत्याहि चळवळींत प्रत्यक्ष भाग न घेतां त्याला पोषक, उपकारक व केवळ तयारीच्या स्वरूपाचीं अशीं जीं दुसरीं कामें आहेत तीं तूं कर असें मीं तुला म्हटलें होतें; व उदाहरण म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवकसंघाचें नांव सुचविलें होतें. त्यावर तूं म्हणतोस कीं या संघांत मी अगोदरच सामील झालों असलों तरी त्यांतील पोरासोरांच्या तोंडांतील ती जाडजूड भाषा, आणि त्यांचा तो शिष्टपणा पाहून माझे मनांत एक प्रकारचा 'कॉंप्लेक्स' निर्माण झाला आहे. तूं सांगतोस त्या प्रकारची स्थिति खरोखरच असेल तर तें वाईट आहे. तरीपण ती थोडीफार तशी असायचीच असें समजूनच आपण त्यांत दाखल झालें पाहिजे, व त्यांतल्या चांगल्या गोष्टी तेवढ्याच घ्यायला पाहिजेत. कोणत्याहि संघांत, पंथांत वा संस्थेंत असें हें चालावयाचेंच. संघचालकांचा किंवा संस्थापकांचा मूळ उद्देश

पूर्णपणें समजून घेऊन त्याप्रमाणें आचरण करणारे आनुयायी फार थोडेच. खुद्द रामदासी पंथाचीच अशी स्थिति झाली नाहीं काय? श्रीसमर्थांचें तत्त्वज्ञान व विचारप्रणालि हीं त्यांच्या ओव्यांत व श्लोकांत तशींच्या तशींच राहून सामान्य अनुयायाच्या काखेंत झोळी व हातांत कुबडी यांशिवाय दुसरें काय राहिलें? पण म्हणून रामदासी पंथाला का नांवें ठेवायाचीं आहेत? आपल्या वेळच्या कॉंग्रेसचें मवाळ धोरण टिळकांना तरी कोठें आवडत होतें? तरी पण तिच्यापासून अलिप्त न राहतां ते आंत घुसले, व आपल्याला हव्या असलेल्या गोष्टी त्यांनीं साध्य करून घेतल्या.

देशी वस्तु वापरण्याबद्दल मीं सुचविलें असतां, आपण खादी वापरीत असल्याचें तूं सांगतोस. उत्तम आहे. पण खादीबरोबरच दुसऱ्या देशी वस्तूंसंबंधींहि तुम्हां मुलांना ( मीहि तुमच्यांतच येतों. ) जितकी आस्था व विदेशी वस्तूंसंबंधीं जितका तिटकारा वाटायला पाहिजेत तितकीं वाटत नाहींत असें म्हणावें लागतें. एरवीं ‘ खादी–भांडारें ’ भरत असतां इतर देशी वस्तूंचीं दुकानें रिकामीं कां दिसलीं असतीं? किंवा, बाहेरचा पोषाख खादीचा व घरांतील इतर वस्तु मात्र अस्सल विलायती असें दृश्य कां दिसलें असतें? आणि हें पाहिलें म्हणजे खादी ही नुसती महात्माजींकरितां किंवा केवळ फॅशन म्हणून तर नाहींना असा संशय येऊं लागतो. असो. मोकळेपणानें तूं मला पत्र लिहिलेंस, खोटी भीड किंवा अकारण भीति न धरतां माझ्या विचारांतील ( तुला वाटलेली ) विसंगति दाखविलीस, स्वतःच्या चुकाहि प्रामाणिकपणें कबूल केल्यास हें पाहून मला अतिशय समाधान झालें येवढें सांगून पुरें करतों. कळावें हे आशीर्वाद—

तुझा

नाना मामा.

## चि. तात्यास— ५

*अनेक आशीर्वाद वि.*

तुझें पत्र पोंचलें. वाचतांना सारखें हसूं येत होतें. ताकाला जाऊन भांडें लपविण्या-सारखा प्रकार केलास, खरा ? कॉलेज सोडून व्यवहारांत पडल्याला फारसे दिवस न झाल्यामुळें अद्याप तुझी ती कॉलेजच्या मुलांची संवय गेली नाहींसें दिसतें. सबंध पत्रांत कॉलेजमधील जीवनाचं अगदीं इत्थंभूत वर्णन करायचं—कोणतीं पुस्तकें वाचलीं, कोणत्या नवीन मुलांची ओळख झाली, प्रोफेसरांच्या काय काय गंमती उडाल्या वगैरे,—( सिनेमा व मैत्रिणींशिवाय बाकी ) सगळं सगळं कळवायचं—अन् शेवटीं जशी कांहीं जातां जातां आठवण झाली असें दाखवून हळूंच पन्नास रु. ची मनीऑर्डर करण्यासंबंधीं सूचना करायची ! वस्तुतः लिहायचं असतं पैशासंबंधीं, पण बाकीच्या भरताड गोष्टी उगीचच लिहिल्या असायच्या ! पण अश्या लपवाछपवीनें माझ्या-सारखा माणूस कसा फसणार ! असो.

पत्रांतून तूं मला दोन गोष्टी विचारल्या आहेस. ‘ ऑफिसमधून आल्यावर जो वेळ मिळतो त्यांत हिंदीचा अभ्यास करूं, का टिळक विद्यापीठाच्या मराठीच्या परीक्षेला बसूं ? ’ हा पहिला प्रश्न; अन् ‘ सांगून आलेल्या ‘ स्थळां ’पैकीं कोणतें स्थळ पसंत करूं ? ’ हा दुसरा प्रश्न. वास्तविक दुसरा प्रश्नच तुझे दृष्टीनें महत्त्वाचा असून त्यासंबंधींचें माझें मत कळावें अशी तुझी इच्छा. पण तेवढ्यासंबंधींच विचारलें तर जरा चमत्कारिक दिसेल कीं काय असें वाटून तूं त्याला गौणस्थान दिलें आहेस.

कांहींका असे ना. मी कुटुंबांतला एक वडीलधारा म्हणूनच नव्हें, तर माझेबद्दल तुला एक प्रकारचा विशेष आपलेपणा वाटतो म्हणूनच तूं मला विचारलेंस यांतच मला विशेष आनंद झाला, आणि म्हणूनच तूं जितक्या मोकळेपणानें विचारलें आहेस. तितक्याच मोकळेपणानें मी तुझ्या दोन्ही प्रश्नांचीं उत्तरें क्रमवार देत आहें.

फुरसुतीचा वेळ एकादी चांगली गोष्ट शिकण्यांत घालावा असें तुला वाटत आहे हें खरोखरच फार चांगलें आहे. नाहींतर नुसत्या चकाट्या पिटण्यांत, किंवा सायकलवरून गांवभर भटकण्यांत, किंवा सिनेमा पाहण्यांत तूं तो वेळ घालविला असतास तरीहि त्यांत विशेष वावगें दिसलें नसतें. तुझ्यासारखेच थोडेंफार मिळवणारे इतर तरुण तरी यापेक्षां दुसरें काय करताहेत ! आणि म्हणून या तुझ्या सदिच्छेबद्दलच मी तुझें प्रथम अभिनंदन करतों. मात्र ज्या गोष्टी शिकण्याचें तूं योजिलें आहेस त्या इतर दृष्टीनें चांगल्या असल्या तरी तुझ्या प्रस्तुतच्या उद्योगाला त्या तितक्याश्या पोषक नाहींत असें मला वाटतें. व्यवहाराच्या दृष्टीनें मराठीच्या उच्च अभ्यासाचा बराच उपयोग होईल यांत शंका नाहीं. पण मिलिटरी अकौंट्स् सारख्या ऑफीसमधील कारकुनीच्या कामाचे ( ' कारकुनीचें काम ' नाहीं म्हणायचें ! ' क्लेरिकल् वर्क ' ! ) दृष्टीनें त्या दोहोंचा फारसा फायदा होणार नाहीं. त्यापेक्षां तूं जर शॉर्ट्हँड् टायपिंग् शिकलास, किंवा अकौंटन्सीचा एकादा साधा कोर्स ( अर्थातच तसा असल्यास ) घेतलास तर तें जास्त उपयोगाचें नाहीं का होणार ? जन्मभर कारकून म्हणून काम करायचें असें एकदां ठरलें म्हणजे उत्तम कारकुनीला पोषक अश्या जितक्या गोष्टी असतील तितक्या शिकून ठेवणें जास्त जरूरीचें व फायद्याचें आहे. सर्वच कला व विद्या माणसाला मिळवतां आल्या असत्या तर फारच चांगलें झालें असतें. पण तसें घडणें शक्य नाहीं हें ओळखून रोजच्या जीविताला आवश्यक असणाऱ्या गोष्टी कोणत्या, व जीविताला अनवश्यक पण एरवीं भूषणास्पद असलेल्या गोष्टी कोणत्या याचा विचार करून त्याप्रमाणें माणसानें आपली निवड करणें जरूरीचें आहे. एकदां साध्य ठरल्यावर त्याला अनुकूल असलेलीं साधनें हस्तगत करणें हेंच शहाणपणाचें नाहीं काय ? साध्यसाधनांचा मेळ बसला नाहीं तर पूर्ण सिद्धी कशी मिळणार ?

साध्यसाधनाच्या मिळणीला नुसत्या नोकरीधंद्याच्या दृष्टीनेंच महत्त्व आहे असें नसून सबंध जीवनांतहि तिला तितकेंच महत्त्व आहे. आणि या एकाच वाक्यांत

तुझ्या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर सामान्यतः सामावलेलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. 'कोणती मुलगी पसंत करूं?' येवढेंच विचारलेंस म्हणून बरें झालें. 'लग्न करूं का नको?' असेंच विचारलें असतेंस तर काय घ्या! 'लग्न करूं, का देशकार्यांत पडूं?' असाच प्रश्न एकदां एका तरुणानें 'लोकमान्यांना' विचारला होता. बळवंतराव जरा तापट अन् स्पष्ट बोलणारे असल्यामुळें त्यांनीं एकदम सांगितलं 'असाच परत जा, अन् अगोदर लग्न कर!' आमचेंहि एकदां असेंच झालें. मीं आणि माझ्या एका मित्रांनीं-( ते आतां एका कॉलेजचे बडे प्रिन्सिपल आहेत )-आम्ही जबलपूरच्या ट्रेनिंग कॉलेजांत असतांना-मालवीयजींना पत्र लिहून विचारलें. 'आम्ही सरकारी शाळेंत नोकरी धरूं? का एखाद्या खाजगी संस्थेंत सेवा करूं?' पण पंडितजी पडले जास्त धूर्त. त्यांनीं आमच्या पत्राला उत्तरच धाडलें नाहीं! आणि उत्तर तरी काय पाठविणार? ज्याला मनापासून लग्न करायचें नसतें, किंवा खाजगी शाळेंत स्वार्थत्यागपूर्वक काम करायचें असतें तो कांहीं दुसऱ्याला विचारायला जात नसतो. काय करायचें तें स्वतःच्या विचारानें करतो, व त्याचे जे कांहीं बरे-वाईट परिणाम होतील ते स्वतः निमूटपणें भोगायला तयार असतो.

तुझ्या प्रश्नाचें झट्दिशीं उत्तर न देतां मी दुसऱ्याच गोष्टी काढीत आहें याचा तुला राग येऊं लागला असेल, नाहीं? पण मी जें असें अधून-मधून विषयान्तर करीत आहें,-किंवा तें माझे हातून होत आहे-याचें कारण असें आहे कीं मी तरी तुला अमूक एक मुलगीच पसंत कर असें निश्चितपणें व तावडतोबीनें कसें सांगूं? वधूवरसंशोधनाच्या ज्या कांहीं कसोट्या पूर्वापार चालत आलेल्या आहेत त्याच तुजपुढें ठेवून, त्यांच्या अनुरोधानेंच एखादी मुलगी पसंत कर असें सांगणार. अर्थात् येवढेंच सांगून व पत्र पुरें करून मी तुझी कशीतरी बोळवण करणार आहे असें नव्हे. पण प्रश्न नाजूक असून त्याचें उत्तर एकदम देणें किती कठीण आहे येवढेंच मला तुला पटवून द्यावयाचें आहे.

पूर्वींचीं लग्नें वधूवर वयानें लहान व अप्रबुद्ध असतांनाच होत असल्यामुळें त्यांच्या लग्नाची सर्व जबाबदारी त्यांच्या पालकांवर पडे; व त्यासंबंधींचा जो काय विचार करावयाचा तो तेच करीत असत. आणि हें काम ते आपल्या मगदुराप्रमाणें खरोखरच चांगलें करीत असत असेंच म्हटलें पाहिजे. गोत्र, कुल, शील, गृहस्थिति वगैरे व्यावहारिक गोष्टी तर ते पहात असतच, पण त्यांशिवाय ते वधूवरांची पत्रिका वगैरे पाहून त्यांचें ग्रहमान परस्परांना अनुकूल आहे कीं नाहीं हेंहि लक्षांत घेत

असत. पण त्यांचे हातून–कदाचित् नकळत–अशी एक चूक होत असे कीं या सर्व गोष्टींचा विचार ते स्वतःचे दृष्टीनें करीत–वधू आणि वर या ज्या महत्त्वाच्या व्यक्ती त्यांचे दृष्टीनें नव्हे! लग्नाच्या नाटकांत त्या अथपासून इतिपर्यन्त मूक नायक किंवा मूक नायिकाच राहात असत. नुसत्या लग्नाच्या बाबतींतच नव्हे; तर मुलांचें खाणें-पिणें, कपडे-लत्ते, आवडी-निवडी, शिक्षण-संस्करण वगैरे सर्वच बाबतींत वडिलांचें हें असें धोरण असे. आत्मौपम्यानें पाहण्याचें हें त्यांचें धोरण प्रेमाचें निदर्शक व म्हणून श्लाघ्य मानलें तरी मानसशास्त्राचे दृष्टीनें तें सदोष आहे असेंच म्हटलें पाहिजे. ही चूक लक्षांत आल्यामुळें, व मुलांमुलींचीं लग्नें हल्लीं त्यांच्या जाणतेपणींच होऊं लागल्यामुळें, लग्नासंबंधींचा जो कांहीं विचार पूर्वी पालक करीत असत तो आतां मुख्यतः मुलांचा मुलांनींच केला पाहिजे. तेव्हां प्रथम तूं स्वतःचें निरीक्षण कर, नंतर सांगून आलेल्या मुलींचें परीक्षण कर; आणि हीं दोन्हीं झालीं म्हणजे उभयतांच्या गृहस्थितींचा विचार कर. आणि मग जी कांहीं निवड करायची ती कर.

'हें एक त्रांगडंच आहे' असं तूं म्हणशील. 'त्रांगडं' तर खरंच! आणि या तिन्ही गोष्टी जुळून लग्न जुळणें हें जवळ जवळ अशक्य. तसें नसतें तर सर्वच विवाह मोठे सुखाचे झाले असते. पण उदाहरण कठीण असलें, आणि त्याचें उत्तर आपल्याला अगदीं बरोबर काढतां येणें शक्य नसलें तरी तें सोडून न देतां, यथामति सोडवून पाहण्यांत आणि शक्य तितकें बरोबर उत्तर काढण्यांतहि एक प्रकारचा पराक्रम व तदनुगामी आनंद आहेतच कीं. तेव्हां निष्कारण भांबावून किंवा गांगरून जाऊं नकोस. मुलगी पसंत करणें म्हणजे मंडईतली भाजी पसंत करण्यासारखें सोपें आहे असें कोणाला वाटूं नये,–तुला तसें वाटत नाहीं हें दिसतेंच आहे–उलट तें अत्यंत जबाबदारीचें व विचाराचें काम आहे ह्याची जाणीव करून देण्याकरितांच मीं जरा जास्त भडक चित्र रंगविलें, येवढेंच.

एरवीं आपली खरी योग्यता काय आहे हें प्रत्येक मुलाला माहीत असलें तरी, लग्नाचा मोसम येऊन मुलींचे सौदे सुरू झाले म्हणजे आपल्याला चांगला भाव यावा म्हणून जो तो आपल्या गुणांची जाहिरात करूं लागतो, व बऱ्याच वेळां नसलेले गुणहि स्वतःला चिकटवूं पाहतो. पहिल्या पहिल्यांदा या बेगडी गुणाची थोडी तरी जाणीव त्याला असते; पण पुढें पुढें तो इतका निर्ढावतो कीं आपण खरोखरींच जुन्या मायन्यांतल्या प्रमाणें 'श्रीमन्त सकलगुणालंकरण अखंड लक्ष्मीराजश्रिया

विराजित ' आहोंत असें त्याला वाटूं लागतें. तूं नाहींस तर तुझे आप्तेष्ट व हित-चिंतक या वेळीं पुढें येऊन तुझ्यांतील असलेल्या गुणांची अतिशयोक्ति करून नसलेले गुणहि तुझ्या आंगीं लावतील. मला तुला येवढेंच बजावावयाचें आहे कीं तूं अशा वेळीं भुलून व फसून जाऊं नकोस. स्वतःचें निरीक्षण कर असें जें वर म्हटलें तें येवढ्याकरितांच. आणि हें तूं केलेंस म्हणजे ' आपण एका जुन्या-बाळ-बोध आचारविचाराच्या, खाण्यापिण्याची फारशी ददात नसलेल्या, शास्त्री घराण्यांत जन्माला आलों आहोंत; शरीरसंपदेंत जरा बऱ्या प्रकारचे, पण बौद्धिक मगदुरांत चारचौघांप्रमाणेंच आहोंत; आपलें झालेलें शिक्षण व पुढील कर्तृत्व बेतावाताचींच असून आपली कमाईहि सामान्य प्रकारचीच राहणार आहे; आपण एकटे सडेफटिंग नसून आपल्यावर आपल्या वृद्ध वडिलांची व लहान भावंडांची बरीच जबाबदारी आहे; आपल्याला नव्याजुन्या जमान्यांतल्या सर्व प्रकारच्या माणसांना निभावून-नांदवून घ्यावयाचें आहे ' इत्यादि गोष्टी तुला आढळून येतील. माझ्यासारख्या आप्ताला-पण त्रयस्थपणें पाहणाराला तुझ्यासंबंधानें जें कांहीं दिसतें व वाटतें तें मीं तुझ्यापुढें थोडक्यांत मांडलें आहे. आतां यांहिपेक्षां कांहीं विशेष गोष्टी तुझ्यांत असल्या तर मला तरी त्या अद्याप दिसून आल्या नाहींत.

अश्या अश्या प्रकारचे आपण आहोंत हें एकदां समजून व पटवून ( नुसतें ज्ञान होऊन चालत नाहीं, तर तें अंतर्यामीं पटावें लागतें. ) घेतल्यावर त्या अनुरोधानें आपल्या भावी वधूचें परीक्षण करावयास लाग. पहिली गोष्ट पहावयाची ती-तिचें आरोग्य. ' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ' असें म्हणण्याऐवजीं ' शरीरमाद्यं खलु सर्वसाधनम् ' असेंच मी म्हणेन. ' शरीराचें कौतुक करतांना नेहमींच असं म्हणायचं असतं ' असं म्हणून या साधनाची उपेक्षा करूं नकोस. आरोग्यावरच माणसाचें सौंदर्य व सौजन्य बहुतांशीं अवलंबून असतें. पाहिल्याबरोबर एकदम प्रेम बसलें अश्या समजुतीनें एखाद्या क्षीण, हडकुळ्या, जरत्कारु, पाप्याच्या पितराशीं(?) किंवा वाऱ्यावर उडून जाणाऱ्या नाजूक फुलपांखराशीं कायमचा विवाहबद्ध होऊं नकोस. दृष्टादृष्ट झाल्याबरोबर उत्पन्न होणारे प्रेम-ज्याला love at first sight असें म्हणतात-तें खरें प्रेमच नव्हे. त्याचें वर्णन फक्त काव्यांतच केलेलें बरें दिसतें. ती एक क्षणिक स्वरूपाची कामवासना असून धकाधकीच्या प्रत्यक्ष व्यवहारांत तिचा कांहींच उपयोग होत नाहीं. नायिकेच्या एखाद्या विशिष्ट गुणावर लुब्ध होऊन नायक वेडावून जातो, व त्याला तिच्यांतील अवगुणांचें ज्ञान करून घेण्याची

विवेकशक्ति उरत नसल्यामुळें ती त्याच्या डोळ्याला सौंदर्याची पुतळीच दिसूं लागते. पण मी तर असें म्हणेन कीं नुसत्या गुणावर मोहून जाऊन उत्पन्न झालेलें प्रेम हीं एक नुसती आसक्ति असून, दोष दिसून आल्यावरहि जें प्रेम पूर्वीच्याच उत्कटतेनें कायम राहतें तेंच खरें प्रेम. तेव्हां सांगायचें असें कीं एकाद्याच गुणावर किंवा तकलादू रूपावर एकदम भाळून न जातां पूर्ण परीक्षा कर, आणि सुदृढ व कांटक शरीर व त्याचे बरोबर येणारें सुदृढ व खंबीर मन यांना प्राधान्य देऊन तूं आपल्या वधूची निवड कर.

सौंदर्याचे दृष्टीनें परीक्षण करतांनाहि खरें–टिकाऊ सौंदर्य व क्षणिक–बेगडी सौंदर्य यांतील फरक लक्षांत ठेव. आरोग्य व सौंदर्य हीं सामान्यतः एकत्र असतात असें वर सांगितलेंच आहे. कोणतीहि निरामय व ताजीतवानी वस्तु सुंदर दिसते. [ हसूं नकोस, पण धष्टपुष्ट गायीबैलांच्या ताज्या शेणांतहि माझ्या डोळ्याला एक प्रकारचें सौंदर्य दिसतें ! ]. वरवरचें सौंदर्य ऊर्फ नखरा फार थोडा वेळ टिकतो. प्रतिकूल परिस्थितीच्या पहिल्याच रपाट्याबरोबर तें पार नाहींसें होतें. कांहीं काळ सुंदर व लुसलुशीत दिसणाऱ्या बाहुल्या एकाच बाळंतपणानें कश्या फिक्क्या, खप्पड व खतम् झालेल्या दिसतात हें तूं पाहिलेंच असशील. तेव्हां नुसत्या गोऱ्या कातडीवर किंवा तकतकीत चेहऱ्यावर भाळून न जातां शरीराची भव्य आणि बांधेसूत ठेवण, व नीटस, चलाख आणि भावदर्शक नाक–डोळे या बाबी लक्षांत घे. सुंदर चेहऱ्यापेक्षां सुंदर आकृति चांगली, व सुंदर कृती तर या दोहोंहूनहि अधिक चांगली. Handsome is that handsome does ही गोल्डस्मिथनें केलेली सौंदर्याची साधी पण मार्मिक व्याख्या लक्षांत ठेवण्यासारखी आहे. नटणाऱ्या–मुरडणाऱ्या किंवा संपन्नतेनें सुखावलेल्या स्त्रिया पुष्कळ वेळां सुंदर दिसतात; पण हें त्यांचें सौंदर्य कृत्रिम व विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून असल्यामुळें तें खरें व कायमचें असें मानतां यावयाचें नाहीं. स्त्रिया एकट्या आणि स्वाभाविक स्थितीत असतांना व दमलेल्या, रागावलेल्या, निराश झालेल्या किंवा त्रासलेल्या मनःस्थितींत असतांनाहि सुंदर दिसत असतील तरच त्यांच्या त्या सौंदर्याचा संसारांत कांहीं उपयोग होतो.

भावी वधूच्या आरोग्याला व सौंदर्याला अतिशय महत्त्व आहे. कारण तिच्यांत हे गुण असतील तरच ते तिच्या पोटीं जन्माला येणाऱ्या संततींत उतरतील. तेव्हां पत्नीच्या आरोग्याचा व सौंदर्याचा संबंध एकट्या पतीच्या सुखाशीं व आनंदाशीं नसून त्यांचा परिणाम पुढच्या सर्व पिढ्यांवर होत असतो. एकाद्या विशिष्ट गुणाकडे

पाहून तूं एकादी निःशक्त व कुरूप स्त्री पसंत करशील; व स्त्रीपुरुष संबंध हा फक्त त्या उभयतांच्या आयुष्यापुरताच असता तर त्या पसंतींत कांहीं वावगेंहि म्हणतां आलें नसतें. पण हा दोघां व्यक्तींपुरताच प्रश्न नसून त्यांत त्यांच्या पोटीं येणाऱ्या सर्व मुलावाळांचा ( व त्यांच्या मुलावाळांचा ) प्रश्न निगडित झाला आहे. तेव्हां या बावतींत नुसत्या वैयक्तिक आवडीचे दृष्टीनें न पाहतां सबंध कुटुंबाच्या व समष्टीच्या हिताच्या दृष्टीनें पाहणें जरूर आहे.

जी गोष्ट शारीरिक सौंदर्यासंबंधीं तीच मानसिक गुणांसंबंधीं. स्त्रीपुरुषांतील कांहीं कांहीं स्वाभाविक गुणावगुण त्यांच्या पुढील पिढींतही संक्रांत होत असल्याचें दृष्टीस पडतें. म्हणून वधूची निवड करतांना तिची सामान्य बुद्धिमत्ता, मानसिक कल, आवडी-निवडी, स्वभावधर्म, विकारलहरी इत्यादि गोष्टींकडेहि लक्ष द्यावयास पाहिजे. हें सर्व समजून येण्यास वधूवरांना एकत्र येतां–राहतां आलें पाहिजे, त्यांचा कांहीं काळ तरी सहवास घडला पाहिजे; व असा सहवास होणें आपल्या आतांच्या विवाह-पद्धतींत तरी शक्य नाहीं, हें खरें. पण तिचे आईबाप व भावंडें यांच्यांतील गुणावगुणांची थोडीफार माहिती मिळाल्यास तिच्यांतील गुणावगुणांचीहि चालचलाऊ कल्पना येण्यास पंचाइत पडणार नाहीं. 'खाण तशी माती व जात तशी व्यक्ती' या सामान्य नियमाचा उपयोग आपल्याला करून घेतां येण्यासारखा आहे. 'तुळशी-पोटीं भांग' असा उलट अनुभवहि कदाचित् येईल. नाहीं असें नाहीं. पण तो अपवाद असें समजून आपण सामान्यतः वागलें पाहिजे. आणि या दृष्टीनें वधूचें कुल, घराणें वगैरे पहाण्याची आपलेकडील पद्धत फार चांगली असून ती तूंहि अनुसरणें शहाण-पणाचें होईल.

वधूमधील विशेष गुण लक्षांत घ्यावयाचा तो–तिची वृद्ध व वडीलधाऱ्या माण-सांशीं वागण्याची वृत्ति व तऱ्हा–हा होय. वृद्धांना योग्य तो आदर देणें, त्यांच्या कलाकलानें घेणें, व त्यांच्याशीं वागतांना स्वतःच्या वागणुकींत एक प्रकारचें मार्दव व सौजन्य राखणें या गुणांमुळें मुली जितक्या खऱ्या अर्थानें सुंदर दिसतात तितक्या दुसऱ्या कशानेंच दिसत नाहींत. आणि हें सौंदर्य तुला तिच्यांत आढळलें म्हणजे तुझें बरेंचसें काम झालें अशी खात्री वाळगण्यास हरकत नाहीं. बाकीच्या गुणांसंबंधीं तूं पुढें पाहून घेशील. आपल्याकडे मुलगे लग्न झाल्यावरोवर आईबापांपासून निराळे होण्याची व स्वतंत्रपणें राहूं लागण्याची चाल नसल्यामुळें मुलींना आपला बराचसा काळ सासूसासऱ्यांच्या संगतींत व त्यांचे तंत्रानें वागण्यांत काढावा लागतो; आणि

त्यांच्याशीं चांगलें वागून व त्यांची मर्जी संभाळून घेण्याचें तंत्र जर त्यांना साधलें नाहीं तर त्यामुळें त्यांना, त्यांच्या नवऱ्यांना व त्यांच्या सासूसासऱ्यांना–सर्वांनाच त्रास होतो. हें तंत्र मुलींना लग्न झाल्यावर आपोआप समजतें, किंवा सासूसासऱ्यांशीं कसें वागावयाचें हें त्यांना लग्नापूर्वी—जेव्हां सासूसासरेच नाहींत तेव्हां—कसें माहीत असणार असें म्हणून चालावयाचें नाहीं. ज्या कुटुंबांत काका–काकू, आजोबा–आजीबाई वगैरे सारखीं भिन्न वयाचीं, भिन्न आचाराविचारांचीं, भिन्न चालीरीतींचीं माणसें आहेत अशा कुटुंबांत वाढलेल्या व रुळलेल्या मुलीला सासूसासऱ्यांसारख्यांशीं वागण्याचें फारसें कठीण जाणार नाहीं. आणि म्हणून अशा एकाद्या कुटुंबांतील मुलीची निवड करणें जरूर आहे.

मुलींच्या मनावर विशेष परिणाम होत असतो तो त्यांच्या आयांचा. आणि म्हणून वडीलधाऱ्या माणसांशीं मुलीची वागणूक कशी काय आहे हें पाहतांना तिच्या आईची—तुझ्या भावी सासूबाईची—चालचलणूक पाहणेंहि सहायप्रद होईल. सासूबाईतच तसें कांहीं आदरणीय व स्पृहणीय दिसून आलें नाहीं तर तूं त्यांच्या मुलीचा नाद सोडून दिलेलाच बरा.

ज्या कुटुंबांत भाऊबंदक्या, भांडाभांड्या, हमरातुमऱ्या वगैरेसारख्या अनिष्ट गोष्टी हमेशा चाललेल्या असतात, व म्हणून जें कुटुंब नेहमीं असंतुष्ट व असमाधानी असतें अशा कुटुंबांतली मुलगीहि न निवडणें बरें. कारण अशा मुलीचे मनावर लहानपणापासूनच मनुष्यस्वभावाबद्दल विपरीत परिणाम झालेला असून ती सामान्यतः तुसडी, माणूसघाणी व मानवद्वेष्टी बनलेली असण्याचा बराच संभव असतो; किंवा ज्या कुटुंबांतील पुरुष नादी, व्यसनी, वगैरे असतात त्यांतील मुलींच्या मनांत पुरुषवर्गाबद्दल एक प्रकारची तेढ उत्पन्न झालेली असते. परवांच एका अमेरिकन जर्नलमध्यें एका स्त्री-डॉक्टरानें एका स्त्री–रोग्यासंबंधीं असें लिहिलें होतें कीं 'त्या तरुणीच्या रोगाची चिकित्सा करतांना असें आढळून आलें कीं तिचा तो रोग पतिसुख न मिळाल्यामुळें जडला होता; व याचें कारण तिला खोदखोदून विचारतां तिनें शेवटीं कबूल केलें कीं त्यांत पतीचा कांहीं दोष नसून तिलाच संभोगाचा तीव्र तिटकारा आहे. हा तिटकारा तरी कां आला असावा याची चिकित्सा मनोगाहनपद्धतीनें करतांना मला असें आढळलें कीं त्या मुलीचा वडील भाऊ घरांतील स्त्री–मंडळीशीं नेहमीं अरेरावीपणानें वागत असून आपल्या बायकोवर–तिच्या वहिनीवर–

एकाद्या पशूप्रमाणें लहर येईल तेव्हां बळजबरी करीत असे. वहिनीनें सांगितलेल्या स्वतःच्या छळाच्या गोष्टी ऐकल्यामुळें, व दुसऱ्या पुरुषांच्याहि तसल्याच प्रकारच्या इतर गोष्टी ऐकल्यामुळें, लहानपणापासूनच त्या हळुवार मुलीचे मनांत एकंदर स्त्रीपुरुष-संबंधाबद्दल असा कांहीं कायमचा तिटकारा उत्पन्न होऊन राहिला होता कीं, लग्न झाल्यावर तिनें आपल्या पतीला त्या बाबतींतलें सुख कधींहि लाभूं दिलें नाहीं.' वरील सर्वाचें तात्पर्य असें कीं, एरवीं सर्व गुण असूनहि मन एकाद्याच विशिष्ट गोष्टीनें विकृत झालें म्हणजे सर्वच बाबतींत तें विकृत होतें; आणि हें विकृत झालेलें मन सुधारण्याकरितां तूं आपलें स्वतःचें सुख गमावून एक प्रकारें हुतात्मा व्हावास असें मला वाटत नाहीं.

समान आवडी-अभिरुचीच्या वधूवरांची निवड हितावह ठरते का विरुद्ध आवडी-अभिरुचीच्या वधूवरांची निवड हितावह ठरते असा एक प्रश्न विचारण्यांत येतो. संसार हा दोघांचा आहे, व तो पूर्ण ऐक्याचा व मिलाफाचा व्हावा अशा दृष्टीनें पाहिल्यास वधूवर समान आवडीनिवडीचीं व अभिरुचीचीं असावीं हें चांगलें. तुझा जन्म कोंकणांत होऊन तुझें बालपणहि तेथेंच गेल्यामुळें कोंकणच्या स्वाभाविक गोष्टी व तेथली ग्रामीण राहणी तुला आवडतात; येवढेंच नव्हे, तर त्यांतच तुला आनंद वाटतो. ऑफिसला केव्हां सुटी होते आणि आपण कोंकणांत जाऊन केव्हां समुद्रावर भटकायला जातों, माडावर चढून शहाळीं केव्हां पाडतों, बैल जुंपून रहाट केव्हां चालवतों, हातांत फांवडें घेऊन शिपणें केव्हां करतों, गायी-म्हशींच्या धारा केव्हां काढतों, पोफळें केव्हां पष्टाळतों, वडे अन् गोडं किंवा कोळपोहे केव्हां खातों असें तुला होऊन जातें. उलट, कल्पना कर कीं, तुझी भावी पत्नी पुण्यासारख्या देखुरी व शहरी वातावरणांत वाढलेली आहे. तिला तुझ्या कोंकणांतल्या कोणत्याहि गोष्टींत फारसा आनंद न वाटतां पुण्याच्या मौजाच आपल्याला केव्हां अनुभवायला मिळतील असें होऊन जाईल. ती मंडई, ती तुळशीबाग-बेलबाग, (किंवा मुलगी शिकली-सवरलेली असल्यास) तें टिळकमंदिर, तो जंगली महाराज रोड, तें लकी रेस्टारंट, तो प्रभात सिनेमा, ती फर्ग्युसन कॉलेजची टेकडी व तिच्यावर दोघांनींच हिंडायला जाणं इत्यादि गोष्टींसंबंधींच तिला औत्सुक्य वाटणार. पोषाकासंबंधीं तसेंच होणार. तूं जो साधा म्हणून पोषाख करशील तो तिला गबाळेपणाचा वाटणार! आणि ती जो नीटनेटका म्हणून करील तो तुला छचोरपणाचा दिसणार! तेव्हां भिन्न परिस्थितींत वाढल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या भिन्न आवडी व अभिरुची जीवनांतील ऐक्याला

पोषक न होण्याचाच संभव जास्त. आणि म्हणून वधूवरांची निवड करतांना त्यांची समान परिस्थिति व समान अभिरुचि लक्षांत घेणें श्रेयस्कर होय.

स्वभावाचे बाबतींत मात्र त्या दोघांत निराळेपणा असणेंच जास्त सुखावह होईल असें वाटतें. दोघेंहि–समज–सारखींच सडेतोड, सारखींच तापट, सारखींच भावनाशील, सारखींच अप्पलपोटीं, सारखींच उधळीं किंवा सारखींच चिक्कू असतील तर संसार सुखाचा होण्यापेक्षां दुःखाचाच होईल. तेव्हां स्वभावाचे बाबतींत वधूवरांनीं परस्परांना पूरक व पोषक असावयास पाहिजे तरच संसाराचा तोल संभाळला जाईल. शिवाय त्यांच्यांतील या परस्पर विरोधीपणामुळेंच संसारांतील एकचएकपणा व त्यामुळें येणारा कंटाळा हे नाहींसे होतील, व त्यांत अधून-मधून नाविन्य उत्पन्न होऊन एक प्रकारची लज्जत येईल. या नाविन्याच्या व लज्जतीच्या अभावीं कितीतरी संसारांतील जीवन नाहींसें होऊन ते अगदीं निर्जीव व नीरस झालेले दृष्टीस पडतात.

याच्या सारखाच दुसरा प्रश्न म्हणजे वधूवरांच्या सामाजिक व आर्थिक दर्ज्यांत साम्य किंवा वैषम्य किती असावें यासंबंधींचा. एखादा राजपुत्र खुशाल एखाद्या भिकारणीशीं तिच्या एखाद्याच गुणावर लुब्ध होऊन लग्न लावतो, व तो त्यांचा विवाह अत्यन्त सुखावह होतो असें दृश्य पुष्कळशा नाटका–सिनेमांतून किंवा कादंबऱ्यांतून दाखविलें असतें. ध्येयवादाच्या दृष्टीनें व केवळ सद्‌गुणांचीच प्रशंसा करण्याचे हेतूनें रंगविलेलीं असलीं चित्रें नाटकगृहांत बसल्याबसल्या पाहायला फार चांगलीं वाटतात; पण बाहेर पडल्याबरोबर आर्थिक विषमतेचें भीषण स्वरूप व त्याचे दुष्परिणाम जेव्हां दृष्टीस पडतात तेव्हां वैवाहिक जीवनांत असली विषतमा मुद्दाम होऊन न आणलेली बरी असेंच वाटूं लागतें. जी वधू तूं पसंत करशील ती–समज–एखाद्या लक्षाधीशाची मुलगी असेल ( तिच्यांत कांहींतरी मोठा गोम असल्यावांचून अशी मुलगी तुला सांगून यावयाचीच नाहीं म्हणा! ) तर नाकापेक्षां मोती जड अशी तुझी स्थिति होईल, व तुला सारखें तिच्या व तिच्या माणसांच्या अंकित होऊन स्वत्व गमवावें लागेल. किंवा उलट तिच्यांतील एखाद्या विशिष्ट गुणावर–उदाहरणार्थ रूपावर–लुब्ध होऊन तूं अगदीं एखाद्या स्वयंपाकिणीची मुलगी करून घेतलीस, तर तिला तुझ्या दर्जाला व इतमामाला आणतां आणतां आणि स्वतःला शोभेशी करतां करतां तुझ्या नाकीं नव येतील! व मग कोठून असली ब्याद घरांत आणली असा तुला सारखा पश्चात्ताप होत राहील. तिला वागवून घेतांना तुला अत्यन्त मोठें मन, अत्यन्त थोर अंतःकरण, अत्यंत विशाल दृष्टि वगैरे असाध्यप्राय गोष्टी अंगीं आणण्याचा प्रयत्न

करावा लागेल. आणि इतकें करूनहि मूळ हेतू साधेलच अशी खात्री नाहीं. मग इतकें सगळें कराच कशाला ? नाटकांतून व कादंबऱ्यांतून सुद्धां असे पेंचप्रसंग निर्माण होतात. पण लेखक हे ' निरंकुश ' असल्यामुळें ते अश्या प्रसंगीं असे कांहीं चमत्कार व योगायोग घडवून आणतात कीं त्यांचे सामर्थ्यावर सर्व कांहीं सुरळीत होऊन नाटक व कादंबरी पूर्वसंकल्पाप्रमाणें सुखान्त होऊं शकतात ! नाटक हें संसाराचा फोटो नसून तें त्याचें चित्र असतें. आणि चित्रच म्हटलें कीं चित्रकाराला परिस्थितींतील यथातथ्यता दाखवितांनासुद्धां आपल्या आवडीप्रमाणें आपल्या चित्रांत कमीअधिक उठावदारपणा व थोडाफार भडकपणा हे दाखविण्यास बराचसा वाव मिळतो. तेव्हां या बाबतींतहि ' महाजनो येन गतः स पन्थाः ' हें वचन लक्षांत ठेवून समान दर्जाच्या व समान आर्थिक परिस्थितींतल्या वधूचीच निवड करावी हें बरें.

वधूची निवड करतांना तिचें आरोग्य, सौंदर्य, घराणें, स्वभाव, आवडी-निवडी, सांपत्तिक स्थिति इत्यादि गोष्टींचा विचार केला पाहिजे असें आतांपर्यंत सांगितलें. आतां आणखी एक दोन किरकोळ गोष्टी सांगून हें माझें वधूपुराण मी पुरें करतों. वधूच्या खुद्द शिक्षणासंबंधीं मीं अद्यापि प्रत्यक्ष असें कांहीं सांगितलें नसलें तरी, तुला त्यासंबंधींचें माझें सामान्य मत समजून आलें असेलच. स्पष्ट सांगायचें म्हणजे मुलगी कोणती परीक्षा पास झाली आहे याला मी फारशी किंमत देत नाहीं. कोणतीहि मोठी परीक्षा पास न होतांहि कांहीं कांहीं व्यक्ति नुसत्या शिक्षितच नव्हे तर सुशिक्षित असल्याच्या माझ्या पाहण्यांत आहेत. शहाणपणा मोजण्याचें एक बाह्य माप या दृष्टीनें परीक्षा उपयोगाच्या असून त्यांना स्वतःचें असें मौलिक महत्त्व नाहीं. शिवाय नुसत्या परीक्षांवर मोजलेली विद्वत्ता व्यवहारांत फलदायी ठरतेच असेंहि नाहीं. उलट विद्वत्ता व व्यवहारज्ञता हीं पुष्कळ वेळां व्यस्त प्रमाणांत वाढत जाऊन ' विद्वान् सर्वत्र पूज्यते ' असें लिहिण्याऐवजीं ' विद्वान् सर्वत्र पूज्य ते ' असें निराळ्याच प्रकारचें व उलट अर्थाचें लिहावें लागतें. तेव्हां मुलीचें शिक्षण लक्षांत घेतांना ती मनानें सुसंस्कृत, बुद्धीनें समंजस, व्यवहारांत दक्ष, गृहकृत्यांत चतुर, कोणत्याहि भल्याबुऱ्या प्रसंगांत सुखासमाधानानें राहण्यासारखी आहे कीं नाहीं येवढें पाहिलें म्हणजे बस् झालें. वास्तविक, स्त्रीशिक्षणाचा मी मोठा भोक्ता व अभिमानी; आणि मींच असले हे मवाळ विचार मांडलेले

पाहून तुला जरा चमत्कारिक वाटेल. पण पदवीवाल्या व सुशिक्षित म्हणून मिरविणाऱ्या स्त्रियांपैकीं कांहींचीं एक-एक थेरें व त्यांचा तो नादानपणा पाहिला म्हणजे नको तें उच्च शिक्षण, आणि नकोत त्या पदव्या असें वैतागानें म्हणावेंसें वाटतें. शिवाय या बाबतींत तुझें स्वतःचें शिक्षण व परिस्थिति हींहि लक्षांत घेतलीं पाहिजेत; आणि तीं लक्षांत घेऊनच मी वरील प्रमाणें सांगत आहें.

वधूवरांच्या पालकांची सांपत्तिक स्थिति समान दर्जाची असावी असें मीं वर म्हटलेंच आहे. अर्थात् तुझा भावी सासरा तुझ्या वडिलांपेक्षां बराच श्रीमन्त असावा, व त्यानें तुला बराच हुंडा द्यावा अशी अपेक्षा करूं नकोस. आणि तो जरी थोडाफार श्रीमन्त आणि कमी अधिक हुंडा देण्यासारखा असला तरी तूं हुंडा बिलकूल घेऊं नयेस या मताचा मी आहें. सर्वच हुंडा घेतात, मग आपण तरी हुंडा घ्यायला काय हरकत आहे असें तूं म्हणशील; पण असें म्हणणें म्हणजे सर्वच शिव्या देतात, मग आपण तरी कां न द्या असें म्हणण्यासारखेंच आहे. जी गोष्ट तत्त्वतः वाईट म्हणून ठरली, ती दुसरे करतात म्हणून आपण करणें हा मूर्खपणा आहे. आपण आपल्या मुलांचा हुंडा घेतला नाहीं, तरी मुलींचा हुंडा द्यावयाचें कांहीं चुकत नाहीं असें म्हणण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं. एकतर, तुला बहीण नसल्यामुळें हें म्हणणें तुझे बाबतींत लागूं पडत नाहीं. शिवाय सर्वांनींच आपल्या मुलामुलींचे हुंडे घेऊन व देऊन सर्वांचीच नाडणूक व पिळणूक करण्यापेक्षां कोणींच हुंडा घ्यावयाचा नाहीं, व कोणींच द्यावयाचा नाहीं असें ठरविणें अधिक चांगलें नाहीं का? एक हुंडा म्हटला म्हणजे सबंध लग्नाचा बाजार होतो. अर्थात तुझ्या वडिलांना माझें हें म्हणणें कदाचित रुचणार नाहीं; पण तूं स्वतः तरी या बाबतींत खंबीर रहा, व त्याकरितां जो कांहीं वाईटपणा येईल तो सोस असें मी म्हणेन.

जी गोष्ट हुंड्याची तीच मानापानाची व दागदागिन्यांची. मान हा मागून मिळत नसतो. तो आपल्या गुणाप्रमाणें व योग्यतेनुरूप इतरांनीं करावयाचा असतो. तेव्हां त्याबद्दल यत्किंचितहि आग्रह धरणें हें कितपतसें शहाणपणाचें होईल? दागिने करणें अवश्य आहे. कारण मुलींना व त्यांच्या आईबापांना—विशेषतः आयांना—प्रसन्न करून घेण्याचें तें पहिलें महत्त्वाचें साधन आहे. परंतु ते सुद्धां थोडेच पण ठळक कर. ते करण्याकरितां कर्ज मात्र काढूं नकोस, किंवा दुसऱ्या कोणाचे उसनेहि आणूं नकोस. हुंडाच घेतला नाहींस म्हणजे दागिने करण्याची जबाबदारीहि फारशी येत नाहीं.

आतां शेवटीं पत्रिका वगैरे पाहण्यासंबंधीं. एकदमच सांगून टाकतों कीं, माझा अद्याप तरी पत्रिकेवर बिलकूलच विश्वास नाहीं. लग्नाचे वेळीं वधूवरांचे परस्परां-संबंधींचे मनोग्रह अनुकूल बनले म्हणजे त्यांच्या जन्माच्या वेळच्या आकाशांतल्या ग्रहांचें जुळतें कीं नाहीं हें पाहण्याचें कांहीं कारण नाहीं. घरांतल्या बापाला लाथाडून 'आकाशांतल्या बापा' ला डोक्यावर घेण्यासारखेंच आचरटपणाचें तें आहे. पत्रिकाविचार अजून शास्त्र या पदवीला पोंचलेला नाहीं; अन् पोंचला असला तरी पत्रिका पाहतांना व जुळवितांना जुळविणारांकडून ज्या खटपटी अन् लटपटी होतात त्या पाहिल्या म्हणजे माझ्या सारख्या भाविक माणसाचाहि त्यावरचा विश्वास उडून जातो.

वर सांगितलेले हे सर्व सिद्धान्त लागू करून तुझ्या मूळ प्रश्नाचें शेवटचें उत्तर मी असें देईन कीं, सांगून आलेल्या मुलींमधून तूं गोडबोल्यांच्या सुधाचीच निवड कर. किंचित् काळी असली तरी, पोर एरवीं तरतरीत, चुणचुणीत, उमदी अन् सालस आहे. कृष्णाजीपंतांचा अन् तुझ्या वडिलांचा पूर्वापार ऋणानुबंध असून दोघांनाहि परस्परांबद्दल पूर्ण आदर आहे. तुझी आणि सुधेचीहि बोलण्याचालण्या-इतपत ओळख आहे. अर्थात् तेवढ्यावरून तिच्या मनाचें पूर्ण परीक्षण तुला करतां आलें असेल असें नाहीं. तरी पण तुम्हां उभयतांना अधिक काळ एकत्र येतां येईल व एकमेकांचा परिचय अधिक करून घेतां येईल अशी व्यवस्था करण्यासंबंधीं मी कृष्णाजीपंतांना सुचवूं शकेन, आणि तेहि तें मनापासून मान्य करतील असें वाटतें. मात्र या संधीचा तूं फाजील (दोन्ही अर्थांनीं) फायदा घेतां कामा नये. नाहींतर करायला जाऊं एक, अन् व्हायचें भलतेंच. तेव्हां सर्व गोष्टीचा विचार करून मला कळीव. म्हणजे पुढच्या कार्याला तावडतोबीनें लागण्यास ठीक पडेल. कारण एकदां जुळविलेलें लग्न कोणत्याहि कारणानें लांबणीवर टाकणें मला पसंत नाहीं.

हें सर्व वाचीत असतांना तूं—मोठ्यानें नाहीं तरीपण मनांत—विचारशील "काकूंची निवड करतांना या सगळ्या गोष्टींचा विचार केला होतात का हो काका?" या तुझ्या मूक प्रश्नाला मी "नाहीं" असेंच स्पष्ट उत्तर देईन. पण खरें सांगूं? माझें आयुष्य हेंहि कादंबरीसारखें पुष्कळसें योगायोगांनींच भरलेलें आहे. माझ्या जीवनांत ज्या कित्येक घटना अकारण चांगल्या झाल्या आहेत त्यांपैकींच पत्नीची निवड हीहि एक आहे. तिची हुशारी, धीटपणा, बाणेदारपणा व ध्येयात्मकता पाहून मी आकृष्ट झालों, व एकदम हो म्हटलें. आणि समज, पुढें संसारांत कांहीं कारणांनीं अडचणी

आल्याच असत्या तर त्यांतून निभावून जाण्याची व एकंदर जीवनांत सुख व समाधान मानून घेण्याची आम्हां उभयतांची प्रथमपासून सारखीच तयारी होती–व अद्यापहि ती आहे. कारण आम्हांला येवढें माहीत आहे कीं, सुख काय किंवा दुःख काय, कोणीहि बाह्य गोष्टींवर अवलंबून नसून मनाच्या मानण्यावरच असतें. वधूची निवड करतांना सर्व प्रकारची दक्षता घेऊनहि पुढें-मागें कांहीं अशुभ अन् अनिष्ट गोष्टी घडल्याच तर तूंहि निराश व दुःखीकष्टी न होतां 'सुख मानण्यावर असतें' या माझ्या म्हणण्याची आठवण ठेव, आणि संसार समाधानानें तरून जा.

माझें हें पत्र वाचून तुला 'व्यासपीठावरून सांगितलेलें एकादें रुक्ष, चर्चात्मक व आदेशात्मक प्रवचन तर आपण ऐकत नाहीं ना' असें वाटेल हें मी जाणून आहें. उदाहरणें वगैरे देऊन तें मला घरगुतीस्वरूपाचें व मनोरंजक करतां आलें असतें. नाहीं असें नाहीं. पण वैवाहिक संबंधाच्या बऱ्या-वाईट खऱ्याखुऱ्या गोष्टी भोंवतालीं इतक्या ढळढळीत घडत आहेत कीं डोळसपणें पाहणाराला त्या सहज दिसतील; आणि म्हणून आणखी उदाहरणें घेऊन पत्र लांबविणें मला प्रशस्त वाटलें नाहीं. शिवाय कांहीं कांहीं गोष्टी अश्या असतात कीं त्या नुसत्या पाहून ओळखावयाच्या असतात. बोलून किंवा लिहून दाखविल्या कीं त्या पुष्कळ वेळां आपल्यावरच उलटतात. कोर्टापुढें चाललेल्या एका खटल्याची हकीकत नुकतीच एका वर्तमान-पत्रांत वाचली. नवऱ्याच्या एका विशिष्ट व्यसनामुळें बायकोचें व त्याचें पटेनासें होऊन तीं दोघें घटस्फोट करण्याच्या बेतांत आहेत ही गोष्ट अगदीं जगजाहीर झाली होती; पण एका भोळ्या माणसानें ती लिहून प्रसिद्ध केल्याबरोबर तीं दोघेंहि त्याच्यावर उलटलीं, आणि त्यांनीं त्याच्यावर अब्रुनुकसानीची फिर्याद ठोकली! अमक्या अमक्या कारणानें अमक्या तमक्याच्या संसाराचा नाश झाला असें नांवनिशीवारीं लिहून दाखविलें तर एकादे वेळेस वरीलप्रमाणेंच स्थिति व्हावयाची. म्हणून तसें केलें नाहीं. खरोखरचीं नांवें गाळून व त्यांचेऐवजीं नुसतीं 'अ', 'ब', 'क' अशीं अक्षरें घालून मला कायद्यांतून सुटतां आलें असतें; पण मग तें विवेचन भूमितीइतकेंच रुक्ष वाटलें असतें.

लिहिलेलें पत्र परत वाचून पाहिल्यावर हें सर्व मीं नेहमींचेंच व मामुली स्वरू-पाचेंच सांगितलें आहे असें माझें मलाच आढळून येऊन तें तुला पाठवूंच नये असेंहि वाटूं लागलें; पण मनांत पुन्हां विचार आला कीं, इतकें लिहिलेंच आहे, तेव्हां या

आतां पाठवून. पोस्टेजचा खर्च होईल येवढेंच ना? असल्याहि पत्रांत तुला कांहीं नवीन व उपयोगाचें वाटलें तर उत्तमच झालें.

आणि हें बघ, मुलींच्या शिक्षणासंबंधीं मीं जरा तुसडेपणानें लिहिलें आहे, खरें; पण तें अगदीं खरें खरें समजून गैरसमज करून घेऊं नकोस. वेळप्रसंग पडलाच तर दोन पैसे मिळवितां येतील इतकी धमक व बुद्धिमत्ता जिच्यांत आहे अशी वधू मिळाल्यास अवश्य पहा. तसेंच जिला एकादी कला वगैरे येत आहे किंवा जिला एकादा चांगला छंद आहे अशीच वधू निवड. अश्या प्रकारचा छंद असला म्हणजेच तिचा रिकामपणाचा वेळ सुखांत व आनंदांत जाईल; व त्याचेच योगानें तुझाहि आनंद व समाधान द्विगुणित होऊन एकंदर संसार सुखाचा होईल.

असो; जेवणाराला भान नसलें म्हणजे त्याचें जेवण कधीं कधीं उलटतें ना? हें पत्र लिहितांना माझेंहि तसेंच होईल कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे. तेव्हां आतां हात आंखडतोंच.

ती. दादांना पत्र वाचून दाखव, व त्या बाबतचें त्यांचें म्हणणें कळव. त्यांना माझे नमस्कार सांग. सर्व लहान मंडळीस आशीर्वाद.

तुझा

नानाकाका

## विद्यार्थि-मित्र चि. विनायकराव ठोसर यांस--



*चि. विनायकराव यांस अनेक आशीर्वाद, वि.*

प्रवासाची दगदग व लग्नघरीं स्वाभाविकतःच होणारी आबाळ अन् कुपथ्य यांचा तोळा-मासा झालेल्या प्रकृतीवर कांहीं वाईट परिणाम होतो कीं काय अशी धास्ती वाटत होती; पण तसें कांहींएक न होतां उलट तुम्हां तरुण मित्रांचा ( व एका काळच्या माझ्या विद्यार्थ्यांचा, ) सहवास माझ्या प्रकृतीला चांगलाच मानवला असें म्हणावयास हरकत नाहीं. खरोखरच तेथील माझे चार दिवस मोठ्या आनंदांत गेले. शाळेमधले खेळ, अभ्यास, वादविवाद वगैरेंच्या गोड आठवणी, थट्टा-मस्करी, जेवण-फराळ-श्लोक वगैरे वेळचा आग्रह इत्यादि गोष्टींनीं सबंध वातावरण कसें प्रेमाचें व आनंदमय झालें होतें !

वास्तविक पाहतां तुम्हां मित्रांचा व माझा संबंध-तुम्ही माझे विद्यार्थी व मीं तुमचा शिक्षक येवढ्याच नात्यानें आला, व तोहि अवघा एक-दोन वर्षेंच टिकला. पण तेवढ्या अल्प काळांतच आपणांला परस्परांसंबंधीं एक विशेष प्रकारचा आपलेपणा वाटूं लागला व तो तुम्हीं सर्वांनीं अद्याप कायम ठेवला आहे हें पाहून मोठें कौतुक वाटतें. दहा-बारा वर्षांनीं प्रथमच आपण असे एकत्र जमलों, खरें ? खरें सांगायचें म्हणजे तुम्हां सर्वांमधेंच किती तरी बदल झाला आहे; पण त्याचें भान न राहून 'नाना, तुम्ही किती म्हातारे झालां हो ?' असें तुम्ही प्रत्येकजण जेव्हां मोठ्या आश्चर्यानें मला विचारीत होतां, तेव्हां टिट्‌बिट्‌समधील तशाच प्रसंगावर काढलेल्या एका चित्राची आठवण झाली, व मनुष्यमात्राच्या या विशिष्ट वृत्तीचें हंसूं येऊं लागलें.

मी तेथून निघतांना तूं आपल्या वधूला घेऊन माझेकडे आलास व तुम्हीं दोघांनीं जुन्या पद्धतीनें अगदीं लवून मला नमस्कार केलात. त्यावर "काय विनोबा, नानांचे-कडून 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद लाटायचा आहे वाटतं सौभाग्य-वतीकरतां ? तेवढीच मदत !" असं गणू साठ्या म्हणाला. "पण विनूसारख्याला दुसऱ्यांच्या आशीर्वादाची जरूरीच काय ? अन् नाना नुसता आशीर्वाद देऊन थोडेच थांबणार आहेत ! थोड्याच दिवसांत ते त्याला उपदेशाचें एक भलें मोठें पत्र लिहितात का नाहीं, बघ ! परीक्षेच्या साध्या अभिनंदनाचे पत्रांतूनहि त्यांनीं आपणा प्रत्येकाला उपदेशाचा केवढा डोझ् पाजला होता तें आठवतें ना ?" असें त्रिंब्या मराठे चेष्टेनें म्हणाला. त्याची ती चेष्टा कांहीं खोटी नाहीं. मला उपदेश करण्याची भारी हौस आहे–नव्हे, तें एक व्यसनच जडलें आहे. पण मी तरी त्याला काय करणार ! गेलीं पंचवीस वर्षे शिक्षकाचा धंदा केला, किंवा तुमच्या भाषेत बोलायचें म्हणजे जन्मभर 'पोरं हांकलीं !' आणि दुसरें असें कीं, तुम्ही ऐकतां म्हणून तरी आम्ही उपदेश करतों. आपलं कोणी ऐकत नाहीं असं दिसून आलं असतं तर कोणता शहाणा त्या नसत्या भानगडींत पडला असता ?

खरं सांगायचं म्हणजे त्याकाळचीं आमचीं लग्नं म्हणजे बाहुलाबाहुलींचीं लग्नं ! अन् आमचे संसार म्हणजे चिमण्याकावळ्यांचे संसार ! परंतु आम्ही त्या वेळीं जरी फारसे बुद्धिवादी व कोणतीहि गोष्ट फारशी विचारपूर्वक करणारे नव्हतों तरी—आमच्यांतील उपजत शहाणपणामुळें म्हणा, किंवा ज्याला तुम्ही intuition म्हणतां तिचे जोरावर म्हणा, किंवा नशिबाच्या मेहेरबानीनें म्हणा –आमचे त्या वेळचे संसार कांहीं कमी सुखाचे झाले असें अजूनहि वाटत नाहीं. पण आतांच्या बदललेल्या काळीं त्याच गोष्टींवर भिस्त व विश्वास ठेवून, स्वतः विचार वगैरे न करतां संसार करूं असें म्हणून तुमचें चालणार नाहीं. आतां जीवन हें शास्त्र व कला होऊं लागल्यामुळें तें यशस्वी व सुखान्त करूं पाहणा-राला संसारशास्त्राचे कांहीं ठोकळ नियम व जीवनकलेचीं कांहीं ठराविक तंत्रें पाळणें अत्यन्त अगत्याचें झालें आहे. त्या नियमांचें व त्या तंत्रांचें प्रत्यक्ष ज्ञान व अनुभव मला स्वतःला फारसें नसल्यामुळें मला आत्मप्रतीतीचें असें कांहीं सांगतां येणार नाहीं; पण शास्त्रीय दृष्ट्या आयुष्य जगून शेवटीं आनंद पावलेल्या महाभागांनीं ज्या कांहीं सूचना यासंबंधीं करून ठेवल्या आहेत त्यांपैकीं कांहींची आठवण मी तुला या वेळीं करून देणार आहे. आपला गुरुशिष्य संबंध, व खरे सांगायचं म्हणजे त्रिंब्या

मराठ्याचं तें डिवचणं यांमुळेंच मी हें करायला उद्युक्त झालों आहे. तुम्हां मित्रांना माझ्या इतर सांगण्याचा आजपर्यंत जसा थोडा-फार उपयोग झाला तसा याहि सांगण्याचा तुला यापुढें झाला तर त्यांत आपणां दोघांनाहि आनंदच वाटणार आहे.

मी तेथून निघतांना तूं मला म्हणाला होतास कीं "आम्ही लौकरच बहुधा माथेरानला जाऊं." तुम्ही त्याप्रमाणें तेथें गेलां असाल तर माझें हें पत्र तुला तिकडेच रिडायरेक्ट होईल. 'आम्ही' म्हणजे तूं आणि घरची सर्व मंडळी, का तूं आणि तुझी वधू हें मला त्यावेळीं नीटसें कळलें नाहीं. सर्वजण गेलां असलां तर ठीकच; पण तुम्ही दोघेंचजण गेलां असलां तर बरीक जरा धोक्याचें व म्हणून इशारा देण्यासारखें आहे. नवपरिणित जोडपें माथेरानासारख्या ठिकाणीं कशाला जातें हें मला ऐकून तरी माहीत आहे. पूर्वीचा परिचय वाढविण्याकरितां किंवा नवीनच असल्यास तो उत्पन्न करण्याकरितां अशा ठिकाणचा प्रवास व सहवास फार उपयोगी पडतो यांत शंका नाहीं. पण परिचयाच्या भरांत बेभान होऊन पुरुष-विशेषतः तोच—फार पुढें जातो, आणि मग सुखारंभ नाटकच पुष्कळ वेळां दुःखान्त बनण्याची भीति असते. तेव्हां अशा प्रसंगीं वागतांना पुरुषानें फार जपून व 'आस्ते कदम' वागावें लागतें. सर्व गोष्टी एकाच दमांत प्राप्त करून घेण्याचा हवरटपणा त्यानें करतां कामा नये. तूं एक तारुण्याच्या भर बहरांत् असशील, पण तुझ्या पत्नीनें तारुण्याच्या प्रांतांत नुकतेंच कोठें पाऊल टाकलेलें असून तिचें शरीर व मन या बाबतींत तुझ्या-इतकें तयार व तन्मुख झालेलें नसणार हें तूं विसरतां कामा नये. स्वेच्छेनें उमलूं पाहणाऱ्या निष्पाप कळीवर अडदांड टोळानें एकदम धाड घालून तिच्या अर्धविकसित देहाशीं धसमुसळेपणा केला तर अपूर्णावस्थेंतच तिचा नाश होईल, व तिच्या परिपूर्ण विकासापासून उत्पन्न होणाऱ्या सौरभाला व सौंदर्याला तो कायमचा मुकेल.

ही सर्व भाषा रूपकात्मक व जराशी काव्यात्मक असली तरी तिचा आशय इतका स्पष्ट व उघड आहे कीं मला तें रूपक व त्यांतील काव्य प्रत्यक्षाशीं लागू करून दाखविण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. पुष्कळशा नववधूंना पुरुषांतील हा जोर व ही मस्ती पहिल्या पहिल्यांदा बिलकूलच सहन होत नाहीं. प्रथम परिचयच त्यांना इतका त्रासाचा व कष्टप्रद होतो कीं त्यांचे मनांत त्यासंबंधीं कायमचाच तिटकारा उत्पन्न होतो, आणि पुढच्या भेटींची आतुरतेनें आणि आनंदानें वाट पाहण्याऐवजीं त्या टाळण्याचाच त्या प्रयत्न करतात. अर्थातच पुरुषांमधल्या पौरुषाला हें न खपून तो हातघाईवर येतो, व मग संभोगांतील सहकारितेचें सुख नाहींसें होऊन त्याला

द्वंद्वयुद्धाचें रानटी रूप प्राप्त होतें. या बाबतींत संसार ही एक अन्योन्यसहकारी पतपेढीच आहे असें म्हणेनास! त्या पेढींतील भागीदारांची पत जोंपर्यंत कायम आहे व तिच्यामुळें मिळणारें सुख व होणाऱ्या सोयी परस्परांना सारख्याच होत आहेत तोंपर्यंतच ही पेढी नीट प्रकारें चालेल. नाहींतर दिवाळें निघून ती केव्हां डबघाईला येईल याचा नेम नाहीं. परस्परानुकूलता या तत्त्वाला व्यापारांतल्याप्रमाणें व्यक्तीच्या कौटुंबिक जीवनांतहि अतिशय महत्त्व आहे; आणि तें लक्षांत ठेवलें म्हणजे संसारांतील हा सौदा सर्वांनांच फायद्याचा व सुखकर होतो. पुष्कळश्या स्त्रियांना संभोगांतील खरा आनंद एक-दोन मुलें होईतों मुळीं मिळतच नाहीं, व तोंपर्यंत त्या या संभोगकार्यांत नुसत्या शरीरानें भाग घेत असल्या तरी त्यांत त्या मनापासून रमत नाहींत, असें कांहीं अनुभवलेल्या स्त्रियाच सांगतात. आणि हें त्यांचें म्हणणें आपणां पुरुषांना पसंत नसलें तरी तें खरें आहे असें मानूनच आपण आपला निर्वाह केला पाहिजे. पुष्कळश्या स्त्रिया या कामांत ज्या सामील होतात त्या त्यांना स्वतःला आनंद होतो म्हणून नव्हे तर पुरुष नाराज होऊं नयेत म्हणूनच होतात. अर्थातच त्यांच्या या करण्याला निष्काम व निःस्वार्थ दानाचें व उपकाराचें रूप प्राप्त होऊन विचारी व मानी पुरुषाला तसलें दान घेतांना ओशाळल्यासारखें वाटतें. अर्थात अंगीकृत कार्यांतील समान व एकच भावना नाहींशी होऊन त्या भिन्न भिन्न व परस्परविरुद्ध झाल्या म्हणजे भागीदारींतील स्वारस्य नाहींसें होतें हें काय सांगावयास पाहिजे? तेव्हां कोणत्याहि प्रकारची नवरेशाही गाजवूं नकोस येवढेंच तुला या बाबतींत सांगावयाचें आहे. 'सह नाववतु' या ऋचेंतील 'सह नौ भुनक्तु' या पदांचा आशय पूर्णांशानें लक्षांत आणून जसें वागावयास हवें तसें वाग.

बळजबरीनें केलेल्या संभोगाचे दुष्परिणाम जसे स्त्रियांच्या मनावर होतात तसेच ते त्यांच्या शरीरावरहि होतात. कोणतेंहि काम—तें मनाविरुद्ध करावें लागल्यास—करणाराला त्रासाचें व कष्टाचें व्हावयाचेंच. स्त्रियांना तर या बाबतींतले कष्ट अतिशयच जाणवतात. ते तात्पुरते व तेवढ्या काळापुरतेच होतात असें नसून त्यांचा परिणाम त्यांच्या सबंध शरीरप्रकृतीवर व कायमचा झाल्याचीं कितीतरी उदाहरणें दृष्टीस पडतात. ते कसे उद्‌भवतात, कसे वाढत जातात व शेवटीं त्यांचेमुळें सबंध शरीराचा कसा ऱ्हास होतो याचें वर्णन मी करण्याची जरूरी नाहीं.

मुलें-बाळें होण्याला अद्याप अवकाश आहे हें खरें; पण गोष्टी निघाल्याच आहेत

म्हणून त्यासंबंधींहि आतांच सांगून टाकतों. अपत्यसंभव ही घटना वायकांच्या वैवाहिक आयुष्यांतील पहिलीच नवीन व महत्त्वाची घटना असल्यामुळें तिचा त्यांचे मनावर इतका कांहीं परिणाम होतो कीं कांहीं कांहीं वेळां त्या अगदीं भांवावून व वेड्या होऊन गेल्याचें दृष्टीस पडतें. अर्भकाला त्या नाहीं नाहीं त्या नांवांनीं हाका मारतील, भलभलतं लाडकं अन् बोबडं बोलत बसतील! आपल्या पहिल्या-वहिल्या छकुल्याचें काय करूं, किती करूं व कसें करूं असें त्यांना होऊन जातें. अर्थातच या वात्सल्योन्मादाचे भरांत संसारांतील गोष्टींकडे—आणि पुष्कळ वेळां तर खुद्द नवऱ्याकडेहि—त्यांचें पूर्ण दुर्लक्ष होतें. असें झालें म्हणजे 'हें पोरटं उगीचच इतक्यांत जन्माला आलं, तें आतां माझ्या चैनीच्या आड येणार, तें आपल्या आईचं इतकं लक्ष वळकावून बसणार कीं आतां आपण तिच्या खिजगणतींतहि उरणार नाहीं' असें वाटूं लागून पुष्कळशा बापांना आपल्या पोराचा मत्सर वाटूं लागतो, व त्याच्या आईचा राग येऊं लागतो. वास्तविक पहातां अपत्यसंभव हा आईला जितका सुखद वाटतो तितकाच तो बापालाहि वाटावयास पाहिजे. नवराबायको दोघेच-दोघे एकमेकांवर किती प्रेम करणार? व त्यांतील त्यांचा आनंद किती काळ टिकणार? एकमेकांवरील प्रेमाला व कर्तव्यभावनेला केंद्रित होण्याला आणखी एक नवीन स्थान लाभल्यामुळें त्यांचा विस्तार होऊन जीवनांतील आनंदहि विस्तृत व उन्नत होतो. प्रेम म्हणजे नुसती कामुकता नसून त्यांत वात्सल्य, आस्था, सहानुभूति, प्रीति, भक्ति वगैरेंचाहि अंतर्भाव झालेला असतो. तें असें बहुंगी असल्यामुळें त्याच्या निरनिराळ्या अंगांचा किंवा पैलूंचा जितका जितका जास्त विकास होईल तितकें तितकें त्या मूळच्या प्रेमाला जास्त उच्च व उज्ज्वल स्वरूप प्राप्त होत जाईल. तेव्हां, मूल जन्माला आलं तर ही नसती ब्याद कशाला आली असं संकट पडूं न देतां तूंहि तुझ्या पत्नीप्रमाणेंच त्या नवोदित जीवाचं हसतमुखानें स्वागत कर. त्यांतच तुम्हां उभयतांच्या संयुक्त जीवनाची पूर्तता, सार्थकता, संपन्नता व सफलता सामावलेली आहे.

या मुख्य बाबींच्या अनुषंगानें व अनुरोधानें वैवाहिक जीवन सुखावह करणाऱ्या इतर किरकोळ गोष्टीहि याच वेळीं सांगून टाकतों. मुख्यतः लक्षांत ठेवायचें तें हें कीं, संसारांतील सर्व उल्हास व आनंद हे प्रेमावर उभारलेले असल्यामुळें तें मूळ प्रेम कसें संपादन करावयाचें याचा अभ्यास तूं डोळसपणें केला पाहिजेस. आमच्या लहानपणीं बॅ. बॅप्टिस्टा म्हणून राष्ट्रीय पक्षाचे एक पुढारी होते. प्रेम व विवाह यांसंबंधींच्या इंग्रज माणसाच्या कल्पना व हिंदी माणसाच्या कल्पना समजावून सांगतांना ते

म्हणाले ‘They in England marry those whom they love; while we in India love those whom we marry.’ लग्न झालें म्हणजे प्रेम आपोआपच उत्पन्न होतें असें त्यांना वाटत असावें. पण मला तरी तसें वाटत नाहीं; व तूंहि तशी कल्पना करून घेऊं नकोस. पशुपक्ष्यांत दिसून येणाऱ्या नैसर्गिक प्रेमावर किंवा पुराणांतरीं वर्णन केलेल्या रामजानकींच्या दिव्य प्रेमावर तुला विसंबून रहातां कामा नये. स्फूर्तीप्रमाणेंच प्रेम हेंहि निसर्गसिद्ध किंवा दैवायत्त नसून माणसाला तें बुद्धिपुरःसर व कष्टपूर्वक कमवावें लागतें—अभ्यासानें संपादावें लागतें. आमचीं लग्नें अगदीं लहानपणींच–म्हणजे आमच्या शारीरिक व मानसिक संवयी आणि आवडी-निवडी कायमच्या बनण्यापूर्वीच–झालीं असल्यामुळें आम्ही त्या एकमेकांना जुळतील अशा रीतीनें बदलूं शकलों, आणि एकमेकांना वागवून व नांदवून घेऊं शकलों. बाळपणींच्या लग्नांतील त्या गोड व रम्य अज्ञानाचा फायदा तुम्हाला आतां मिळूं शकणार नाहीं. तुमचीं आतांचीं लग्नें प्रौढावस्थेंत होऊं लागल्यामुळें तुम्हां वधूवरांच्या आवडी-निवडी, आशा-आकांक्षा, आचार-विचार, प्रकार-पद्धति वगैरे सर्व कांहीं लग्नापूर्वींच तयार झालेलें व कायम बनलेलें असणार; आणि अर्थातच नवीन व प्रतिकूल परिस्थितीशीं एकजीव होण्याला लागणारा लवचीकपणा व मिळतें घेण्याचा गुण तुमच्या ठिकाणीं नसणार; व यामुळेंच संसार यशस्वी रीतीनें पार पाडणें पूर्वींइतकें सहज व सुलभ राहिलें नाहीं. हें जाणूनच आधुनिक काळांतल्या अनुभविक लोकांनीं व मानसशास्त्रज्ञांनीं यासंबंधीं ज्या कांहीं गुणकारी सूचना (Tips) देऊन ठेवल्या आहेत त्या तुझ्यासारख्या होतकरू गृहस्थांना फायदेशीर होतील.

प्रेम संपादन करण्याच्या कलेंतील पहिली साधी गोष्ट ही आहे कीं वैवाहिक जीवनाचे पहिले कांहीं दिवस तरी पतीनें आपल्या पत्नीच्या रूपाचें तिच्या देखत कौतुक करावें. तें वयच असें असतें कीं प्रत्यक्ष गर्दभीला सुद्धां आपण मोठ्या अप्सरा आहों असें वाटत असतें ! मग पत्नी थोडीफार सुरूप असल्यावर तर बोलावयासच नको ! दुसऱ्या कोणी नाहीं तरी निदान आपल्या पतीनें तरी आपल्या सौंदर्याची वाखाणणी करावी अशी तिची फार इच्छा असते, व ही वाखणणी तो जितकी जितकी जास्त करतो तितकी तितकी ती जास्त खुशालते व सुखावते. ही वाखाणणी सर्वस्वीं खरी असावी लागते, किंवा तिची सत्यता व न्याय्यता दुसऱ्यांना पटावीच लागते असें मुळींच नाहीं. पत्नीचें तें वयच असें भावडेपणाचें असतें कीं, पतीनें तिच्या

रूपाला कोणतेंहि विशेषण लावलें तरी तें सहज संपादून जातें! 'बोल ग वाचे, तुझें काय वेचे?' हें नामसंकीर्तनाचें धोरण या बाबतींत चांगलें लागू पडतें. तेव्हां प्रेमसंवर्धनाचें उद्दिष्ट साधण्यासाठीं स्तुतिपर शब्दांचा उपयोग करतांना तरुण पतीनें मागेंपुढें पाहण्याचें कांहींच कारण नाहीं.

पतीनें पत्नीच्या सौंदर्याचा स्वतः आनंद मानणें व त्याची तिलाहि जाणीव देणें हें महत्त्वाचें असलें तरी, पत्नीचें हें सौंदर्य कायमचें नाहीं, तें इतर नश्वर गोष्टीं-प्रमाणें केव्हां तरी नाहींसें होणार हीहि जाणीव त्यानें स्वतःचे मनाशीं बाळगिली पाहिजे. सर्व प्रकारच्या चैनीचा व चलतीचा काळ चालू आहे, सांसारिक जीवनाच्या सुरुवातीची फक्त सुखाचीच बाजू दिसत आहे तोंपर्यन्तच स्त्रियांचें हें तारुण्य, सौंदर्य, उत्साह वगैरे टिकून राहतें. पण जीवन हें नुसत्या सुखाचें व निर्भेळ आनं-दाचें बनलेलें नसतें. त्यांत त्रासाचे, दुःखाचे, चिंतेचे, निराशेचे, निरुत्साहाचे प्रसंगहि अधूनमधून येत जाणारच; आणि मग अंगाअंगांतून वहरणारें त्यांचें तारुण्य व सौंदर्य ओहटूं लागणारच. विशेषतः दोन-तीन मुलें झाल्यावर जेव्हां त्या शरीरानें निःसत्त्व व मनानें विरागी अन् अरसिक बनतात तेव्हां तर पहिल्यांदा अप्सरेसारख्या सुंदर भासणाऱ्या स्त्रियाच नवऱ्यांना हिडिंबेसारख्या हिडिस दिसूं लागतात. अति-शयोक्ति करून सांगण्यांत माझा उद्देश येवढाच आहे कीं स्त्रियांच्या रूपांत निसर्गतः होणारा हा बदल पुरुषांनीं वेळींच लक्षांत आणून त्यांनीं स्वतः त्यांच्या बाह्य सौंदर्या-वर फारसें विसंबून न राहतां त्यांच्यांतील गुणांवर लुब्ध होण्यास स्वतःचे मनाला शिकवावें.

जी गोष्ट तिच्या रूपवर्णनासंबंधीं तीच तिचा पोषाख, बोलणं, चालणं, काम करणं इत्यादि लहानसान गोष्टींतील गुणांसंबंधीं. आपल्या पतीचें व मुलाबाळांचें चांगलें करून एकंदर प्रपंच सुखाचा करणें हें ती आपल्या जीविताचें इतिकर्तव्य मानते, व तें उत्तम प्रकारें पार पाडण्यासाठीं तिची सारी धडपड चाललेली असते. ती जीं हजारों लहानसान कामें कष्टपूर्वक करीत असते तीं जीवनाला अतिशय महत्त्वाचीं आहेत अशी तिची स्वतःची प्रामाणिक समजूत असून आपल्या पतीनेंहि तीं तितकींच महत्त्वाचीं मानावींत अशी तिची अपेक्षा असते. पतीनें पत्नीच्या कामाचें व कष्टाचें चीज व कौतुक करून तिची ही अपेक्षा पुरी करण्याचें तर बाजूलाच राहतें. उलट 'हें कशाला? तें कशाला? खुळ्यासारखी उगीचच मर मर मरतेस,' अशासारखे अनुत्साहाचे उदासीनतेचे उद्गार जेव्हां तो काढतो तेव्हां पत्नीला अति-

शय वाईट वाटतें, आणि तिचा सर्व उत्साह व उल्हास मावळून जाऊन ती दुःखी कष्टी वनते. माणूस जीं राशीवारीं कामें करतो तीं त्याचें कोणीं तरी कौतुक करावें याच सुप्त सदिच्छेनें करतो ना ? घरच्या घरीं—आपल्याच माणसांनीं तें केलें तर उत्तमच. पण तसें नच झाल्यास, तो तें दुसऱ्या कोणाकडूनहि मिळवूं पाहतो. पत्नीचेंहि तसेंच होतें. आपल्या पतीला आपल्या कामाबद्दल व कष्टाबद्दल कांहींच वाटत नाहीं असें तिच्या निदर्शनास आलें म्हणजे तिचें आसावलेलें मन बाहेरचें जें कोणीं आपलें कौतुक करून आपली भूक भागवील त्याचेकडे ओढलें जातें, व मग त्याचा शेवट पतिपत्नींमध्यें परस्पर अविश्वास व असमाधान उत्पन्न होण्यांत होतो. माझ्या माहितींतल्या एका जोडप्याचें असेंच झालें. नवरा एरवीं अतिशय चांगला. बायकोहि मोठी सुग्रण. पण तिच्या रूपगुणांचें नवऱ्याला कांहींच वाटत नसल्यामुळें, किंवा वाटत असूनहि तो तसें स्पष्टपणें बोलून दाखवीत नसल्यामुळें, बायको नेहमीं असंतुष्ट व असमाधानी असायची. हें त्याच्या लक्षांत लवकरच आलें म्हणून ठीक झालें. नाहीं तर हें तिचें असमाधान ओळखून एकाद्या धूर्तानें जर तिचें मुक्तकंठानें कौतुक केलें असतें, व या बाबतींतली तिची अतृप्त इच्छा तृप्त केली असती तर, माझी खात्री आहे कीं, तिचें भुकेलेलें मन त्याच्याकडे ओढलें जाऊन पुढच्या सर्व अनर्थ-परंपरेला सुरुवात झाली असती. पतिपत्नींमधील परस्पर विश्वासांत व एकतान-तेंत अशा प्रकारची एकादीहि बारीक फट राहिली म्हणजे तिच्यांतून ओटीवरल्या अयस्थाला माजघरांत शिरकाव करून घ्यायला सोपें जाऊन एकंदर गृहसौख्याला कीड लागते. तेव्हां पत्नीच्या तुष्टीकरितां व जीवनानंदाच्या पुष्टीकरितां पतीनें पत्नीचें योग्य तें कौतुक करून व उत्तेजन देऊन तिला सदैव सुखी ठेवणें अगत्याचें आहे.

पत्नींतील सद्गुणांचें कौतुक करण्याइतकेंच तिच्यांतील दुर्गुणांकडे दुर्लक्ष करणें हेंहि जरूरीचें आहे. भात कच्चा राहिला असला तरी तें न सांगतां ' भाकरी पक्की भाजली आहे,' किंवा चकल्या कडक झाल्या असल्या तरी त्याच्याबद्दल कुरकुर न करतां 'त्यांवरील लोणी किती मऊ आहे' असें कांहींतरी म्हणून वेळ मारून ने. झालेल्या चुका व राहिलेले दोष तिला कळत नसतात असें नाहीं. मग त्याची वाच्यता करून तिला जास्तच हिणवण्यांत काय शहाणपणा आहे ? सारांश तिच्यां-तील गुणांचे गोड सूर अधूनमधूनहि न काढतां तिच्यांतील दोषांचा ढोलच तूं सारखा बडवीत राहिलास तर संसाराच्या सुरेल गाण्याला रडगाण्याचें भेसूर रूप प्राप्त झाल्यावांचून राहणार नाहीं.

पत्नीच्या प्रापंचिक कार्यासंबंधीं औदासीन्य न दाखवितां त्यांत तूं उत्साहानें व ममत्वानें भाग घेणें हें जसें जरूरीचें आहे, तसेंच तुझ्या कामांत तिला भाग घेण्यास लावून तिची सहानुभूति संपादन करणें जरूरीचें आहे. 'माझ्या बाहेरच्या उद्योग-धंद्यांत तुला काय कळणार ? तुझें शहाणपण फक्त घरांत—चुलीपुढें !' असें म्हणून पुरुष पुष्कळ वेळां बायकांना झिडकारतात, व त्यांच्या शहाणपणाचा व कर्तृत्वाचा उपयोग आपल्या कामांत करून घेत नाहींत. वास्तविक पाहतां कुटुंबांतील बहुतेक कामें स्त्रीपुरुषांनीं मिळून करणें हा सृष्टीचा नियम असून मानवी समाजाच्या खालच्या म्हणून मानल्या गेलेल्या थरांतूनहि तोच नियम सामान्यतः पाळला जातो. शेतकरी, मजूर, कोष्टी-लोहार-चांभार वगैरे शिल्पीधंदा करणारे लोक, वाणसवदा-भाजीपाला वगैरे किरकोळ पदार्थ विकणारे दुकानदार—माळी इत्यादि लोकांना आपआपल्या काम-धंद्यांत आपआपल्या बायकांची कितीतरी मदत होते. नाहीं म्हणायला, कारकून-शिक्षक-वकील-डॉक्टर वगैरेंना मात्र त्यांची मदत तितकीशी होत नाहीं. पण त्यांनींहि आपआपल्या पत्नींची निवड पहिल्यांदांच तशा धोरणानें केली, व पुढें त्यांना योग्य तें शिक्षण दिलें तर रोजचीं गृहकृत्यें संभाळूनहि स्त्रिया आपल्या पतींना मदत करूं शकतात. शास्त्रीय उपकरणें विकणारे माझ्या माहितीचे एक गृहस्थ आहेत. आपल्या धंद्यांतली माहिती देऊन—देऊन त्यांनीं आपल्या पत्नीला त्यांत इतकें तरबेज केलें आहे कीं, ते सत्याग्रहांत गेले असतांना तिनें तो धंदा उत्तम प्रकारें चालविला होता. आमच्या वसंतराव कुलकर्ण्यांची बायकोहि तशीच. विम्याच्या उपयुक्ततेचा प्रचार बायकांत करून व स्त्रीग्राहक मिळवून ती वसंतरावांना त्यांच्या धंद्यांत कितीतरी मदत करीत आहे. पुरुषाची इच्छा असेल व स्त्रीच्या कर्तृत्वावर त्याचा विश्वास असेल तर स्त्रीच्या मदतीचा त्याला स्वतःला फायदा करून घेतां येईल व तिलाहि 'आपण आपल्या 'माणसां'ना त्यांच्या कामांत मदत करूं शकतों' अशा गोड जाणिवेचें समाधान देतां येईल.

जी गोष्ट सर्वसामान्य पुरुषांची तीच असामान्य पुरुषांची. ते कितीहि मोठे नाणावलेले राजकारणी असोत, विख्यात संशोधक असोत, नाहीं तर कर्तृत्ववान कारखानदार असोत; त्यांचें काम कितीहि मोठें व महत्त्वाचें असो—त्यांत त्यांच्या पत्नींना कांहीं ना कांहीं भाग घेतां येणें अगदीं शक्य आहे. प्रत्यक्ष व सक्रिय भाग घेतां आला नाहीं तरी निदान पुरुषांचें सहानुभूतिपूर्वक कौतुक करून त्यांना उत्तेजन देणें येवढें काम तरी त्या खात्रीनें करतील. बायकांच्या या प्रत्यक्षा-

प्रत्यक्ष मदतीचा पुरुषांना नेहमींच उपयोग होत असल्यामुळें थोर थोर व्यक्तींनींहि वायकांच्या या ऋणाचा मुक्तकंठानें निर्देश केला आहे. यासंबंधींचे पौराणिक किंवा ऐतिहासिक दाखले न देतां हाताशीं असलेलें एक आधुनिक उदाहरणच देतों, म्हणजे झालें. माझ्यासमोर टेबलावर Character & the conduct of life हा मोठा ग्रंथ पडला आहे. त्याच्या कर्त्यानें–सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ William McDugall यानें–तो ग्रंथ आपल्या पत्नीला अर्पण केला असून तो अर्पणपत्रिकेंत म्हणतो—" To my wife, to whose intuitive insight I owe whatever understanding of human nature I have acquired. " हे उद्गार किती प्रेमाचे व कळवळ्याचे आहेत, पाहिलेस ? पुरुषानें कितीहि ज्ञान व सामर्थ्य मिळविलें असलें, तरी त्याला पत्नीच्या उपजत शहाणपणाची किंवा तिच्या 'अशिक्षित पटुत्वा' ची जोड मिळाल्यावांचून त्याच्या ज्ञानाला पूर्तता येत नाहीं, किंवा त्याच्या सामर्थ्याला पूर्णता प्राप्त होत नाहीं. पुरुषाचें सारें कर्तृत्व हें स्त्रीच्या स्फूर्तीवर व सहानुभूतीवर अवलंबून असतें. तेव्हां पत्नीच्या या शहाणपणाचा, सहानुभूतीचा व स्फूर्तीचा स्वतःच्या कामीं उपयोग करून घेण्यास आपण पुरुषांनीं चुकतां कामा नये.

आणखी असें कीं ' आपण नुसत्या कोणीतरी मोलकरीण किंवा स्वयंपाकीण आहों असें नसून घरांत आपल्याला यापेक्षां जास्त मानाचें स्थान आहे, आपला पति आपल्याला स्वतःच्या कामांतहि महत्त्वाचा भागीदार मानतो, मित्राप्रमाणें आपला सल्ला घेतो ' अश्या जाणीवेनें स्त्रियांचा स्वाभिमान दुणावतो व त्या जास्त जास्त कर्तृत्ववान होतात. तेव्हां दोघांच्याहि फायद्याच्या व हिताच्या दृष्टीनें तूं आपल्या पत्नीला स्वतःची खरीखुरी अर्धांगी करणें जरूरीचें आहे.

केवळ मोठ्या व महत्त्वाच्या वावतींतच नव्हे, तर लहानसान व साध्यासुध्या वावतींतहि पतीनें पत्नीची सल्लामसलत घेण्यास चुकूं नये. याचेहि पुढें जाऊन, मी असें सुचवीन कीं आपलें तिच्यावांचून अगदीं अडलें आहे असेंहि वेळप्रसंगीं नवऱ्यानें दाखविण्यास हरकत नाहीं. कपड्याच्या घड्या घालणें, चहा करणें अश्यासारख्या गोष्टी नवऱ्याला साधत नाहींत, व त्याला त्या वावतींत आपल्यावर अवलंबून राहावें लागतें असें पाहून, वर वर जरी तिनें वाईट वाटल्याचें दाखविलें तरी ' हा माझ्या कर्तृत्वाचा एक पुरावाच आहे ' असें वाटून तिळा मनांतून एक प्रकारचा आनंदच होत असतो. मुलाबाळांचें करण्यांत जें सुख आईला होत असतें

तेंच सुख सर्वसामान्य पत्नीला अश्या प्रसंगांनीं होत असतें. मात्र ही परावलंबी वृत्ति पतीनें नेहमींच व सर्वच बाबतींत दाखवितां कामा नये; नाहीं तर पत्नीला स्वतःच्या कर्तृत्वाचा अभिमान वाटण्याऐवजीं पतीच्या बावळटपणाचाच तिटकारा वाटूं लागेल. स्वावलंबन हा सर्वसामान्यतः एक महत्त्वाचा गुण मानला जात असला तरी प्रेमळ व्यक्तींमधील परस्परावलंबनालाहि प्रेमसंवर्धनाच्या दृष्टीनें महत्त्व आहे. त्यानें प्रेमाला पुष्कळ वेळां वात्सल्याचें स्वरूप प्राप्त होऊन तें जास्त उन्नत होत जातें.

कांहीं कांहीं बायका मुळांतच अडाणी असल्यामुळें नवऱ्याच्या कांहीं कांहीं गोष्टी त्यांना कळतच नाहींत. पण कांहीं कांहींना मात्र सगळें कळत असूनहि त्या आडमुठेपणा व हट्टीपणा करतात. स्त्री अडाणीच असेल तर तिला गोडीगुलाबीनें सांगून-सवरून सुधारतां येईल. पण ती जर आडमुठेपणानेंच वागत असेल, आपल्या कर्तव्यांत जाणूनबुजूनच हेळसांड करीत असेल तर मात्र नुसतें सांगून–शिकवून भागत नाहीं. शिकवणें, सुचवणें वगैरेंसारख्या नाजूक उपायांचा कांहीं गुण येत नाहीं असें दिसल्यावर रागें भरणें, कावणें, कातवणें, घालून–पाडून किंवा कुसकें–नासकें बोलणें, शिवीगाळी करणें व प्रसंगीं अंगावर हातहि टाकणें अशा प्रकारचे चढत्या श्रेणीचे जालीम उपाय योजण्याची पुष्कळश्या पतिपुंगवांना बुद्धि होते! पुरुषानें या थराला गोष्टी नेल्या म्हणजे स्त्रियांतील सुप्त सैतान एकदम जागृत होऊन त्या पुरुषांशीं तोंडातोंडी व हस्ताहस्ती करायला मागेंपुढें पाहात नाहींत. हें मी कांहींतरी सांगत नसून कालच आमच्या समोरच्या चाळींत असा सीन प्रत्यक्ष पाहिला. स्त्रिया जात्या अबल व अबोल असल्या तरी प्रसंगच आला तर आपल्या हातातोंडाच्या सामर्थ्याची चुणूक दाखविण्यास त्या कधींही कमी करणार नाहींत. तेव्हां पुरुषांनीं अशा बाबतींत स्त्रियांची शोभा करूं नये व स्वतःचीहि करून घेऊं नये. हे बाह्य उपाय लागूं पडत नाहींत याचें कारण असें आहे कीं, आडमुठेपणा किंवा आडदांडपणा हा मनांतील गांठीचा किंवा तेढीचा निदर्शक असून तो घालविण्यासाठीं मनांतील या गांठी व तेढी अगोदर हळुवार हातानें सैल करून उलगडल्या पाहिजेत. अशा प्रसंगीं अगदीं स्पष्ट–स्पष्ट, आडपडदा न ठेवतां पण शांतपणें, स्वतःच्या मनांतील सर्व बोलून टाकणें व पत्नीच्या मनांतील सर्व वदवून घेणें जरूरीचें आहे. आपलेंच कांहींतरी चुकलेलें आहे असें स्वतःचेंच मन सांगत असलें म्हणजे पुरुष असा उलगडा करून घ्यायला तयार न होतां बायकोच्या मनांतील गांठ सोडविण्याची चालढकल करतो, व डोळ्यावर कातडें ओढून आला दिवस घालवीत असतो.

बायकांच्या मनांत आढी वसण्यासरख्या कितीतरी गोष्टी पुरुष पुष्कळ वेळां करतात यांत शंका नाहीं. उदाहरणार्थ एकच गोष्ट घे नाः—परस्त्रीच्या सहवासांत येण्याचा प्रयत्न करणें, तिच्याशीं बोलण्याचालण्याचा प्रसंग मुद्दामच आणून तिच्याशीं सलगी करणें, तिच्या पुढें पुढें करून तिचें मन आकर्षित करण्याची संधि साधणें वगैरे कृति पुरुषाचे हातून न कळत व स्त्रीदाक्षिण्याच्या नांवाखालीं होत असतात. त्याला स्वतःला या कृति निरर्थक व ' उगीच ' अशा वाटत असल्या तरी त्याच्या बायकोला त्यांत कांहीं विशेष अर्थ दिसून येतो, व त्याचें वैषम्य वाटून ती नवऱ्याला ऐकूं येईल अश्या रीतीनें धुसफुसते तरी, किंवा ( तितकाहि धीटपणा नसल्यास ) मनांतल्या मनांत चिडते व कुढते तरी. उपवधू पुरुषानें वधूसंशोधन व प्रेम-संवर्धन यांचे निमित्तानें असले कांहीं प्रकार केले तर ते क्षम्य ठरतात; कारण त्यांची परिणती पुढें विवाहांत होत असते. पण विवाहित पुरुषहि परस्त्रीशीं असला चवळपणा करील तर त्याच्या पत्नीला तें मोठ्या धोक्याचें वाटतें, व मग तिच्या धुसफुशीला, चडफडीला व मानसिक तेढीला सुरुवात होते.

दुसऱ्याहि एका गोष्टीचें शल्य बायकांच्या मनाला सारखें टोंचत असतें. आणि तें म्हणजे हें कीं, आपल्याला पैशा–दोन–पैशाकरितांहि नवऱ्याचे तोंडाकडे पाहावें लागतें. ' नवऱ्याकरितां अन् पोरांबाळांकरितां राब राब राबून कष्ट करायचे आम्हीं, मालकिणीच्या नात्यानें घरांतलीं सगळीं कामें करायचीं आम्हीं, आणि घरांतल्या या आमच्या कामांवर व कष्टांवर बाहेर पैसे मिळवायचे आणि स्वतःचे म्हणून बळकवायचे मात्र पुरुषांनीं हा न्याय कुठला ! ' असें त्यांना वाटत असतें. या त्यांच्या वाटण्यांत फारशी चूक आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. किसान, कामगार वगैरेंचीं गाऱ्हाणीं ऐकून जर आपण मालकशाही, भांडवलशाही वगैरे नाहींश्या झाल्या पाहिजेत असें म्हणतों, तर स्त्रियांनींहि घरांतील पुरुषशाहीला विरोध केला तर त्यांत त्यांचें काय चुकलें ? 'बायकांच्या घरांतल्या कामाचें मोल करतां यावयाचें नाहीं, पुरुष देऊन देऊन त्यांना काय देणार ! ' हें म्हणणें वास्तविक असमर्थतेच्या व कृतज्ञतेच्या खऱ्या जाणीवेनें म्हणावयाचें असतें. पण त्याच्या वाच्यार्थाचा फायदा घेऊन पुरुष निर्लज्ज-पणानें व लुच्चेपणानें जेव्हां त्यांना कांहींच देत नाहींत तेव्हां स्त्रियांना संताप आल्या-वांचून कसा राहील ? पैशावरील मत्ता तीच खरी सत्ता अशी विचारसरणी जिकडे तिकडे ऐकूं येत असतां बायकानांच मात्र निष्कामकर्माचा उपदेश करणें निव्वळ ढोंगीपणाचें अन् आप्‌मतलबाचें नाहीं काय ? जुन्या बायकांना पैशाची मातबरी

तितकीशी वाटत नसे. घरांतील धनधान्यादि समृद्धि हीच कायती संपत्ति; आणि त्याची देखरेख व व्यवहार हीं जोंवर आपल्या हातांत आहेत तोंवर सर्व आर्थिक व्यवहार आपणच करीत आहों असें त्यांना वाटत असे. आतां किंमत मालाला राहिली नसून पैशाला प्राप्त झाली आहे. आणि म्हणून नुसत्या धान्याच्या कोठाराच्या किंवा दूधदुभत्याच्या कपाटाच्या किल्ल्या हातांत असल्या, तरी पैशाच्या तिजोरीच्या किल्ल्या हस्तगत होईतोंपर्यंत मालकिणीच्या हक्काचें खरें सुखसमाधान स्त्रियांना मिळणें शक्य नाहीं. याकरितां नवऱ्याच्या कमाईंत आपण समभागी आहों, योग्य बावतींत त्याचा विनियोग करायला आपल्याला त्याच्या इतकीच मोकळीक आहे असा विश्वास स्त्रीचे मनांत उत्पन्न झाला म्हणजे आपोआपच आर्थिक परावलंबनाची लाचारी तिला वाटणार नाहीं, किंवा आर्थिक स्वातंत्र्याची हाकाटी करण्याचेंहि तिच्या मनांत येणार नाहीं.

अपराध कोणाचाहि असो, व तेढीचें कारण कोणतेंहि असो-पत्नीच्या मनांतील ती तेढ तशीच जागच्या जागीं वाढूं देणें मात्र शहाणपणाचें होणार नाहीं. मनाचा हिय्या करून व मनमोकळेपणानें असेल नसेल तें बोलून टाकून व त्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून प्रेमाचा तुटलेला धागा पुरुषानें पुन्हां सांधून घेतला पाहिजे. मोकळेपणानें मागितलेली क्षमा सहसा वाया जात नाहीं.

बरें; पुरुषाचें सर्व कांहीं बरोबर असून बायकोचेंच कांहीं चुकत असलें तरीसुद्धां निभावून नेण्याची शेवटची जबाबदारी त्याचेवरच पडत नाहीं का ? दोघांत जास्त शक्तिमान, जास्त सुशिक्षित, जास्त अनुभवी व जास्त सुसंस्कृत सामान्यतः पुरुषच असल्यामुळें, या प्रत्येक बावतींत आपल्याहून कमी असलेल्या आपल्या पत्नीला सुधारून त्यानेंच तिला योग्य मार्गावर आणावयास नको का ? ज्येष्ठपणा तर पाहिजे; पण त्याबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्या मात्र नकोत असें म्हणून कसें चालेल ?

आपल्याकडे अद्याप तरी येवढ्यातेवढ्यावरून पतिपत्नींच्या मनांत कायमच्या तेढी पडून त्यांचें पर्यवसान घटस्फोटांत झाल्याचें फारसें दृष्टीस पडत नाहीं हें चांगलें आहे. [ अमेरिकेंत तर रेडिओ लावण्या-न-लावण्यावरूनहि पतिपत्नींनीं घटस्फोट केले आहेत ! ] पण कलियुगांत वावरणाऱ्या आपण सत्ययुगांतली परिस्थितीच नेहमीं राहील अशी अपेक्षा कां करावी ? वदललेल्या परिस्थितीला अनुसरून कांहीं कारणांनीं पतिपत्नींच्या मनांत कायमच्या निर्गाठी पडल्याच व बाकीचे

सर्व उपाय खुंटले, तर घटस्फोट करायलाहि त्यांची तयारी असली पाहिजे. दोघांनीं शरिरानें एकत्र, पण मनांनीं विभक्त बनून सुखी संसाराचें नुसतें ढोंग करण्यांत काय हंशील आहे ? खुशाल घटस्फोट करून दोघांनींहि सुखी व्हावें हें उत्तम.

लिहिण्याचे ओघांत मी किती वाहवत गेलों, पाहिलेंस ? वास्तविक पहातां तुमचा हा प्रेमाच्या पहिल्या बहराचा प्रसंग. या वेळीं निसर्गाला साक्ष ठेवून तुम्ही प्रेमाचें आनंदगीत आलापीत व दऱ्याखोऱ्यांतून आलेले त्याचे आनंदी पडसाद ऐकत बसलेले असाल. आणि खरें बोलायचें तर आपणहि कांहीं संवादी सूर काढून तुमच्या आनंदरागाचा परिपोष करावा व तुम्हाला उत्तेजन द्यावें या हेतूनेंच मी हें पत्र लिहावयास बसलों. पण घसरत घसरत शेवटीं कुठें आलों ?—तर घटस्फोटा-कडे ! ' अनौचित्याची अन् अरसिकपणाची यांनीं कमाल केली ' असेंच तुला वाटेल, नाहीं ? पण, बाबारे ! चालू असलेल्या चांगल्या गोष्टींचा आनंद उपभोगीत असतांनाच त्यांना दृष्ट लागून त्यांतूनच पुढें कांहीं भलतें सलतें तर निष्पन्न होणार नाहींना अशी अशुभ भीतीहि अश्या प्रसंगीं माझ्या मनाला वाटत असते. आणि ' रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्, पर्युत्सुको भवति यत् सुखितोऽपि जन्तुः ' या चरणांत वर्णिलेल्या प्रमाणें माझी मनःस्थिति होते. मनाच्या या सामान्य धर्माशिवाय तुम्हांसंबंधीं असें अशुभ मनांत येण्याचें दुसरें एक कारण आहे, व तें म्हणजे ' अतिस्नेहः पापशंकी. '

आतां शेवटीं माझी एक पेटंट् सूचना करून पुरें करतों. कितीहि खबरदारी घेतली तरी वैवाहिक जीवनांत कधीं कधीं कांहीं बिनतोड प्रसंग उद्भवतातच. आणि अश्या प्रसंगांवर विनोदवृत्तीसारखें दुसरें रामबाण औषध नाहीं. "कितीहि प्रयत्न करा, परिस्थितीच अशी चमत्कारिक व पेंचाची येते कीं, मनुष्याचें त्यावेळीं कांहीं चालत नाहीं. तो मारे रुसतो, रागावतो, चडफडतो, अगदीं डोकें फोडून घेतो ! पण सगळं व्यर्थ ! तेव्हां परिस्थितीची भीषणता व मानवी शक्तीची दुर्बलता लक्षांत घेऊन त्यानें असले प्रसंग विनोदावारी नेणें हें चांगलें. ' लीलया भवजलं तरणीयम् ' असें आमचे वामनराव जोशी म्हणत असतात. त्याचा अवलंब करून माणसानें आला प्रसंग न खचतां निभावून नेला म्हणजे त्याला कायमचें सुख लाभेल.

तुम्हां उभयतांनाहि तें तसेंच लाधो असें इच्छिणारा तुझा

गुरु–मित्र

## चि. सौ. यमूस—



*अनेक आशीर्वाद, वि.*

सुखरूप पोंचल्याचें पत्र येथें आल्यावरोबर लिहावयाचें. पण आल्यापासूनच चार–पांच दिवस अजीर्णानें अंथरूण धरलें होतें. उतारवयांत पचनशक्ति कमी होते हें तर खरेंच, पण तुमच्या तेथल्या पाहुणचाराचीहि भर त्यांत पडली असली पाहिजे. चांगल्या म्हणून केलेल्या गोष्टींचाहि केव्हां केव्हां कसा वाईट परिणाम होतो, पाहिलेंस ? आजारानें अगोदरच हळवें झालेलें मन आजारीपणाच्या एकान्तांत जास्तच विचारशील बनतें, व एरवीं बऱ्या चाललेल्या गोष्टींसंबंधानेंहि नाहीं नाहीं त्या कल्पना व अवास्तव शंका माणसाचे मनांत उद्भवूं लागतात. माझेंहि तुझ्यासंबंधीं असेंच झालें. तुझ्या घरच्या दोन-तीन दिवसांच्या मुक्कामांत ज्या कांहीं थोड्या गोष्टी माझ्या नजरेस आल्या त्या तर जास्तच शंकास्पद वाटल्यामुळें आणि त्यांना शेजारच्या गोगट्यांच्या मथूकडूनहि दुजोरा मिळाल्यामुळें आजारीपणाच्या विचारतंद्रींत भर पडली, व तुझ्या भविष्यत्कालाबद्दल जास्तच भीति वाटूं लागली. कदाचित् ही भीति काल्पनिक असेल, अन् ती तशीच ठरो !— पण वाटली व अजूनहि वाटते येवढें खरें; व ती तुझ्याशीं मोकळेपणानें बोलून टाकावी—त्याशिवाय बरें वाटणार नाहीं—असें वाटल्यामुळें आज मी तसें करीत आहें. पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टी खरोखरच तश्या असतील तर तुझ्यांत वेळींच सुधारणा व्हावी, नसल्यास माझें कर्तव्य मीं केलें असें समाधान वाटावें म्हणूनच मी हें लिहीत आहें. तथ्य घ्यावें, बाकीचें सोडून द्यावें.

तुमच्या उभयतांच्या परस्परांसंबंधींच्या वागणुकीकडे जरा बारकाईनें पाहिलें

म्हणजे पाहणाराच्या नजरेला असें चटकन् दिसून येतें कीं, तुमच्या जीवनांत कांहीं तरी बिघाड उत्पन्न झाला आहे, कांहींतरी न्यून आहे, कश्यासंबंधींची तरी तेढ आहे, व हें सर्व तुम्ही एकमेकांपासून व तिऱ्हाइतापासून लपवूं पाहात आहां. तुमचें दोघांचें नेमकें कामापुरतेंच बोलणें, जरूर त्या गोष्टी आनंद म्हणून नव्हे तर केवळ कर्तव्य म्हणूनच करणें, कोणत्याहि गोष्टीसंबंधीं बोलणें निघालें असतांना त्या बोलण्याचें घरगुती साध्या संभाषणाचें किंवा प्रेमळ हितगुजाचें रूप नाहींसें होऊन त्याचें तर्कट वादविवादांत रूपान्तर होणें, व मग लोकांत वाच्यता व बभ्रा व्हायला नको म्हणून कोणींतरी मुद्दामच पड खाणें वगैरे गोष्टी माझ्यासारख्या माणसाला जरा चमत्कारिकच वाटतात. घर म्हणजे कांहीं एकादी सार्वजनिक सभा नाहीं, व त्यांतलें बोलणें म्हणजे कांहीं प्रतिपक्षावर मात करण्याकरितां केलेला वाद अन् कोटिक्रम नाहीं.

मी तुमचेकडे आल्याबरोबर तुला व यशवंतरावांना मोठा आनंद झाला; व मलाहि फार बरें वाटलें. लग्नाच्या वेळच्या धांदलींत जाऊन घाईनेंच परत निघून येण्यापेक्षां हिनें स्वतःचा संसार नीटपणें थाटल्यावर आपण आलों हें चांगलें केलें, व आपल्याला आतां बऱ्याच सवडीनें व निर्बंधपणें राहतां येईल अशा समाधानांत मी होतों. चहाचे दोन पेले आणून तूं आम्हां दोघांपुढें ठेवलेस. तूं आपल्याला आणला नाहींस असें पाहून यशवंतरावांनीं आपले पुढचा कप तुझेपुढें केला. 'माझा आतांच झाला' असें जराश्या झटक्यांत म्हणून तूं त्यांचा त्यांना परत केलास. 'मग माझाहि झाला नाहीं कीं काय? तुला नको तर मलाहि नको' असें चिडून म्हणून त्यांनीं तो कप मधेंच ठेवला. गरम होऊं पाहणाऱ्या एकंदर वातावरणांत बिचारा चहा मात्र निवूं लागला. यशवंतरावांनाच काय वाटलें कोण जाणें, त्यांनीं अर्धा चहा बशींत घेऊन बाकीचा कप तुझे पुढें केला. मग आपण सर्वजण तो चहा प्यालों वगैरे सर्व ठीक झालें. चहा गोड लागला, पण तो प्रकार जो घडला तो लहानसाच असला तरी कडू वाटला.

यशवंतराव भाजीची पिशवी घेऊन बाजारांत निघाले. 'भाजी काय आणूं?' असें त्यांनीं विचारतांच 'मी काय इथून सांगूं? जी बरी दिसेल ती आणा.' असें तूं तुटक उत्तर दिलेंस. 'भाजी कोणती आणूं' हें विचारण्यांत वास्तविक मला कोणती आवडते हें काढून घेण्याचा त्यांचा हेतु होता. अन् एरवीं तो तुझ्या लक्षांतहि आला असता. पण अगोदरचें चहाप्रकरण नडलें! माझे निमित्तानें घरांत गोड-धोड व्हावें या हेतूनें त्यांनीं जरा मागें फिरून 'श्रीखंड पाहूं का?' असें विचारलें.

त्यावर तूं ' तुम्हांला हवें असलें तर आणा ' असें सांगितलेंस. ही काय सांगण्याची रीत झाली ? मी जो तुमचेकडे आलों तो मुख्यतः तुझा पाहुणा म्हणून आलों होतों. माझ्या आवडी–निवडी तुला जास्त माहीत असणार अशा हेतूनेंच ते तुला सारखे विचारीत होते. जें काय करायचें किंवा आणायचें तें तुम्हां उभयतांना जास्त गोडी-गुलाबीनें, प्रेमानें व एकमनानें ठरवितां आलें असतें. पण तूं त्या मनःस्थितींत नव्हतीस, ना !

यशवंतराव बाहेर गेल्यावर तूं त्यांची बसण्याची खोली मला लागेल म्हणून साफ करायला आलीस. टेबलावरील वर्तमानपत्रांचा ढीग व विशेषतः ॲशट्रेवरून खालीं सांडलेली सिगारेटची राख हीं तुला न खपून (व ती माझे दृष्टीस पडली हें तुला सहन न होऊन ) या घाणीची सर्व जबाबदारी नवऱ्यावर ढकलण्याचे हेतूनें तूं म्हणालीस ' यांचें हें नेहमींचें असें आहे. म्हणूनच मी टेबल साफ करण्याचे भानगडींत कधीं पडतच नाहीं ! ' तूं स्वतःची बाजू सांवरायला गेलीस खरी, पण त्याचेच योगानें नवऱ्याचे दोष जास्तच उघडे पाडलेस. अन् तूं म्हणतेस त्याप्रमाणें त्यांचें ' हें नेहमींचेंच असें ' असेल असें मला वाटत नाहीं. आणि असलेंच तर तूं टेबल साफ करण्याचे भानगडींत कधीं पडत नाहींस म्हणूनच असेल. व्यवहारांत एकमेकांशीं वागतांना माणसांच्या मनांत बनणाऱ्या तेढी व उडणारे खटके हीं पुष्कळ वेळां कार्यकारणाची अदलाबदल झाल्यामुळें होत असतात.

जेवण वगैरे व्हायचें त्याप्रमाणें–म्हणजे मनें साफ नसलीं म्हणजे होतें त्याप्रमाणें–झालें. आग्रह झाला, पण तो मला एकट्यालाच झाला. बोलणें, गप्पा वगैरे झालें तें सर्व माझ्याशींच झालें. सगळ्या गोष्टींत मी आणि तुमच्यापैकीं कोणीतरी एकजण अशी विभागणी होत होती. आपण तिघेहि एकमतानें कोणत्याच बाबतींत भाग घेत नव्हतों. तूं मागून जेवायला बसलीस तेव्हां यशवंतराव आंत तुझ्या समाचाराला म्हणून आले. तूं त्यांना काय म्हणालीस, आठवतें ? कांहीं नको दिखाऊ कौतुक ! ब्राह्मण ओशाळला, पण आपण ओशाळलों आहों असें दिसून येऊं नये म्हणून कांहीं तरी करीत शेवटपर्यंत तेथेंच घोटाळत राहिला !

मी पान खात व यशवंतराव सिगारेट ओढीत बैठकीचे खोलींत बसलों होतों. तूं, घरांतलें आटपून बाहेर आलीस; व मला उद्देशून म्हणालीस ' हज्जारदां सांगून बघितलं असेल; पण यांची ही बया कांहीं सुटायची नाहीं ! ' या तुझ्या बोलण्यांतून एकाद्या

सायकोअनॉलिस्टानें कितीतरी अर्थ काढला असता! नवऱ्याची कोणीतरी खरोखरची ' वया ' असल्याचा तुला संशय आहे, तो संशय आल्यावरोबर राजरोसपणें नवऱ्याला विचारण्याइतका तुमचे दोघांत मनाचा मोकळेपणा नाहीं, तो तसा नसल्यामुळें तुझ्या मनांतील ही तिडीक फार दिवस घर करून राहिली आहे, आणि आतां ती एकदम भलत्याच वेळीं व भलत्याच निमित्तानें व्यक्त झाली आहे वगैरे वगैरे! त्यानें केलेलें हें पृथक्करण सर्वतोपरीं वरोवरच ठरेलच असें नाहीं; पण अनुमान करायला जागा दिलीस यांत शंका नाहीं. ' वया म्हणजे कोण ? ही सिगारेटच ना ' ? असें विचारून मीं तो प्रसंग हंसण्यावारी नेला, आणि क्षणभर उडालेली चलविचल नाहींशी झाली.

गोष्ट निघालीच आहे म्हणून सांगतों:—सिगारेटचं काय किंवा दुसरं कोणतंहि व्यसन काय–तें वाईट आहे यांत शंकाच नाहीं. आणि त्यासंबंधींची नापसंती योग्य प्रकारें दाखवून पुरुषांना त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करणें हें स्त्रियांना योग्यच होईल. पण ही नापसंती दाखवितांना अंतःकरणाची सहानुभूति व वाचेचा गोडवा हींहि दिसलीं पाहिजेत. ही सहानुभूति व हा गोडवा नसतील तर दोघांनाहि परस्परांवद्दल तिटकारा वाटूं लागून त्यांच्यांत तेढ उत्पन्न होईल; आणि एकंदर जीवनच दुःखमय होईल. लागलेलें व्यसन सोडून देऊन जीवन पुन्हां सुखमय करणें पुरुषाला या तेढीच्या मनःस्थितींत तरी अशक्यप्राय वाटूं लागतें, व निराशामय अवस्थेंत तो तें दुःख नाहींसें करण्याऐवजीं त्या दुःखाची जाणीवच होऊं नये म्हणून जास्तजास्तच व्यसनासक्त बनतो. आणि व्यसन नाहींसें करण्याचे दृष्टीनें केलेला प्रयत्न–योग्य मार्गाचा व योग्य प्रमाणांत न झाल्यामुळेंच–निष्फळ ठरतो. सर्व व्यसनी माणसांच्या आयुष्याची हीच रडकथा होते. ' एकच प्याला ' नाटकांतल्या सिंधूनें अतिशय नरमाईचें धोरण स्वीकारलें म्हणून, तर उलट गीतेनें अतिशय जालीम उपाय योजला म्हणून सुधाकर व तळिराम–दोघेंहि कायमचे दारुडे वनले, व दोघांच्याहि संसारांची सारखीच वाताहात झाली! तेव्हां सांगायचं असं कीं, बायकांनीं पुरुषांच्या व्यसनाचे बाबतींत मिळतं घेण्याचें व योग्य वेळीं व योग्य रीतीनें त्याला व्यसनमुक्त करण्याचें धोरण स्वीकारणेंच शहाणपणाचें होईल. शिवाय असें कीं खडतर जीवनांत व त्यांतल्या धकाधकीच्या मामल्यांत वावरतांना सर्वसामान्य पुरुषाच्या मनाला सिगारेट–विडीसारख्या व्यसनामुळें थोडा–फार विरंगुळा वाटतो हें कांहीं खोटं नाहीं. हें मी माझ्या तपकिरीची तरफदारी करण्यासाठीं म्हणतों असें समजूं नकोस. व्यसन–हें केव्हांहि वाईटच असं मी एकदां सोडून हजारदां सांगेन;

पण हें सांगतांनाच असेंहि म्हणेन कीं, तें लागूं नये–पण लागलंच तर बायकांनीं जिवाचा मोठा त्रागा करून, जीव घेण्याची किंवा देण्याची पाळी आपणांपैकीं कोणावरच आणूं नये हें बरें. व्यसनाचा अतिरेक होऊन तें नवऱ्याच्या प्रकृतीला व प्रपंचांतल्या सुखासमाधानाला मारक होणार नाहीं येवढी खबरदारी बायकांनीं घेतली म्हणजे त्यांचें कर्तव्य संपलें.

या विडीप्रकरणानें थोडेसे ओशाळे होऊन कांहींतरी करायचं म्हणून यशवंतराव टेबलावरील पत्ते चाळूं लागले. तिकडे तुझें लक्ष जाऊन तूं लगेच कुरकुरलीस- ' रविवारचा तुमचा अड्डा आज इथं नको आं. त्या गोडबोल्यांकडेच जा कसे. नानांना जरा स्वस्थता अन् विश्रांति मिळूं द्या. ' या तुझ्या सांगण्यावर व विशेषतः त्या डाफरून बोलण्यावर थोडेंसें चिडून पण लगेच पडतं घेऊन ते म्हणाले " जशी बाईसाहेबांची मर्जी ! आपल्याला काय ! इथें नको तर आपण आपले बाहेरच जाऊं. " " नका हो, गोडबोल्यांनाच येथें बोलवा; अन् आपण चौघे ब्रिज् येथेंच खेळूं " असा मींच आग्रह धरल्यामुळें तुला नको असलेला ' अड्डा ' शेवटीं घरींच पडला ! उचललेलीं पानें अनुकूल पडलीं अन् तुम्ही उभयतां पार्टनर झालां. पण खरं सांगायचं म्हणजे खेळांत सुद्धां तुमची खरी पार्टनरशिप् दिसली नाहीं. एकमेकांवर चिडणें, एकमेकांच्या अचूक खेळण्याचें कौतुक यत्किंचितहि न करतां चुकीच्या खेळण्याचा मात्र बभ्रा करणें, एकमेकांनीं दिलेल्या चुकीच्या सवालामुळें डाव स्वतः- वर उलटला तर वाईट न वाटतां ' बरं झालं, खोड मोडली ' असें तामसी समाधान होणें, वगैरे खऱ्या खिलाडू भिडूला न शोभण्यासारख्या कितीतरी लहानसहान गोष्टी तुम्हां उभयतांचे हातून तुम्हांला नकळत होत होत्या. तुम्ही खेळांतल्यापुरतेच भागीदार असतां तर कदाचित् या गोष्टींचें मला विशेष कांहीं वाटलें नसतें. पण तुम्ही जीवनांतलेहि भागीदार आहां; आणि जीवनांतल्या चुकांप्रमाणें खेळांतल्या चुकांकडेहि तुम्हीं सहानुभूतीनें पहावें अशी अपेक्षा. पण ती सहानुभूति जीवनांतच नसल्यावर खेळांत तरी कशी दिसणार !

अन् मघाशीं मीं जें सीगरेटसंबंधीं सांगितलें ना, तेंच मला या बाबतींत सांगायचें आहे. पुरुषांना कामावरून घरीं आल्यावर बाहेर क्लबांबिबांवर–किंवा तुझ्या शब्दांत बोलायचें म्हणजे ' अड्ड्यावर '–जें जावेंसें वाटतें ना त्याचेंहि कारण हेंच आहे कीं, रोजच्या एकाच एक ठराविक कामांत त्यांना कांहीं ना कांहीं बदल हवासा वाटतो; व तो त्यांना घरच्या परिस्थितींत मिळत नाहीं. नुसत्या

खेळण्यापेक्षां माणसानें दुसरा चांगला नाद लावून घ्यावा—लेखन-वाचन, गायन-वादन, चित्रलेखन वगैरे जास्त उपयोगाचें व जास्त बुद्धीचें असें कांहींतरी करावें असें तूं म्हणशील. मीहि तसेंच म्हणेन.पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, असल्या प्रकारच्या गोष्टींचा नाद माणसाला पुढें मोठेपणीं लागण्याकरितां अगोदर लहानपणींच त्याला जें शिक्षण मिळावयास पाहिजे तें किती जणांना मिळालेलें असतें ? हल्लींच्या शिक्षणांत असलेल्या उणीवांपैकीं ही एक फार मोठी उणीव आहे. आणि समज,—अशा प्रकारचें शिक्षण मिळून माणूस पुढें फार मोठा कलावंत झाला; तरी पण अशा कलावंतालासुद्धां थोडा वेळ तरी क्लबांत वगैरे जाऊन खेळावें-सवरावेंसें वाटणें स्वाभाविक नाहीं का ? नवराबायको, मुलंबाळं वगैरे जमून सर्वजण घरच्या घरींच आनंदानें खेळतील, गप्पागोष्टी, थट्टामस्करी, हास्यविनोद वगैरे करतील तर पुरुषांना क्लबांवर जाण्याची चटक लागणार नाहीं. पण असें घडायला आपल्या कौटुंबिक नीतीच्या कल्पना बदलाव्या लागतील; आणि त्याहि बदलल्या तरी खऱ्या आनंदाचा परिपोष व्हायला वयाची, बुद्धीची, अनुभवांची, आचाराविचारांची जी एक समपातळी लागते ती घरांत कशी असणार !

तसंच पाहिलें तर तुम्हां बायकांनाहि तिसऱ्या प्रहरीं कामाच्या निमित्तानें शेजारच्या बायकांकडे जाऊन गप्पाविप्पा मारून यावेंसें नाहीं का वाटत ? समज, यशवंतराव त्यांच्या त्या 'अड्डया' वर न जातां रोजरोज घरींच तुझ्याशीं बोलत बसले तर—माझी खात्री आहे कीं—तुला थोडेच दिवसांत त्याचा कंटाळा येईल. बरोबर फिरायला जायच्या बाबतींतहि तसेंच होईल. पहिले कांहीं दिवस जोडीनें बोलत-बोलत जाल; पण लवकरच असा देखावा दिसेल कीं, तुम्ही दोघेंहि फर्लांगाच्या अंतरानें आपआपला मार्ग एकएकटे व मुकाट्यानें आक्रमीत आहां ! तेव्हां सांगायचं असं कीं, या बाबतींतली स्त्रीपुरुषांची गरज एकच असली तरी ती भागविण्याचे दोघांचे प्रकार भिन्न असतात. आणि हें ओळखून आपआपली गरज योग्य मार्गांनीं व योग्य प्रमाणांत पुरवूं देण्याला कोणींच खळखळ करूं नये, हें उत्तम. अर्थात त्यांतहि अतिरेक होऊन एकंदर सांसारिक सुखाची हानि होणार नाहीं एतदर्थ जी काय दक्षता घ्यावयाची तेवढी घेतलीच पाहिजे.

खेळ वगैरे झाल्यानंतर मीं 'पहिल्या पाळण्याला' जाण्याचा बूट काढला. यशवंतरावांना विचारलें असतांना ते जरासे घोटाळले, व 'चलूं या पाहिजे तर; पण आजच कशाला ? उद्यांपरवां गेलों तर नाहीं का चालणार ? ' असें कांहींसें म्हणाले.

त्यावर तूं माझेकडे पाहून म्हणालीस ' नाना, ते नाहीं आपल्येबरोबर यायचे. त्यांची मंडळी निराळी आहेत. अन् त्यांना त्यांच्या साहेबानं कामाला बोलावलं असेलच कीं. आपण आपलीं दोघेंच जाऊं या कशीं. ' हें तुझं बोलणं ऐकून यशवंतरावांनीं आपल्या-बरोबर येण्याचा अगोदरच केलेला बेत रद्द केला, अन् वेळ मारून नेण्याकरतां ते म्हणाले ' हो, बरं झालं, आठवण केलीस म्हणून. आतां त्या हेड्क्लार्कनें मला बोलावलं आहे हें मी विसरलोंच होतों. सुटीच्या दिवशीं सुद्धां लेकाचा काम सांगतो ! ' सुटीच्या दिवशींहि काम सांगणारा 'लेकाचा' हेड्क्लार्क त्या दिवशीं ऐत्या वेळीं यश-वंतरावांच्या किती उपयोगी पडला, पाहिलास ! ही सबब खोटी आहे हें मला दिसून आलें होतें, पण येण्याला प्रवृत्त करण्याऐवजीं तूं त्यांना परावृत्तच केल्यावर ' याच ' असा आग्रह मी तरी कोणत्या तोंडानें करणार ? व्हायचें तेंच झालें, आणि आपण दोघेंच सिनेमाला गेलों. सबंध सिनेमाभर व जातां–येतांना तूं माझ्याशीं फारच मनमोकळेपणानें वागलीस व बोललीस. हा मोकळेपणा व प्रेमळपणा खुद्द नवऱ्याशीं वागतांना कां असूं नये या विचारानें माझें मन सारखें उद्विग्न झालें होतें. सिनेमा चालू असतांना मी अधूनमधून विचारलेल्या साभिप्राय प्रश्नांचीं जीं उत्तरें तूं दिलींस, व इतर वेळीं ज्या कांहीं गोष्टी तूं मला निरागसपणें सांगितल्यास त्यांवरून तुझे एकंदर विचार, तुझीं मतें, तुझ्या आवडी-निवडी वगैरे कितीतरी गोष्टी मला आपोआप कळून आल्या, व त्यांतल्या बऱ्याचश्या चुकीच्या असून त्यासंबंधीं वेळींच तुला बरेचसें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे असें मीं त्या वेळींच मनाशीं ठरविलें.

आपण सिनेमागृहांत बसलों असतांना आजूबाजूच्या प्रेक्षकांची माहिती तूं मला देत होतीस. ही माहिती देत असतांना पुरुषांचे पगार, अधिकार, मोटारी इत्यादींचें व त्यांच्या बायकांचे पोषाख, डागदागिने वगैरेंचें वर्णन तूं इतक्या असो-शीनें व लज्जतीनें करीत होतीस कीं, त्यांचें हें सारें वैभव आपल्याला असतें तर काय बहार झाली असती असें तुला वाटत असल्याचें मला स्पष्टपणें दिसून आलें. एरवीं रावसाहेब आपट्यांची सातआठशेंची प्रॅक्टिस, अप्पासाहेब जोश्यांची कोरी करकरीत मोटार, आक्कासाहेब बर्व्यांचा चंद्रहार, मिस् ठोमऱ्यांच्या पातळाचे झकास कांठ व पदर इत्यादि गोष्टी माझ्यासारख्याला सांगण्याचें काय प्रयोजन होतें ? असलेलें वैभव योग्य प्रमाणांत भोगावंसं वाटणं व वस्त्राभरणांनीं थोडंबहुत नटावंसं वाटणं यांत कांहीं वावगं नाहीं; पण त्याचें प्रदर्शन करून दिमाख दाख-विण्याची मनीषा माणसांत उत्पन्न झाली, व वैभवाची प्राप्ति व प्रदर्शन हीच काय

ती जीविताची इतिकर्तव्यता असें त्याला वाटूं लागलें म्हणजे मात्र अश्या माणसाची कींव वाटल्यावांचून रहात नाहीं.

अन् तसंच पाहिलं तर तुला त्या पुरुषांच्या वैभवाचा अन् स्त्रियांच्या सौंदर्याचा हेवा बिलकूलच वाटावयास नको. यशवंतरावांना हल्लीं जरी शेंपन्नास रुपयेच मिळत असले व त्यांना मोटार वगैरे ठेवण्याची आतांच ऐपत नसली तरी त्यांच्यांत पुरेसें कर्तृत्व व पुरेशी धडाडी असल्याचें स्पष्ट दिसतें. ( त्या ' साल्या ' हेड-क्लार्केचें त्यांच्यावांचून इतक्यांतच अडून राहणें हें त्यांच्या या गुणांचेंच गमक नाहीं काय ? ) आणि हे गुण ओळखून तूं त्यांना उत्तेजन देत गेलीस तर ते लवकरच स्वतःला वैभव मिळवून तुलाहि थाटामाटांत ठेवल्यावांचून राहणार नाहींत. व मग आज तुला ज्यांचा हेवा वाटत आहे तेच तुमचा उद्यां हेवा करावयास लागतील.

जी गोष्ट वैभवाची, तीच सौंदर्याची. खरं सांगायचं म्हणजे तूं जात्याच इतकी सुरेख व सुंदर आहेस कीं, तुला सौंदर्याच्या बाह्य साधनांची फारशी जरूरी नाहीं. मात्र तुला या सौंदर्याची आस्थापूर्वक निगा राखून त्याची जोपासना करणें आवश्यक आहे. पण याची जाणीव तुला नाहीं असें मीं जें दोन दिवस पाहिलें त्यावरून म्हणावेंसें वाटतें. सिनेमा पाह्यला बाहेर पडलीस तेव्हां मात्र तूं व्यवस्थित पोषाख केलास, व पावडर, फुलें वगैरेमुळें जास्त सुंदरहि दिसूं लागलीस. पण घरांत असतांनाचें तुझें रूप व पोषाख किती गबाळेपणाचीं होतीं ! चेहरा बुरसटलेला, केस विस्कळीत, आंग मिशमिशीत, अन् पातळ विशविशीत–अशा प्रकारचा एकंदर थाट होता ! ओंगळ, वेंधळें व गबाळं दिसण्याचा जणू कांहीं तूं मुद्दामच प्रयत्न करीत होतीस ! चांगलं अन् नीटनीटकं दिसायचं तें फक्त बाहेर जातांना व इतरांच्या नजरेस पडतांनाच दिसायचं अशी तुम्हां मुलींची एक समजूतच झालेली दिसते. घरांतल्या घरांत वावरतांना व घरच्या मंडळींच्या दृष्टीस पडतानांहि शक्य तों स्वच्छ, सुरेख, व्यवस्थित दिसलं पाहिजे असं तुम्हांला वाटत नाहीं. या तुमच्या पाशीं फॅशनचा परिणाम असा होतो कीं, स्त्रियांच्या सौंदर्याबद्दलची पुरुषांची आवड घरचेघरीं व स्वतःचे पत्नीकडून राजरोस अशी कधींच पुरविली जात नाहीं, व त्यांना सारखें इतर स्त्रियांकडे–विशेषतः त्या बाहेर पडतात तेव्हां–चोरून पाहावेंसें वाटतें. हें मी निवळ पदरचं सांगतों आहें असं म्हणूं नकोस. संध्याकाळचे वेळीं देवदर्शनाकरितां व रात्रीचे वेळीं गालिच्चे, आरास वगैरे पाहण्या-

करितां देवळांत जाणें, स्त्री-पुरुषांच्या मिश्र सभांना हजर राहणें, चौपाटीसारख्या गर्दीच्या रस्त्यांवर हिंडावयास जाणें, सिनेमाला गेलें असतांना फॅमिली सर्कलमध्यें बसणें, चैत्राचे महिन्यांत स्त्रिया हळदीकुंकवाला निघाल्या म्हणजे घरच्याघरींच मान्याचे जागीं बसणें वगैरे पुरुषी कृतींना त्यांच्या मनांतील ही सुप्त व अतृप्त इच्छा थोडीबहुत तरी कारणीभूत होत नसेल काय ? पुरुषांनीं असें चोरून पाहिलें म्हणजे तुम्हां बायकांना त्यांत काळंबेरं व कांहींतरी अनैतिक दिसूं लागतें; व मग गृह-सौख्याचा जो पाया—परस्पर विश्वास व समाधान–तोच उन्मुळून पडतो ! काट-कसरीचा प्रश्न काढूं नकोस. घरांतल्यासंबंधीं पूर्ण आस्था व समाधान हीं असलीं म्हणजे काटकसर करून सुद्धां व्यवस्थित अन् नीटनेटक्या राहणाऱ्या व सदाफुली-सारख्या नेहमींच ताज्यातवान्या नि सुंदर दिसणाऱ्या स्त्रियाहि कांहीं कमी नाहींत.

सिनेमा चालूं असतांनाचे तुझे उद्गार मोठे सूचक होते. नायक–धनंजय–आपल्या नववधूला ( काय तिचें नांव ! ) पंक्तींत वाढायला लावतो त्या प्रसंगीं तूं एकदम उद्गारलीस ‘ घरीं दारीं–कुठेंहि पहा; पुरुषांची अरेरावी अन् अप्पलपोटेपणा हीं दिसायचींच ! ’ पुरुषांच्या अप्पलपोटेपणाचा सारखा डांगोरा पिटण्याची तुम्हां बायकांना अलिकडे एक खोडच लागली आहे. मलाहि ते मोठे त्यागमूर्ति वाटतात असें नाहीं. तुम्ही स्त्रिया त्यांचे मानानें फार मोठा त्याग करतां यांत शंका नाहीं. पण स्वतःच्या त्यागाच्या अवास्तव जाणीवेनें तुम्ही इतक्या भारून जातां कीं, तुम्हांला पुरुषांचा त्याग कोठेंच दिसून येत नाहीं. पुरुषांना सारखा सारखा असा अन्याय होतांना पाहिला म्हणजे मग त्यांच्याहि वतीनें बोलण्यासारख्या दोन गोष्टी तुम्हांला सुन-वाव्याश्या वाटतात. माझ्या मतें तुमचा सगळ्यांत मोठा त्याग हा कीं, तुम्हीं मुलांचें ओझें वाहतां, प्रसववेदना प्राण–पणानें सहन करतां, कष्ट करून व खस्ता खाऊन त्यांचें संगोपन करतां, वगैरे. म्हणजे तुमचा त्याग मुख्यतः शारीरिक स्वरूपाचा व म्हणूनच इतरांना ढोवळपणें दिसणारा असतो. उलट पुरुषांचा त्याग मुख्यतः मान-सिक व आर्थिक स्वरूपाचा असल्यामुळें तो सामान्य माणसांचे डोळ्यांत झटकन् भरत नाहीं.

तुझ्या यशवंतरावांचीच गोष्ट घेना. बिचाऱ्याच्या त्यागाला लग्नाचे पूर्वीपासूनच सुरुवात झाली आहे. वधू म्हणून त्यांनीं जी तुझी निवड केली ती त्यांच्या घरच्या माणसांना बिलकुलच पसंत नव्हती. तुझें रूप घरांतल्या बायकांच्या रूपाला साजेसें नव्हतें; तुला मंगळ असल्यानें तुझी पत्रिका यशवंतरावांच्या पत्रिकेला जुळणारी

नव्हती; त्यांच्या वडलांना हवा असलेला हुंडा द्यायला तुझ्या ' बापाला ' ऐपत नव्हती; तुझं घराणं त्यांच्या इतकं खानदानी व प्रतिष्ठित नव्हतें. इतक्या सगळ्या गोष्टींमुळें घरचीं सर्व माणसें एकजात विरुद्ध असतांनाहि यशवंतरावांनीं तुझे गुण पाहून तुझीच निवड कायम केली व तुझ्याशीं लग्न लावलें. हा त्यांचा मुजोरपणा पाहून वडिलांनीं त्यांना घरांतून जवळ जवळ हांकलूनच लावलं, व तुम्हां दोघांच्या संसाराचा भार एकदम यशवंतरावांवर पडला. झालं ! बी. एस्‌सी. चें वर्ष हातांत आलेलं त्यांना दवडावं लागलं, अन् आजपर्यन्तची कॉलेजकरीअर व पुढची महत्त्वाकांक्षा यांना एकदमच रामराम ठोकून तुझें व स्वतःचें पोट भरण्यासाठीं त्यांना आली ती हलकीसालकी नोकरी पत्करावी लागली. सर्व बौद्धिक आशा–आकांक्षा नाहींश्या झाल्या; आई, भाऊ, वहिणी वगैरे प्रेमळ माणसांच्या प्रेमाला मुकावें लागलें; नातेवाइकांकडून मूर्ख, अविचारी, उल्लू अश्याप्रकारचीं बोलणीं सोसावीं लागलीं; घरच्या मोठ्या इस्टेटीला व वडिलार्जित उत्पन्नाला मुकावें लागलें. अश्या प्रकारें बौद्धिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक वगैरे ज्या ज्या गोष्टी माणसाच्या भावी उन्नतीला अन् सुखाला महत्त्वाच्या समजल्या जातात त्या त्या सर्वांना यशवंतरावांना पारखें व्हावें लागलें; आणि हें सर्व कश्यासाठीं ? तर तुझ्यासाठीं ! या सर्व गोष्टी तूं मला मागें पत्रांतून कळविल्यास त्यावेळीं तूंच त्यांच्या धीरोदात्त वर्तनासंबंधीं व त्यागासंबंधीं किती गौरवानें, आदरानें व अभिमानानें लिहिलें होतेंस ! मग तो गौरव नि आदर आतांच कां नाहींसा झालेला दिसतो ?

लग्नानंतर ओघानेंच प्रपंच वाढूं लागला. तुझ्या मैत्रिणी, आप्तेष्ट, घरीं येऊं-राहूं लागलीं. यशवंतरावांचे स्वतःचे मित्रहि गोळा होऊं लागले. या सर्वांचें यथायोग्य करतांना व इतर जबाबदाऱ्या पार पाडतांना होणारा खर्च भागविण्यासाठीं यशवंतरावांना स्वतःच्या आवडीप्रमाणें घर व सामानसुमान घेतां आलें नसेल, स्वतःला मनासारखे कपडेलत्ते करतां आले नसतील, हवीं तीं पुस्तकें वगैरे विकत घेतां न आल्यामुळें स्वतःची बौद्धिक भूक मारावी लागली असेल, समाजाकरितां–देशाकरितां कांहींतरी करावें असें सारखें वाटत असूनहि त्यांना तें तुझ्यासंबंधींच्या विचारामुळें करतां आलें नसेल. या सर्वाला त्याग नाहीं म्हणायाचें, तर काय म्हणायाचें ! जी गोष्ट यशवंतरावांची तीच थोड्या–फार फरकानें इतर पुरुषांचीहि असते. पुरुषांच्या या त्यागाचें तुम्ही बायका चीज व कौतुक न करतां उलट त्यांना स्वार्थी, अप्पलपोटे, अरेराव अश्या शेलक्या

शब्दांचा आहेर करतां, आणि मग तर त्यांचें मन जास्तच उद्‌विग्न होतें. ' शेळी जाते जिवानिशी, अन् खाणारा म्हणतो वातट ' अशी त्या विचाऱ्यांची स्थिति होते. दुसऱ्या पुरुषांचें असें होत असो अगर नसो—यशवंतरावांचे बाबतींत तरी तें सारें खरें आहे, आणि म्हणून दुसऱ्या बायकांनीं जरी आपल्या पुरुषांच्या अरेरावीला अन् अप्पलपोटेपणाला नांवें ठेविलीं तरी तुला मात्र तशीं ठेवण्याचें कांहींच कारण नाहीं असें मला सांगायचें आहे.

सिनेमांतली ती नायिका नोकरी करते त्या प्रसंगानें मीं तुला विचारलें ' तूं कां नाहीं कांहीं नोकरी वगैरे करीत ? ' त्यावर तूं म्हणालीस ' मींहि येथील कन्याशाळेंत अर्ज करून ठेवला असून येत्या जूनपासून मला काम मिळणार आहे. ' ' चांगलं आहे. मूलबाळ होईतों करायला कांहींच हरकत नाहीं. ' असें मी म्हणालों. त्यावर जरा शहारून तूं उद्गारलीस ' अंऽहं ! तसलं कांहीं नाहीं आँ नाना ! मुलांचं नांव देखील काढूं नका. अन् समजा झालींच एक-दोन पोरं, तरी नोकरी करायला काय हरकत आहे ! आमच्या समोरच्या त्या गोखलेबाई नाहीं का तीन पोरं असूनहि नोकरी करीत ? पोरांचं करण्यांत त्यांचा कितीकसा असा वेळ जातो आहे ? ' यासंबंधीं पुढें बोलण्याचा तो प्रसंगहि नव्हता, अन् असता, तरी तेवढा वेळहि नव्हता. या दोन्ही प्रश्नांसंबंधीं सामान्य स्त्रियांच्या ज्या कल्पना असतात त्याच तुझ्याहि आहेत हें पाहून मात्र वाईट वाटतें.

तूं म्हणालीस ' पोरांचं नांव देखील काढूं नका. ' मग काय ! शेवटपर्यंन्त तूं पोरांबाळांवांचूनच संसार करणार आहेस ? तें शक्य आहे काय ? अन् शक्य असलें, तरी इष्ट आहे काय ? पोरं न होऊं देण्याची खबरदारी तूं त्या कृत्रिम साधनांचा उपयोग करूनच घेणार ना ? हीं साधनें अगदीं शंभर टक्के गुण ( ? )कारी आहेत अशी खात्री अद्याप देतां येते का ? बरं, महात्मा गांधी म्हणतात त्याप्रमाणें अगदीं कडकडीत ब्रह्मचर्य पाळणें तरी कितीश्या स्त्रियांना शक्य होईल ? अन् जरी कोणत्याहि साधनानें पोरं होऊं न देणं शक्य असलं तरी असल्या वांझपणाचा स्त्रियांच्या शरीरावर व विशेषतः मनावर कांहीं घातुक परिणाम होणार नाहींत काय ? तुझ्यासारख्या सर्वसामान्य स्त्रियांना परिपूर्ण जीवनांतील स्वाभाविक समाधान व सहजानंद मुलांवांचून मिळेल काय ? सध्यां मी स्वतः यासंबंधीं कांहीं एक न सांगतां, हे विचार तुजपुढें प्रश्नरूपानें मांडीत आहें. त्यांचा स्वतःशीं विचार कर; या विषयावरील एक-दोन सोपीं पुस्तकें मी तुला पाठवून देईन तींहि वाच. आणि अश्या

रीतीनें विचार करून व दुसऱ्यांचें म्हणणें वाचून पाहून तुला जर तें शक्य व इष्ट आहे असें वाटलें तर अवश्य आचरणांत आण. मग याचेवर माझें कांहींच म्हणणें नाहीं.

पोरं झाल्यावरहि स्त्रियांनीं नोकरी करावी कीं नाहीं, त्यापासून त्यांचें, त्यांच्या मुलाबाळांचें, व नोकरींत त्यांचा ज्या इतर कोणाशीं संबंध येतो त्यांचें नुकसान होतें कीं नाहीं यासंबंधीं ' स्त्री ' मासिकांत नुकतीच चर्चा झाली आहे. ती तूं वाचली नसल्यास अवश्य वाच येवढेंच सध्यां मी यासंबंधानें सांगेन. पोराबाळांचें करण्यांत बायकांचा फारसा वेळ जात नाहीं असं जें तूं नुसतं मोघम म्हणालीस तेंच एका विदुषीनें प्रत्यक्ष गणितानें सिद्ध केलें आहे. प्रत्येक बाईला सरासरीनें एकंदर तीन मुलें होतात असें गृहीत धरून तिनें आपलें गणित पुढील प्रमाणें केलें आहे:—

प्रत्येक बाळंतपणाला दीड महिना, असा तिन्ही बाळंतपणांना लागणारा एकंदर काळ = ४॥ महिने.

पांच ते दहा वर्षें वयाच्या प्रत्येक मुलाचें संगोपन ( आठवड्यांतून पांच दिवस, व रोज एक तास प्रमाणें ) = १००० तास ( अदमासें २०० दिवस ).

एकूण अदमासें = १ वर्ष.

अशा रीतीनें प्रत्येक आईला आपल्या तीन मुलांचें जनन, संगोपन व पोषण करण्याकरितां आपल्या एकंदर आयुष्यांतील फार तर एक वर्ष खर्च करावें लागत असून बाकीचें सर्व आयुष्य तिला कांहीं तरी सामाजिक कार्य करण्यांत घालविण्यास कांहींच हरकत नाहीं असें त्या विदुषीनें सिद्ध केलें आहे ! बाईनें केलेलें वेळापत्रक मोठें मजेदार आहे, नाहीं ? पण गणितावर बसविलेल्या वेळापत्रकाप्रमाणें साध्या यांत्रिक आगगाड्याहि चालूं शकत नाहींत; तर मग जीवनाचा गुंतागुंतीचा गाडा असल्या वेळापत्रकाप्रमाणें कितपत चालूं शकेल ? तो गाडा नुसत्या यांत्रिक रुळावरून जात नसून तो सुरळीत चालण्याचीं यंत्रें व साधनें अगदींच निराळीं आहेत. पति व पत्नी हीं तीं साधनें असून तीं दोघें एकमतानें व एकोप्यानें चालल्यासच तो गाडा उद्दिष्ट ठिकाणापर्यंत सुखरूप पोंचूं शकेल—एरवीं नाहीं. असो.

आपण सिनेमा पाहून घरीं आलों. जेवणें वगैरे झालीं. बांधाबांधी करून व कपडे घालून मी तयार झालों. पण यशवंतरावांनीं खुणावल्यावरून आम्ही दोघेजण गच्चीवर गेलों, आणि अंधारांतच जरा बोलत उभे राहिलों. तूं खालून विचारलेंस ' येवढं काय गुपित चाललं आहे, नाना ? माझेसंबंधींच कांहीं चाललें असेल ! '

आठवतें ना ? त्या वेळीं मीं कांहींच उत्तर दिलें नाहीं, पण आतां सांगतों. सिनेमा कसा चांगला होता वगैरे सांगून झाल्यावर मनांतली रुखरूख एकदांची काढून टाकावी म्हणून मीं यशवंतरावांना म्हटलें 'तुम्ही कां नाहीं आलां सिनेमाला ? आणखी मजा आली असती.' माझें हें विचारणें अगदींच साधें नव्हतें हें खरें; पण त्यांना तें अपेक्षेपेक्षांहि जास्त लागलेंसें दिसलें. किंचित् कांपऱ्या व जरा भरून आलेल्या स्वरांत ते म्हणाले 'बरं झालं, नानासाहेब, विचारलंत म्हणून. बाकी तुम्हीं नसतं विचारलंत तरी मी सांगणारच होतों. माझी एकंदर वागणूक तुम्हांला जरा चमत्कारिकच वाटली असेल, नाहीं ? कदाचित् तुमच्या विद्यार्थिनीनें माझेसंबंधीं कांहीं सांगितलेंहि असेल. पण त्याचं खरं असं आहे कीं, हिचा स्वभाव हल्लीं भारी चमत्कारिक अन् भलता संशयी झाला आहे. आजच्या सिनेमाचीच गोष्ट घ्या ना. तुमचं राहणं आणखी एकादा दिवस लांबावं म्हणूनच मी सिनेमाचा बेत पुढें ढकलीत होतों. त्यांतूनहि मी तुमचेबरोबर यायला निघालों तों ती काय म्हणाली, आहे लक्षांत ? 'त्यांची मंडळी निराळी आहेत' हें तिचें वाक्य साधेंसुधें नव्हतें. त्याला निराळा अर्थ व थोडासा इतिहास आहे. त्याचं असं झालं कीं, माझ्या एका मित्राच्या मनांतून आपली भावी वधू एकदां माझ्या दृष्टीखालून घालावी असें फार होतें; अन् शिवाय लग्नाआधींच दोघेंच्या दोघें सिनेमाला गेल्यास लोकांना—विशेषतः आपल्या सासुरवाडीच्या मंडळींना—चमत्कारिक दिसेल म्हणून त्यानें मला बरोबर येण्याचा आग्रह केला. वास्तविक हिलाही त्यानें बोलावणें केलें असतें तर सर्वच दृष्टींनीं तें चांगलें झालें असतें. अन् त्याप्रमाणें मीं थोडेंसें त्याला सुचविलेंहि. पण त्याला तें समजलें नाहीं म्हणा, किंवा आणखी कांहीं वाटलें म्हणा, त्यानें कांहीं हिला विचारलें नाहीं. आपण जावें अशी हिची इच्छा असतांना, व हिनें यावें अशी माझी इच्छा असतांनासुद्धां मला माझ्या मित्राबरोबर एकट्यालाच जावें लागलें. आम्ही दोघेच नसून आमच्या बरोबर कोणी एक मोठी मुलगी होती हें समजल्यावर तर हिच्या मनानं कांहीं निराळंच घेतलं. ती मुलगी कोण, त्या दोघांबरोबर मी तिसरा कां गेलों, हिनें येऊं नये अशी माझ्या मित्राचीच इच्छा कशी दिसली वगैरे गोष्टी मीं हिला मागाहून सांगितल्या त्या पहिल्यांदाच सांगितल्या असत्या तर बरं झालं असतं, हें खरं. अन् तेवढं माझं चुकलं. पण नंतर हें सगळं समजल्यावरोबर हिचं मन स्वच्छ व्हावयास पाहिजे होतं; पण तें कांहीं झालं नाहीं, अन् तेव्हांपासून हें असं चाललं आहे. तुम्ही तरी जरा पहा कांहीं सांगून-सवरून.'

यमू, सगळा प्रकार कसा गैरसमजाचा आहे. पाहिलेंस ? माझाहि तुझ्या त्या तुसड्या बोलण्यावरून गैरसमज झाला होताच कीं ! मागें कांहीं कारण असल्या-शिवाय तूं असं बोलली नव्हतीस, खास; खरं पाहिलं असतां या सगळ्यांत चूक अशी कोणाचीच नाहीं. असलीच थोडीशी, तर ती त्या मित्राची. पण त्याच्या चुकीचें प्रायश्चित्त बिचाऱ्या यशवंतरावांना भोगावं लागायला नको होतं. इतर बाबतींतहि आणखी असले कोणकोणते गैरसमज झाले आहेत, देव जाणे! यमू, आमचे वामनराव म्हणतात तेंच खरं. जगांतील बहुतेक भांडणं, दुःखं वगैरे केवळ गैरसमजामुळेंच उत्पन्न होतात; आणि म्हणून ते होऊं नयेत येवढ्यासाठीं माणसानें नेहमीं जपायला पाहिजे. स्वच्छ मन, शुद्ध विचारसरणी, पूर्ण समजूत, दुसऱ्याच्या चांगूलपणावरची श्रद्धा इत्यादिमुळें बरेचसे गैरसमज टळतील. त्यांतूनहि कांहीं झालेच तर परस्परांनीं मोकळेपणानें बोलून टाकावे, चुका कबूल कराव्या, झाल्यागेल्याची क्षमा करावी, मनसोक्त थट्टा–विनोद करावा, म्हणजे त्यायोगानें मनांतील सर्व किल्मिष धुऊन जाऊन मन पुन्हां स्वच्छ, ताजें–तवानें व निरोगी बनतें. तुमच्या असमाधानाचें निदान परस्परांचा गैरसमज हें असल्यामुळें इतकं सगळं लिहावं लागलं. उपाय करून पाहण्यासारखा आहे. गुण हटकून येईल.

सदरहु सूचनेप्रमाणेंच आणखीहि कांहीं सूचना थोडक्यांत करून मी हें पत्र पुरें करतों.

( १ ) प्रजोत्पादन हें केवळ बुद्धिहीन पशूलाच साजेसें असून बुद्धिवंत मनुष्याला तें शोभण्यासारखें नाहीं ही समजूत–तुझी असलीच तर ती अयोग्य आहे. मनुष्य हा सुद्धां मुळांत पशूच आहे, आणि आपल्या पाशवी वृत्तीचें नियमन करून व तिला उन्नत रूप देऊनच—ती अजिबात काढून टाकण्याचा व्यर्थ प्रयत्न करून नव्हे—त्यानें आपला विकास करावयाचा आहे.

( २ ) पुरुष जात्याच वैचित्र्याचा भोक्ता आहे; आणि म्हणून त्याचे हातून एकादे वेळेस चुकून पाऊल वांकडें पडल्यास बायकांनीं त्याला क्षमा करावयास शिकलें पाहिजे. तसा प्रसंग येऊं नये अशी इच्छा व तसे प्रयत्न दोघांनींहि करावेत हें चांगलें; पण तो आलाच, तर बायकांनीं डोक्यांत राख घालून सबंध संसाराची राखरांगोळी करण्यास उद्युक्त होऊं नये. किंवा जशास तसें या न्यायानें स्वतःचेंहि स्खलन होऊं देऊं नये. नीतिमत्तेचा शेवटचा आधार व आसरा स्त्रिया. पण त्याच पतित झाल्या तर राष्ट्र अधोगतीला गेलेंच म्हणून समजावें.

( ३ ) नवऱ्याचें पतन होण्याचा प्रसंगच येऊं नये येवढ्यासाठीं सारखी टेहळणी व पाळत ठेवूं नको, किंवा एकसारखी त्याची पाठराखणहि करूं नको. असें करण्यांत एक प्रकारची मत्सरबुद्धि दिसून येते; आणि मत्सर हें एक दुधारी शस्त्र असल्यामुळें त्यानें केलेला वार करणारावरच केव्हां उलटेल याचा नेम नसतो.

( ४ ) उलट नवरा म्हणजे प्रति शुक्राचार्य, तो कामविषयक मोहाला बळी पडणें केव्हांहि शक्य नाहीं अशी फाजील खात्री करून घेऊन त्याचेबद्दल पूर्णपणें बेफिकीरहि राहूं नकोस. या दृष्टीनें स्वतःच्याच उद्योगांत पूर्णपणें मग्न राहून नवऱ्याबद्दल निष्काळजीपणा किंवा औदासीन्य दाखविणें सुरक्षितपणाचें होणार नाहीं.

( ५ ) स्वतः कमावती झालीस तरी त्या कमाईबरोबर येणारी बेफिकीरी व बेछूटपणा अंगीं येणार नाहींत अशी खबरदारी घे.

( ६ ) बाहेरचे इतर उद्योग व सामाजिक कामें कितीहि केलींस तरी तूं मुख्यतः गृहिणी आहेस ही जाणीव ठेवून आपल्या गृहपालनाच्या कामांत अंतराय येऊं देऊं नकोस. गृह व्यवस्थित असेल तरच तूं ' सुगृहिणी ' मानली जाणार, आणि यशवंतराव ' सद्गृहस्थ ' या पदवीला पात्र होणार. वास्तविक पाहतां तुम्ही दोघेंहि फार चांगलीं आहां. तुम्ही परस्परांना इतकीं शोभेशीं आहां कीं तुम्हांकडे पाहून कोणाहि रसिकानें कण्वाप्रमाणें " समानयंस्तुल्यगुणं वधूवरं, चिरस्य वाच्यं न गतः प्रजापतिः " असे धन्यतेचे उद्गार काढावे ! दुष्यन्त अन् शकुंतला यांच्या जीवनांतहि मध्यंतरीं गैरसमजाचे, विस्मरणाचे वगैरे तरंग येऊन तें गढूळ नव्हतें का झालें ? पण त्यांतूनहि ते दोघे सुखरूप पार पडले येवढेंच नव्हे, तर त्यांचें एकंदर जीवन इतकें सुंदर, आनंदमय व कलात्मक झालें कीं तेंच आज ' शाकुन्तल ' रूपानें अमर होऊन राहिलें आहे.

एकंदर पत्र, त्यांतील उपदेश व शेवटचें रूपक वाचून तूं थट्टेनें व थोड्याश्या मिस्किलपणानें म्हणशील " आतां फक्त ' शुश्रूषस्व गुरून् कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने ' या वर्गांत शिकवलेल्या श्लोकाचीच आठवण करून देण्याचें राहिलें. नाना ! पुरते कण्व बनलांत ! " मला कण्व म्हणून माझ्या म्हातारपणच्या आर्ष विचारांची तूं चेष्टा केलीस तरी हरकत नाहीं. पण मी या चेष्टेवर तितक्याच गांभीर्यानें म्हणेन ' यमू, तुमच्याहि जीवनाची त्या दिव्य ' शाकुन्तला ' सारखी

सुंदर कलाकृति व्हावी अशी इच्छा असेल तर हा कण्वाचा उपदेशच तुला आयुष्यांत उपयोगी पडेल; आणि तुम्हां उभयतांचें जीवन सुंदर, सुखकर आणि आनंदमय बनेल. ' हाच माझा आशीर्वाद.

तुझें सदैव कल्याण व्हावें असें इच्छिणारा

तुझा

गुरु व आप्त.

**ता. क.** केव्हांहि काय, टाळी एका हातानें कधींच वाजत नाहीं हें खरें. यशवंतरावांचेंहि थोडेंसें चुकत असेलच. पण त्यांच्याहून तूंच लहान व मला जास्त जवळची असल्यामुळें सांगायचें तें तुलाच सांगितलें आहे. त्यांना हें पत्र वाचून दाखव. त्यांनाहि त्यांत घेण्यासारखें बरेंच सांपडेल. अन् मग आपोआपच त्यांना निराळें सांगण्याचें मला कारण उरणार नाहीं. त्यांस माझे आशीर्वाद प्रविष्ट करणें.

## चि. सौ. येसूस ८

*अनेक आशीर्वाद, वि.*

कालच्या पत्रांत भाऊनें चि. शकूच्या उष्टावणाचें बोलावणें केलें तें पोंचलें. 'अवश्य येईन, किंवा येतां येत नाहीं याचें वाईट वाटतें' अश्या मजकुराचें एक कार्ड उलट उत्तर म्हणून मला पाठवितां आलें असतें. पण नुसत्या नवऱ्याच्या बोलावण्यावर समाधान न मानतां पत्राचे शेवटीं ताजा कलम करून व सुनेला साजेशी भीड, लाज वगैरे बाजूला ठेवून तूं स्वतः ज्या चार ओळी लिहिल्यास व आपलेपणानें अन् आग्रहपूर्वक जें बोलावणें केलेंस त्याचें मला विशेष कौतुक वाटलें ! समारंभाला समक्ष येतां आलें तर अवश्य येईनच. पण प्रकृतिमानानें इतक्या लांब येतां आलें नाहीं, आणि अश्या प्रसंगाचे निमित्तानें द्यावयाची देणगी प्रत्यक्ष देतां आली नाहीं, तर तुला अगदींच वाईट वाटूं नये म्हणून तूर्त एका निराळ्या प्रकारची देणगी तुला पाठवीत आहें. वस्तु वगैरेंची देणगी आणखीहि एकाद्या प्रसंगानें मला तुला देतां येईल; पण आतां ही जी देणगी देण्याचें ठरविलें आहे ती पुढें देतां येण्यासारखी नाहीं—वास्तविक ती यापूर्वींच द्यावयास पाहिजे होती. ती शाब्दिकच आहे, व तिचें प्रदर्शन करून 'ही नानामामंजींनीं दिली' असें इतरांना अभिमानपूर्वक सांगण्याचें सुख जरी तुला लाधलें नाहीं, तरी ती तुझ्या दृष्टीनें अतिशय किमतीची आहे असें मला तरी—कदाचित् म्हातारपणामुळेंहि तसें असेल—वाटतें.

येसू, तूं आनंदानें उष्टावणाचें बोलावणें केलेंस हें ठीकच झालें. आपल्याला

नकोश्या वाटणाऱ्या गोष्टीहि निसर्गनियमानुसार झाल्याच तर त्याचेबद्दल वाईट वाटून न घेतां, आला प्रसंग शक्य तितक्या आनंदानें साजरा करून इतरांच्या मनाचा विरस करावयाचा नाहीं ही जी तुझी वृत्ति ती खरोखरच अभिनंदनीय आहे. मला माहीत आहे कीं येवढ्यांतच आपल्याला मातृपद प्राप्त व्हावें असें तुला वाटलें नसलें पाहिजे. वास्तविक पाहतां लग्नालाच तूं त्यावेळीं फारशी उत्सुक नव्हतीस. पण तुझ्या वडिलांच्या जिवावरचें ओझें तेवढेंच कमी होऊन त्यांना जरा हलकें वाटावें म्हणून आपला ट्रेनिंगचा कोर्स पुरा होण्यापूर्वीहि तूं त्यांच्या म्हणण्याला तयार झालीस. त्यावेळीं मनांतून तुला कदाचित् असें वाटत असलें पाहिजे कीं लग्न झालें म्हणून काय झालें? त्यानंतरहि कॉलेजमध्यें जाऊन राहिलेलें एक वर्ष आपल्याला सहज पार पाडतां येईल. (आणि तसें झालें असतें तर मलाहि फार आनंद झाला असता.) पण वधूवरांनीं—विशेषतः वयांत आलेल्या वधूवरांनीं—लग्नानंतर कांहीं काळपर्यंन्त तरी जी एक विशिष्ट खबरदारी व दक्षता बाळगावयाची असते ती तुम्हीं न बाळगल्यामुळें तुझ्या मूळच्या आकांक्षेवर एकप्रकारें पाणी पडलें, आणि तुझा थोडाफार विरस झाला. बारशाचे वेळींहि तूं तितकीशी आनंदांत नव्हतीस, व हें जाणूनच मीहि त्यावेळीं प्रेझेंट वगैरे देण्याचे लोळांत पडलों नाहीं; हें मी आतां—वेळच आली म्हणून—सांगतों. कांहीं झालें तरी वर्ष फुकट जाऊं द्यावयाचें नाहीं, झालेली चूक त्यांतल्यात्यांत दुरुस्त करावयाची अशा इरायानें दोन–तीन महिने उशीरानें का होईना—पण त्याच वर्षी कॉलेजमध्यें जावें असें तुला फार वाटत होतें, व तूं मला मोठेपणा देऊन तसें विचारलेंसहि. पण तुझें सबंध वर्ष फुकट जातें याची मला स्वतःला जाणीव असूनहि मींच तुला त्यावेळीं नुसतें नको म्हणून सांगितलें, आणि माझेवर विश्वास ठेवून तूं तें ऐकलेंसहि.

येसू, तुम्हां तरुण माणसांचें असें होतें:—तुम्ही एकादी गोष्ट करून जातां; व ती फसली असें लक्षांत आल्यावर ती सुधारण्याकरितां म्हणून दुसरी एकादी गोष्ट करतां; पण तीहि तितकीच चुकीची असते. आतां तूंच विचार कर—तीन महिन्यांची तान्ही पोर घरीं आजीपाशीं वगैरे ठेवून तूं सहासात तास बाहेर शाळेंत राहिली असतीस तर तुझें अभ्यासाचें वर्ष कदाचित् वांचलें असतें; पण त्यामुळें बिचाऱ्या पोरीची काय अवस्था झाली असती याची कल्पना आहे का? तिची खाण्यापिण्याची आबाळ व्हायची, तिचें न्हाणें—माखणें वेळचेवेळीं व्हायचें नाहीं, निजविण्या—उठविण्याची दूक संभाळली जायची नाहीं,—एक कीं दोन! सासूबाई

तिचें करणार करणार म्हणून किती करणार! त्यांनाहि त्यांचीं मुलें-बाळें आहेतच ना? भाऊ दुकानावर जायचा, तात्या ऑफिसांत जायचा, सुंदरी, कमी, बापू वगैरे शाळेंत जायचीं; दादा-अण्णा आजारी-आजारी. वहिनींचें तरी आतां वय व शक्ति पहिल्यासारखीं राहिलीं आहेत काय? त्यांनीं तरी कोणा-कोणाचें व काय काय म्हणून करावयाचें?

बाहेरचें सर्व व्यवस्थित करूं, व घरचेंहि सगळें यथास्थित पार पाडूं असें तुला वाटलें असावें. पण अशी अपेक्षा आपल्यासारख्या मध्यम स्थितींतल्या व सामान्य शक्तीच्या माणसानें कां करावी? त्यामुळें होतें काय कीं कोणतीच गोष्ट नीटपणें तडीस जात नाहीं. शाळेंतल्या कामाकडे पाहिजे तितकें लक्ष न देतां आल्यामुळें तिथें असमाधान. बरें घरीं आल्यावर तरी समाधान आहे का? पोर किरकिर करते आहे, सासुबाई स्वतः दमूनभागून नातीला तावातावानें दामटीत निजवीत आहेत, इतर मुलेंबाळें भूकभूक करीत आहेत, आण्णा-दादा तुझ्यावरचा राग कोणातरी दुसऱ्यावर काढीत आहेत, असें कांहींना कांहीं तरी चाललेलें रोज-उठून पाहावयाचें, व मग मनांत दुःखीकष्टी व्हावयाचें किंवा स्वतःचेवर चडफडा-वयाचें! तुझ्या एकटीच्या आकांक्षेचे पायीं घरांतील सर्वांच्या सुखासमाधानाला खर्चीं घालायाचें!

बरें, बाकीच्यांचें असो. तुझ्या नवऱ्याचें तरी काय? तो सुजाण आहे, तुझ्या इच्छाआकांक्षांना शक्य तों वाव देण्याची त्याची इच्छा आहे, (भाऊ माझाच पुतण्या आहे, आणि म्हणून मी त्याला चांगला म्हणतों असें समजूं नको.) हें सगळें खरें. पण तोहि अद्याप तरुण आहे. तूं पत्नी म्हणून तुझ्या संबंधींच्या त्याच्याहि कांहीं अपेक्षा असणें स्वाभाविक आहे. आणि त्या अपेक्षा तुझ्याकडून पुऱ्या होणें हें त्याच्या कर्तृत्वाच्या वाढीच्या दृष्टीनें जरूर आहे. 'त्यानें आपलें सर्व कर्तृत्व बाहेरच्या उद्योगांत दाखवावें, आपल्या धंद्याशींच त्यानें इतकें तादात्म्य पावावें-त्यांतील उत्कर्षांतच त्यानें इतका आनंद मानावा कीं घरच्या जीवनांतील आनंदाची त्याला फारशी पर्वा वाटूं नये, व त्याकरितां पत्नीवर त्यानें फारसें अवलंबून राहूं नये' असें कदाचित् तूं मनांत म्हणशील. पण असें म्हणणें वेडेपणाचें आहे. धंद्याशींच तादात्म्य पावणें, त्यांतच पूर्ण आनंद मानणें हें त्याला इतक्यांतच शक्य कसें व्हावें? धंद्यांत पुढें यायला, त्यांत खूपसा पैसा व कीर्ति मिळवायला, व त्यांच्या जोरावर सर्व सुख व आनंद प्राप्त करून घ्यायला माणसाला परिस्थितीची

अनुकूलता लागते. पैशाचें पाठबळ, पूर्वार्जित प्रसिद्धि, घरची जोड, स्वतःची बुद्धिमत्ता व धडाडी वगैरे ज्या गोष्टींचे भांडवलावर मनुष्य व्यापारांत पुढें पुढें जातो त्यांपैकीं कोणकोणत्या गोष्टी तुझ्या नवऱ्यापाशीं आहेत ? या घटकेला तरी कोणत्याच नाहींत असें, वस्तुस्थिति लक्षांत घेतां, कबूल करणें प्राप्त आहे.

दुकानाचा धंदा व त्यांतील जीवन हीं कशा प्रकारचीं आहेत याची कल्पना भाऊनें तुला कधीं दिली आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. सगळा वेळ गिऱ्हाइकाची वाट पहात बसावयाचें, जे दहा–पांच लोक येतील त्यांच्याशीं अदबीनें वागून माल व किंमती पटवून द्यावयाच्या, हुज्जत घालणारांचें मनोराधन करावयाचें, गिऱ्हाइकाला हव्या असलेल्या मालाबरोबरच त्याला नको असलेली वस्तु हळूंच त्याच्या गळीं बांधून पडून असलेल्या वाणाचा उठाव करायचा, व त्यांतच समाधान मानायचें, ‘टर्मस् कॅश्’ अशी पाटी पुरोभागीं लटकत असूनहि पुढच्या आशेनें उधार माल देऊन पैसे बुडणार तर नाहींत ना अश्या काळजींत असायचें, असलेल्या येण्याचा रिकाम्या वेळीं नुसता कागदी हिशेब करून तें लवकरच येईल अश्या आशेवर झुलत रहायचें, देण्याचा वायदा मात्र चुकतां कामा नये म्हणून पैशाचे विवंचनेंत सारखें असायचें ! त्यांतच पुन्हां लढाईची धांदल अन् मालाची तंगी यांची भर ! अश्या प्रकारचें रुक्ष, चिंतामय व आनंदहीन जिणें सामान्य दुकानदाराला जें कंठावें लागतें, तेंच तुझ्या नवऱ्याचें सध्यां तरी आहे. बाजारांत निराश आणि निरुत्साह होऊन आपण दुकान केव्हां एकदां बंद करतों, अन् घरीं आपल्या मुलांमाणसांत केव्हां जातों असें त्याला होऊन गेल्यास नवल नाहीं. पण घरीं आल्यावर त्याला कोणतें दृश्य दिसणार ? शाळेंतून आल्यावर तुला जें दिसणार तेंच ! दिवसभर तुम्ही दोघेंहि आपआपल्या उद्योगांच्या धांदलींत अन् विवंचनेंत असणार. एकमेकांना एकमेकांचीं तोंडें दिसण्याचीहि मारामार—मग बोलणें सवरणें बाजूलाच राहिलें ! सबंध दिवसाकांठीं रात्रीं काय त्या तुमच्या गांठी-भेटी व्हायच्या. अन् नेमक्या त्याच वेळीं तूं जर शिक्षणमानसशास्त्र वाचीत बसली असलीस, किंवा उदाहरणें सोडवीत अथवा पाठाचीं टांचणें करीत बसली असलीस, किंवा मुलीला मांडीवर घेऊन स्वतः पेंगत बसली असलीस, किंवा कामाच्या शिणानें मरगळून पडली असलीस, तर दोघांनीं एकमेकांशीं सुखदुःखाचीं बोलणीं बोलायचीं, परस्परांचीं सांत्वनें-समाधानें करायचीं, तारुण्योचित थट्टा-मस्करी व ‘आमोद-प्रमोद’ करायचे वगैरे ज्या कांहीं गोष्टी करावयाच्या त्या केव्हां व कश्या करावयाच्या ?

मनुष्य—स्त्री व पुरुष—दिवसभर गाढ्यावारीं ओझीं वाहतो, मरमर कष्ट करतो, निराशा-अपमान वगैरे मनस्ताप गिळतो–हें सर्व जें तो करतो तें कशाचे जोरावर? रात्रीं एकान्तांत गांठ पडली असतांना आपल्या सहचऱ्याकडून, सहकाऱ्याकडून सुख, समाधान, सहानुभूति, उत्तेजन, स्फूर्ति वगैरे मिळेल या आशेवरच ना? रात्रींच्या सहवासाचें कार्य माणसांनीं आपल्यांतील फक्त वैषयिक कामना तृप्त करणें येवढेंच नसतें, तर आपल्या मानसिक वृत्तींचेंहि समाधान व वर्धन करणें हें असतें. आणि हें कार्य–एकटया पत्नीनें पतीसंबंधीं करायाचें किंवा उलट एकटया पतीनें पत्नीसंबंधीं करायाचें असें नसून–दोघांनींहि परस्परांच्या संबंधीं करावयाचें असतें. हें एक-प्रकारचें व्रत असून तें दोघांनींहि निष्ठापूर्वक पाळावयाचें असतें. त्याचें फळ–जें कांहीं मिळावयाचें तें—दोघांनाहि सारखेंच मिळत असल्यामुळें आपण दुसऱ्या-करितां मोठा त्याग करतों आहों असें कोणालाच–एकाला वाटण्याचें कारण नाहीं. तुम्हां वायकांना नेहमीं असं वाटत असतं कीं, आपण नवऱ्याकरतां मोठा त्याग करतों आहों. तुम्ही करीत असलेल्या गोष्टींचा फायदा पुरुष स्वतःपुरतांच घेत असतील, तुम्हांलाहि देत नसतील तर तुमचें म्हणणें बरोबर होईल; आणि मग अश्या अप्पलपोट्या, स्वार्थलंपट नवरोबांना वठणीवर आणण्याकरितां बायकांनीं काडीचाहि त्याग करूं नये असें मी सुद्धां म्हणेन. पण पुरुषांनाहि जोंपर्यन्त आपल्य कर्तव्याची जाणीव आहे, व तेहि आपणांकडून तुमच्या सुखासमा-धानाला जपताहेत तोंपर्यन्त तुम्हीं स्त्रियांनीं हें त्यागाचें तुणतुणें वाजवण्यांत कांहींच हंशील नाहीं.

तेव्हां मला–सार म्हणून–तुला हें सांगायचें आहे कीं, तूं पत्नी म्हणून आपल्या नवऱ्याला आनंद दिला पाहिजेस, त्याच्या सुखदुःखाची भागीदारीण होऊन सुखाचा विहार व दुःखाचा परिहार केला पाहिजेस, निराशेचे व निरुत्साहाचे प्रसंगीं त्याला आधार व उत्तेजन देऊन त्याला कार्यप्रवण केलें पाहिजेस. आतां ज्याअर्थीं तूं लग्नच केलें आहेस आणि तुला मूलहि झालं आहे, त्याअर्थीं तुला आतां पत्नी व माता यांच्यावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या स्वीकारल्याच पाहिजेत, व त्यांनीं करा-वयाचीं कर्तव्यें पार पाडलींच पाहिजेत. आणि हें सर्व करायचें तें धर्माची, समा-जाची किंवा दुसऱ्या कोणाची आज्ञा अथवा सक्ति म्हणून करायचें असें नाहीं, किंवा केवळ दुसऱ्या कोणाच्या सुखाकरितां करायचें असेंहि नाहीं, तर तसें करण्यांत इतरांचे प्रमाणें तुलाहि सुख आहे, आनंद आहे म्हणून करावयाचें.

परवां, मुलीला खेळवीत असतांना एकदम म्हणून गेलीस–' अहाहा ! काय पण गुण ! आईच्या अभ्यासाच्या मुळावर आली आहे बया ! ' तूं हें हंसत–हंसत व लाडीक आवाजांत म्हणालीस खरी, पण या लाडाच्या बुडाशींच एक प्रकारचा राग दडलेला असला पाहिजे; नाहीं तर हें म्हणत असतांनाच तुझा चेहरा एकदम पडला नसता. शाळेचें वर्ष फुकट गेलें ही गोष्ट तुझ्या मनाला इतकी लागून राहिलेली दिसते कीं वात्सल्याच्या भरांत सुद्धां ती डोकें वर काढून तुझ्या वात्सल्यानंदाचा विरस करूं शकते ! नैसर्गिक, न्याय्य व सात्त्विक आनंदापुढें वर्ष वाचल्यानें होणारा व्यावहारिक फायदा वास्तविक किती क्षुद्र व क्षुल्लक वाटावयास पाहिजे. वर्ष वांचून वर हा आनंदहि मिळाला असता तर दुधांत साखर पडली असती हें खरें. पण वर्षाची बचत, का मुलीचें—व तदनुषंगानें सबंध कुटुंबाचें—हित असा प्रश्न जेव्हां पडतो तेव्हां पहिल्यापेक्षां दुसऱ्यालाच प्राधान्य देणें शाहाणपणाचें ठरतें.

तुला येवढें वाईट कां वाटतें याचें कारण मी समजलों आहें. तुझ्या इच्छेप्रमाणें तुला हायस्कुलांत न पाठवितां तुला ट्रेनिंगकडे धाडलें तेव्हां मींच म्हटलें होतें कीं, तीन वर्षांत तुला नोकरी लागून तूं मिळवती होशील. ' आपल्याला लवकरच नोकरी लागेल, पगार मिळेल, अन् मग आपल्याला जरा स्वतंत्रतेनें राहतां येईल ' असल्या एका गोड कल्पनेनें तुझ्या अंतःकरणाला ओझरता स्पर्श केला, व तिचे भरांत तूं ट्रेनिंगकडे जायला एकदम तयार झालीस; पण मध्यन्तरींच मुलीची धोंड तुझ्या मार्गांत आडवी आल्यामुळें ट्रेनिंगचें सर्टिफिकेट, नोकरी, पगार, आर्थिक स्वातंत्र्य वगैरे सर्वच गोष्टी गडगडल्या ! केलेले बेत अन् रचलेलीं मनोराज्यें अकल्पितरीत्या एकदमच ढासळलीं म्हणजे माणसाला–विशेषतः मानी माणसाला–फार वाईट वाटतें; आणि तुझेंहि तसेंच झालें आहे. तुला जी मीं ट्रेनिंगकडे पाठविली ती तूं पास झाल्याबरोबर नोकरी करावीस, व तावडतोबीनें प्रपंचाला मदत करावीस म्हणून नव्हे. सर्वसामान्य स्त्रियांसंबंधीं सांगावयाचें म्हणजे शिक्षण घेतल्याबरोबर त्या प्रत्यक्ष मिळवत्या झाल्या पाहिजेत अशी माझी कल्पना नाहीं. स्त्रियांना शिक्षण अवश्य पाहिजे; पण त्याचा उपयोग त्यांनीं पुरुषांप्रमाणें केवळ नोकरी मिळविण्याकरितांच केला पाहिजे–नोकरी व पैसा हेंच त्यांच्या शिक्षणाचें ध्येय असलें पाहिजे असें नाहीं. वास्तविक पाहतां पुरुषांच्या शिक्षणाचेंहि तें एकमेव ध्येय असतां कामा नये. पण अर्थोत्पादन हें एक त्यांचें आवश्यक कर्तव्य झालें असल्यामुळें, शिक्षण घ्यावयाचें तें नोकरीकरितांच

असें त्यांना वाटल्यास क्षम्य आहे. पण वायकांची गोष्ट अद्याप तरी तशी नाहीं. त्यांनीं जें शिक्षण घ्यावयाचें तें ती एक नुसती आर्थिक जरुरी आहे म्हणून न घेतां त्याचे योगानें मनाचा विकास होतो, कौटुंबिक जीवन जास्त समृद्ध, सुंदर, सुखकर व आनंदमय होतें, व त्यावरोवरच एकंदर समाजाचें राष्ट्राचेंहि हित साधतें म्हणूनच घ्यावयास पाहिजे.

तूं म्हणशीलः–'हें सर्व उच्च शिक्षणासंबंधीं ठीक आहे. पण ट्रेनिंगकडील शिक्षणाचा हेतु तरी स्त्रियांना शिकवण्याच्या धंद्याचें शिक्षण देऊन त्यांना मिळवत्या करणें हाच आहे ना? आणि मीं जर माझा अभ्यासक्रम अर्धवट सोडला तर तो हेतु कसा सफल होणार? ट्रेनिंग्कडे गेलें म्हणून उच्च शिक्षणानें प्राप्त होणाऱ्या मानसिक उन्नति, संस्कृति वगैरेंना मुकलें; व तें अर्धवट सोडावें लागणार म्हणून त्यामुळें येणारी ती तुमची अर्थोत्पादनक्षमता का कोण–तिलाहि मुकणार! 'तेल गेलं, तूप गेलं.' अशी माझी स्थिति झाली आहे!' शिक्षकाच्या धंद्याचें शिक्षण तुझें अपुरें राहिल्यामुळें तुला नोकरी व पैसे मिळणार नाहींत हें खरें. आणि या दृष्टीनें तूं तें येत्या वर्षी पुरें करावेंस असें मलाहि वाटतें. पण पूर्णपणें ट्रेंड होऊन तूं नोकरी करण्यास लायक झालीस तरी सुद्धां तूं नोकरी करावीसच असें मी म्हणणार नाहीं. सामर्थ्य किंवा शक्ति कमवून ठेवलेली असावी. पण म्हणून तिचा तावडतोबीनें –जरूर नसतांनाहि–उपयोग केलाच पाहिजे असें नाहीं. योग्य वेळीं व कारणपरत्वें उपयोगी पडण्यासारखें एक साधन हस्तगत करून ठेवलेलें असावें इतकेंच.

शिवाय असें पहा कीं, या अपुऱ्या शिक्षणाचाहि तुला 'आई' म्हणून घरच्या घरींच कितीतरी उपयोग होणार आहे. मुलांबाळांचें संगोपन शास्त्रशुद्ध रीतीनें कसें करावयाचें, त्यांचे स्वाभाविक कल, आवडी–निवडी, इच्छा–आकांक्षा वगैरे लक्षांत घेऊन तदनुसार त्यांना कसें वागवावयाचें, त्यांचें प्रत्यक्ष शालेय शिक्षण सुरू होण्या-पूर्वी त्याचा पाया म्हणून त्यांच्या इंद्रियांचा विकास कसा करावयाचा, त्यांना संवयी कोणत्या व कश्या लावावयाच्या या सर्वांचें चालचलाऊ ज्ञान तुला कॉलेजमध्यें दोन–अडीच वर्षें मिळालें आहे व त्याचा प्रत्यक्ष उपयोग करण्याची संधीहि लाभली आहे. या दोहोंचा उपयोग तूं घरच्या घरींच स्वतःचे मुलीचे व घरांतील इतर मुलांचे कामीं जर केलास तर आणखी काय पाहिजे? सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनाचें ध्येय सुगृहिणीत्व व सुमातृत्व हेंच असल्यामुळें–सुसेवकत्व हें नसल्यामुळें (मला

एकट्यालाच असें वाटतें असें नाहीं; बहुतेक विचारवंतांचें मत तसेंच आहे. ) त्या गृहिणीपदाला व मातृपदाला उपकारक ठरणारें शिक्षण जर तुला मिळालें, तर त्याचे योगानें केवळ पैसा मिळत नाहीं म्हणून वाईट वाटण्याचें तुला बिलकूल कारण नाहीं.

मानसशास्त्राचा व शिक्षणशास्त्राचा उपयोग मुलांचें संगोपन व पोषण करतांना कसा करावयाचा हें मी माझ्या 'आमच्या इंदूचें शिक्षण', या पुस्तकांत विशद केलें आहे. तूं तें पुस्तक एकदां वाचलें असलेंस तरी या दृष्टीनें पुन्हां एकदां वाच.

स्वतःच्या शिक्षणानें पैसे मिळवून तुला तुझ्या नवऱ्याच्या कमाईत कांहीं भर घालतां आली नाहीं तरी वाईट वाटण्याचें कारण नाहीं. अडाणीपणामुळें फालतू होणारा खर्च, व एरवीं स्वतःला करतां येणारीं कामें मोलाच्या नोकरांचाकरांवर टाकल्यामुळें होणारा जादा खर्च असे दोन्ही प्रकारचे खर्च तुला आतां करावे लागणार नसल्यामुळें, होणाऱ्या एकंदर खर्चांत पुष्कळच बचत होईल; व बचत हीहि एकप्रकारची कमाइच नाहीं का? परवांच, एक ओळखीचा दुकानदार फारा दिवसांनीं भेटला. मी एकंदर विचारपूस करतांना तो एकदम म्हणाला 'हल्लीं चाळीस रुपये पेन्शन मिळतें.' हा व्यापारी माणूस, याला पेन्शन–अन् तेंहि इतक्या तरुणपणीं–कुठलें असें आश्चर्य वाटून मीं त्याला त्याप्रमाणें विचारलें. हसत्या ओठांनीं पण विषण्ण मुद्रेनें तो म्हणाला 'गेलें सबंध वर्ष दुकानांत दरमहा ४० रु. खोट येत होती. तें दुकानच आतां काढून टाकल्यामुळें ती खोट येईनाशी होऊन तेवढी बचत झाली! हेंच माझें पेन्शन!' अधिकाधिक कमाई करण्याचें ज्याचें वय व कर्तृत्व त्याच्या तोंडीं बचतीची ही नामर्दपणाची भाषा चमत्कारिक व विषादकारक वाटते हें खरें. पण सर्वसामान्य स्त्रियांनीं 'आपण घरांतील खर्चांत बचत करून नवऱ्याचे मिळकतींत भर घालतों' असें मानलें तर त्यांत वरच्यासारखें कमीपणाचें किंवा खोट्या समाधानाचें असें कांहीं नाहीं. बाहेर मरमर काम करून वीस–पंचवीस रुपये मिळवायचे, व तितकेच घरीं नोकरांचाकरांवर किंवा औषधपाण्यावर जास्त खर्च करायचे हा कुठला व्यवहार? मोलीं कामें दिल्यामुळें नुसता खर्चच जास्त होतो असें नाहीं, तर त्यानें सबंध कुटुंबाचीच एक प्रकारें आबाळ होऊन त्यांत अस्थिरता व असमाधान प्राप्त होतात.

स्त्रिया मिळवत्या झाल्या पाहिजेत, त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळालें पाहिजे वगैरे म्हणण्यांत खरें तथ्य काय आहे हें तुला सांगण्यासारखें आहे; पण तें याच

पत्रांत नको. झालें एवढें विषयान्तरच पुरे झालें. बाकी म्हातारपणाची ढाल माझे-जवळ असल्यामुळें लोकांच्या हसण्यासवरण्याची भीति मला वाळगायला नको. अन् शिवाय लोक हें पत्र थोडेंच वाचणार आहेत ! तें तुला खाजगी म्हणून लिहिलें आहे हें मी विसरलोंच. एकूण बहुभाषपणा आणि विसरभोळेपणा हे म्हातारपणाचे दोन्हीहि गुण आमच्यांत येऊं लागले म्हणायचे ?

असो. पोरीचें उष्टावण थाटानें अन् आनंदानें करा. आलों तरी वाह्वा, नाहीं आलों तरी वाह्वा—

तुझा

नाना मामंजी.

# चिरंजीव भाऊस

१

*अ. आशीर्वाद, वि.*

‘चि. अप्पा, तात्या वगैरेस लांब लांब पत्रें पाठवून त्यांना उपयुक्त अश्या कांहीं कांहीं गोष्टी सांगितल्यात. एकादें पत्र मला पाठवून मला माझ्या उद्योगांत उपयोगी पडतील अश्या कांहीं गोष्टी सांगा’ असें तूं मला लिहिलेंस. माझ्या लिहिण्यांत कांहीं ऐकण्यासारखें व घेण्यासारखें असतें असें तुझ्यासारख्यांना वाटतें हें ऐकून मला किती बरें वाटलें म्हणून सांगूं? माझ्या लिहिण्याला हें एक अप्रत्यक्ष सर्टिफिकेटच नव्हे का? शिवाय कोणीं चांगलें सांगितलें असतां तुझी घेण्याची तयारी आहे हें पाहूनहि आनंद झाला. तात्या, अप्पा यांना सांगण्यासारखें माझ्या प्रत्यक्ष अनुभवाचें, किंवा वाचलें–ऐकलेलें असें थोडें–फार मला माहीत होतें. पण तुझ्या धंद्यासंबंधीं मला प्रत्यक्ष असा कांहीं अनुभवहि नाहीं, किंवा त्यासंबंधींचीं पुस्तकें वगैरेहि मीं वाचलीं नाहींत. असें असूनहि केवळ तुझी इच्छा म्हणून तुझ्या धंद्याला उपयोगी पडतील अश्या कांहीं व्यावहारिक गोष्टी सांगण्याचें मीं योजिलें आहे. तुला त्यांचा कांहीं उपयोग झाला तर पहा.

तुझें पत्र आलें त्याच दिवशीं संध्याकाळीं मी आपल्या अण्णासाहेबांकडे बसलों होतों. अण्णासाहेब ही येथील एक बडी मोठी असामी असल्यामुळें त्यांचेकडे येणारे–जाणारे बहुतेक लोकहि बडे असतात; व अशा बड्या लोकांच्या बड्या गप्पा

ऐकण्यांतहि कांहीं कांहीं वेळां मोठी मजा वाटते. शिवाय आपल्यापेक्षां कांहीं निराळ्याच जगांत गेल्यामुळें माणसाला कितीतरी निरनिराळ्या नवीन गोष्टी ऐकूं येतात, व कितीतरी निरनिराळे नवीन व्यवहार पाहायला सांपडून त्याच्या ज्ञानांतहि भर पडते. व म्हणून निरनिराळ्या प्रकारच्या वातावरणांत व निरनिराळ्या व्यवसायाच्या माणसांच्या संगतींत वावरण्याची संधि कधींकाळीं आल्यास माणसानें तिचा अवश्य फायदा घ्यावा असें मला वाटतें.

त्या दिवशीं अण्णासाहेबांकडे मुंबईच्या कोटांतला एक मोठा बडा व्यापारी आला असून तो त्यांना आपल्या गिऱ्हाइकांच्या कांहीं कांहीं मौजा सांगत होता. स्वतःच्या अनुभवांतील मौजा सांगून झाल्यावर त्यानें डेल कार्नेजीच्या पुस्तकांतून नुकतीच वाचलेली एक गोष्ट सांगण्यास सुरुवात केली. मनुष्य मोठा गोष्टीवेल्हाळ असून गोष्टींतील वर्णन असं कांहीं हुबेहूब करी कीं जसं कांहीं सगळ्या गोष्टी आपण प्रत्यक्षच पाहात आहों असं ऐकणाराला वाटावें. एक सिगरेट शिलगावून व ओठांतून सोडलेल्या धूम्रवलयांकडे अभिमानानें पाहून तो व्यापारी जराशा नाटकी भाषेंत अण्णासाहेबांना सांगूं लागला " अण्णासाहेब, गोष्टींतलीं मुख्य पात्रें दोन, बरं का—एक हुशार, व्यवहारज्ञ व समयज्ञ दुकानदार; व एक तापट पण भाबडं गिऱ्हाईक. स्थळ—न्यू यॉर्कमधील एक मोठें कापडाचें दुकान. प्रसंग असा कीं:—त्या गिऱ्हाइकानें त्या दुकानच्या शिलाई खात्यांतून एक सूट विकत घेतला होता. तो सूट त्याला इतर दृष्टया फार आवडला होता; पण कोटाची काळी कॉलर शर्टच्या पांढऱ्या शुभ्र कॉलरवर सारखी घासून तिला काळे डाग पडल्यामुळें तें गिऱ्हाईक त्यासंबंधीं तक्रार करण्याकरितां व शक्य तर तो सूट तसाच परत करण्याकरितां म्हणून आलें होतें. दुकानांतल्या ज्या नोकरापासून त्यानें तो सूट विकत घेतला होता त्याला बोलावून आणून तो आपली तक्रार सांगूं लागला—" सांगूं लागला " कसला ? सांगण्याचा प्रयत्न करूं लागला. कारण त्याचें सांगणें पुरें ऐकून घेण्यापूर्वींच त्या नोकरानें त्या गिऱ्हाइकाला थांबवून ' आजपर्यंत आम्ही असले शेंकडों सूट विकले असून कोणीहि असली तक्रार घेऊन आला नाहीं. तुम्हींच असलं पहिलं गिऱ्हाईक दिसतां ' असें उलट सांगितलें. नोकरानें प्रत्यक्ष उच्चारलेले हे शब्द तितकेसे लागण्यासारखे नसले तरी ते उच्चारतांवेळची त्याची चर्या व हातवारे अशा प्रकारचे होते कीं ' तुम्ही धडधडीत खोटें बोलतां आहां. उगीचच तुम्ही

आमच्यावर आरोप करतां आहां ' असेंच जणूं त्याला म्हणावयाचें होतें. अर्थात साध्या स्पष्टीकरणाला बाचाबाचीचें रूप येऊन शब्दानें शब्द वाढूं लागला.

हें पाहून दुसरा एक नोकर तेथें आला, व आपल्या सहकाऱ्याचा कैवार घेण्याचे हेतूनें व शिष्टाईच्या वाहाण्यानें म्हणाला " हें पहा भाऊसाहेब, जिकीर कशाला ? सगळ्याच काळ्या सुटांचा रंग पहिल्यांदा थोडाबहुत उडायचाच. आणि अजिबात न विटणाऱ्या कापडाचा सूट तुमच्या सारख्या गिऱ्हाइकाला कसा परवडणार ! मोल तसा माल, अन् दाम तसं काम ! " पहिल्याच्या उर्मटपणांत दुसऱ्याच्या खिजविण्याची भर पडून त्या गिऱ्हाइकाचें पित्त खवळलें व त्याचा चेहरा रागानें लालबुंद झाला. प्रसंग हातघाईवर येऊं नये म्हणून तो व्यापारी आतां वेळ पर्यंत दूर होता तो पुढें आला. गिऱ्हाइकानें झालेला सर्व प्रकार—त्याला जसं कांहीं कांहींच माहीत नाहीं असं समजून—इत्थंभूत सांगितला व तो म्हणाला ' तुम्हीं मला एकादा खोटा लफंगा किंवा दरिद्री चिक्कू समजतां कीं काय ? कोणता मानी मनुष्य असलीं हीं दुरुत्तरें ऐकून घेईल ? मला तो तुमचा सूटच नको. दुसऱ्या कोणाला विका, नाहींतर चुलींत घाला ! ' हे त्या गिऱ्हाइकाचे निर्वाणीचे उद्गार ऐकल्यावर त्या व्यापाऱ्यानें त्याला दादा–बाबा करून कसं शांत केलं, व पुढें काय काय करून त्याला कायमचं सुप्रसन्न करून घेतलं याचें वर्णन त्या मुंबईकर व्यापाऱ्यानें मोठें रसभरित केलें. मीं वर सांगितलेंच कीं त्याची सांगण्याची पद्धति फारच चित्ताकर्षक व मोठी विनोदी होती. माझ्यासारखा एक त्रयस्थ व तिऱ्हाइत मनुष्य तेथें होता याचेंहि भान त्याला नव्हतें.

त्या अमेरिकन् व्यापाऱ्यानें एकंदर तीन गोष्टी केल्याचें दिसतें. पहिलीं म्हणजे—आपल्या गिऱ्हाइकाचें म्हणणें अगदीं शांतपणें–मधें कांहींहि न बोलतां–सवरतां त्यानें ऐकून घेतलें. दुसरी म्हणजे, गिऱ्हाइकाचें म्हणणें खरें असून आपल्या नोकरांनीं त्याला खोट्यांत काढायला नको होतें असें त्यानें प्रामाणिकपणें कबूल केलें. त्याच्या शर्टची कॉलर खरोखरच खराब झाली असून आपल्या माणसांनीं त्याला असल्या विटक्या कापडाचा सूट द्यायला नको होता असें मान्य केलें, व गिऱ्हाइकाचा संतोष हेंच दुकानदाराचें ध्येय असलें पाहिजे याची जाणीव त्याच्याच देखत आपल्या नोकरांना देऊन असला खोटा माल गिऱ्हाइकाच्या गळ्यांत बांधतां कामा नये अशी सक्त ताकीद दिली. तिसरी गोष्ट म्हणजे—' आपण आतां सांगाल तें मी करतों; आणखी कांहीं दिवस तो सूट वापरून पहा, पहिल्या धुण्यानंतर तो रंग

उडणार नाहीं; त्यांतूनहि तो उडालाच तर सूट परत करा, व दिलेले पैसे परत घेऊन जा; किंवा सूट परत न करतांहि पैसे घेऊन गेलां तरी माझी हरकत नाहीं ' असें मोठ्या अजीजीनें सांगून त्यानें आपल्या गिऱ्हाइकाची समजूत घातली. अर्थात या तिन्ही गोष्टींचा परिणाम गिऱ्हाइकाचे मनावर व्हायचा तोच झाला. त्याचा राग नाहींसा झाला, त्यानें तो सूट तसाच परत नेला, व कांहीं दिवसांनीं ' आतां रंग उडत नाहीं ' असें मोकळेपणानें कळवून आपल्या घायकुती स्वभावाबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली. येवढेंच नव्हे तर, तेव्हांपासून तो त्या दुकानाचा कायमचा गिऱ्हाईक बनला.

' अगदीं इंडिअन् कॉमेडी झाली, खरी ? ' व्यापाऱ्याची गोष्ट सांगून झाल्यावर अण्णासाहेब एकदम उद्गारले. ' हो, झाली खरी या बाबतींत. ' असें म्हणून तो व्यापारी पुढें सांगूं लागलाः—' त्याच्या चांगूलपणाचें बक्षीस देवानें त्या व्यापाऱ्याला अगदीं हातोंहात दिलें—म्हणायचें ! असें बक्षीस मिळावें या पॉलिसीनें नव्हे, तर बक्षीस मिळणार नाहीं अशी खात्री असतांनाहि केवळ प्रिन्सिपल म्हणून प्रत्येक खऱ्या व्यापाऱ्यानें अश्याच सचोटीनें व सौजन्यानें वागलें पाहिजे; या गोष्टींतला गृहस्थ त्या दुकानाचा कायमचा गिऱ्हाईक बनला तें सोडा. आमचीं कांहीं कांहीं गिऱ्हाईकें अशीं चमत्कारिक असतात कीं आम्हीं त्यांच्याशीं अतिशय चांगलें वागल्यामुळेंच तीं लाजतात व आमचेकडे फिरकेनाशीं होतात ! पण गिऱ्हाईक तुटलें म्हणून माणुसकी सोडायची कीं काय ' ?

त्या दोघांच्या आणखीहि कांहीं गप्पा निघाल्या असत्या; पण इतक्यांत कॉफी आली म्हणून त्या थांबल्या. कॉफी पिऊन झाल्यावर तो व्यापारी दुसरी सिगरेट् ओढूं लागला, व मीहि उठण्यापूर्वीची चुळबूळ करूं लागलों. हें अण्णासाहेबांचें लक्षांत येतांच त्यांनीं त्या व्यापाऱ्याला माझी थोडीशी ओळख करून दिली; तेव्हां जरा दिलगिरीनें पाहून तो म्हणाला ' Excuse, Professor, I kept all the while talking. I hope I have not bored you. ' मीहि ' No, no, it was pleasure to hear you ' असें कांहींसें अर्धवट म्हणून व दोघांना एक नमस्कार करून तेथून निघालों.

भाऊ, त्या दोघांहि—एक अमेरिकन् व दुसरा मुंबईकर—व्यापाऱ्यांपासून कितीतरी गोष्टी घेण्यासारख्या आहेत, नाहीं ? त्यांचें तें व्यापारी कौशल्य, माणसाचें

मन खेंचून त्याला आपलासा करून घेण्याची हातोटी, चटकदार व रसभरीत वर्णन करण्याची शैली, वागण्याची गोड तऱ्हा, मनाचें सौजन्य इत्यादि गुण सर्वांनाच —विशेषतः व्यापारांत पडणाऱ्या तुझ्यासारख्या माणसाला—मार्गदर्शक व घेण्या-सारखे आहेत; आणि आपल्या या गुणांवर ते आपल्या धंद्यांत इतके मोठे व यशस्वी झाले असल्यास कांहींच नवल नाहीं. त्यांच्यांतील कितीतरी गुण घेऊन त्यांपैकीं प्रत्येकावर एक एक भाष्य करण्यासारखें आहे; पण तसें न करतां त्यांच्या उदा-हरणांवरून सुचलेल्या कांहीं साध्या गोष्टी सांगून मी हें पत्र पुरें करणार आहें.

गिऱ्हाईक वेधून घेण्याचे दृष्टीनें दुकानदारानें स्वतः स्वच्छ राहून आपला पोषाखहि स्वच्छ, नीटनेटका, व सुटसुटीत ठेवणें हें पहिलें काम होय. नीट-नेटकें व स्वच्छ राहाण्याला फारसा खर्च येतो असें नसून, अगदीं गरीब दुकान-दारालाहि तसें करतां येणें शक्य आहे. आपल्या भोंवतालच्या दुकानदारांकडे या दृष्टीनें तूं एकदां पहा. त्यांचा तो मळका, कळकळीत पोषाख, घामट अंग, बुरसटलेला चेहरा वगैरे गोष्टी पाहिल्या म्हणजेच माणसाला एक प्रकारची शिसारी वाटून त्यांच्या दुकानांत पाऊल टाकूं नयेसें वाटतें. दुकानावरील मोठमोठ्या पाट्या व आंतील भपकेदार सामानसुमान पाहूनच गिऱ्हाईक येतें असें नव्हे, तर दुकानदाराची आकर्षक मूर्ति पाहूनहि तें वरेंचसें ओढलें जातें.

स्वच्छ व नीटनेटक्या पोषाखाबरोबरच दुकानदाराची मुद्राहि नेहमीं हसतमुख असली पाहिजे. दुसऱ्याचें मन ओढून घेण्याचे कामीं सुहास्यासारखें दुसरें साधन नाहीं. (प्रो. ना. सी. फडक्यांचा सुहास्यासंबंधींचा प्रसिद्ध लेख तूं अवश्य वाच.) दुकानाला देणें असो, त्याचें असलेलें येणें येत नसो, नको असलेला माल पडून राहिलेला असो, हवा असलेला येत नसो—वगैरेसारख्या चिंता, व काळज्या कितीहि असल्या तरी दुकानदाराच्या चेहऱ्यावर त्याचा परिणाम यत्किंचितसुद्धां दिसतां कामा नये. कारण येऊं पहाणारे गिऱ्हाईकहि त्यामुळें दूर जाण्याचा संभव असतो. यासंबंधींचें एक लहानसेंच, पण तुझ्या माहितींतलें उदाहरण द्यावयाचें तर मी आपल्या मामा पाटणकराचें देईन. दुकान काढून त्याला फार दिवस झाले आहेत, किंवा त्याला त्यांत फार फायदा मिळतो आहे, किंवा त्याला फारसें देणें वगैरे नाहीं असें कांहींहि नाहीं. तरी पण माणूस कसा नेहमीं स्वच्छ, नीटनेटका, व हसतमुख दिसतो. यापेक्षां जास्त मोठें उदाहरण खादीभांडाराच्या व्यवस्थापकांचें देतां येईल. गृहस्थ, पहावे तेव्हां, हास्यपूर्वक स्वागत करायला हात जोडून उभा असतो.

याच्या उलटचें उदाहरणहि तुझ्या शेजारींच आहे. तो गबाळ व घामट पोषाख, ती माणूसघाणी दृष्टि, तो कद्रू–कंजुष स्वभाव–सर्व कांहीं और आहे! दुकानाची पायरी चढावी असें गिऱ्हाइकाला चुकून सुद्धां वाटणार नाहीं. अर्थातच अश्या माणसाची व्यापारांत कधीं फारशी भरभराट होईल असें वाटत नाहीं. असल्या प्रकारचेंच दुसरें एक ढळढळीत उदाहरण म्हणजे तुला माहीत असलेल्या एका प्रसिद्ध कारखान्याचें. देवडीवरच्या माणसापासून तों थेट मॅनेजरच्या खुर्चीवर आरूढ झालेल्या माणसापर्यन्त सर्वजण कसे गबाळ, अव्यवस्थित, मारकट दृष्टीचे व माणूसघाणे आहेत! असा संच कोठें पैदा झाला असेल कोणास ठाऊक!

दुकानदारानें गिऱ्हाइकांचें स्वागत हसतमुखानें करण्यास नेहमीं सज्ज असलें पाहिजे असें जेव्हां मी म्हणतों तेव्हां त्याचा अर्थ त्यानें लाळघोटेपणा करून त्यांच्या पुढें पुढें केलें पाहिजे असा नव्हे. आर्जवयुक्त स्वागत करतांना सुद्धां त्यानें आपला मूळचा भारदस्तपणा व मानीपणा सोडतां कामा नये. स्वागत करायला दुकानदारानें 'सज्ज असलें पाहिजे' असें मी मुद्दाम म्हणतों; कारण त्याच्या वावरण्यांत तडफ व चटचटीतपणा दिसली पाहिजेत. दुकानदार गादीवर तक्क्याशीं टेंकून बसला आहे, किंवा कधीं कधीं पाठीचा तक्क्या उश्याशीं घेऊन स्वस्थपणें लवंडला आहे असलें अळसट दृश्य दिसतां कामा नये. तसेंच त्याच्या एकंदर वृत्तींतहि कामसूपणा दिसला पाहिजे. दुकान म्हणजे कांहीं चार माणसें जमवून त्यांच्याशीं गप्पा मारीत व पान खात बसण्याचें आरामस्थान नव्हे. असल्या दुकानांत आपलें काम झटदिशीं होईल अशी खात्री वाटत नसल्यामुळें माझ्यासारख्या गिऱ्हाइकाला तरी तेथें जाणें फारसें आवडत नाहीं. दुकानदारानें गिऱ्हाइकाची थट्टा, टिंगल वगैरे–त्याच्या देखत तरी–कधींहि करतां कामा नये. एखादें फाकडसें स्त्री–गिऱ्हाईक आलें तर डोळे वेडेवांकडे करणारे, किंवा एखादे वेळीं लठ्ठ बायको व हडकुळा नवरा असें विजोड जोडपें आलें असतांना 'लॉरेल व हार्डी' आले असें आपापसांत म्हणून फिदिफिदी हसणारे चावट दुकानदार किंवा त्यांचे टारगट गुमास्ते कांहीं कमी दिसून येत नाहींत!

गिऱ्हाईक दुकानाजवळ आलें म्हणजे त्याला आंत ओढून (दंडाला धरून नव्हे) घेण्यांतहि दुकानदाराला कौशल्य दाखवावें लागतें. मीं कितीतरी दुकानदार असे पाहिले आहेत कीं गिऱ्हाईक फळीपाशीं तिष्ठत राहिलें असलें तरी ते त्याच्याकडे ढुंकूनहि पाहणार नाहींत! कांहीं दुकानांत तर 'माल घेणें असल्यासच आंत

यावें ' अशी पाटीच दारावर कायमची लटकलेली असते. ही गोष्ट केवळ काल्पनिक किंवा अतिशयोक्तीची आहे असें मुळींच नाहीं. फारा दिवसांपूर्वी बुधवारांतील एका पुस्तकाच्या दुकानावर असली पाटी होती! बिशाद काय गिऱ्हाईक दुकानाची पायरी चढून आंत येईल! निरनिराळ्या वस्तु नुसत्या हाताळून व भावाची चौकशी करून कांहीं एक विकत न घेतां परत जाणाऱ्या रिकामटेकड्या गिऱ्हाइकाला खालचेखालींच वाटेला लावणेचा त्याचा हा उपाय होता हें खरें. पण प्रथमदर्शनींच्या असल्या दवकावणीनें गिऱ्हाईक वर येईलच कशाला! असल्या पाट्यांचे ऐवजीं, हल्लीं, कांहीं कांहीं दुकानांतून 'या, वसा नमस्कार,' 'सुस्वागतम्' अशा शब्दांच्या पाट्या लटकावलेल्या दिसतात. वरच्या पाट्यांपेक्षां ह्या पाट्या पुष्कळ बऱ्या. पण त्यांच्यांतहि किती तांत्रिकपणा व तुसडी वृत्ति भरलेली आहेत! स्वतः मालकानें केलेल्या हार्दिक व हसतमुख आदरातिथ्याची सर असल्या छापील स्वागताला कधींतरी येऊं शकेल काय? 'माल चोख, पैसा रोख' अशी पाटी पाहिली म्हणजेसुद्धां कसेंसेंच वाटतें. अर्थात 'पैसा रोख' किंवा 'Terms cash' येवढ्याच शब्दांच्या पाटीपेक्षां ही पाटी अधिक चांगली. तिच्यांत निदान रोख पैशाच्या सूचनेबरोबर चोख मालाची खात्री तरी दिलेली असते. पण माल 'चोख' आहे हें नुसतें लिहून कसें भागणार? तो दाखविला पाहिजे, गिऱ्हाइकाला स्वतः पाहूं दिला पाहिजे, त्याच्या चांगूलपणाबद्दल दुकानदारानें दोन शब्द सांगायला पाहिजेत; व अशा रीतीनें गिऱ्हाइकाचें मन प्रसन्न करून घेतलें पाहिजे. 'पैसा रोख' हें धोरण सुरक्षिततेच्या दृष्टीनें ठीक असलें तरी रोखीवांचून व्यवहारच करायचा नाहीं अशी शपथ घेऊनहि चालावयाचें नाहीं. गिऱ्हाईक नेहमींचें व शहाजोग असेल तर वरील नियमाला अपवाद केला पाहिजे.

मोठमोठ्या दुकानांत तर गिऱ्हाईक नुसत्या लेखी ऑर्डरी पाठवितात; व दुकानदार त्यांप्रमाणें माल पाठवून एकंदर येण्याचा हिशेब महिनाअखेर करतात. असें करण्यांत हेतु येवढाच असतो कीं, गिऱ्हाइकाला कसल्याहि प्रकारची भगभग, दगदग किंवा जिकीर वाटूं नये, व तें नेहमीं प्रसन्न राहिलें पाहिजे. अश्या प्रकारें माल पाठवितांना वजनां–मापांबद्दल व भावाबद्दल अतिशय सचोटी बाळगावयास पाहिजे. एकदां कां एकादी चूक दिसून आली तर तें गिऱ्हाईक कायमचें तुटलें असें समजावें. अर्थात् रोखीच्या व्यवहारापेक्षां असला उधारीचा व्यवहार दुकानदाराच्या दृष्टीनें जास्त त्रासाचा व थोड्याश्या भीतीचा असतो, व त्यांत लिहिणें विनाकारण

वाढतें हें खरें; पण गिऱ्हाइकाची सोय व संतोष हेंच मुख्य ध्येय असल्यामुळें थोडीशी गैरसोय व त्रास सोसणें जरूरीचें आहे. शिवाय विश्वासानेंच विश्वास वाढत असतो हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. एकादे वेळीं बिल जास्त आकारलें गेल्याची तक्रार गिऱ्हाइक आणतें. तेव्हां एकदम त्यालाच चुकींत किंवा खोट्यांत काढण्यापूर्वी दुकानदारानें आपली वही पुन्हां पुन्हां तपासून स्वतःची खात्री करून घेतली पाहिजे. कारण गिऱ्हाइकाचें एकच खातें असल्यामुळें त्याचेंच म्हणणें खरें असण्याचा संभव जास्त असतो. उलट दुकानदाराचीं खातीं मात्र निराळीं असल्यामुळें एकाला दिलेला माल दुसऱ्याचे नांवावरच मांडला जाऊन त्याचीच चूक होण्याची भीति जास्त असते.

हें सर्व साधावयाचें म्हणजे दुकानदाराचे हिशेब मात्र अत्यंत चोख व अगदीं त्या क्षणापर्यन्त ठेवलेले ( upto date ) असले पाहिजेत. गिऱ्हाइकानें मागितल्याबरोबर जमाखर्चाचा सर्व खरडा त्याचेपुढें ठेवतां आला पाहिजे. पण हिशेबच जर का खरे नसले किंवा ते ठेवण्यांत जर का दिरंगाई झालेली असली तर वरील दुकानदाराच्या पदरीं खोटेपणा व हलगर्जीपणा आल्यावांचून राहणार नाहीं.

हिशेबाप्रमाणेंच दुसऱ्याहि एका बाबतींत दुकानदारानें सचोटीनें वागावयास पाहिजे. पुष्कळ वेळां गिऱ्हाईक आपल्या जवळच्या कांहीं कांहीं वस्तु किंवा दुकानांत घेतलेला खुद्द मालच तेथें विसरून निघून जातें. मी स्वतःच एकदां पैशाचें पाकीट व एकदां छत्री दुकानांत विसरून घरीं आलों होतों. पण आमचा दुकानदार असा प्रामाणिक कीं त्यानें त्या दोन्ही वस्तु स्वतःच्या गड्यामार्फत घरीं ( स्वतःच्या नव्हे,-माझ्या ) पाठवून दिल्या. छत्रीवर नांव तरी होतें, पण पाकिटाला तर कसलीच खूण नव्हती ! त्याच्या या प्रमाणिकपणाबद्दल मला अतिशय आनंद झाला हें सांगावयास नकोच.

पुष्कळसे दुकानदार गिऱ्हाइकानें मागितलेला मालच त्याचे पुढें ठेवतात; किंवा त्याला नक्की सांगतां आलें नाहीं तर अडून बसून नमुना आणावयास सांगतात. पण सामान्य गिऱ्हाईक इतकें जाणतें व व्यवस्थित नसल्यामुळें, आपलें अज्ञान दिसूं नये म्हणून कांहींएक न घेतांच तें तावडतोब निघून जातें. वास्तविक पहातां, गिऱ्हाइकानें एका विशिष्ट जातीचा माल मागितला असतांना सुद्धां दुकानदारानें त्याच्यापुढें तसल्याच जातीचा अनेक प्रकारचा माल आपण होऊन टाकला पाहिजे, व

निवड करण्याचे कामीं त्याला प्रामाणिकपणें मदत केली पाहिजे. गिन्हाईक फक्त एकाच प्रकारचा माल घेऊन जात असल्यामुळें बाकी राहिलेला माल पुन्हां नीटनेटका व जागचे जागीं ठेवण्यांत दुकानदाराला थोडासा त्रास पडतो हें खरें. पण येवढा त्रास सोसल्याशिवाय गिन्हाईक खूप कसें होणार? व दुकानदाराला फायदा तरी कसा होणार? तेव्हां त्रासाला कंटाळून, किंवा माल हाताळला गेल्यामुळें खराब होईल अश्या भीतीनें दुकानदारानें एकाद्या सांगकाम्याप्रमाणें व जेवढ्यास तेवढें अशा आंगचुकारपणानें वागून चालावयाचें नाहीं. दुकानदाराच्या उदार व उमद्या वृत्तीमुळें काहीं कांहीं दुकानें कशीं चांगलीं चाललेलीं दिसतात. पुण्याचें 'इंटर नॅशनल बुकसर्विस,' किंवा मुंबईचें तारापूरवाल्यांचें दुकान पहा. पुस्तकें कशीं राशीवारी पुढेंच ठेवलेलीं असतात. कोणींहि आंत जावें, पुस्तकें खुशाल चाळून पहावींत, थोडेंसें वाचीत बसायचें असलें तरीहि बसावें, असें उदार धोरण दुकानदाराचें असल्यामुळें गिन्हाईक आपोआप आकर्षिलें जातें, व मालाचा खप वाढतो. बरें इतकें सर्व करून एकाद्यानें कोणतेंच पुस्तक खरेदी केलें नाहीं तरीहि मालक आंबट चेहरा करणार नाहीं. कारण त्याला खात्री असते कीं एकदां गिन्हाईक खूप झालें कीं विक्री आज ना उद्यां व्हायचीच. तेव्हां दुकानदारानें सर्व गोष्टी दमादमानें, दिलदारपणानें व गिन्हाईकाच्या कलाकलानें घेतल्या पाहिजेत.

नेहमीं लागणाऱ्या वाणाबरोबरच कधीं काळीं लागणारा वाणहि दुकानांत ठेवला पाहिजे. त्याला खप नाहीं, तो उगीचच पडून राहतो अश्या सबबीवर तो अजिबाद न टेवून चालावयाचें नाहीं. हेतु असा कीं, कोणत्याहि गिन्हाइकाला कसल्याहि मालाबद्दल 'नाहीं' असें सांगण्याची पाळी दुकानदारावर येतां कामा नये. सर्व प्रकारचा व सर्व दर्जाचा माल येथें मिळतो अशी खात्री गिन्हाइकाला वाटली पाहिजे. आपल्या यादींतील जिनसांकरितां चार ठिकाणीं हिंडावें लागणें हें गिन्हाइकाचे जिवावर येतें; व हा त्रास चुकविण्याकरितां एकादा जिन्नस थोडासा महाग लागला तरी त्याला त्याचें फारसें वाटत नाहीं. गिन्हाइकानें मागितलेला वाण कांहीं कारणानें संग्रहीं नसला तर तो दुकानदारानें तावडतोबीनें आणून द्यावा; पण आलेलें गिन्हाईक जाऊं देऊं नये. त्यांतूनहि तो माल पुरवितां न आल्यास त्याच जातीचा दुसरा माल सुचवावा. परंतु असें करतांना योग्य ती दक्षता घ्यावी. नाहींतर रेनकोट नाहीं म्हणून ओव्हरकोट पुढें करण्यासारखा, किंवा टॉयलेट पेपर नाहीं म्हणून सँडपेपर सुचविण्यासारखा मूर्खपणाचा व हास्यास्पद प्रकार व्हावयाचा!

जास्त किंमत आकारून थोडें गिऱ्हाईक मिळविण्यापेक्षां वाजवी किंमत लावून जास्त गिऱ्हाईक संपादन करणें जास्त किफायतीचें ठरतें. तसेंच स्वतःचे फायद्याकडेच पाहण्यापेक्षां गिऱ्हाइकाचे फायद्याकडे पाहणेंहि जास्त श्रेयस्कर आहे. एकादेवेळीं गिऱ्हाईक विनाकारणच भारी किंमतीचा माल मागतें; परंतु तितकाच गुणकारी पण कमी किमतीचा दुसरा माल असल्यास तो सुचविणें हें सरळपणाचें लक्षण असून त्यायोगें गिऱ्हाईक खूष होतें. हें सर्व करीत असतांनाच देशी मालाचा शक्य तितका पुरस्कार करण्यासहि दुकानदारानें विसरतां कामा नये. कितीतरी देशी औषधें विलायती औषधांच्या तोडीचीं असतात; पण विलायती मालाची प्रसिद्धि ज्यास्त म्हणून म्हणा, किंवा ज्या अर्थी त्यांची किंमत जास्त त्या अर्थी त्यांचा गुणहि जास्त अशी समजूत असते म्हणून म्हणा, गिऱ्हाईक तसल्याच मालाची मागणी आग्रहानें करतें. अश्या प्रसंगीं गिऱ्हाइकाला सर्व गोष्टी समजावून व पटवून देण्याची जबाबदारी दुकानदारावर पडते. गिऱ्हाईक विलायती माल मागतें, तर आपणहि विलायतीच देऊन टाका, समजावून–पटवून देण्याचे भानगडींत कशाला पडा अश्या संकुचित दृष्टीच्या व आंगचुकारपणाच्या धोरणानें वागतां कामा नये. एकाद्या आडमुठ्या गिऱ्हाइकाची समजूत न पडून तें विलायतीचाच आग्रह धरून वसलें, व वदला द्यावयाच्या देशी मालाच्या गुणकारकतेबद्दल स्वतःची खात्री असली, तर वेळीं खोटें बोलूनहि देशी माल विलायती म्हणून देण्यास मागें–पुढें पाहूं नये. अशा दुराराध्य व दुर्विदग्ध गिऱ्हाइकाच्या समजुतीखातर डॉक्टर तळवलकरांना आपलीं औषधें ‘Dr. T'walkar’ अश्या इंग्रजीसारख्या दिसणाऱ्या नांवाखालीं विकावीं लागलीं असें म्हणतात.

भाऊ, आतांपर्यन्त सांगितलेल्या गोष्टी फार मोठ्या आहेत, किंवा तुला त्या अगदीं नवीन आहेत असें नाहीं. त्यांपैकीं पुष्कळश्या तुझ्या हातून न कळत होतहि असतील. पण न कळत होणाऱ्या चांगल्या गोष्टींतील चांगूलपणा कोणींतरी मुद्दाम डोळ्यांपुढें आणून दिला म्हणजे त्या आपल्याला जास्त पटतात, व त्यांचें आचरण आपण नुसतें निष्ठापूर्वकच नव्हे तर बुद्धिपूर्वक करतों; आणि म्हणून मीं त्या गोष्टींकडे तुझें लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय मोठेपणा प्राप्त व्हायला माणसाला मोठ्या गोष्टीच कराव्या लागतात असें नाहीं, तर बारीकसारीक गोष्टीहि पूर्णपणें व यथासांग केल्या तरी सुद्धां तो मिळूं शकतो. ‘Greatness lies in doing small things perfectly’ हें सुभाषितवजा

वाक्य तुझ्यासारख्यांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यासंबंधींच आणखीहि कांहीं गोष्टी सांगतां येतील, पण आतां त्या न सांगतां दुकानच्या कामाशिवाय हल्लीं तूं जें एजंटाचें किंवा अडतीचें काम घेतलें आहेस त्यासंबंधीं दोन गोष्टी सांगून मी हें पत्र पुरें करणार आहें.

दुकानदारीच्या बैठ्या कामावर समाधान न पावून तूं हल्लीं कलकत्त्याच्या 'स्वर्णमयी' शाईच्या प्रचारकाचें काम घेतलें आहेस हें फार चांगलें आहे. निरनिराळ्या ठिकाणीं करावा लागणारा प्रवास, निरनिराळ्या माणसांशीं होणारी ओळख व जडणारी मैत्री, निरनिराळ्या दर्जाच्या माणसांशीं वागतांना येणारा धोरणीपणा वगैरेमुळें तुझ्या धंद्यांत तर भर पडेलच, पण त्याशिवाय तुझ्या शहाणपणांतहि भर पडेल अशी माझी खात्री आहे. पण हें सर्व चांगल्या प्रकारें व्हायला एजंटाचे अंगीं कांहीं कांहीं गुणहि असावयास पाहिजेत. स्वतः स्वच्छ व नीटनेटकें असणें, चांगला व व्यवस्थित पोषाख करणें, वागणूक चुणचुणीत व चेहरा हसतमुख राखणें, वाणी गोड व आर्जवी ठेवणें इत्यादि वर सांगितलेले गुण तर त्याचे अंगांत पाहिजेतच; पण त्यांशिवाय त्याला माणसाची पारख, आपल्या मालाची पूर्ण माहिती, व तो गिऱ्हाइकाला पटवून देण्याकरितां लागणारें वक्तृत्त्व हींहि त्याचेपाशीं असलीं पाहिजेत.

पूर्वी ओरिएंट्ल् विमा कंपनीचे मेहेथा नांवाचे एक एजंट होते. माणूस किती आर्जवी, गोडबोल्या, हजरजबाबी, व विनोदी होता म्हणून सांगूं? सांगाल त्या वेळीं, सांगाल त्या ठिकाणीं तयार असायचा. 'नाहीं' म्हटलें तर तेवढ्यापुरतें गप्प बसून व विषयान्तर करून गिऱ्हाईक जरा खुषींत आलें म्हणजे पुन्हां मूळ पदावर यायचा. माणसाच्या आवडी-निवडी पाहून त्याप्रमाणें बोलणें काढील. वेळ-प्रसंगीं चहा देईल, सिगरेट पुढें करील. सारांश, गिऱ्हाइकाची मर्जी संभाळण्यासाठीं काय वाटेल तें करील, पण शेवटीं पॉलिसी गळ्यांत बांधील! शिवाय आठवणीचा तर इतका धड कीं, माणसाशीं एकदां झालेली ओळख, व त्याच्याशीं राहिलेलें काम जन्मांत विसरणार नाहीं! दोन-चार वर्षांनीं व कोठेंहि भेटो—"केम् नानासाब, सब् ठीक छे? इंदू तो ऑल् राईट? तिचा मॅरेज् पॉलिसी तो एकदा भरून सोडा!" असें कांहींतरी एकदम बोलून स्वारी पुढें झटकायची! भाषा कानाला जरी धेडगुजरी, मराठी—कानडी—रांगडी व चमत्कारिक लागायची, तरी बोलणाऱ्याच्या मनांतील घरगुतीपणा, इतरांबद्दलची आस्था, स्वकार्यतत्परता इत्यादिमुळें ऐकणाराच्या

मनाला आनंद व्हावयाचा! कुलकर्णी, वर्टी वगैरे बुकएजंटांचाहि हाच नमुना आहे. अशांच्या स्वार्थांत सुद्धां एकप्रकारचा परार्थ दिसून त्यांचेबद्दल गिऱ्हाइकाला आदरच वाटतो.

या दोन-तीन उदाहरणांवरून, एजंटाचे अंगीं असाव्या लागणाऱ्या गुणांची थोडीशी कल्पना तुला येईलच. त्याच्या कामांतील मुख्य कळा म्हणजे त्याला दुसऱ्याला वश करून घेतां आलें पाहिजे. आणि ही कला ज्याला एकदां साधली तो कायमचा यशस्वी झाला म्हणून समजावें. यासंबंधीं पुष्कळांनीं पुष्कळ लिहून ठेवलें आहे; तें तुला वाचायला मिळेलच असें नसल्यामुळें, त्यांतल्या महत्त्वाच्या अश्या दोन-तीन गोष्टीच थोडक्यांत सांगतों म्हणजे झालें.

( १ ) आपल्या मालाचा पुरस्कार करण्याकरितां ज्याच्याकडे जावयाचें त्याची माहिती—त्याचें सबंध नांव वा दर्जा, त्याचा धंदा व उत्पन्न, त्याच्या आवडी–निवडी, त्याचे विशेष गुण व छंद वगैरे—अगोदर करून घे. आपलेपणा एकदम उत्पन्न होण्याचे दृष्टीनें अशा माहितीचा अतिशय उपयोग होतो. परवांच एका व्याख्यानाला गेलों होतों. तेथें माझ्या शेजारींच एक काळा व धामट इसम बसला होता. त्यानें मला नांव विचारल्यावरोबर मीं नुसतें 'पटवर्धन' असें सांगितलें. त्यावर "ना. म. पटवर्धन का? अरे वा! आपलें 'आमच्या इंदूचें शिक्षण' मीं वाचलं आहे. फार सुंदर आहे बुवा!" असें तो एकदम म्हणाला. झाऽऽलें! त्याच्या धामटपणामुळें मी जो त्याच्याशीं दुरून-दुरून व जरा बांकून वागत होतों तो तावडतोब जवळ सरकलों, व त्याच्याशीं बोलूं लागलों! त्याचें डोकें किंचित् ठिकाणावर नसल्याचें मागाहून समजल्यावर आम्हां उभयतांबद्दल मला काय वाटलें ती गोष्ट निराळी! पण तेवढ्यापुरतें तरी त्यानें मला मनानें ओढून घेतलें हें खास. सबंध भाषेंत एकादा विशिष्ट शब्द आपल्याला विशेष महत्त्वाचा व आवडीचा वाटत असेल तर तो स्वतःचें नांव; आणि त्याला जरा स्पर्श झाला कीं, आपल्या मनाला जशा कांहीं गुदगुल्या होतात.

दुसऱ्याच्या आवडी–निवडी माहीत करून घेऊन त्यांपैकीं एकादी शक्य तर पुरवणें याचे योगानेंहि त्याचें मन वश होतें. मी सोलापुरास असतांना पुण्याचे आपले रामभाऊ भावे 'पाईन ॲपल' चा एक डबा घेऊन मजकडे आले. मला आवडत असलेला पदार्थच नेमका मिळाल्यावरोबर अडचण असतांहि मीं त्यांस आग्रहपूर्वक राहून घेतलें येवढेंच नव्हे, तर ते परत जातांना त्यांना मीं—कोणाला

कांहीं न देणाऱ्या मीं–सोलापुरी चिवड्याचा एक डबा घेऊन दिला. खरंच सांगतों, ते हात हालवीत आले असते तर, मला नाहीं वाटत–मीं त्यांचें इतकें आदरातिथ्य केलें असतें ! इतक्या वर्षांचा आमचा स्नेह; पण नाना नारळकर हिंगण्यास येतांना अजूनहि माझ्याकरितां ताजीं खारीं बिस्किटें घेऊन येतात. पोटाला त्रास झाला तरी मनाला प्रत्येक खेपेस नवा नवा आनंद वाटतो हें कांहीं खोटें नाहीं. 'रिक्तहस्तो न गच्छेत्' या म्हणण्यांत 'प्रत्येकाला प्रत्येक वेळीं लाच द्यावा' असा अनैतिक आदेश दिलेला नसून, त्यांत व्यवहारोपयोगी असें एक मानसशास्त्रीय तत्त्व सांगितलें आहे. गिऱ्हाइकाच्या आवडी-निवडींसंबंधीं आस्था दाखविणें याचा अर्थ आस्था नसतांही ती दाखविणें असा नव्हे. नाहीं तर तुझें करणें ढोंगीपणाचें दिसून तुझ्याबद्दल त्याचें मत चांगलें होण्याऐवजीं वाईटच होईल.

(२) गिऱ्हाइकाचे मनांत आपल्याबद्दल जास्त जास्त भरोसा उत्पन्न होऊन तो जास्त जास्त खुशींत यावा म्हणून, तूं स्वतः आपलेबद्दल फारसें न बोलतां शक्य तों त्यालाच बोलूं दे; व तो जें सांगत असेल तें लक्ष देऊन ऐक. तो स्वतः सरकारी नोकर असला तर कॉंग्रेसनें राजकारणाची कशी घाण केली आहे हें घोळून घोळून सांगेल. तो म्हातारा असला तर तरुणांच्या टारगटपणाबद्दल किंवा ते घालीत असलेल्या हैदोसधुल्ल्याबद्दल तावातावानें सांगेल. जुन्या पिढींतील वाचक असला तर फडके–माडखोलकरांच्या हल्लींच्या लिखाणाबद्दल नाक मुरडील. श्रीमंत पण चिक्कू असला तर सार्वजनिक संस्थांच्या फंडगुंडीबद्दल गाऱ्हाणें करील. किंवा यांपैकीं कशांतच त्याला गोडी वाटत नसल्यास आपण बांधलेल्या नवीन बंगल्याबद्दलच तो सारखा बोलत राहील. विषय कोणताहि असला तरी तूं त्याचें सगळें म्हणणें शांतपणें व आस्थापूर्वक ऐकून घे; म्हणजे प्रथमतः प्रतिकूल असलेला तोच मनुष्य कांहीं वेळानें तुझ्या म्हणण्याला अनुकूल होईल.

या बाबतींतला माझा स्वतःचा एक खराखुरा अनुभव सांगतों, म्हणजे तुला मी काय म्हणतों तें पटेल. मी व आपले भास्करभाऊ अखिल हिंदुस्थानांत सुप्रसिद्ध असलेल्या एका मोठ्या पुढाऱ्याकडे त्याला व्याख्यान देण्याबद्दल विनंति करण्याकरितां गेलों होतों. प्रथम त्यांनीं आम्हांला जवळ जवळ धुडकावूनच दिलें; पण भास्करभाऊंनीं जातां जातां सहज कांहींतरी बोलायचें म्हणून हल्लींच्या राजकारणासंबंधीं एक प्रश्न काढला. झाऽऽलें ! तार नेमकी छेडली गेली. जे गृहस्थ प्रथम उभ्या उभ्या बोलत होते तेच आतां खालीं बसले, व आंतून तीन कप चहा माग-

चून त्या एकाच प्रश्नासंबंधीं आमच्याशीं दोन तास बोलत राहिले. वास्तविक आम्हांला त्यांतलें फारसें समजत होतें असें नाहीं; पण आम्ही दोघेहि त्यांचें सांगणें मोठ्या समंजसपणानें व आस्थेवाईकपणें ऐकून घेत असल्यामुळें–किंवा खरें म्हणजे ऐकण्याचें बेमालूम ढोंग करीत असल्यामुळें–तो वडा गृहस्थ इतका कांहीं खुशींत आला कीं, प्रथम दिलेल्या नकाराचें विस्मरण होऊन त्यानें थोड्याच दिवसांत व्याख्यानाला यावयाचें कबूल केलें ! व जातां जातां वर आमच्या अभ्यासू वृत्तीची प्रशंसा केली ! आम्हीं मनांत योजलेलं काम सफल झालें याचें श्रेय कोणाला ? आम्हीं जी आमच्या कार्याची थोडी-फार वाखाणणी केली तिला नव्हे; तर, आम्हीं त्याचें म्हणणें पूर्णपणें व आस्थापूर्वक ऐकून घेतलें त्याला. आपण कोणी तरी मोठे आहोंत अशी जी सुप्त भावना प्रत्येक लहान-थोर माणसामध्यें थोड्याफार प्रमाणांत असते ती जागृत केली, व आपलं म्हणणं कोणीं तरी ऐकावं अशी जी त्याला इच्छा असते ती पुरविली म्हणजे आपलें काम बरेंच सोपें होतें.

गिऱ्हाइकाला स्वतःचें असें सांगायचें कांहींच उरलें नाहीं म्हणजे तो तुझ्या मालांतले दोषहि काढूं लागेल. असें झालें तरी तेवढ्यानें चिडून जाऊं नकोस, किंवा त्याचें म्हणणें खोडून टाकण्याचा प्रयत्न करूं नकोस. माणसाला जसा स्वतःच्या नांवाचा अभिमान असतो तसा स्वतःच्या मताचाहि असतो; आणि तो कोणीं डिवचलेला त्याला खपत नाहीं. अशा वेळीं त्याचे म्हणण्यांत जो कांहीं सत्यांश असेल तो मोकळेपणानें मान्य कर, किंवा तुझे म्हणण्यांत जर एकादी चूक असेल तर तीहि न लाजतां कबूल कर. त्यानें दाखविलेले दोष खरोखरींच तसे असतील तर ते दाखवून दिल्यावद्दल त्याचे आभार मान, व आपण कंपनीला कळवून ते नाहींसे करून घेण्याची खटपट करूं असें त्याला आश्वासन दे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ' सुसरीबाई तुझी पाठ किती मऊ ', किंवा 'बालात् अपि सुभाषितं ग्राह्यम् ' या नीतितत्त्वांचा अवलंब कर, म्हणजे तें खाष्ट गिऱ्हाईक बरेंच नरम येईल.

इतक्यानेंहि तुझी ब्याद टळत नाहीं असें दिसून आल्यास मालावरील आपला राग तो माणसावर काढील, व दुसऱ्या एजंटांनीं आपणांस आजपर्यन्त कसें फसविलें हें सांगून तूंहि त्यांपैकींच एक असल्याचें सुचवील. पण ही शिवी आहे असें न मानतां उलट एजंटांच्या यशस्वी कामगिरीला तें एक सर्टिफिकेटच आहे असें समज, व गड थोडक्यांतच काबीज होणार म्हणून आनंद मान. याच्याहि पुढें जाऊन तो एकादे वेळीं उद्दामपणानें तुला चालतें होण्यासहि सांगेल. पण त्याचाहि विशेष

विपाद न मानतां जातां जातांहि आपलें म्हणणें शांतपणें चालूं ठेव. अश्या प्रकारें सर्व गोष्टी गिऱ्हाइकाच्या कलाकलानें व दमादमानें घेऊन चिकाटीनें वागलास म्हणजे तुझें काम फत्ते झाल्यावांचून सहसा राहणार नाहीं. इतकें करूनहि यश नच आलें तरीहि विषाद न मानतां त्याच्याच खमंगपणाचें कौतुक करीत मनांतून हास, व 'जाना देव् ' असें म्हणत आपला मार्ग सुधार. अशा शेवटच्या प्रसंगीं विनोदच माणसाच्या उपयोगीं पडतो.

( ३ ) गिऱ्हाइकाच्या मनाचा थांग काढून व त्याच्या शंकाकुशंकांचें निरसन करून आपलें म्हणणें त्याच्या गळीं उतरविणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे हें वर सांगितलेंच. तें जितकें कुशलतेचें तितकें कठीणहि आहे. तें नीट प्रकारें साधण्याकरितां मनुष्यस्वभावाच्या ज्ञानाबरोबरच गिऱ्हाइकाला गोडी वाटत असलेल्या विषयांची चालचलाऊ माहितीहि एजंटाला असली पाहिजे. याकरितां त्यानें माणसाचें सूक्ष्म निरीक्षण तर चालूं ठेवलेंच पाहिजे, पण त्याशिवाय सर्वसामान्य ज्ञानहि पैदा करीत राहिलें पाहिजे. या दृष्टीनें त्यानें प्रचलित वाङ्मयाचें, चालू राजकारणाचें, व वर्तमान सामाजिक प्रश्नांचें वाचन ठेवणें हिताचें होईल. ज्या भागांत आपल्याला हिंडावयाचें त्यांतील लोकांची बोलभाषाहि त्याला अवगत असावयास पाहिजे. त्या त्या भाषेंत बोलतांना थोड्याबहुत चुका झाल्या तरी हरकत नाहीं. गिऱ्हाइकाला अश्या चुकांची गम्मतच वाटत असल्यामुळें तो खुषींत येण्याला त्यांनीं एकप्रकारची मदतच होत असते. आपलें म्हणणें त्याला पटवून देण्याकरितां स्पष्ट आवाज, योग्य मुद्रा, साजेसा अभिनय, समाधानी व विनोदी वृत्ति इत्यादींचा अवलंब कर.

ज्या मालाचा तूं प्रचार करीत असशील त्याची खडान्‌खडा माहिती तुला स्वतःला असावयास पाहिजे. तो कोठें होतो, कसा होतो, कोण करतो, त्याच्या सारखाच दुसरा माल कोणता आहे, त्याच्यांत व तुझ्या मालांत गुण-दोषाचे दृष्टीनें फरक काय आहे, तो घेण्यापेक्षां तुझाच माल घेण्यांत गिऱ्हाइकाचा जास्त फायदा कसा आहे वगैरे सर्व गोष्टी तुला स्वतःला माहीत असून त्या तुला गिऱ्हाइकाला पटवूनहि देतां आल्या पाहिजेत. एकादी गोष्ट कितीहि स्वयंसिद्ध असली तरी तिचा नुसत्या तोंडानें सांगून व कानानें ऐकवून फारसा परिणाम होत नाहीं, तर तिचें प्रत्यक्षीकरण करावें लागतें. तिची सत्यता व उपयुक्तता गिऱ्हाइकाचे डोळ्यांत व डोळ्यावाटें डोक्यांत भरवावी लागते. या दृष्टीनें आपल्या मालाचा आतांपर्यन्तचा खप कसा वाढत आहे हें सालोसालचे आंकडे, ग्राफ, तक्ते वगैरे देऊन गिऱ्हाइकाला पट-

वलें पाहिजे. यांनाच चित्रांची जोड दिल्यास अधिक चांगलें. तुकारामाचा एक मोठा लाकडी पुतळा गाड्यावरून फिरवून व त्यायोगें लोकांचें लक्ष वेधून तो बोलपट जितका लोकप्रिय झाला तितका कांहीं नुसत्या जाहिरातींनीं झाला नसेल हें खास. अर्थात नुसत्या जाहिरातींनीं व चित्रांनींच सर्व काम झालें असें नाहीं. मूळ बोलपटांत तसेच चांगले गुण आहेत म्हणून तो इतका यशस्वी झाला हेंहि खरें आहे; व या दृष्टीनें आपला मालच शक्य तों निर्दोष, चोख, व शहाजोग ठेवणें व अशयाच मालाचा पुरस्कार करणें हेंच चांगलें. माणसाचा खून अन् मालांचा गुण केव्हांना केव्हां उघडकीस यावयाचाच; पण तोंपर्यन्त तरी या प्रत्यक्षीकरणाचा उपयोग अतिशय होतो यांत शंका नाहीं.

भाऊ, मला सांगायचें होतें तें सांगून झालें आहे. तेव्हां जास्त न वाढवितां शेवटीं इतकेंच सांगतों कीं, स्वतःचा माल चोख ठेव, मनुष्यस्वभावाचा अभ्यास करून गिऱ्हाइकाला खूष ठेव, व योग्य प्रकारची जाहिरात करून आपलें म्हणणें गिऱ्हाइकाला पटवून दे, म्हणजे तुझें हें नवीन घेतलेलें एजंटाचें कामहि चांगल्या प्रकारें चालेल. दुकानदारी यशस्वी रीतीनें कशी करावी यासंबंधींची व्यावहारिक माहिती किर्लोस्कर मासिकांत अधून-मधून येत असते; ती व त्यांनींच प्रसिद्ध केलेलीं ‘यशस्वी धंद्याचा मार्ग’, ‘व्यापाराचें व्याकरण’ वगैरे पुस्तकें तूं अवश्य वाच. शिवाय त्यांनींच प्रचारिलेल्या ‘उद्यम’, ‘उत्साह’ वगैरे ध्येय शब्दांचा अवलंब कर; म्हणजे तुझाहि ‘उत्कर्ष’ व्हावयास फारसा उशीर लागणार नाहीं. कळावें हे आशीर्वाद.

तुझा
नाना काका.

## ‘आराम’ क्लबाच्या सभासदांस— १०

*सा. न. वि. वि.*

महिन्या–दीड महिन्या पूर्वीची गोष्ट असेल. ‘वृद्धाश्रमा’च्या सभासदांना उद्देशून लिहिलेलें माझें पत्र मीं तुम्हांला वाचून दाखविल्यावर त्यासंबंधीं आपण सर्वांनीं बरीच चर्चा केली. ती चालू असतांना अर्धवट थट्टेनें–अर्धवट गंभीरतेनें व्यक्त झालेले एकमेकांचे अनुकूल—प्रतिकूल शेरे ऐकावयास सांपडून आपणां सर्वांनाच फार मजा वाटली. चर्चा आटोपून उठतां उठतां “ नानासाहेब, तुम्हांला मनुष्यस्वभावाची बरीच पारख दिसते; आपल्या क्लबांतील मेंबरांच्या स्वभावासंबंधींहि कांहीं सांगा कीं–आपली एक गम्मत म्हणून ” असें आपल्या डॉ. केरेकरांनीं सुचविलें, व तुम्हीं बाकीच्यांनीं त्यांच्या त्या सूचनेला जोराचा दुजोरा दिलात. त्यावेळीं मी ती गोष्ट हसण्यावारीं नेऊन कांहीं बोललों नाहीं हें खरें; पण त्यांच्या त्या सूचनेनें माझे मनांत मूळ धरून आपण खरोखरच अश्या प्रकारचें कांहीं सांगावें असें मला वाटूं लागलें होतें. परंतु मधेंच इकडे निघून यावें लागल्यामुळें सांगायचें तसेंच राहून गेलें. काल क्लबाच्या आइस्क्रीम पार्टीचें तुमचें बोलावणें आल्याबरोबर डॉक्टरांच्या सूचनेनें डोकें पुन्हां वर काढलें, व आलेल्या संधीचा फायदा घेऊन मीं सांगावयाचेंहि ठरविलें. पण आतां कांहीं कारणांनीं मला प्रत्यक्ष हजर राहतां येत नसल्यामुळें, व माझी अनुपस्थिति ऊर्फ गैरहजेरी तुम्हांस जाणवूं नये या हेतूनें तोंडी सांगायाचें म्हणून जें कांहीं योजिलें होतें तें मी आतां लिहून कळवीत आहें. आईस्क्रीम खातां खातां

तें वाचा, म्हणजे तुमच्या गप्पागोष्टींत व हशांत कदाचित आणखी भर पडेल. मात्र हें बोलून चालून 'परिहास विजल्पित' आहे असें समजून त्यांत कांहीं बोचण्यासारखें असल्यास तें कोणींहि 'परमार्थेन' घेऊं नये अशी मी आपणांस प्रथमच विनंति करतों.

पहिल्यांदा आपले डॉ. केरेकरच घ्या. त्यांचें वर्णन अगदीं थोडक्यांत करायचें म्हणजे मी त्यांना 'ए चार्मिंग् डॉक्टर' असें म्हणेन. डॉक्टर म्हणून ते आपल्या धंद्यांत मोठे निष्णात–प्रति भडकमकर–आहेत असें नाहीं. त्यांचेपेक्षां जास्त कुशल व हुशार डॉक्टर कितीतरी असतील. पण आपल्या गोड वाणीनें, प्रेमळ वागणुकीनें व रोगी सांगत असलेल्या सर्व गोष्टी शांतपणें व सहानुभूतिपूर्वक ऐकून घेण्याच्या गुणानें ते रोग्याच्या मनावर अशी कांहीं छाप बसवितात कीं प्रत्येक रोग्याला हेच डॉक्टर हवेसे वाटतात. ते डॉ. जोश्यांसारखे घुम्मे नाहींत, किंवा त्यांच्या बंधुराजांप्रमाणें बलबल बोलणारेहि नाहींत. डॉ. कामासारख्या हुशार पण तिरसिंगराव डॉक्टराचे हातून बरें होण्यापेक्षां डॉ. केरेकरांचे हातून एकादे वेळीं मरण आलेलें परवडलें असें म्हणणारे कितीतरी रोगी आहेत!

डॉक्टराची सहानुभूति नुसती कोरडी व बोलण्यापुरतीच नसते. गरीबगुरिबांकडून ते इतरांचे मानानें कमी फी घेतील, व आडलेल्या–नाडलेल्यांना तर ते फुकटहि औषधपाणी देतील. मात्र आपल्या डॉ. देवांप्रमाणें ते भोळसरपणानें फसलेहि जाणार नाहींत. डॉक्टर म्हणून जसे ते लोकप्रिय आहेत तसेच इतर दृष्टींनींहि ते लोकांना हवेहवेसे वाटतात. त्यांच्या दिसण्यांत, व बोलण्या–चालण्यांत एक प्रकारची ऐट, मोहकता किंवा 'चार्म' आहे. ही मोहकता केवळ सुरूपतेमुळें त्यांना प्राप्त झाली आहे असें नाहीं. तसं असतं तर आपले नटवरलाल गांधी डॉक्टरांपेक्षांहि जास्त मोहक वाटले असते. डाक्टरांच्या वागण्यांत एक प्रकारचा गोडवा व सरळपणा असून त्यांचा स्वभाव उमदा व मनमिळाऊ आहे. वादाचा कोणताहि प्रश्न असो ते त्यांतून मोठ्या समंजसपणानें तोड काढतील व सर्वांनाच मिळतें घेण्यास लावतील. ते स्वतः नेहमीं खुशींत व आनंदांत राहून इतरांनाहि खूष व आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारच्या गोड व मनमिळाऊ स्वभावामुळेंच डॉक्टर आपणां सर्वांना प्रिय व आदरणीय झाले असून आपल्या क्लबांत जें ऐक्य, जी गोडी व जो आनंद नांदत आहेत त्याचें बरेंचसें श्रेय त्यांना आहे.

आतां आपले एंजिनअर बरवे घेऊं. बापुसाहेबांचें वर्णन मी ' A man of taste ' असें करीन. त्यांच्या वागणुकींत सदभिरुचि व औचित्य हीं विशेष रीतीनें दिसून येतात. पुष्कळश्या कलावंतांना अभिरुचि व सौंदर्यासक्ति असते. पण ही सौंदर्यासक्ति त्यांच्या कलाविषयांपुरतीच असून ती त्यांच्या एकंदर वागण्यांत दिसेलच असें नाहीं. उलट ते स्वयंमन्य, घमेंडखोर व इतरांना तुच्छ लेखणारे असे असतात. वागणुकींतील कलात्मकता अंगीं येण्यास मनुष्य नुसता सौंदर्यास्वादक, व भावनाक्षम असून चालत नाहीं, तर तो विचारशील, विवेकशील व संयमशील असावा लागतो. डॉ. केरेकरांच्या चेहऱ्यावरचें प्रसन्नत्त्व व वागण्यांतील प्रेमळपणाची ऊब बापूसाहेब बरव्यांमध्यें दिसून येणार नाहींत. ते त्यांचेपेक्षां वृत्तीनें जास्त थंड, कमी उत्साही असून त्यांचें बोलणें–चालणें डॉक्टरांइतकें भावनोत्कट व आवेशयुक्त नसतें; पण अघळपघळपणाचे भरांत डॉक्टरांचे वागण्यांत एखादी चूक होण्याची जशी भीति असते तशी बापूसाहेबांचे बाबतींत नसते. त्यांची प्रत्येक कृति निवडक व वेंचक असते. ते लोकांवर उपकार करतील पण त्याला न जाणवूं देतां करतील. त्यांचेपाशीं एखादी गोष्ट उसनी मागायला माणसाला अवघड वाटत नाहीं. आप्तेष्टां-कडून कधींकाळीं स्वतःला पैसे उसने घ्यावे लागलेच तर ते घेतांना व्याजाचा दर ठरवून ' आपण व्यवहाराला मोठे सरळ आहोंत ' असें मुद्दाम दाखविणार नाहींत, व नात्यांत किंवा मैत्रींत व्यत्त्यय आणणार नाहींत; पण आपली कृतज्ञता अन्य रीतीनें व्यक्त केल्यावांचूनहि राहणार नाहींत. क्लबासाठीं देणग्या मिळवितांना लहान-थोर अशा सर्वच देणगीदारांचे आभार ते सारख्याच प्रमाणांत मानतील;—कमी देणारांचे कमी व जास्त देणारांचे जास्त—अशी हिशेबी वृत्ति दाखविणार नाहींत. नोटेची मोड घेतांना ते रुपायान्–रुपाया मोजून व वाजवून घेणार नाहींत, तर मोड देणाऱ्या माणसावर पूर्ण विश्वास ठेवून सर्व रुपये एकदम खिशांत घालतील. ( आणि एखादे वेळीं एखादा रुपाया खोटा लागलाच तर मागाहून स्वतःशींच चुळबूळ करीत बसतील ! ) मोटारींत बसतांना ते दुसऱ्याला अगोदर चढूं देतील, व स्वतःची मोटार म्हणून स्वतःच ऐसपैस बसून दुसऱ्याला संकोचांत ( शरीरानें व मनानें ) पाडणार नाहींत.

बापूसाहेब एकदां आमचे घरीं आले असतां आमचे काका व्हरंड्याच्या पायरी-वरच बसून कांहीं काम करीत होते. काकांनीं गड्याकडून खुर्ची देवविली असतांहि पोषाखाच्या स्वच्छतेविषयीं व नीटनेटकेपणासंबंधीं नेहमीं दक्ष असलेले बापूसाहेब

काकांच्या शेजारींच पायरीवर बसले, व काकांनीं पुढें केलेली साधी खाकी विडी ओढूं लागले. सेव्हन्–सेव्हन्–सेव्हन् किंवा फाइव्ह्, फाइव्ह्, फाइव्ह् सारख्या हायक्लास सिगरेटच्या शौकाबद्दल प्रसिद्ध असलेल्या बापुसाहेबांचे तोंडांत ती गांवठी विडीच त्या वेळीं किती शोभून दिसत होती म्हणून सांगूं? सांगायचा मुद्दा असा कीं, वेळप्रसंगीं ते सौंदर्याकडे व अभिजात अभिरुचीकडे दुर्लक्ष करतील, पण सौजन्याची हेळसांड कधींहि करणार नाहींत. कलात्मक सदभिरुचि नेहमींच्या वागणुकींत उतरली म्हणजेच त्याला आपण सौजन्य म्हणतों. सौजन्य म्हणजे वागणुकींतील सौंदर्य, व तें सौंदर्य बापूसाहेबांत पुरेपूर असल्यामुळें आपणांस त्यांचेबद्दल इतका आदर वाटतो.

आतां आपले तिसरे सभासद हिराचंद शेठजी घ्या. शेठसाहेबांना मी ‘ A man of tact ’ असें म्हणेन. आज ते शेंकडों कामगार असलेली एक मोठी गिरणी चालवीत आहेत. दुसरीकडे संप होवोत नाहीं तर हरताळ पडोत–यांच्या गिरणीचें काम मात्र अहोरात्र, विनबोभाट व सुरळीत चाललें आहे. त्यांच्यांतील या टॅक्टचा किंवा शिताफीचा प्रत्यय आपणांपैकीं प्रत्येकाला बारीकसारीक बाबतींतहि येतो. त्यांनीं गेल्या वर्षींच आपल्या क्लबाला जागा किती शिताफीनें मिळवून दिली! मालकालाहि खूष केला अन् सौदाहि स्वस्तांत साधला. प्रथमतः मालक कबूल होईना, तेव्हां शेठजींनीं थोडेंसें कठोर होऊन ओढून धरलें; पण मागाहून तो नरमाईवर आल्याबरोबर हेहि नरम झाले, व त्वयार्धं मयार्धं करून यांनीं आपलें कार्य साधलें! व्यवहारज्ञान, मनुष्यस्वभावाची पारख, कोणत्याहि गोष्टीचा घोळ न घालतां ती तावडतोब समजून घेऊन निकालांत काढायला लागणारें बुद्धिचापल्य, कोणत्याहि गोष्टीकडे दुसऱ्याच्या दृष्टीनें पाहतां येण्याला व त्याच्या अडचणी लक्षांत घेण्याला लागणारी सहानुभूति. मनाचा खंबीरपणा, आत्मविश्वास, दिलदार वागणूक इत्यादि गुणांचे जोरावरच हिराचंद शेठजींनीं आपल्या धंद्यांत येवढें यश संपादन केलें आहे. गाडीवानाला आपली गाडी योग्य मार्गानें नेतांना घोडयांना नुसतें पुढें पुढें दामटून चालत नाहीं, तर लगाम कधीं मागें खेचून–तर कधीं सैल सोडून, कधीं फटकारून तर कधीं चुचकारून, आस्ते आस्ते पुढें न्यावें लागतें. गिरणीसारखें सांघिक कार्य सुद्धां इतरांना तंत्रांत ठेवून व वेळप्रसंगीं स्वतः त्यांच्या तंत्रानें घेऊन शेठजींना करवून घ्यावें लागतें. शेठजींसारख्या कर्तृत्ववान माणसाचे हातांत तरवार असते, पण ती तो मखमली म्यान्यांत ठेवीत असून तिचा वार क्वचित् प्रसंगींच–व तोहि

अत्यन्त हळूवारपणानें तो करतो. तो स्वभावानें नुसता साधू नसून कार्यसाधू असतो; अर्थात् आपलें कार्य साधतांना त्याला सत्यासत्याचा, न्याय्यान्याय्याचा विचार प्रत्येक वेळीं काटेकोरपणानें करतां येईलच असें नाहीं; पण नुसत्या अधिकाराच्या जोरावर व केवळ हडेलहप्पीच्या धोरणानें तो आपला कारभार करतो असेंहि नाहीं.

आपले मारूळकर हेडमास्तर हेहि शेठजींची एक लहानशी प्रतिमाच आहेत म्हणाना. या टॅक्टच्या गुणावरच त्यांचीहि राजवट अत्यंत यशस्वी, व विद्यार्थी-शिक्षक वगैरेंना अत्यंत सुखावह झाली. डॉक्टरांचा गोडवेपणा व बापूसाहेबांचें सौजन्य या गुणांची त्यांच्या कर्तृत्वाला जोड मिळाल्यामुळें हेडमास्तरसाहेबांनीं जनता व सरकार या दोघांकडूनहि कशी धन्यता मिळविली हें त्यांना परवां पालकांनीं दिलेल्या मानपत्राचे प्रसंगीं चांगलेंच दिसून आलें.

आतां आपल्या क्लबाचे अध्यक्ष—बाबासाहेब सुखात्मे घेऊं. कोणत्याहि संस्थेच्या अध्यक्षामध्यें असावा लागणारा पोक्तपणा व शहाणपणा बाबासाहेबांत भरपूर असल्या-मुळें क्लबाचें कार्य कसें सुयंत्रित व भरभराटीचें चाललें आहे. ते एकाकाळीं न्याया-धीश असल्यामुळें त्यांचेमध्यें न्यायशीलता व न्यायप्रियता तर आहेच, पण तिच्यांतच विस्तृत व विविध अनुभवांची भर पडल्यामुळें बाबासाहेबांचे स्वभावांत एक प्रकारचा समधातपणा व समतोलपणा आला आहे. त्यांनीं जीवनाकडे प्रेक्षकाच्या तटस्थ भूमिकेनेंच पाहिलें असें नसून त्यांत त्यांनीं मनानें व कृतीनें भाग घेतला आहे, व त्यांतील सुखदुःखांचा गोडकडूपणा जो काय चाखावा लागला तो प्रत्यक्ष चाखला आहे. थोरला मुलगा कर्तासवरता निघून वडिलांच्या कीर्तींत भर घालीत आहे याचा जसा त्यांना आनंद होत असतो, तसाच दुसरा मुलगा हातींतोंडीं येऊन अकस्मात गेल्याचें व एक मुलगी घरीं आल्याचें दुःखहि त्यांना पचवितां येतें. सुखदुःखें, लाभालाभ, जयाजय हीं सर्व सारखींच लेखून त्यांनीं आपल्या शांत व आनंदी वृत्तींत कधीं खंड पडूं दिलेला नाहीं. कोणीहि कसलेंहि सत्कार्य काढो हे त्याला आशीर्वाद व मदत द्यावयाला एका पायावर तयार असतात. प्रो. विचाऱ्यांप्रमाणें ते पुस्तकी ज्ञानांत किंवा तात्त्विक विचारांतच गढून जात नसल्यामुळें ते प्रोफेसर-साहेबांप्रमाणें स्वयंस्थित, स्वयंसंतुष्ट, एकमार्गी व एकरुली झाले नाहीत. आपल्या-सारख्या सामान्य माणसांप्रमाणें ते सुखदुःखांशीं व रागलोभांशीं समरस होऊं शक-तात, व तेवढे प्रसंग निभावले म्हणजे पुन्हां आपल्या मूळच्या साम्यावस्थेप्रत पोचूं शकतात. अशा रीतीनें सर्व प्रकारच्या द्वंद्वांचे अतीत होण्याची पात्रता त्यांचेमध्यें

असल्यामुळें त्यांना योग्याची विरक्ति व स्थितप्रज्ञाची शांति लाधली आहे. पंधरा वर्षांपूर्वी आपण त्यांचा एकसष्ठावा वाढदिवस साजरा केला, पांच–सहा वर्षांनीं त्यांचा एक्याऐंशीवा वाढदिवस साजरा करण्याचें भाग्य क्लबाला लाधो अशी इच्छा आहे.

बाबासाहेबांची सर्व–संग्राहक वृत्ति व मनमिळाऊपणा उत्कटत्वानें दाखविण्याकरितांच एकमार्गी व एककल्ली अशा प्रो. विचाऱ्यांचें उदाहरण घेतलें खरें; पण तो दोष सोडल्यास प्रो. विचारे हीहि एक वरच्या दर्जाची व्यक्ति आहे, यांत शंका नाहीं. एकदां ते प्रोफेसर झाले म्हणजे मग ते विद्यार्थी राहात नाहींत असा प्रवाद पुष्कळश्या प्रोफेसरांबावत ऐकूं येतो. पण आपले विचारे या प्रवादाला अपवाद असून त्यांच्या व्यासंगीपणाबद्दल त्यांच्या विद्यार्थ्यांना व आपणा सर्वांनाहि नितान्त आदर आहे. या व्यासंगीपणामुळेंच कदाचित् ते प्रथम एकमार्गी व पुढें पुढें एककल्ली झाले असावेत. वास्तविक मनुष्य जात्या फार प्रेमळ व माणसाचा शोकी आहे. शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मुलांबाळांसंबंधीं तर इतकी आवड कीं त्यांना घरीं मुद्दाम बोलावून व खाऊ खेळणीं वगैरे देऊन त्यांचें कौतुक करील. पण त्यांचा कायमचा पाश लागून आपल्या व्यासंगांत व्यत्यय येऊं नये म्हणूनच कीं काय गृहस्थ कायमचा अविवाहित राहिला आहे. ते रोज क्लबांत येतील, पण ठरलेल्या मिनिटाला व ठराविक वेळेपुरतेच येतील; व आले तरी गप्पा वगैरे न मारतां कांहींतरी वाचीत बसतील. पण अशींहि कांहीं व्यासंगी माणसें जगांत हवींतच. एरवीं ज्या विषयाचा त्यांचा व्यासंग असतो त्यांत भर तरी कशी पडली असती? ते क्लबांत थोडा वेळ तरी येतात हाच त्यांचा चांगूलपणा असून त्यांच्या सारखा व्यासंगी व विद्वान् आपल्या क्लबाचा सभासद आहे यांतच आपल्याला भूषण वाटलें पाहिजे.

आतां आपले रावसाहेब विनीत घेऊं. नांव ‘ विनीत ’ पण गृहस्थ जात्या जरा जादा शिष्टच आहे. त्यांच्या पाठीमागें कांहीं लोक त्यांना ‘ भंपकराव ’ म्हणतात तें अगदींच अयथार्थ आहे असें नाहीं. विचाऱ्याच्या तोंडांत नेहमीं मोठमोठ्यांचीं नांवें असतात. “ आतां भोरकरांकडे गेलों होतों, तेथें सांगलीकरांचा निरोप समजला कीं उद्यां कसंही करून भेटून जा. लेडी लमलींनीं वारफंडाकरितां एक कॉन्सर्ट करावयाचें योजिलें असून त्यांनीं दोन तिकिटें–एक स्वतःकरितां व एक घरच्या ‘ हं हं ’ करितां–पाठविलीं आहेत ” अश्या प्रकारचें कांहींना कांहीं बडं बोलत स्वतःच्या वढाईची जाहिरात ते सारखे करीत असतात. स्वारी सर्व सभा-समारंभांना न चुकतां

जाईल; पण ठराविक वेळेपेक्षां जरा उशीरां जाईल; व सर्वांच्या पुढून, चवड्यावर चालत, मान लववीत, तोंडानें एक्स्क्यूज म्हणत म्हणत थेट डायसवर जाऊन बसेल, व अध्यक्षांची दृष्टि साधून नमस्कार करील. व्याख्यानाकडे आपलें लक्ष असून व्याख्यात्याचें म्हणणें आपणांला पटतें आहे असें दाखविण्याकरितां इतर सर्व जांभया देत असतांना मध्येंच ' हिअर हिअर ' करील, व विशेष कांहीं सांगायाचें नसलें तरी उपवक्ता म्हणून थोडें तरी बोलेल ! येवढा एक अप्रयोजकपणा व भंपकपणा सोडला म्हणजे मनुष्य एरवीं मोठा सरळ मनाचा व उपकारी वृत्तीचा आहे.

आतां आपले ' औदार्य-सिंधु ', श्रीमन्त राजेसाहेब इनामदार घ्या. राजेसाहेबांचें व्यक्तिमत्व संमिश्र स्वरूपाचें असून त्याचें यथातथ्य चित्रण करणें बरेंच कठीण आहे. हे मोठे धर्मशील व भाविक आहेत. हे शिरडीच्या साईमहाराजांचे उपासक असून पंढरपूरची वारीहि यांची सहसा चुकत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी, नाशिकला आचार्यपूजेचे प्रसंगीं पांचशें एक रुपयांची गुरुदक्षिणा अर्पण करून व अन्य प्रकारेंहि त्यांनीं मठाला मोठी मदत केली. अर्थात् ' श्रीं ' नीं प्रसन्न होऊन राजेसाहेबांना ' औदार्य- सिंधु ' अशी पदवी दिली, व त्यांनींहि ती प्रसाद म्हणून शिरोधार्य केली. दोन वर्षांपूर्वी तेथील शिक्षणसंस्थेच्या वार्षिक समारंभाचे प्रसंगीं आपली दहा एकर जमीन संस्थेला दिल्याचें त्यांनीं अध्यक्षपदावरून घोषित केलें. नुकतेंच त्यांनीं वारफंडाला दहा हजार व सोल्जर्स कंफर्ट फंडाला तीन हजार अश्या दोन देणग्या दिल्या.

या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे राजेसाहेबांचें दातृत्व किती मोठें व विविध प्रकारचें आहे याची कल्पना कोणालाहि सहज करतां येईल. हा सर्व पैसा त्यांनीं हरीच्या इतर लालांप्रमाणें शर्यतींत, जुगारांत किंवा दुसऱ्या एकाद्या व्यसनांत उधळून टाकला असता तरीहि चालण्यासारखें होतें; परंतु तो तसा खर्च न करतां त्यांनीं त्याचा विनियोग धार्मिक व सार्वजनिक कामांत केला यावरून त्यांची दानशूरता दिसून येते यांत शंकाच नाहीं; व त्यांच्या या गुणावर लुब्ध होऊन श्रीमत् आचार्यांनीं त्यांना ' औदार्य–सिंधु 'चे ऐवजीं ' दानशूर ' अशी पदवी दिली असती तर ती त्यांस अधिक शोभली असती असें मला वाटतें. राजेसाहेब सामान्यतः धार्मिक वृत्तीचे व उदार अंतःकरणाचे समजले जातात. पण खऱ्या धार्मिकतेंत व औदार्यांत दिसून येणारे त्याग, संयम, दया वगैरे गुण राजेसाहेबांत कितपत आहेत ? असा एक प्रश्न बारकाईनें पहाणारांच्या मनांत डोकावल्यावांचून रहात

नाहीं. धर्मश्रद्ध माणूस खाद्यपेयाचे बाबतींत विधिनिषेध बाळगतो, व त्याच्या वागणुकींत एक प्रकारचा संयम दिसून येतो. उलट राजेसाहेब गव्हर्नमेंट हाऊस-वरील पार्टीचे प्रसंगीं टेबलावरील सर्व खाद्यपेय वस्तूंचा इतर सहकाऱ्यांच्या बरोबरीनें यथेच्छ समाचार घेऊं शकतात असें म्हणतात. आपल्या धार्मिकतेचें प्रदर्शन होऊं नये, किंवा तें असभ्यतेचें दिसूं नये म्हणूनहि ते तसे वागत असतील, नाहीं असें नाहीं.

वारफंडाला व सोल्जर्स कंफर्ट फंडाला राजेसाहेबांनीं नुकत्याच ज्या देणग्या दिल्या त्याबद्दल सरकारनें त्यांना एक चांदीचें पदक देऊन त्यांचा गौरव केला. आपल्या क्लबातर्फेंहि त्यांचें अभिनंदन करावें असा एक बूट निघाला होता; पण कांहीं सभासदांनीं विरोध केल्यामुळें अभिनंदन करण्याचें तसेंच राहून गेलें. त्यावेळीं आपल्या 'निर्भीडराव चक्रम्'नीं बाबासाहेबांचे देखत व खुद्द राजेसाहेबांच्या तोंडावर असें स्पष्टच बोलून दाखविलें कीं " यांचें अभिनंदन कशाकरितां करायचं? इतर ठिकाणीं मोठमोठ्या देणग्या देऊन औदार्याचें श्रेय उपटणारे हेच गृहस्थ क्लबाची नेहमींची वर्गणी देतांनाहि आळंटाळं करतात, व गड्या–माणसांना दिवाळी शिमग्या-सारख्या प्रसंगीं आठ–चार आण्याचें पोस्त द्यावयालाहि खळखळ करतात. चीन--दुष्काळ फंडाला मुक्त हस्तानें मदत करणारे राजेसाहेबच स्वतःच्या कुळांना कर्ज-फेडीचे वेळीं एका पै–पैशाचीहि सूट देत नाहींत! यांना शिक्षणाचें खरें प्रेम आहे असें म्हणावें तर तेंहि दिसत नाहीं. संस्थेला यांनीं देणगी दिली ती त्यांना पैशाचे रूपानें, ताबडतोब व विनशर्त देतां आली नसती असें नाहीं. जमिनीच्या रूपानें, नुसत्या आश्वासनावर, व स्वतःचें नांव शाळेला देण्याचे अटीवर ती देणगी देण्याचें कांहींच कारण नव्हतें. बरें, आश्वासित जागा तरी निर्वेध व उपयोगाची असावयाची होती! पण तसें नसून ती पडीक, दलदलीची, व थोड्याफार वांध्यांतली आहे असें ऐकतों. अश्या माणसाचें अभिनंदन वाटलें तर सरकारनें करावें, पण आपण काय म्हणून करावें? राजेसाहेबांचें दातृत्व मोठें असेल तर त्याचें श्रेय त्यांना अवश्य मिळावें; पण धर्मशीलता, दयाळुत्व, औदार्य वगैरे गुणांचा संबंध दया, प्राणिमात्रां-विषयींची हितबुद्धि, मनाचा मोठेपणा वगैरे भावनांशीं असल्यामुळें, व या भावना राजेसाहेबांचे अंतर्यामीं तितक्या प्रमाणांत वसत नसल्यामुळें त्या गुणांचें श्रेय त्यांना मिळतां कामा नये येवढेंच माझें म्हणणें. या उप्पर बहुमताचे जोरावर तुम्ही वाटेल तें करूं शकतां."

निर्भीडरावांचें हें तावातावाचें बोलणें ऐकून बाबासाहेबांनाहि मोठा विचार पडला. नीति–अनीतीच्या शास्त्रशुद्ध अर्थानें पाहतां निर्भीडरावांचे म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे असें त्यांनाहि पटलें. कोणत्याहि कृतीचें मूल्यमापन करतांना नुसतें परिणामाकडे पाहून चालत नाहीं तर तिच्या हेतूकडे पाहावें लागतें हें खरें. व या दृष्टीनें पाहतां राजेसाहेबांची वागणूक कितपत शुद्ध, श्लाघ्य व अभिनंदनीय आहे असा त्यांनाहि प्रश्न पडला. तथापि "व्यवहारी माणसाच्या प्रत्येक कृतींत थोडाफार स्वार्थ हा असायचाच; तरी पण त्याच्याचबरोबर जर परार्थही साधत असेल तर तो स्वार्थ निंद्य न ठरतां एक प्रकारचा उन्नत व सात्विक म्हणून वंद्यच ठरतो" वगैरे प्रकारचें सांगून बाबासाहेबांनीं निर्भीडरावाचें समाधान करण्याचा कसा तरी प्रयत्न केला. पण तो व त्याचे दुसरे सहमत साथीदार जेव्हां अगदींच ऐकेनात तेव्हां 'विघ्नं कालेन योजयेत्' या व्यावहारिक धोरणाचा अवलंब करून तें अभिनंदन–प्रकरण त्यांनीं लांबणीवर टाकलें. राजेसाहेबांनींहि या एकंदर प्रकरणाकडे खिळाडू व उमद्या वृत्तीनें पाहून सर्व गोष्टी हसण्यावारी नेल्या; व त्यामुळेंच त्यांचें स्वभावदर्शन करवितांना झाल्या गेल्या गोष्टींचा आज पुन्हां उच्चार करतांना मला तितकेंसें अवघड वाटत नाहीं.

शिवाय मी पहिल्यांदांच सांगितलें आहे कीं हें सर्व 'परिहास विजल्पित' असून त्यांतील दोषदर्शन त्या त्या व्यक्तींनींहि मनावर घ्यावयाचें नाहीं. येवढें वरीक खरें, कीं जगांत सगळ्याचा उपयोग आहे—राजेसाहेबांच्या दिखाऊ औदार्याचा जसा आहे, तसाच निर्भीडरावांच्या निर्भीडपणाचाहि आहे. वंदकांच्या वंदनांतील अतिरेकाचा दोष काढून टाकण्याला निंदकांच्या निंदनाचा कडू काढाहि अधून-मधून कोणींतरी द्यावा लागतो. आणि याच अर्थानें 'निंदकाचें घर असावें शेजारीं' असें तुकोबारायांनीं म्हटलें आहे.

याच निमित्तानें बाबासाहेबांनीं खरें औदार्य व शुद्ध दया म्हणजे काय याचें विवेचन एका ऐतिहासिक उदाहरणावरू केलें तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. रणांगणावर जखमी होऊन पडलेला आणि तान्हेनें अत्यंत व्याकूळ झालेला सर फिलिफ् सिड्ने आपल्याकरितां आणलेला पाण्याचा पेला स्वतः घेत नाहीं; व "His need is greater than mine" असें म्हणून आपले शेजारींच विवळत पडलेल्या एका साध्या सैनिकाला तें पाणी आपण होऊन देतो! सर फिलिप्–अगोदर मुख्य सेनापति, त्यांतच आपल्या पक्षाला जय मिळवून देण्याकरितां प्राणाची

शिकस्त करून घायाळ होऊन पडलेला, व शिवाय तान्हेनें व्याकूळ झालेला. पुढें आलेलें पाणी त्यानें स्वतःच घेतलें असतें तरी सर्व दृष्टींनीं तें योग्यच झालें असतें. पण तश्याहि स्थितींत, त्याचे ठिकाणची दयेची भावना नुसती जागृत होते येवढेंच नव्हे, तर अशी कांहीं जोराची उसळी घेते कीं तिच्यापुढें प्रथम उद्भवलेला स्वार्थ पार नाहींसा होतो! सर फिलिप् सिड्ने यांची सेनापति म्हणून जी कीर्ति झाली आहे तिच्यापेक्षां त्यांची दयाळू व त्यागी म्हणूनच जास्त कीर्ति झाली आहे असें बाबासाहेब म्हणाले तें कांहीं खोटें नाहीं. दयेचें किंवा औदार्याचें रहस्य अश्या प्रकारें स्वार्थ व परार्थ यांच्या द्वंद्वयुद्धांत असून तें युद्ध जितक्या प्रमाणांत हिरीरीचें व निकराचें असेल तितक्या प्रमाणांत दया व औदार्य जास्त खुलून दिसतात.

सदरहु उदाहरणांत औदार्याच्या मुळाशीं दयेची भावना असलेली दिसून येते. पण दयेची भावना अजिबात नसतांहि केवळ कर्तव्यबुद्धीनें दाखविलेलें औदार्यहि कधीं कधीं दिसून येतें. आपल्या क्लबाचे कारकून जोशीबुवाच घ्याना. मॅट्रिक-मध्यें बराच वर नंबर आला असतांहि व कॉलेजमध्यें जाण्यासारखी एकंदर स्थिति असतांहि बिचारा टाइपिंग् शिकतो व निमूटपणें आपल्या क्लबांत साध्या कारकुनाची नोकरी धरतो. कां? तर आपल्याला व आपल्या सावत्र भावाला—दोघांनाहि—कॉलेजमध्यें पाठविण्याची ऐपत वडिलांना नाहीं म्हणून. स्वतःची पूर्ण पात्रता आहे; भाऊ बोलून-चालून सावत्रच असल्यामुळें त्याचेबद्दल मनांतून फारसें प्रेम वाटत नाहीं; वडिलांना फक्त एका कोणालाच तरी कॉलेजमध्यें पाठविण्याची ऐपत असून, जोशीबुवांनीं हट्टच धरिला असता तर वडिलांनीं त्यांनाच पाठविलें असतें अशी खात्री आहे; असें असतांनाहि केवळ कर्तव्यबुद्धीनें जोशीबुवा स्वतःच्या आकांक्षा बाजूला सारून आपल्या भावाचें हित पाहतात! याचें नांव खरें औदार्य! औदार्याबद्दल कोणाचें अभिनंदन करावयाचें असतें तर राजेसाहेबांपेक्षां जोशीबुवां-चेंच करणें जास्त योग्य झालें असतें. असो.

आतांपर्यंत एकाच तऱ्हेचीं म्हणजे ज्यांच्या ठिकाणीं फक्त गुणांचेंच प्राचुर्य आहे अश्या व्यक्तींचींच स्वभावचित्रणें झालीं. दोषयुत व्यक्तींचीं स्वभावचित्रेंहि काढतां येतील. पण तसें करण्याचा हा प्रसंग नसून त्यापासून कांहीं फायदाहि होण्यासारखा नाहीं. तेव्हां वास्तविक पाहतां आतां पुरें करायचें. पण गुपचूपपणें कोपऱ्यांत बसून दुसऱ्यांचीं स्वभाववर्णनें ऐकणारे ते जगदेवराव पहा. गृहस्थ माझे-

कडे मिश्कीलपणें पहात, व ‘ नानासाहेब, आतां तुमचें स्वतःचें चित्र काढा ना; बघूं कसं दिसतं. ’ असेंच जणूं कांहीं सांगत आहे.

आणि इतरांचें वर्णन करून झाल्यावर स्वतःचेंहि वर्णन करण्यास मला कोणीं सांगितलें तर त्यांत कांहींच वावगं नाहीं. शिवाय जन्मभर पातकें करून शेवटीं मरतांना त्यांची कबुली धर्मगुरूपाशीं दिली म्हणजे तो पातकी सर्व पापांतून मुक्त होतो असें जसें ख्रिस्ती लोकांना वाटतें, तसेंच माझ्या दोषांचा पाढा मीं आपणांपुढें वाचला म्हणजे इतरांचे दोष दाखविण्याच्या पापापासून माझीहि मुक्तता होईल असें मलाहि वाटतें. आणि म्हणून जगदेवरावांची जिज्ञासा तृप्त करण्याकरितां, माझ्या पापाचें प्रायश्चित्त घेण्याकरितां, व इतरांच्या गंमतींत भर घालण्याकरितां मी आतां आपलें स्वतःचें चित्र काढून आपणांपुढे ठेवीत आहें. मीं आपल्याकडून तें शक्य तितकें खरें काढलें आहे; पण त्यांतूनहि तें कोणास खोटें वाटल्यास माझा नाइलाज आहे.

ज्या व्यक्तींच्या स्वभावाचें मीं वर वर्णन केलें आहे, त्या व्यक्तींमध्यें कोणत्या ना कोणत्या प्रकारचा गुण किंवा दोष-प्रकर्षानें वसत असून तो स्पष्टपणें दिसूनहि येतो. डॉक्टरांच्या ठिकाणीं मोहक व आकर्षक व्यक्तिमत्व दिसतें, तर बापूसाहेबांचे दृष्टींत सौंदर्यासक्ति व वागणुकींत सदभिरुचि दिसून येते; हिराचंद शेटजींमध्यें एकप्रकारची शिताफी व धडाडी आहे, तर बाबासाहेबांमध्यें पोक्तपणा व समधातपणा आहेत; रावसाहेब विनीतांचे ठिकाणीं जरा भंपकपणा आहे, तर राजेसाहेबांमध्यें खऱ्या धर्मापेक्षां दिखाऊ दांभिकपणाच जास्त आहे; हे गुण किंवा दोष त्या त्या व्यक्तींमध्यें उत्कटत्वानें दिसून येत असल्यामुळें इतरांच्या प्रमाणें त्यांच्याहि ते चटकन् लक्षांत येतात, व इच्छा असल्यास ते त्यांना सुधारतांहि येतात. माझ्यामध्येंहि अशा प्रकारचे कांहीं गुण व कांहीं दोष आहेतच. पण ते तितक्या प्रमाणांत नसल्यामुळें इतरांना व मलाहि त्यांची जाणीव तितक्या उत्कटपणें होत नाहीं, व म्हणून ते सुधारले पाहिजेत अशी आंचहि मला लागत नाहीं.

ज्याला इंग्रजींत ‘ निगेटिव् कॅरेक्टर ’ म्हणतात तश्या प्रकारचा माझा स्वभाव आहे. मी डॉक्टरांप्रमाणें आकर्षक व लोकप्रिय नसलों तरी लोकांना मी अगदीं नकोनकोसाहि वाटत नाहीं. माझ्या कपाळाला आठ्या असल्या तरी मला पाहिल्याबरोबर लोकांच्या कपाळाला आठ्या पडून ते माझेपासून दूर राहतील असेंहि फारसें

होत नाहीं. विद्यार्थि-विद्यार्थिनी, सहकारी शिक्षक, व इतर मित्रमंडळी यांना मी थोडा-फार आवडतों असें मला तरी वाटतें. कारण, तसें नसतें तर मला निरोप देतांना ( व एरवींहि ) प्रत्येकानें ‘ तुम्ही गेलांत म्हणजे आम्हाला चुकल्याचुकल्या सारखें होईल ’ असें जें अगदीं मनापासून म्हटलें तें म्हटलें नसतें. बऱ्याच जणांना मी हवासा व यावासा वाटतो. तुम्हींच नाहीं का—आतां मी दूर असतांनासुद्धां मला आइस्क्रीम पार्टीकरितां मुद्दाम आठवण ठेवून बोलविलें ?

बापूसाहेबांप्रमाणें माझेमध्यें सौंदर्यासक्ति व सदाभिरुचि नसली तरी मला अगदीं बीभत्स, भयानक, किंवा अश्लील गोष्टीच आवडतात, अथवा माझे वागण्यांत अगदीं रुक्षता, रांगडेपणा किंवा हूप्पेपणा आहे असेंहि नाहीं. मलाहि सौंदर्याची आवड असून गायनादि कलांतील व क्रीडनादि कृतींतील आनंद उपभोगतां येतो; व सुसंस्कृत समाजामध्यें सुसंस्कृत चालीरीतींप्रमाणें वागायचें समजतें व. थोडें—फार साधतेंहि. हिराचंदांप्रमाणें किंवा आरुळकर मास्तरसाहेबांप्रमाणें माझेमध्यें कार्यनैपुण्य, शिताफी, धडाडी वगैरे गुण नसले तरी मी अगदींच आडमुठा, दडप्या, व धसमुसळ्या आहें असेंहि नाहीं. क्वचित्काळीं उत्पन्न झालेल्या अडीअडचणींतून मलाहि सामोपचारानें व तडजोडीनें मार्ग काढतां येत असून मीहि माझ्या लहानश्याच शाळेला अडचणीच्या प्रसंगांतून सुखरूपपणें पार पाडूं शकलों आहें. प्रो. विचाऱ्यांप्रमाणें मी मोठासा व्यासंगी व अभ्यासी नसलों तरी विद्येचें व माझें अगदींच वांकडें आहे असेंहि नाहीं. मींहि थोडें—फार वाचलें आहे व लिहिलें आहे. मी राजेसाहेबांइतका प्रसिद्धिलोलुप नसलों तरी प्रसिद्धीचें मला अगदींच वावडें आहे असेंहि नाहीं. मलाहि ‘ तेवढेंच ज्ञानप्रकाशांत ’ असें वाटून वर्तमानपत्रांतून आपलें नांव यावें अशी इच्छा असते; आणि फोटो आला म्हणजे तर विचारावयासच नको !

मी बाबासाहेबांइतका समधात व समतोल वृत्तीचा नसलों तरी प्रपंचांतील बऱ्या—वाईट प्रसंगांना मींहि त्यांचेप्रमाणें धैर्यानें तोंड दिलें असून, अद्यापपर्यन्त तरी सुखानें हुरळून गेलों नाहीं किंवा दुःखानें होरपळून गेलों नाहीं. बाबासाहेबांप्रमाणें माझे अंगांत खरोखरचा पोक्तपणा व विचारीपणा नसला तरी मलाहि पोक्तपणाचा आव आणतां येतो, व लोक कधीं कधीं माझाहि सल्ला घेतात. ( त्यांना माझ्या सल्ल्याचा फारसा उपयोग होत नाहीं ही गोष्ट निराळी ! ) जोशीबुवांसारखें शुद्ध औदार्य माझे ठिकाणीं नसलें तरी, थोडीशी झीज सोसायची माझीहि तयारी असते. कोण-

त्याहि सत्कृत्यांत किंवा चांगल्या चळवळींत मी जातीनें भाग घेत नसलों तरी तिला माझी पूर्ण सहानुभूति असून तत्प्रीत्यर्थ कांहीं वर्गणी वगैरे देण्याची पाळी आली तर मी फारशी खळखळ करीत नाहीं. सरकारी नोकरीला चिकटून राहून मीं जशी पैशाची हाव धरली नाहीं, तशीच देशकार्याच्या खाईंत उडी घेऊन सर्वस्वाचा होम करण्याची धडाडीहि दाखविली नाहीं.

मलाहि आडलेल्या–नाडलेल्यांची कींव व दया येते. त्या दयेचें रूपान्तर प्रत्येक खेपेस कृतींत होतेंच असें नसलें तरी, तें दृश्य मला निगरगट्टपणानें पाहवतें असेंहि नाहीं. कालचीच गोष्ट सांगतों. गॅलरीमध्यें उभा असून हातां-तलें केळें खाण्याच्या बेतांत होतों. इतक्यांत एक म्हातारी भिकारीण येऊन माझेकडे केवीलवाणें पाहूं लागली. माझ्यापेक्षां जास्त चांगल्या माणसानें तिला तें केळें देऊन टाकलें असतें. माझ्या हातून कांहीं तें केळें त्यावेळीं देववलें नाहीं; पण तेथेंच उभें राहून तिच्या देखत तें खाववलेंहि नाहीं. मीं जें केलें तें येवढेंच कीं मी गॅलरींतून आंत आलों व ती भिकारीण दिसेनाशी होईतों पुन्हां गॅलरींत गेलों नाहीं. त्या वेळीं ही सर्व कृति इतकी नकळत व झटकन् झाली कीं आतां मला तिचें थोडेसें आश्चर्य व विषाद वाटत आहे. सारांशानें सांगावयाचें म्हणजे मी जात्या सुष्टहि नाहीं किंवा दुष्टहि नाहीं.

चांगलें किंवा वाईट–कोणतेंच विशेषण लावतां न आल्यामुळें आपण एकायाला नुसतेंच भला किंवा good natured म्हणतों; तेंच वर्णन मला लागूं पडे-लसें दिसतें. पण माझे ठिकाणीं दिसणारा चांगूलपणा किंवा भलेपणा अकारण व अकरण ( negative ) स्वरूपाचा असतो. मी किंवा माझ्यासारखीं माणसें चांगलीं कां ? तर आम्ही वाईट नाहीं म्हणून. माझेसंबंधीं गोष्टी निघाल्या असतां, माझ्या एका आप्तांनीं माझें वर्णन एका वाक्यांत केलें तें असें—'He is good, but good for nothing.' या एकाच वाक्यांत माझ्या स्वभावाचें सर्व सार भरलें आहे असें मला वाटतें. सर्वांचें चांगलें असावें, सर्वांनीं आपल्यावर राजी असावें, जें तें आपआपलें पाहून घेईल, त्यांच्या उठाठेवींत पडून आपल्याला करा-वयाचें आहे काय, ते बरे—आपण आपण आपले बरे, अश्या वाक्यांतून ज्या स्वभावाचा बोध होतो तसला स्वभाव माझा आहे. कोणत्याहि चांगल्या गोष्टींतील चांगूलपणाचा उत्कट परिणाम माझ्या मनावर होणार नाहीं, व त्याला अनुरूप अशी

वागणूक माझे हातून घडणार नाहीं. वाईट गोष्टींबद्दल मला चीड–त्वेष वगैरे येणार नाहींत, व त्यांचा प्रतिकार करण्याची लढाऊ वृत्तीहि माझेमध्यें नाहीं. खोल व दूरवर विचार, निश्चित निर्णय, व उत्कट भावना यांवर आधारलेल्या वागणुकींत जो पीळदारपणा, बाणेदारपणा व तेजस्वीपणा दिसून येतो तो माझे ठिकाणीं नसल्यामुळें माझें एकंदर वर्तन बिन् बुडाचें, बिन् धराचें व भोंगळ स्वरूपाचें असतें. कोणतीहि गोष्ट धडाडीनें करायला जी शक्ति व श्रद्धा लागते ती माझेमध्यें नसल्यामुळें माझे वृत्तींत एक प्रकारचा मवाळपणा किंवा आळणीपणा आलेला आहे.

जुन्या पिढींत जन्मलों–वाढलों असल्यामुळें जुन्या जमान्यांतील कर्मठपणा व सकुंचित वृत्ति हीं माझ्यामध्यें उतरलीं आहेत; पण पुढें–पुढें नव्या पिढीशीं संबंध जडल्यामुळें, त्यांच्या वृत्तींतील मतौदार्य व चालढकलपणा हींहि माझ्यामध्यें शिरलीं आहेत. पण हे दोन्ही प्रकारचे गुण परस्परांना छेद देत असल्यामुळें माझे ठिकाणीं शून्यापेक्षां जास्त कांहीं उरलें नाहीं. या शून्यत्वाची चीड येऊन, सुष्ट होण्याचें आपल्या नशिबीं नसलें तर निदान दुष्ट तरी व्हावें असें हल्लीं पुष्कळ वेळां मनांत येतें. आपल्या विरुद्ध मताच्या माणसांशीं खूप खसमसून भांडावें, असलेल्या थोड्याफार शक्तीचा व अधिकाराचा दुरुपयोग करून इतरांवर आपला वचक बसवावा, हेक्यानें व आततायीपणानें ऐकादी गोष्ट—मग ती वाईट कां असेना—करून टाकावी, भीड–भाड न धरतां बेगुमान वृत्तीनें वागावें अश्या प्रकारची इच्छा अधूमधून होते. पण तसें वागण्याची वेळ आतां निघून गेल्यामुळें तेंहि जमणें शक्य नाहीं; अश्या प्रकारें नको असलेल्या अकरणात्मक सुष्टपणांतच समाधान मानावें लागत आहे. बाकीच्या सर्व इच्छा व नाद विफळ होऊन गेल्यामुळें आतां एकाच गोष्टींत मनाला विरंगुळा वाटतो; आणि ती म्हणजे जगांत उघड्या डोळ्यानें वावरावें, मनुष्यस्वभावाचें निरीक्षण करावें, आणि आपल्याला जें कांहीं बरें–वाईट दिसतें तें इतरांना सांगावें व बोधावें. त्यांनीं ऐकलें तरी वाहवा, न ऐकलें तरी वाहवा ! मीं तरी कोणाचें ऐकलें आहे व त्यापासून योग्य तो बोध घेऊन स्वतःमध्यें सुधारणा केली आहे ?

सन्मान्य मित्रांनो, प्रसंग लहानसाच असून मीं इतकें विवरण कां केलें याचें कारण माझी ही आवड व विरंगुळा होय हें आतां तुम्हांला समजलेंच असेल; व त्याबद्दल तुम्ही मला दोष देणार नाहीं अशी आशा आहे. सर्व कळून केवळ वळतां न आल्यामुळें आत्मोन्नतीच्या बाबतींत अपेशी ठरण्याची पाळी जशी माझ्यावर आली तशी

तुम्हां कोणावर येऊं नये, उलट तुमची उत्तरोत्तर उन्नति व बरकत होत जावी येवढीच इच्छा आहे. असो.

पार्टीचे प्रसंगीं प्रत्यक्ष हजर राहून क्लबाची सेवा करतां आली नाहीं तरी लेखरूपानें जें कांहीं थोडें करतां आलें तें गोड करून घ्या; व वर्णनाचे भरांत भान न राहून कोणाचा कांहीं अपमान झाला असल्यास त्याची क्षमा करा अशी विनंति करून आपली रजा घेतों.

आपला-स्नेहांकित
नानासाहेब

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# हितपत्रें

ना. म. पटवर्धन

## वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| फुलें आणि दगड | सायंकाल |
| घरट्याबाहेर | अविनाश |
| पहिलें प्रेम | मंदाकिनी |
| जळलेला मोहर | सहा भाषणें |
| क्रौंचवध | कलिका |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | |
|---|---|
| अवशेष | माझी नभोवाणी |
| नागकन्या | नवे संसार ( जप्त ) |

चंदनवाडी

## ना. धों. ताम्हनकर

तात्या भा. १ ला | निवाडे भा. १ ला

तात्या भा. २ रा

## साने गुरुजी

पुनर्जन्म | आस्तिक

## चिं. वि. जोशी

आणखी चिमणराव

नवें भारूड | स्टेशनमास्तर

## दत्तु बांदेकर

सख्या हरी | नवी आघाडी

## द. र. कवठेकर

अपुरा डाव | रेशमाच्या गांठी

नवें जग ?–पु. य. देशपांडे
रॉयचरित्र–भाई वेके
काव्यज्योति–प्र. ले. वि. स. खांडेकर
पारंब्या–आनंदीबाई जयवंत
ढासळलेले बुरूज–लक्ष्मण० सरदेसाई
व्यक्तिचित्रें–प्रो. वि. ह. कुलकर्णी
स्मृति-लहरी–वा. म. जोशी
फसगत–ना. ह. आपटे
साखरपुडा–प्र. के. अत्रे
मीनाक्षीचें जीवन–कृष्णाबाई मोटे
चलती नाणी–र. गो. सरदेसाई
सौंदर्यशोध आणि आनंदबोध-रा.श्री.जोग
हितपत्रें–ना. म. पटवर्धन

# आमचीं प्रकाशनें

# पुढील प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| अश्रु | छाया भाग १-२ |
| बुद्ध आणि हिटलर | वालुका |
| चल ये राणी | कालचीं स्वप्नें |
| विसावें शतक | 'चारभिंती' |
| तिसरी भूक | मंजिऱ्या |
| वर्षाकाल | |

## ग. त्र्यं. माडखोलकर

तीन दिवस
व्यक्तिरेखा
ऋणभार
माझे आवडते कवी
चक्रवर्ती उदयन
उर्वशी

## चिं. वि. जोशी

गुंड्या भाऊ

## अनंत काणेकर

उघड्या खिडक्या
काळे आणि पांढरे
धुक्यांतून लाल ताऱ्याकडे

## ना. धों. ताम्हनकर

चकमकी | निवाडे भा. २ रा

गुजाताई

## कृष्णाबाई मोटे

मवाली | कलाक्षेत्रांत

## काकासाहेब कालेलकर

| | |
|---|---|
| ब्रह्मदेशचा प्रवास | स्मरण यात्रा |
| ग्रह आणि तारे | सत्याग्रही |

आपुलकीची झळ–द. र. कवठेकर
बेबीची वहीण–वि. वि. बोकील

REFBK-0006379